R E V

तुमची वित्तीय क्रांती

# कार्यनितीचे सामर्थ्य

O L U

गॅरी कीसी

T I O N

ख्रिस्तातील प्रिय मित्र,

ह्या शिक्षण संसाधना द्वारे तुम्हाला आशीर्वाद आणि प्रोत्साहन मिळावे हीच आमची प्रार्थना आहे! कृपया ही सामुग्री आपल्या मित्र, कुटुंबजन आणि आपल्या चर्चमधील सदस्य ह्यांना मुक्तहस्ते द्या. तसेच, तुम्ही FLNFree.com वर जाऊन अतिरिक्त प्रती डाउनलोड करू शकता आणि तुमच्या भाषेतील अधिक मोफत शिक्षण सामुग्री मिळवू शकता.

देव तुमच्यावर प्रेम करतो आणि त्याच्याकडे तुमच्या जीवनासाठी एक अद्भुत योजना आहे! देवाचे राज्य कसे कार्य करते हे शिकल्याने आमचे स्वतःचे जीवन बदलून गेले आणि आमचा विश्वास आहे की ह्या शिक्षणामुळे तुमच्या जीवनात देखील असेच परिवर्तन घडून येईल!

ख्रिस्तामध्ये प्रेमाने,

गॅरी आणि ड्रेंडा कीसी



P.S. तुमच्या भाषेतील अधिक मोफत शिक्षण सामुग्री डाउनलोड करण्यासाठी आमच्या मोफत डाउनलोड वेबसाइट FLNFree.com वर अवश्य भेट द्या!

R E V

तुमची वित्तीय क्रांती

# विश्रांतीचे सामर्थ्य

O L U

गॅरी कीसी

T I O N

Your Financial Revolution: The Power of Strategy, Marathi
Copyright © 2023 by Gary Keesee

Originally published in English
Copyright © 2019 by Gary Keesee
ISBN: 978-1-945930-14-0

Gary Keesee Ministries,
P.O. Box 779, New Albany,
OH 43054, USA

GaryKeesee.com

This book is a FREE GIFT from Gary Keesee Ministries and is NOT FOR SALE

तुमची वित्तीय क्रांती: कार्यनितीचे सामर्थ्य, मराठी

Copyright © 2023 द्वारा गैरी किसी

मूलतः इंग्रजी मध्ये प्रकाशित
Copyright © 2019 द्वारा गैरी किसी
ISBN: 978-1-945930-14-0

गैरी किसी मिनिस्ट्रीज़,
P.O. Box 779, न्यू अल्बेनी,
OH 43054, USA

GaryKeesee.com

हे पुस्तक गैरी किसी मिनिस्ट्रीज़ कडून बक्षिस आहे आणि विक्री साठी नाही

मला हे पुस्तक माझ्या पत्नी ड्रेन्डाला समर्पित करायचे आहे, कारण हे तिचे प्रोत्साहन, देवाच्या गोष्टींबद्दलची तिची आवड आणि तिच्या कुटुंबावर आणि माझ्यावरील प्रेमामुळे मला या सर्व वर्षांमध्ये प्रेरणा मिळाली आहे. आम्ही एकत्रितपणे हे सिद्ध केले आहे की स्वप्ने खरोखरच सत्यात उतरतात!

गॅरी कीसी

# विषय सूची

**प्रस्तावना** ....................................................................................9

**अध्याय 1:** आम्ही काय करावे असे तुम्हाला वाटते? ........................................21

**अध्याय 2:** राज्य ..............................................................................33

**अध्याय 3:** विस्मित...........................................................................41

**अध्याय 4:** मुलतत्वे: या शिवाय घर सोडू नका.................................................57

**अध्याय 5:** पवित्र शास्त्रीय पुरावा ..........................................................73

**अध्याय 6:** सर्व अन्य भाषेत प्रार्थना करतात काय?...........................................81

**अध्याय 7:** संपत्तीची/ धनाची तिजोरी..........................................................93

**अध्याय 8:** बढतीची कठीण जागा .............................................................109

**अध्याय 9:** शांत, मंद वाणी......................................................................119

**अध्याय 10:** दृष्टांत आणि स्वप्ने..............................................................133

**अध्याय 11:** पवित्र आत्मा मला माझ्या बॉस सारखा वाटतो. ............................145

**अध्याय 12:** कशी प्रर्थना करून पवित्र आत्म्याचा बाप्तिस्मा मिळवावा.................159

# प्रस्तावना

आर्थिक क्रांती: युव्हरचनेचे/कृतीयोजनेचे सामर्थ्य हे पुस्तक आर्थिक क्रांतीच्या साखळीतील तिसरे पुस्तक आहे. एकंदर पाच पुस्तके असतील. 2005 मध्ये अल्बानिया येथे जी कोन्फारंस झाली तिचे ही पुस्तके विस्तारित लिखाण आहेत. या कॉन्फरन्स मध्ये माझ्या जीवानातील दिशेत नाटकीय बदल झाला. ही गोष्ट जर तुम्ही ऐकली असेल तर ही प्रस्तावना टाळून तुम्ही सरळ अध्याय 1 कडे वळाल. परंतु ह्या गोष्टीबद्दल तुम्ही ऐकले नसेल तर त्याबद्दल (blue haze) मला तूम्हाला सांगू द्या. Blue haze,? हे काय आहे? मला प्रश्न समजला. जेंव्हा मी ते पहिले तेंव्हा मलाही ते माहित नव्हते. परंतु देवाचे सामर्थ्य इतके शक्तिशाली होते की मला हे समजले कि ते देवापासून आहे. मला ती गोष्ट सांगू द्या.

माझी पत्नी आणि मी आम्ही दोघांनी आमचे विवाहित जीवन कर्जात सुरु केले, आणि नऊ वर्षे आम्ही कर्जातच होतो.

आम्ही फक्त कर्जातच होतो असे नाही तर ती परिस्थिती सहन करीत असतांना त्याच्यामुळे समस्या, भय आणि तणाव निर्माण झालेला होता.. आर्थिक दृष्टीने आमचे जीवन खालावेल असा आमचा उद्देश नव्हताच तरी आम्ही तेच केले. आम्ही सुरुवातीला ग्यासोलीन क्रेडीट कार्ड घेतले, नंतर विसा कार्ड घेतले , नंतर दहा विसा कार्ड्स घेतले. जेंव्हा विसा कार्डवर आणखी पैसे देवू शकलो नाही तेंव्हा आर्टिक संस्थेद्वारा 18 तो 23 टक्के व्याजावर कर्ज घेवून पैसे देण्याचा प्रयत्न केला परंतु आम्ही पुन्हा कार्ड्स घेतली परंतु आमचे कर्ज वाढतच गेले. सरतेशेवटी आम्ही सर्व क्रेडीट कार्ड्स, तीन कर्ज देण्याऱ्या संस्थांकडून घेतलेले कर्ज आणि आय, आर एस TAX मुळे, हजारो dollars साठी मिळलेला अधिकार हे सर्व गमावून बसलो. आणि इतर लहान लहान कर्ज फेडता येईनात. दंत तज्ञांचे पैसे, कपडे धुण्याचे पैसे,आमच्या आई –वडिलांचे एक लाख डॉलर्स. दोन कार्स चे पैसे, घरभाड्याचे पैसे,,...लिस्ट वाढतच

जाईल. त्यावेळी आम्ही आम्हाला मिळणाऱ्या कमिशन वर अवलंबून होतो. मी तणाव खाली होतो, तान कमी करण्याची औषधे घेत होतो. परंतु त्यामुळे काही फायदा होत नव्हता.

आमच्या जवळ जे होते ते सर्व कोलमडले. आमच्या कार्स 2 लाख मैल चालल्या होत्या. आमचे शेतातील घर जे आम्ही 300 डॉलर्स प्रतीमहा भाड्याने घेतले होते त्याबाबतही काही समस्या निर्माण झाल्या. त्या घराच्या जुन्या खिडक्या तुटल्या-फुटल्या होत्या. पैसे नसल्यामुळे त्याला आम्ही फक्त टेप लावला होता. परंतु ते पुरेसे नव्हते. बाहेरील वेली-झुडपे तुटलेल्या भेगांमधून आत आलेल्या होत्या. माझी पत्नी देन्द्रा त्यांना थोडेफार कापत असे जणू काय ते घराच्या डेकोरेशनचा भाग होते.मुलांच्या झोपण्याच्या खोलीतील सतरंजी रस्त्यावरील कचऱ्याच्या डब्ब्यात होती, त्यांच्या गाद्या आजाऱ्याच्या खोलीत टाकून दिलेल्या होत्या, प्रत्येक सामान ग्यारेजमध्ये कमी किंमतीत विकण्यासाठी किंवा कचऱ्याच्या डब्ब्यात होते.

जीवन ही काही गम्मत नाही. प्रतेक दिवशी उठल्यावर एकच प्रश्न, आज कुटुंबाला कसे जेऊ घालावे? माझे जीवन भीतीने ग्रासून गेले होते, आमचा आनंद, आशा जीवन जगण्याच्या गोंधळात होरपळून गेले होते. या अवस्थेत मी व देन्द्रा लांबच लांब नाऊ वर्षे राहत होतो. एखादा महिना किंवा एखादे वर्ष मी समजू शकतो . परंतु नऊ वर्षे? नऊ वर्षात तुमचा तणाव, तुमच्या भावना ह्या शिळ्या होतात, आणि सहनशिलतेला जणू अस्तित्वच राहत नाही.

या नऊ वर्षात आम्ही ख्रिस्ती होतो, उपासनेला ला जात असू, दशांश देत असू. मंडळीत आम्हाला शिकविले जायचे की देवाच्या लोकांनी गरीब असावे ही देवाची इच्छा नाही. परंतु देवाचा विश्वासूपणा व त्याच्या वचनात जे सांगितले होते ते काही दिसत नव्हते. मला जुन्या करारात पदवी होती व बायबल स्कूल मध्ये एक वर्षापेक्षा जास्त दिवस अभ्यास केला होता. काहीतरी चूक होते आहे असे मला जाणवत होते परंतु सरते शेवटी परिस्थिती बदलेल असे वाटत होते. परंतु नऊ वर्षे तसे काही घडले नाही. बिल्स गोळा करणारे दररोज फोन करीत होते आणि मी व देन्द्राने सर्व अशा सोडली होती.

हे सर्व असतांना डॉक्टरने मला सांगितले की माझे स्वाथ्य बिघडत होते व मधुमेह होण्याची सुरुवात दिसत होती. पैसे नव्हते, प्रत्येक क्रेडीट कार्ड रद्द झाले होते व घरात खाण्यासाठी जेवण नव्हते. माझे जीवन कष्टाने पिळवटून गेले, आणि घर सोडून जावे लागते कि काय अशी भीती मला वाटू लागली. माझी पत्नी विचार करू लागली की लेकरांना घेऊन तिने तिच्या

आईवडिलाच्या घरी जावे. या विचाराने तिच्या पतीला ती गमावणार होती. आणि याच सर्वात खालच्या पातळीवर मी असतांना माझ्या जीवनाने एक वळण घेतले.

अशात, माझ्या वकीलाने फोन करायला सुरुवात केली, आणि त्याचे पैसे मी देईल हे अभिवचन मी त्याला देत राहिलो. परंतु त्याचे पैसे देण्यासाठी पैसे कधी आलेच नाही. एके सकाळी मला त्याचा फोन आला, त्याची सहनशीलता संपलेली होती. तो म्हणाला, “ तीन दिवसाच्या आत मला माझ्या फीचे पैसे हवेत नाही तर मी कोर्टामध्ये तुझ्याविरुद्ध दावा ठोकीन. त्या क्षणी मला कळले की आता ढोंग करणे बस झाले. माझ्याजवळ पैसे नव्हते, व माझ्या कुटुंबातील लोकही मला पैसे देऊ शकत नव्हते. अगदी निराश-अवस्थेमध्ये मी वरच्या झोपण्याच्या खोलीत पायऱ्या चढून गेलो, बिछान्यावर पसरलो, व देवाला ओरडून विनंती केली. आणि अगदी चमत्कारिक रीतीने, माझ्या मनात देवाने मला ताबडतोब उत्तर दिले. पहिले म्हणजे त्याने मला एक वचन दिले की जे मी ऐकले होते व अनेक वेळा वाचलेही होते. फिलीपैकारास पत्र 4:19 .

*“माझा देव आपल्या संपत्यनुरूप तुमची सर्व गरज ख्रिस्त येशूच्या ठाई गौरवाच्या द्वारे पुरवील.”*

अर्थात हा शास्त्राभाग मला माहित आहे.मी देवाला म्हणू लागलो “ परंतू माझ्या जीवनात तर हे घडत नाही. माझ्या सर्व गरजा पूर्ण झालेल्या नाहीत.” देवाने मला उत्तर दिले, “ तू ज्या गोंधळात आहे त्याबद्दल मला काही कर्तव्य नाही. तू ह्या गोंधळात आहेस कारण माझे राज्य कसे काम करते हे तुला कधी समजलेच नाही.” दुसऱ्या आणखी काही गोष्टी देवाने मला सांगितल्या आणि मला संदेश मिळाला की: देवाची इच्छा नाही की मी कर्जात असावे.....

देव माझ्याशी बोलला हे पाहून मी रोमांचित झालो, परंतु मी कबुल करतो की राज्याचा अर्थ मला समजला नव्हता. माझ्याजवळ पवित्र शास्त्राची पदवी होती आणि मला वाटत होते की मला पवित्र शास्त्र बऱ्यापैकी माहित आहे. परंतु मी चूक होतो. देवाचे हे शब्द ऐकल्यावर मी पहिली गोष्ट केली आणि ती म्हणजे मी देन्द्राकडे गेलो आणि मी त्यांना गोंधळाच्या स्थितीत आणले म्हणून तिच्याजवळ पश्चाताप केला. मग आम्ही दोघांनी प्रार्थना केली आणि राज्य कसे

काम करते हे आम्हाला शिकविण्यास देवाला विनंती केली. कर्जावर आम्ही अवलंबून राहिलो म्हणून पश्चाताप केला, आणि नीर्णय घेतला की येथून पुढे आम्ही कर्जावर अवलंबून राहणार नाही. वास्तवात, मला जरो पवित्र शास्त्राची पदवी होती तरी त्या वेळी देव-राज्य हे माझ्यासाठी एक रहस्य होते. नव्या करारात येशूने शिकविलेल्या प्रार्थनेत "राज्य' शब्द वापरलेला एवढेच मला आठवत होते.

*"तुझे राज्य येओ, जसे स्वर्गात तसे पृथ्वीवरही तुझ्या इच्छेप्रमाणे होवो.* (मत्तय 6:10)

देव आम्हाला काय संगाण्याचा प्रयत्न करीत होता हे खऱ्या अर्थाने आम्हाला समजले नव्हते. परंतु जस जसे आम्ही त्याला शोधण्याला सुरुवात केली तस तसे त्याने आम्हाला शिकविण्यास सुरुवात केली. पहिली गोष्ट आम्ही पाहण्याचा प्रयत्न केला की राज्य म्हणजे काय आणि देवाने तो शब्द का वापरला. देव आम्हाला काय सांगत होता? काही शोध घेतल्यानंतर आम्हाला समजले की राज्य म्हणजे फक्त लोकांचा समुदाय नाही. राज्य म्हणजे असा लोक-समुदाय की जो राज्य-व्यवस्था व राजा यांच्या क्षेत्रीय अधिकाराखाली राहतो. खऱ्या अर्थाने राज्य म्हणजे "राजाचे अधिपत्य." राज्याचे अधिपत्य, अधिकार आणि त्याचे कायदे हे राजाच्या क्षेत्रात त्याच्या शासन व्यवस्थेसह प्रत्येक नागरिकाला लागू असतात. येथे महत्वाची किल्ली माझ्यासाठी आहे: देवाचे राज्य म्हणजे शासन-व्यवस्था. आणि शासन-व्यवस्थेत कायदे असतात.

सर्व साधारण बहुतेक ख्रिस्ती लोक जसे देवाकडे पाहतात तसे मीही पाहत होतो. देव काय करू शकतो याची चुकीची समजूत मला होती. मी असे गृहीत धरून चालत होतो की देवाला जे पाहिजे ते तो पाहिजे तेंव्हा करू शकतो. मला माहित आहे की या पुस्तकात मी जे सांगणार आहे ते चूक आहे असे तुम्ही म्हणाल.

परंतु मला पुढे जाऊ द्या. कारण मला माहित आहे की देवाला जे पाहिजे ते तो पाहिजे तेंव्हा केंव्हाही करू शकतो. मी पाहिले की ज्या प्रार्थनेचे उत्तर मिळत नाही त्यात केलेली विनंती देवाने नाकारलेली असते. या अनीश्चीततेमुळे मला अशा निर्माण झाली की देव उत्तर देईल. आतापर्यंत माझ्या प्रार्थनेत देवाच्या दयेसाठी ओरडून सांगणे व भिक मागणे एवढेच

होते.. देवाचे लक्ष माझ्याकडे वेधण्यासाठी माझी स्थिती गंभीर आहे अशी अशा करू या. परंतु देवाने मला शिकवायला सुरुवात केली की *त्याचे संपूर्ण राज्य ही एक शासन-व्यवस्था आहे की ज्यात कायदे असून ते आम्ही शिकले पाहिजेत व त्याचा उपयोग करायला पाहिजे. मी प्रभावित झालो. मी शिकलो की जेंव्हा मी ख्रिस्ताकडे येतो तेंव्हा मी वारसदार होतो व त्याच्या मोठ्या राज्याचा नागरिक बनतो.*

> *“तर ह्यावरून तुम्ही आतापासून परके व उपरे नाहीत, पण पवित्र जनाच्या बरोबरीचे नागरिक व देवाच्या घराचे आहात.”* (इफिस. 2:19)

हे वचन वाचल्यावर व विचाराअंती मला समजले की *देवाच्या राज्यात मला कायदेशीर अधिकार आहेत. परंतु हे इतके सोपे आहे काय? अमेरिकेचा नागरिक या नात्याने जे माझे आहे त्यासाठी मला भिक मागण्याची किंवा विनंती करण्याची गरज नाही, मी अमेरिकेचा नागरिक आहे हे सिध्द करण्यासाठी मला रोमांचित होण्याची गरज नाही. कारण माझा जन्म अमेरिकेत झाला आहे. जेंव्हा मी देवाराज्यात जन्मलो तेंव्हा मी त्याच्या राज्याचा नागरिकही झालो. म्हणजेच त्या राज्यातील प्रत्येक कायदा आणि मिळणारे फायदे यासाठी मी कायदेशीर रीतीने जाऊ शकतो, ते माझ्यासाठी आहेत.* परंतु त्यावेळी अनेक ख्रिस्ती लोकांसारखे मला व देण्ड्राला देव-राज्य व त्या राज्याचे कायदे माहित नव्हते.

जेंव्हा कठीण प्रसंगांना तोंड द्यावे लागते तेंव्हा अनेक लोक म्हणतात, “देवच असे होवू देतो, आमच्यासाठी काय उत्तम आहे हे देवाला ठाऊक आहे, सर्व त्याच्या अधिकाराखाली आहे, देव सार्वभौम आहे...” वरील विधानांवरून हे दिसते की आमच्या प्रश्नांना उत्तरे देण्याचे सामर्थ्य देवाजवळ आहे परंतु त्याची इच्छा नाही किंवा या बाबतीत सहभागी होण्याचा त्याने निर्णय घेतलेला नाही. देवाचे गुणवैशिट्ये किंवा देवाच्या राज्याचे कार्य कसे चालते हे माहित नसल्यामुळे वर वर्णन केलेल्या चुकीच्या गोष्टी आम्हाला खऱ्या वाटतात.

मी काय म्हणत आहे हे मला सांगू द्या. तुमच्या बँक मध्ये तुमचे 100 कोटी डॉलर्स आहेत तेव्हा तुम्ही म्हणाल, “ माझ्याजवळ 100 कोटी डॉलर्स आहेत.” परंतु प्रत्यक्षात तुमच्या खिशात 100 कोटी डॉलर्स नाहीत. वास्तवात, एका संस्थेत 100 कोटी डॉलर्स आहेत, व ते

तुमच्याजवळ येण्यासाठी काही कायदेशीर बाबी कराव्या लागतात. देव राज्याचे असेच आहे देवाच्या कुटुंबाचा सभासद व राज्याचा नागरिक म्हणून तुम्ही राज्याचे वारसदार आहात. परंतु आमचे कायदेशीर जे आहे ते मिळविण्यासाठी आम्हाला काही कायदेशीर बाबी कराव्या लागतात.

बहुतेकांना देवाराज्य त्याचे कायदे, व ते कसे चालते याची कार्यपद्धती समजत नाही. म्हणून जेंव्हा देवाच्या वचनाप्रमाणे काही गोष्टी घडत नाही तेंव्हा त्यांना वाटते की त्यांच्या मध्ये नाही तर देवाच्या उद्दिष्ठा मध्ये काहीतरी चूक आहे. येथे मला एक गोष्ट सापडली. समजा तुम्ही निर्णय घेतला की न्यू यार्क येथील स्टेट एम्पायर बिल्डिंगवरून पराशुट शिवाय तुम्ही उडी मारणार आहात. आणि तुमची खात्री आहे की तुमचे हाथ पसरून तुम्ही उडी मारल्यास तुम्ही अगदी सहज जमिनीवर उतरू शकता.

मला वाटते या मूर्खपणाच्या कृतीचा काय परिणाम होईल हे तुम्हाला माहित आहे. तुम्हाला हा परिणाम माहित आहे कारण गुरुत्वाकर्षणाचा नियम तुम्हाला माहित आहे. या नियमाला पक्षपातीपणा माहित नाही किंवा कोणाची बाजूही घेत नाही. प्रत्येक ठिकाणी ते सारखेच काम करते, म्हणून तुम्हाला परिणामाची खात्री आहे.

तसेच एखाद्या लाईट चे बटन तुम्ही दाबले तर प्रकाश निर्माण होईल याची तुम्ही अपेक्षा करता. कारण विजेचा नियम तुम्हाला माहित आहे. जेंव्हा मी विमानात बसतो तेंव्हा उमान उडेल हे मला माहित आहे कारण उडण्याचा नियम मला माहित आहे, विमान उडणे, बल्ब प्रकाशने, हे होत राहते, कारण, ते काही नियमांच्या आधारे होते. तेच नियम वापरून तोच परिणाम आम्ही दुसरीकडे पाहू शकतो. याच प्रमाणे देवाचे राज्य निश्चितपणे काही नियामानुसर चालते

> *त्याच्याजवळ येण्यास आपल्याला जे धैर्य आहे ह्यावरून की आपण त्याच्या इच्छेप्रमाणे काही मागितले तर तो आपले ऐकेल; आणि आपण जे काही मागतो ते तो ऐकतो, हे आपल्याला ठाऊक आहे, महणून ज्या मागण्या आपण त्याच्याजवळ केल्या आहेत त्या आपल्याला मिळाल्या आहेत हेही आपल्याला ठाऊक आहे.*
>
> (1 योहन 5:14-15)

हाच आपला आत्मविश्वास आहे आपले धैर्य आहे. जर देवाच्या इच्छेनुसार आपण काही मागितले तर आम्हाला माहित आहे की तो ऐकतो, आणि तो ऐकतो हे जर आपल्याला माहित आहे, तर आम्ही जे मागितले ते आमच्याजवळ मिळालेआहे हे आम्हाला माहित आहे. जे मिळेल त्याबद्दल मला आत्मविश्वास आहे कारण देवानेच ते नियम बनविलेले आहेत. त्याचे नियम, कायदे यांना तो पुष्टी देईलच. अगदी भौतिक पद्धतीने तो आपले शब्द ऐकतो असे नाही, एखादा न्यायाधीश योग्य न्याय देण्याच्या दृष्टीने जसे ऐकतो तसे देव ऐकतो. एखादा न्यायाधीश न्याय देतो ते स्वताच्या भावनेच्या आधारावर देत नाही तर कायद्यानुसार नागरिकांना सर्व सुविधा, फायदे मिळावेत हे समजून तो न्याय देतो. एखाद्या कोर्ट मधील केसचा शेवट काय होईल हे ती केस सुरु होण्याअगोदर मला माहित असते.

देवाराज्याचे कायदे आमच्या जीवनात आम्ही लागू करू लागलो तेंव्हा आमच्या जीवनात अनेक वाखाणण्या जोग्या गोष्टी आमच्या जीवनात घडल्या याचा अनुभव आम्ही घेतला. दोन वर्षात आम्ही पूर्ण कर्जमुक्त झालो. आमच्या तीन लेकारामध्ये आम्ही भोजनाचा आस्वाद घेऊ लागलो. नवीन कार्स साठी आम्ही पूर्ण रक्कम भरली. आणि 55 एकरांमध्ये आम्ही आमचे स्वप्नातील घर बांधले व सर्व पैसे भरले. आम्ही त्या वेळी ज्या संस्था तयार केल्या त्यांच्या उत्पादनात आम्हाला लाखो डॉलर्स चा नफा अजूनही होत आहे. मग आमच्या मुळ-गावात आम्ही देवाराज्याबद्दल आम्हाला काय सापडले ते

सांगण्यासाठी एक मंडळी स्थापन केली. आणि आम्हाला हे कळून चुकले की देव राज्य चांगले जीवन जगण्यासाठी केली काय देते हे जाणून घेण्याची अनेक लोकांची इच्छा होती. देव-राज्याच्या उत्तम बातमीमुळे तेंव्हापासून मंडळीत वाढ होवू लागली व आता आमची संख्या जवळजवळ एक हजार आहे

ज्यांना ऐकण्याची इछा असेल त्या एका व्यक्तीला किंवा गटाला ज्यानी कधीच हा अनुभव ऐकला नाही तो सांगण्याची माझी इच्छा आहे. देव-राज्याबद्दल समजण्यासाठी मला एक सत्रापेक्षा ज्यास्त वेळ लागू शकतो हे मला माहित आहे. मेथोडीस्ट मंडळीत वाढत असतांना मला हा अनुभव मला आला की ज्यामुळे कार्य होते.. जेंव्हा मी लहान होतो तेंव्हा आमच्या मंडळीत दररोज संध्याकाळी एक आठवडाभर सभा असायच्या. म्हणून या आर्थिक बाबी बाबत मला वाटते आपण एक आठवड्याच्या सभा घ्याव्यात, जर तुमची इच्छा असेल तर.

मला वाटते पाच संध्याकाळ त्यासाठी पुरे आहेत. या अगोदर देव-राज्याबद्दल एकानंतर एक असे पद्धतशीर रीतीने मी शिकविलेले नाही म्हणून या गोष्टी कशा मांडाव्यात हे अजूनही मला माहित नाही. तरी जे पाच दिवसांचे सत्र मी या अगोदर घेतली त्याचा ज्यांनी ते ऐकले त्यांच्यावर त्याचा काय प्रभाव पडला ते पाहून मी उत्सुक झालो आहे. म्हणून अशी सत्रे घेण्यासाठी मी प्रार्थना करायला सुरुवात केली व संधींची मी वाट पाहू लागलो. ज्यांनी या अगोदर हे कधीच ऐकले नाही त्या गटाला हे शिकवावे ही माझी अट आहे.

एका दुपारी, अल्बानिया या ठिकाणी मिशनरी कार्य करणाऱ्या माझ्या एका मित्राकडे मी गेलो. मंडळी आणि सेवाकार्य याबद्दल असलेल्या पुष्कळ पैलूंबद्दल आम्ही बोलत होतो आणि शेवटी देव मला जे काही दाखवत आहे त्याकडे आमची चर्चा वळली. माझा मित्र लोरी देशातील वार्षिक सेवा-कॉन्फरंस त्या वर्षी हिवाळ्याच्या अगोदर घेणार होता व कॉनफरंस मध्ये एक वक्ता म्हणून मला आमंत्रण दिले. मला पाच सत्रांची गरज आहे हे मी सांगितले नाही, परंतु मला तीन सत्र घ्यावे लागतील हे ऐकल्यावर मी रामंचित झालो. माझा व येणाऱ्या अनेक पालकांचा खर्च मला करावा लागेल हेही त्याने मला सांगितले कारण अल्बानिया हा भाग त्यावेळी खूप गरीब होता. मी सहमती दर्शविली आणि अल्बानिया येथे येण्याची माझी योजना मी आखली.

शेवटी तेथे जाण्याची वेळ आली आणि देवाराज्याबद्दल शिकवायला मी खूपच उत्सुक होतो. विशेष म्हणजे हे लोक नवीनच होते व ख्रिस्ती म्हणजे काय हे शिकत होते. अल्बानिया च्या विमानतळावर लोरी मला भेटला व सांगितले की एक वक्ता येत नाही म्हणून मला पाच सत्र घ्यावे लागतील.

मला खात्री झाली की हे पवित्र अत्म्यानेच घडवून आणले. माझ्याजवळ तीन सत्रांचे लिखाण होते परंतु मी प्रार्थना केली आणि दोन सत्रांच्या नोट्स काढल्या. मला थोडी भीती वाटली लोक कसा प्रतिसाद देतील याचे कारण त्यांची गरिबी खूप होती आणि भ्रष्टाचार सर्व देशात पसरलेला होता.

पहिल्याच सत्रामध्ये लोक थोडे चलबिचल झाले, हयगय करू लागले, परंतु जशी मी पुढे सुरुवात केली व देवाने मला जे शिकविले त्यासंबंधीच्या घडलेल्या गोष्टी पुस्टी देण्यासाठी त्यांना सांगितल्या तेंव्हा ते आनंदी झाले उत्सुकही झाले. चौथ्या सत्राच्या वेळी तर ते हसू लागले आणि ते इतके आनंदी झाले की त्यांनी ओरडायला सुरुवात केली. पाचव्या सत्राच्या

शेवटी दान जमा करावे असे देवाने मला सांगितले, हे चमत्कारिक होते. मी चमत्कारिक हा शब्द वापरला, कारण ज्या लोकांना सत्राला येण्यासाठी मी पैसे दिले होते व ज्यांच्याजवळ फारच कमी पैसे होते किंवा जवळजवळ नवतेच त्यांना मी सांगत होतो. मला वाटले की लोक जे ऐकत होते त्यावर त्यांनी अंमलबजावणी करावी. माझा मित्र लोरीला थोडे कसेतरीच वाटले, परंतु त्याने ताबडतोब त्याला होकार दिला. अर्थात ते पैसे मी घेणारच नव्हतो तर अल्बानिया येथील मंडळयांसाठी देणार होतो.

शेवटचे सत्र आले , तुमचा विश्वास कसा मोकळा सोडवा याबद्दल काही नियमांचे स्पष्टीकरण करून मी शिक्षण देत होतो. सत्राच्या शेवटी जेंव्हा मी वर्गणी घेतली तेंव्हा सर्वकाही मोकळे झाले होते. देवाच्या अभिषेकामुळे प्रेक्षक गृह भरून गेले व लोक ओरडून नाचू लागले. चार लोक वर्गणीच्या थैल्या घेऊन उभे होते पण त्यांना उभे राहायला कठीण जात होते. जेंव्हा लोक दान आणत होते वर्गणी घेणारे देवाच्या सान्निध्यात ओरडत होते व हालत होते. अशा प्रकारची सभा विशेषरीतीने दान/वर्गणी घेण्याच्या बाबतीत मी कधी पाहिली नव्हती.

मी आणि लोरीने मीटिंग समाप्त केली. सामर्थ्याने झालेला लोकांचा अभिषेक आणि लोकांनी दिलेला प्रतिसाद याबद्दल आम्ही अचंबित झालो होतो.

माझा मित्र लोरीच्या घरी आल्यानंतर लोरीला दान मोजण्याचे खुप उत्सुकता होती कारण दोन दानपेट्या भरलेल्या त्याने कधी पहिल्या नव्हत्या. आदल्या वर्षी 1/4 दानपेटी भरली होती असे त्याने सांगितले. जेंव्हा लोरीने आपल्या टेबलवर ते पैसे ओतले, तेंव्हा निळसर प्रकाशाने ती खोली भरून गेली, आणि यापूर्वी कधीही न अनुभवलेला अभिषेक आमच्यावर झाला. आम्ही आमच्या जागेवर मागच्या बाजूला झुकलो त्याशिवाय आम्ही काहीच करू शकलो नाही. मी पैशाकडे पहिले तेंव्हा एक लग्नाची अंगठी मला तेथे दिसली. ज्याच्याजवळ पैसे नव्हते अश्या कोणीतरी व्यक्तीने ती अंगठी टाकलेली होती. त्याच्याजवळ जे होते ते त्याने दिले होते. मी ती अंगठी पाहिल्यावर देव माझ्याबरोबर बोलला. “ आर्थिक आशीर्वादाचा करार देशांना सांगण्यासाठी मी तुला पाचारण करीत आहे. आणि ज्या ठिकाणी मी तुला पाठवील त्या ठिकाणाचा खर्च मी देईन.”

मी काहीच करू शकलो नाही. तीन दिवस मी झोपू शकलो नाही. हा अभिषेक अनेक आठवडे माझ्यावर होता. मला वाटत होते अशाच प्रकारचा अभिषेक दुसऱ्या देशातही होईल.

त्या वेळचे ते दान जरी अल्बानिया प्रांतासाठी होते लोरी ने यातील ती अंगठी मात्र मला पाठविली. मी रोमांचित झालो. मला ती अंगठी हवी होती पण तसे मी लोरी ला सांगितले नाही. परंतु देवाने ते त्याला सांगितले आणि अंगठी मला पाठविण्यात आली. देवाने मला जे सांगितले त्याची आठवण म्हणून मला ती अंगठी हवी होती. आणि आज मी ती माझ्या घरातील भिंतीवर लावलेली आहे.

ओहायओ या राज्यात माझ्या घरी मी गेलो तेंव्हा लोरीचा एक पाळक मित्र एका लहान मंडळीचा पाळक होता. त्याने ऐकले की अल्बानिया येथे काय घडले. म्हणून त्याने माझ्याशी संपर्क साधला व शक्य असल्यास त्याच्याकडे जावे अशी विनंती केली. ज्या ठिकाणी तो पाळकीय सेवा करीत होता तेथील लोक फार गरीब होते. ती मंडळी फक्त 60 लोकांची होती. मी त्याला सांगितले हरकत नाही मी येईल. त्या ठिकाणीही मी पाच सत्र घेतले जे अल्बनियात घेतले होते. परंतु या ठिकाणी मला निळसर प्रकाश दिसला नाही, परंतु अभिषेक मात्र खूप मजबूत होता. या ठिकाणचे दान मात्र माझ्या सेवाकार्यासाठी होते.

मी पैशाची थैली माझ्या घरी ओहायओ ला नेली व ऑफीस मध्ये आल्यावर माझ्या सेक्रेटरी ला पैसे मोजायला सांगितले, व मी दुपारचे जेवण घेण्यासाठी निघून गेलो. जेवत असतांना माझा सेल फोन वाजू लागला . माझा सेक्रेटरी चा नंबर होता. जेंव्हा मी बोलण्यासाठी फोन उचलला तेंव्हा पलीकडून कोणी बोलले नाही. मी फोन करणारच होतो तेंव्हा मला ऐकू आले, ट्रेसी? मी म्हटले ट्रेसी बोलत आहे. माझ्या सेक्रेटरीच्या भावना समजून घेण्याचा मी करत होतो. ती म्हणाली " पाळकसाहेब, या पैशासाम्बंधाने उटाह या ठिकाणी काय झाले? " "तुला काय म्हणायचे आहे," मी म्हणालो. ती म्हणाली, " जेंव्हा मी पैशाची थैली माझ्या टेबल वर ओतली तेंव्हा आकस्मिक रीतीने देवाचा अभिषेक माझ्यावर झाला आणि मी जमिनीवर पडले."

आवाज ऐकून दुसरी सेक्रेटरी काय झाले ते पाहण्यासाठी आली, आणि देवाच्या सामर्थ्याने तिलाही माझ्यासाराखेच झाले. पाळकसाहेब या पैशाचे काय?" मी म्हटले की उटाह याठिकाणी मी पैसे गोळा करतांना असाच सामर्थ्यशाली अभिषेक झाला, परंतु याशिवाय दुसरे काही झाले नाही. मला याठिकाणी कबुल करावे लागेल की मी देखील गोंधळून गेलो होतो कारण असे की मी कधी पहिले नव्हते व ऐकलेही नव्हते. जरी मला ते समजले नाही तरी हे स्पष्ट होते की अभिषेक त्या पैशावर होता.

मग आम्ही आर्थिक-क्रांती-कॉन्फरंस (Financial Revolution Conferences) घेण्यास सुरुवात केली. मोठे किंवा लहान मंडळया किंवा जे ऐकण्यास उत्सुक आहेत त्या ठिकाणी आम्ही जाण्यास सुरुवात केली. काही ठिकाणीच आम्ही निळसर प्रकाश पहिला पण अभिषेक फार सामर्थ्यशाली होता. अल्बानिया आणि उटाह येथील इंडियन मंडळयात दानांवर अभिषेक होता या इतर ठिकाणी देखील होता. मी पहिले की मिटिंग संपल्यावर व दान घेतल्यानंतर जर एक नाणे तुम्ही हातात घेतले तर तुम्ही पवित्र आत्म्याच्या सामार्थ्याखाली हलु लागता. आणि आणखी एक महत्वाची गोष्ट म्हणजे प्रत्येक नाणे किंवा चेक वेगळा होता. प्रत्येकाला समान पातळीचा अभिषेक नव्हता.

मी हे शिकलो की प्रत्येक व्यक्तीने दान घेण्याच्या वेळी जो विश्वास मोकाळ्यारीतीने दाखविला होता त्याचे प्रात्यक्षिक म्हणजे हा अभिषेक होता. अद्भुत आहे!

तुमची पाच पुस्तकांची “Financial Revolution” ही मालिका म्हणजे अल्बानिया येथे मी जी पाच सत्रे घेतली तीच आहेत. अर्थात पहिल्या कॉनफरन्स मध्ये जे शिकविले त्यापेक्षा त्या पुस्तकात थोडे दीर्घ लिखाण आहे. देव-राज्याबद्दल मी व देन्द्राने जसा अभ्यास केला तसा तुम्ही अभ्यास करायला लागाल तेंव्हा प्रत्येक बाबतीत झालेला बदल तुम्ही पाहाल. मालिकेतील हे तिसरे पुस्तक आहे त्याला सुरुवातीला “ Wealth by the Holy Spirit” हे नाव होते ज्या नावाने मी अल्बानिया मध्ये शिकविले होते. माझा विश्वास आहे की आजही ते खरे आहे. पावित्र आत्म्याच्या प्रेरणादाई युव्ह-रचनेने तुम्ही वृद्धिंगत होतो.. माझी आशा आहे की या पुस्तकामुळे तुम्ही हे शिकाल की पृथ्वीवर पवित्र आत्मा त्याची युव्ह-रचना कशी अमलात आणतो.

अध्याय 1

# आम्ही काय करावे असे तुम्हाला वाटते?

मी जेंव्हा अलबानिया वरून घरी आलो तेंव्हा मी गोंधळून गेलो होतो.देवाने आमच्य आयुष्यात कसा प्रभाव टाकला आणि त्याने मला इतर इतर देशांमध्ये तीच गोष्ट करायला सांगितले हे मन भरून टाकणारे होते. देशांमध्ये?? मी देण्द्राशी जेंव्हा लग्न केले तेंव्हा तिला सांगितले होते की मला प्रवास आवडत नाही, आणि दुसऱ्या देशांमध्ये मिशन-ट्रीप वर जाणे मला नको होते. परंतु अर्थातच देवाच्या योजना वेगळ्याच होत्या. मला इतर देशांमध्ये जायचे होते पण कसे? माझ्याजवळ माझा व्यवसाय बहुतेक पूर्ण अमेरिकेत चालत होता. त्यामुळे माझी मंडळी, माझे कुटुंब व इतर बऱ्याच जबाबदाऱ्या पार पडत होत्या. इतर देशांत कसे जावे हे मला दिसत नव्हते. परंतु देवाजवळ योजना होती. ती योजना म्हणजे मला प्रवास करण्याची गरज नव्हती. ह्या योजनेचा मी कधीच विचार केला नसता किंवा तसा विचार करायला मला आवडले नसते. ती योजना म्हणजे “टेलीव्हीजन”

टी.व्ही बद्दल मला किंवा ड्रेन्डा ला काहीच माहित नव्हते. त्यावेळी आम्ही व्हिडीओदेखील काढत नसू. परंतु काय येणार होते आणि त्याबद्दल काय करावे हे देवाने आम्हाला दाखवायला सुरुवात केली, आणि टी.व्ही बद्दल विचार करायला आम्ही विचार करू लागलो. पहिली गोष्ट मला कळाली की टी.व्ही कार्यक्रम करण्यास खूप पैसे लागतील. सर्व गोळाबेरीज केल्यावर मला समजले की पहिल्या वर्षी 3 लाख डॉलर्स लागतील. टी.व्ही साठी इतका खर्च येईल हे कळल्यावर मला धक्काच बसला. महत्वाची गोष्ट महणजे आमच्या चर्च ने Now Center बांधण्याचे काम हाती घेतले होते त्यातच खूप खर्च होणार होता.

आणि टी.व्ही. साठी आमच्याजवळ पैसे नव्हते. हिच गोष्ट मी देवाला सांगितली की टी.व्ही. कार्यक्रमासाठी आमच्याजवळ पैसे नाहीत. आणि देव म्हणाला बरोबर आहे. परंतु तू आणि देन्द्रा त्यासाठी पैसे देणार आहात.

हे ऐकून आम्ही हतबल झालो असे म्हणणे थोडे कमीपण आणणारे होईल. आमच्या मंडळीचे जवळ जवळ 60 ते 70 लाख डॉलर्स चे एक केंद्र उभारण्याची योजना होती. आमचे केंद्र बांधण्याची योजनाच विश्वासावर अवलंबून होती व त्यासाठी येणारा पैसा व इतर मदत त्यासाठीच खर्च होत होती. या कामासाठी मी व देन्द्राने 2 लाख 50 हजार डॉलर्स देण्याचे अभिवचन दिले होते आणि ते पैसे अजून जमा झालेले नव्हते. व आता या दुसऱ्या कार्यासाठी 3 लाख डॉलर्स लागणार होते, व तेही त्याच वर्षी. ही गोष्टी अश्यकच वाटत होती.

परंतु मला माहित होते की माझा प्रवास हा देवच होता. आणि ज्याठिकाणी तो मला पाठवणार होता ती गोष्ट अजूनही माझ्या कानात घुमत होती, व पैसे पुरविण्याचे त्याचे अभिवचन मला होते. परंतु स्वाभाविक तीत्या विचार करता आम्ही जे करत आहोत त्याच्याही पुढे जाऊन 3 लाख डॉलर्स कसे जमा करायचे हे मला दिसत नव्हते. परंतु मला माहित होते कि देव विश्वासू आहे आणि त्याच्यावरील विश्वासात तो मला काय दाखविणार हे पाहण्यासाठी पुढे पाऊल टाकायचे होते. मला तुम्हाला सांगू द्या की माझ्या निर्णयाबद्दल मला काळजी नव्हती. माझे वैयक्तिक पैसे मी दिलेल्या वचनानुसार 2 लाख 50 हजार डॉलर्स देण्यासाठी जाणार होते. आणि आमच्या बिसिनेस साठीही मला पैसे खर्च करावयाचे होते. आणि म्हणून टी.व्ही कार्यक्रम सुरुकरण्यासाठी लागणारे 3 लाख डॉलर्स आमच्या जवळ नव्हते.

**परंतु मला माहित होते कि देव विश्वासू आहे आणि त्याच्यावरील विश्वासात मला तो काय दाखवणार हे पाहण्वासाठी पुढे पाऊल टाकायचे होते.**

देन्द्रा आणि मी दोन आठवड्यासाठी हवाई येथे सुट्टीला गेलो होतो. परत आल्यावर मला टी.व्ही. कार्यक्रमासाठी करार करायचा होता. हवैतले आमचे दिवस चांगले गेले, परंतु मी हे कबुल करतो की टी.व्ही. कार्यक्रमाचे ओझे माझ्या मनातून घालवणे कठीण होते. पैसे हा एक मुद्दा तर होताच पण क्यामेऱ्यासमोर बोलणे मला कठीण वाटत होते. एखाद्या मीटिंग मध्ये हजारो लोकांसमोर मी बोलू शकत होतो, परंतु टी.व्ही. समोर बोलण्यासाठी मला भीती वाटत होती. हे विचार मनात असतांना मी माझ्या भीतीबरोबर झगडत होतो.

देव याबाबत माझ्याबरोबर बोलला याची मला खात्री होती, तरी पैसे नाहीत ह्या गोष्टीला मी तोंड देत होतो. माझा बिझिनेस आर्थिक दृष्टीने तणावाखालीच होता, म्हणून हे कसे होईल

ह्याची शक्यता मला दिसत नव्हती. होय मला भीती होती, हा अविश्वास होता. मला माहित आहे की या ठिकाणी मी प्रामाणिक आहे. परंतु मला मिळालेला शब्द मी धरून ठेवणे मला भाग होते. माझे लक्ष या गोष्टीपासून दूर करून अंगठीवर लावावेत हे मला माहित झाले. देवाने सांगितले होत की तो म्हणजे देव येणारा खर्च भरेल. यावेळी वर्गणी मध्ये एकदा एक सोन्याचे नाणे आले होते. अगदी प्रामाणिकपणे सांगतो की सोन्याचे नाणे मी याअगोदर पहिले नव्हते. ते नाणे समोर धरल्यावर देव माझ्याबरोबर बोलला, “ कर भरण्यासाठी जसे मी पेत्राला एक नाणे दाखविले तसे टी.व्ही कार्यक्रमासाठी कोठे पैसे शोधायचे हे मी तुला दाखवील”?

आमच्या हवैई बेटावर जातांना मी ते नाणे बरोबर घेतले होते. आणि ते नाणे हातात घेऊन समुद्र किनाऱ्यावर फिरतांना मी स्वतःला म्हटले की देवाने टी.व्ही.कार्यक्रमाचा खर्च भरला आहे. समुद्राकाठची माझी ट्रीप अशी झाली. कार्यक्रमाच्या करारावर मी सह्या करतांना मला शांती मिळणार होती. परंतु 20 ते 50 फुट टेकडीवर गेल्यावर माझे मन मला पुन्हा ओरडून सांगू लागले भौतिक दृष्टीने पैश्यासाठी कोणताही मार्ग नाही. वास्तुस्थिती अशी होती की आमच्या जवळ पैसे नव्हते व टी.व्ही कार्यक्रम कसा करायचा हे आम्हाला माहित नव्हते.

आमच्याजवळ काही साधन नव्हते. यादी मात्र वाढत होती. परंतु तू जेथे जशील त्या ठिकाणाचा खर्च मी पुरवील हे मात्र अल्बानियात देवाने मला सांगितले ते माझ्या मनात मला सतत ऐकू येत होते. आता मे महिना ला होता आणि खऱ्या अर्थाने वर्षाच्या शेवटी माझ्याजवळ 3 लाख डॉलर्स टी.व्ही. कार्यक्रमासाठी हवे होते. ही गोष्ट म्हणजे फार मोठा पर्वत चढण्यासारखे हे होते.

भयाचा आत्मा देवाने मला जे सांगितले ते धरून ठेवतांना माझी परीक्षा घेत होता. तो म्हणत होता, “आर्थिक सचोटीबद्दल तू शिकावितोस पण तूच तुझे बिल्स भरू शकत नाही त्याचे काय?” हे ऐकल्यावर मी समुद्रकिनारी जाऊन फेऱ्या मारून प्रार्थना करीत असे व देवाच्या शब्दाबद्दल माझे मन पुन्हा नवीन करून मनाला शांती मिळेपर्यंत हे करीत असे. एक आठवडाभर हे मी केले; सर्व काही चांगले होईल आणि नकारात्मक विचारांची भीती मला त्रास देणार नाही असे होईपर्यंत मी असे करीत होतो. आम्हाला हवे असलेले पैसे कोठून मिळतील हे मला व देन्द्राला ठाऊक नव्हते. परंतु आम्हाला कळले की आम्ही देवाचे शब्द ऐकलेले आहेत. घरी परत आल्यावर मी करारावर सही केली आणि टी.व्ही. कार्यक्रम कसा करायचा हे आम्ही तयार करू लागलो.

पैशाच्या बाबतीत मात्र असे घडले की हवैई ला सुट्टीला जाण्याअगोदर काही महिन्यापूर्वीच ओळख झालेल्या अटलांटा येथील एका गृहस्थाचा मला फोन आला. तो म्हणाला की त्याने आर्थिक बाबीवरील माझे पुस्तक वाचले आणि त्याला ते फार आवडले. त्यावेळी माझे पुस्तक मीच प्रकाशित केले होते व फक्त माझ्याच शहरात त्याची विक्री झाली होती. मला असे दिसून आले की माझ्या ऑफिस मध्ये काम करणारा एकजन अटलांटा येथे सुट्टीला गेला होता व या गृहस्थाबरोबर आर्थीक बाबीवर त्याचे बोलणे झाले होते. या गृहस्थाची व त्याची विमानतळावर सहज भेट झाली होती. माझ्या कर्मचाऱ्याने माझे पुस्तक त्याला वाचायला दिले होते.

ते पुस्तक वाचल्यावर त्या गृह्स्ताला ते इतके आवडले की माझ्याबरोबर बोलावे असे त्याला वाटले. आम्ही बराच वेळ बोललो व मला कळले की तो एक इकडे तिकडे फिरणारा सुवार्तिक आहे. आणि त्याचा भर विदेशामधील सुवार्तेच्या कामावर होता. मला भेटण्याची इच्छा त्याने दाखविली. आणि मी त्याला सांगितले की एका महिन्यात मी अटलांटाला येणार आहे.

माझी सुट्टी संपल्यावर एका सभेसाठी जातांना हे होणार होते. आम्ही भेटावे याबद्दल माझी सहमती झाली. जेंव्हा आम्ही भेटलो तेंव्हा आमचे खूप चांगले संभाषण झाले. त्याच्याबाबतीत घडलेल्या अद्भुत गोष्टींबद्दल व प्रवासातील अडचणींबद्दल ऐकून मला खूप आनंद झाला. आणि आर्थीक बाबतीत आम्ही खूप एकमेकांशी जुळल्या गेलो. कर्जातून बाहेर पडण्याबद्दळ मी जे लिहिले होते त्यामुळे तो खूपच आकर्षिल्या गेला.

बोलतांना त्याने सांगितले कि charlotte येथे झालेल्या त्याच्या टी.व्ही. कार्यक्रमानंतर तो नुकताच परत आलेला होता आणि त्या कार्यक्रमामध्ये माझ्या आर्थिक बाबीतल्या गोष्टी जर सांगितल्या तर खूप चांगले होईल. माझे पुस्तक तो त्या लोकांना देणार आहे असे त्याने मला सांगितले. की जेणेकडून त्यांना माझ्याबद्दल कळेल. या संपूर्ण गोष्टी ऐकून मला धक्काच बसला.

त्याने सांगितलेल्या टी.व्ही. कार्यक्रमाबद्दल मी कधीच ऐकले नव्हते . परंतु काही आठवड्यानंतर त्या टी.व्ही संचालकाचा मला फोन आला व मला विचारले की त्यांच्या टी.व्ही. साठी मी यावे. एक अट होती ती म्हणजे, त्या कार्यक्रमात एका उत्पादनाबद्दल जाहिरात होती. मी त्यांना सांगितले की माझ्याजवळ आर्थिक क्रांती बद्दलच्या पाच सी.डीज. होत्या. ते म्हणाले ही गोष्ट योग्यच आहे.

मग त्यानंतर दुसरा धक्का देणारा माझ्याच मंडळीतला एक गृहस्थ मला भेटला . काही वर्षांपूर्वी तो आर्थिक दृष्टीने तुटून गेला होता व मंडळी सोडण्याचा त्याचा विचार होता. परंतु आता तो आला व माझ्या टी.व्ही. कार्यक्रमासाठी मदत करावी ही त्याची इच्छा होती. त्याने देवराज्याबद्दल माझ्याकडून ऐकले होते व आता तो दरिद्री नव्हता. त्याने मला 1 लाख 20 हजार डॉलर्स टी.व्ही. साठी दिले.

माझ्या सीडी विकून आलेला पैसा, माझी मित्राने दिलेले पैसे, आणि इतर दाने हे एकत्र केल्यावर त्या पहिल्या वर्षी मला आणि देन्द्राला आमच्या खिशातून काहीही देण्याची गरज भासली नाही. देव त्याने दिलेल्या वाचनात विश्वासू होता. त्याने म्हटले होते की तो देईल आणि त्याने दिले. पैशामुळे अर्धा प्रश्न सुटला होता, परंतु एक मोठा प्रश्न अजून तसाच होता आणि तो म्हणजे मी मागे सांगितल्यानुसार मला टी.व्ही. कार्यक्रमाबद्दल काहीच माहित नव्हते.

हिवाळा सुरु होण्याच्या अगोदर स्त्रियांच्या एका मोठ्या कॉन्फरन्स साठी देन्द्राला आमंत्रण होते. सभांच्या मधल्या काळात एका कलाकाराच्या खोलीत सर्व पाहुणे जमत असत; देन्द्राला त्या ठिकाणी आमंत्रण होते; हा एक सन्मान होता. आमंत्रण पाहून ती रोमांचित झाली होती. एका सत्रानंतर देन्द्रा जेवणासाठी बसली असतांना एक स्त्री जिला देन्द्रा कधीही भेटली नव्हती ती देन्द्राजवळ येऊन बसली.एकमेकीची ओळख करून घेतल्यानंतर त्या स्त्रीने विचारले,”

“तुम्ही टी.व्ही. कार्यक्रम कधी केला काय?” देन्द्रा थोडी घाबरली. ती म्हणाली आतापर्यंत आम्ही केला नाही पण त्याबद्दल विचार करीत आहोत. ती स्त्री म्हणाली, “ठीक आहे, तसे असेल तर या माणसाला फोन कर.तो युम्हला मदत करेल.” देन्द्राने त्याचा फोन नुंबर व इ-मेल लिहून घेतला व आपल्या bag मध्ये ठेवला.

दोन आठवडे घरी आल्यानंतर निघून गेले. आणि तिच्या पिशवीत ठेवलेला कागद ती जवळपास विसरून गेली. परंतु एके रात्री तो कागद सापडल्यावर तिने त्या गृहस्थाला इ-मेल करण्याचा विचार केला. इ-मेल वाचल्यावर त्यात त्याला रुची वाटली व आर्थिक क्रांतीबद्दल च्या माझ्या सीडी. त्याने आमच्या सीडी पाठविण्यास सांगितले आणि आम्ही पाठविलेही..एक आठवड्यानंतर त्याच्या सहाय्यकाने फोन करून सांगितले की त्य गृहस्थाला आमच्या कामात आवड नीर्माण झालेली आहे व तो “national Religious Boroadcasters” च्या वार्षिक कॉन्फरंस मध्ये आम्हाला भेटू इच्छितो. ही कॉन्फरंस दोन आठवड्यानीच होणार होती.

आम्ही तीथे येऊ असे आम्ही त्याला सांगितले. आम्ही तेथे पोहोंचलो. मिटिंग साठी मी काला सूट शिवला होता, परंतु तरी काय अपेक्षा करावी कळत नव्हते; आम्निराशच होतो. त्याने आम्हाला त्याच्या हॉटेल मधील अलिशान खोलीमध्ये भेटायला व टीव्ही. कार्यक्रमाबद्दल चर्चा करण्यासाठी बोलावले . बोलावले.

आम्ही त्याच्या अलिशान दोन दारे असलेल्या खोलीच्या जवळ गेलो. दरवाजा ठोठावण्याच्या अगोदर मनाला थोडी शांतता मिळण्यासाठी हॉल मधेच आम्ही काही फेऱ्या मारल्या. त्या अलिशान खोलीत गेल्यावर आम्हाला दिसले की तेथे आमच्याबरोबर बोलण्यासाठी अनेक लोक बसले होते. आम्हाला आश्चर्य वाटले. सर्व खुर्च्या अर्ध-गोलाकार ठेवल्या होत्या. त्यांच्याकडे तोंड करून मी व देन्द्रा बसलो. आम्ही त्यांना कधीही भेटलो नव्हतो. ते अगदी व्यवसायिक कपडे घालून बसले होते.

आम्ही काही थोडे बोलण्यास सुरुवात केली. परंतु त्यांनी आम्हाला टीव्ही. कार्यक्रमाबद्दल प्रश्न विचारण्यास सुरुवात केली. पहिला प्रश्न होता, "तुम्हाला टीव्ही कार्यक्रम कशासाठी सुरु करायचा आहे. त्या ठिकाणी जमलेले ते लोक टीव्ही कार्यक्रम तयार करण्याच्या वेगवेगळ्या शाखांचे उच्च पातळीवरचे अधिकारी होते.आम्हाला त्या वेळी ते माहित नव्हते. ज्या गृहस्थाला आम्ही संपर्क साधला होता तो तेथे होताच पण त्याशिवाय कार्यक्रम तयार करणारे, मार्केटिंग करणारे असे अनेक लोक उपस्थित होते व ते आम्हाला अनेक कठीण प्रश्न विचारत होते. सर्व झाल्यावर मला वाटले सर्व साधारण मिटिंग चांगली झाली. आम्ही आम्हीच होतो. कोणावर प्रभाव टाकण्याचा आम्ही प्रयत्न केला नाही तर देवाने आमच्यासाठी काय केले त्याच गोष्टी आम्ही त्यांना सांगितल्या. आमचा दृष्टांत, व आमची कळकळ त्यांना समजली असे आम्हाला दिसले. काही आठवड्यानंतर आपण पुन्हा भेटू व तपशीलवार चर्चा करू असे त्यांनी आम्हाला सांगितले.

काही आठवड्यानंतर आम्ही पुन्हा एकत्र आलो व टीव्ही. कार्यक्रम सुरु करण्याच्या योजना आखू लागलो. आम्ही एक गोष्ट ठरविली की एक फिल्म तयार करून ती घरीच दाखवावी. ज्याने ही मिटिंग घडवून आणली त्या गृहस्थाने विचारले की आमच्या घरीच भेटणे चांगले राहील त्याला आमचे घर बघायचे होते की जेथे ही फिल्म दाखविता येईल व पुढील शक्यता पाहता येईल.

तो दिवस आला जेंव्हा तो आमच्या घरी आला, आणि आम्ही बोलण्यासाठी बसलो. तोपर्यंत त्याच्या टीव्ही बद्दलचा इतिहास आम्हाला माहित नव्हता. फक्त जी स्त्री देन्द्राला भेटली होती व तिने या गृहस्थाचा नंबर दिला होता तेव्हढेच माहित होते. त्याने त्याची गोष्ट सांगण्यास सुरुवात केली.

त्याने केलेले टीव्ही. कार्यक्रम आणि आता चालू असलेले कार्यक्रम याबद्दल त्याने सांगितले. सर्व कार्यक्रमाची नावे घरातील (घरगुती) होती. मी भय-चकित होऊन मनात म्हटले, “हे देवा, या गृहस्थाला लॉसएन्जेलीस वरून माझ्या घरी कसे आणले? घाणरडे रस्ते असलेल्या देशांच्या या मध्य भागात कसे आणले?” आमचा पूर्ण कार्यक्रम म्हणजे शूटिंग, संपादन कार्य, आणि निर्माण कार्य, अगदी कमी पैशात करण्यास त्याने सहमती दर्शविली. प्रथम आमच्या घरातच आम्ही कार्यक्रम दाखवावा याच्याशी आम्हीही सहमत झालो.

ध्वनी-मुद्त्रीत करण्याचा पहिला दिवस आला, आणि मला कबुल करू द्या की मी काळजीत पडलो. मला टीव्ही चा काहीच अनुभव नव्हता . टीव्ही. कार्यक्रमाची आखणी कशी करावी हे मला माहित नव्हते; कॅमेऱ्या समोर मी कधीच बोललो नव्हतो. टीव्ही माझ्या जीवनातील एक भयावह उंबरठा होता जो मला ओलांडायचा होता, जिंकायचा होता.

**"जर तुमच्यापैकी कोणी संकटात आहे काय? त्याने प्रार्थना करावी"**
**–याकोब 5:13**

एक अंतकरण दुखाविणारी गोष्ट त्या पहिल्याच दिवशी घडली, त्यामुळे माझी अधीकच वाईट अवस्था झाली. त्या एका आठवड्यात ध्वनिमुद्रण करण्यासाठी ज्या निर्मात्याला पाठविले होते तो त्या रात्रीच निघून गेला. या निर्मात्याचा तरुण मुलगा त्याचा शेजारी त्याची कार मागे घेत असतांना त्याच्या कार खाली येऊन मरण पावला. निर्मात्याच्या सहाय्यकाने आम्हाला ही गोष्ट आम्हाला सांगितली. आम्ही ठरविले कि आमचे शूटिंग पूर्ण होईपर्यंत ही गोष्ट कोणाला सांगू नये. कसेतरी आम्ही आमचे काम पूर्ण केले. त्या एका दिवशी आम्ही तीन काराक्रामाचे ध्वनिमुद्रण पूर्ण केले, आणि अधिकृतपणे आम्ही टीव्ही वर आलो.

टीव्ही कार्यक्रम प्रसारित करायला सुरुवात झाली, परंतु कार्यक्रम प्रसारित करण्याच्या दिलेल्या वेळेसाठी पैसे कसे द्यायचे याची आम्हाला कल्पना नव्हती. देवाने आम्हाला शिकवायला सुरुवात केली की तो आम्हाला फक्त 3 लाख डॉलर्स कार्यक्रम तयार करण्यासाठी देईल असे नाही तर टीव्ही साठी दिलेल्या वेळेसाठी येणारा खर्चही देणार आहे. आम्हाला

पुष्कळ शिकायचे होते. लोक आम्हाला पैसे देतील याचा आम्ही विचारही केला नव्हता, इतके आम्ही नवीन होतो.

मला आठवते, माझ्या सेक्रेटरीने आमच्या प्रसारणाला सुरुवात झाल्यावर मला फोन केला होता. जेंव्हा मी तिला उत्तर दिले तेंव्हा ती शहारुनच गेली. तिचा आवाज थरथरता होता. ती मला म्हणाली, "पाळकसाहेब., तुमचा कार्यक्रम पाहिल्यावर एकाने मला 500 डॉलर्स चा चेक पाठविला. आणि पाळक साहेब, जेंव्हा मी चेक उचलला तेंव्हा तुम्ही इंडियन रिझर्वेशन या ठिकाणातून आणलेल्या पैशावर जसा अभिषेक झाला तसा यावरही झाला. " तू गंभीररीतीने सांगतेस काय?" मी अडखळत विचारले. "कोणीतरी आम्हाला पैसे पाठविले होते. तो चेक मिळेपर्यंत आम्हाला या कार्यक्रमासाठी लोक पैसे पाठवितील असे मला वाटलेच नव्हते. परंतु तेंव्हापासून लोकांनी पैसे पाठवायला सुरुवात केली. व आता प्रत्येक दिवशी प्रत्येक वेळेच्या क्षेत्रामध्ये आमचा कार्यक्रम चालत आहे. आमचे बिल्स दर वर्षी लाखो रुपयांच्या वर जात आहेत. देवाने दिलेला शब्द त्याने पाळला होता. तो नेहमी बिल्स भरतो.

देवाच्या आत्म्याचे ऐकून जीवनामध्ये त्याला पुढारीपण द्यावे हेच या पुस्तकाद्वारे सांगायचे आहे. पवित्र आत्मा लोकांच्या जीवनात त्यांना पुढे जाण्यासाठी व त्यांनी स्वप्न पाहिलेल्या मोठ्या गोष्टी करण्यासाठी कसे मार्गदर्शन करतो याचे एक उत्तम उदाहरण म्हणजे आमचा अनुभव. देवाचे राज्य कसे काम करते हे समजून घेण्याच्या आमच्या पात्रतेमुळेच देवाने आमच्या जीवनात कार्य केले असे नाही तर त्याचे मार्गदर्शन, सुज्ञता, आणि आमच्या गरजांना दिलेली उत्तरे दिली ते ऐकण्यासाठीही त्याने आम्हाला तयार केले. जर मी पवित्र आत्म्याचे मार्गदर्शन ऐकले नसते मी सांगितलेली गोष्ट घडलीच नसती. कधी कधी आम्ही काही अडचणी पाहतो की ज्यामुळे आमची अवस्था आशाहीन वाटते, परंतु देवाजवळ उत्तर आहे.

*"जर तुमच्यापैकी कोणी संकटात आहे काय? त्याने प्रार्थना करावी"* (याकोब 5:13)

का प्रार्थना करावी? कारण तुम्हाला त्याचे उत्तर, मार्गदर्शन, व संकटावरील उपाय ऐकायला हवा असतो. संकटाला तोंड देतांना मी व देन्द्राला हे दिसून आले की देव आम्ही विचार करतो त्यापेक्षाही ज्यास्त करू शकतो. काही आश्चर्यकारक व विलक्षण उपय व युव्हरचना तो तूमच्यासमोर ठेवतो, व जे तुम्हाला अशयक्य वाटते त्यावर तुम्ही मात करता.

पुष्कळदा, देवाचे उत्तर ऐकण्याची पात्रता म्हणजेच यश आणि अपयश, जीवन आणि मृत्यू यातील फरक आपण पवित्र आत्म्याचे ऐकणे या विषयावर या पुस्तकात मी खुप बोलणार आहे. परंतु पहिले मला आणखी एक उदाहरण हे सांगू द्या की पावित्र आत्मा आम्हाला कठीण काळात कशी मदत कार्य शकतो.

“Now Center” साठी आम्ही इमारत उभारण्याचे आमचे कार्य आम्ही सुरु केले. हे काम 65 लाख डॉलर्स चे होते आणि आम्ही 25 लाख डॉलर्स जमा केले होते. आणि बँकेतले काही पैसे वापरले होते. 18 महिन्याच्या या कामात आम्हाला काही पैसे मिळाले होते.550 सभासद असण्याऱ्या मंडळीसाठी हे फार खर्चिक काम होते.2007 च्या हिवाळ्याच्या अगोदर आम्ही भूमी खोदानीचे काम सुरु केले आणि 2008 च्या वसंत ऋतू पर्यंत सर्व काही सुरळीत चालू होते.2008 ची मंदी तुम्हाला आठवत असेल. यागोष्टीच्या मध्ये आम्ही बांधकाम सुरु केले. सर्व गोष्टींच्या किमंती छप्पर फाडून वर गेल्या होत्या. पोलादाची किंमत सुरुवातीच्या ठरविलेल्या किंमतीपेक्षा 3 लाख ने वाढली होती. हे फक्त एक उदाहरण आहे. सर्व गोष्टींच्या किंमती वाढल्या मुळे आमच्या ठरविलेली बजेट च्या बाहेर खर्चाने उंच भरारी मारली होती.

2008 च्या शेवटी आमच्या भागात आणि संपूर्ण देशात बँकांनी क्रेडिटवर पैसे देणे कमी केले होते आणि कर्ज देण्यामध्येही घट झाली होती. याच वेळी आमचा बांधकाम करणारा आमच्याकडे पैशाची मागणी करू लागला. बँकेने आमचे कर्ज मान्य केले होते. त्याला त्याच्या मदतनीसांना व इतर काही कामासाठी पैसे द्यावयाचे होते कि जे त्याने स्वतः खर्च केले होते. एक लाख डॉलर्स द्यायचे होते पण एक लाख डॉलर्स चा चेक हाताशी नव्हता आणि बँकेने मंदीमुळे आपले हात आखडते घेतले होते व आम्हाला कबुल केलेले कर्ज व क्रेडीटवर द्यायचे पैसेही कमी केले होते. आम्हाला धक्काच बसला. फक्त आमचीच बँक नाही तर शहरातील इतर बँकांची स्थिती अशीच होती. स्थानिक दैनिकात आमच्या बँकेचे नाव सर्वात वर होते. त्याच आठवड्यात बँकांनी 550 कर्मचारी काढून टाकले होते आणि आर्थिक व्यवहारात त्या कसेबसे अस्तित्व टिकवत होत्या.

बिल्डरला त्याच्या सहकाऱ्याचे आणि ज्या वस्तू त्याने विकत आणल्या होत्या त्यांचे पैसे द्यायचे होते. 10 लाख डॉलर्स त्याला भविष्यात वापरायचे नव्हते त्याने ते स्वतः खर्चे केलेले होते. दुसऱ्या काही कंपनी आणि कुटुंबे होते ज्यांना तो घेतलेले पैसे देणार होता. त्याने

असे गृहीत धरले होते कि बँक् त्याबाबत सहाय्य कारनार होती. आता काय करायचे? अशा परिस्थितीत तुम्ही काय कराल?. माझ्याजवळ 10 लाख डॉलर्स नव्हते. माझ्या मंडळीतल्या लोकांना मी मागणार नव्हतो. या शिवाय, टीव्ही. कार्यक्रम महाग झाले होते. कारण आम्ही वेगवेगळ्या NET-WOKS वर काम सुरु केले होते. प्रसारणाचा आमच्या वेळेसाठी प्रत्येक महिन्याला पन्नास हजार डॉलर्स द्यावे लागणार होते. आम्ही काय करू शकत होतो? याकोब 5:13 नुसार प्रार्थना करणे!

असे घडले की व्यवसाय निमित्त आमची आणखी एक ट्रीप हवैई ला जाणार होती. आम्ही जाण्याच्या अगोदरच बँकेने आमचे क्रेडीट कमी केलेले होते. म्हणजे बिल्डरला देण्यातही आम्हाला कर्ज मिळणार नव्हते. मला धक्का बसला. मी हवैई साठी विमानतळावर गेलो. मी चालत असतांना माझे मन लाखो मैल प्रती घनता धावत होते. काळजी वाटू लागली. तितक्यात देवाचा शब्द मी ऐकला, “ तुझी काठी वर धर....”

फरो चे सैन्य आणि समुद्र यांच्या मध्ये इस्राएल लोक अडकलेले असंतांना देव मोशेला हेच म्हणाला होता. मोशेने आपली काठी समुद्रावर उंच धरावी असे देवाने मोशेला सांगितले होते. जेंव्हा मोशेने तसे केले तेंव्हा समुद्राचे पाणी दुभागले व इस्राएल लोकांनी समुद्र पार केला व त्यांची सुटका झाली. एखादे काम करण्यासाठी देवाने दिलेले अभिवचन आणि अधिकार याचे दर्शक ती काठी होती. त्या क्षणी देव मला काय सांगत होता ते मला समजले. मी अधिकारी/पुढारी होतो, त्या मंडळीचा पाळक होतो. मी त्या परिस्थितीशी कसे वागायचे त्याचा अधिकार देवाने मला दिला होता. मला तो अधिकार वापरून उभे राहायचे होते.

आम्ही हवैई ला आल्यावर मी रात्री झोपू शकलो नाही. आम्ही फक्त प्राथानच करू शकत होतो. आम्हाला हवे असलेल्या उत्तरासाठी आम्ही जणू झगडा करीत होतो. आत्मा तळमळत होता. देन्द्राला एक कल्पना सुचली. तो देवाप्सून आहे असा तिचा विश्वास होता. तिने कधीच अशा सोडली नाही. माझ्यासाठी तिची काय किंमत होती हे मी सांगू शकत नाही.

तिची योजना साधीच पण गहन होती. पण त्यानुसार होईल असे चन्ह दिसत नव्हते. त्या योजनेनुसार आम्ही त्या योजनेचे सादरीकरण बँकेला करावे असे ठरले, म्हणजे आम्हाला कर्ज मिळेल. व ते आमच्या बिल्डर च्या बकेला द्यावे असे ठरले. माच्या बिल्डरला तर लवकरात लवकर पैसे हवे होते. जर त्याने वेळेत पैसे दिले नाही तर त्याला दिवाळखोर म्हणून घोषित

करण्यात आले असते. आम्ही एक चित्रीकरण केले व त्यात आम्ही कोण आहोत , आम्ही काय करणार आहोत, व आम्हाला कर्ज का हवे ते चित्रित केले होते.

त्या बँकेशी आमचा तसा काही संबंध नव्हता. पण आम्ही चित्रीकरण करून सदर केले, ही देन्द्रचीच कल्पना होती.

आम्ही राहत असलेल्या भागाचे वर्णन करून दाखविण्यासाठी आम्ही एक फ्लिप-चार्ट बनविला. बँकेला आमचा इतिहास व आमची वाढ कशी होणार हे आम्ही दाखविले. आमची इमारत व्यवसायासाठी वापरून किती उत्पन्न मिळू शकते तेही आम्ही दाखविले, उदाहरणार्थ आमचा टीव्ही कार्यक्रम कसा वाढू लागलेला आहे व यासारख्या काही बाबी आम्ही त्यांना दाखविल्या की ज्यामध्ये त्यांना उत्सुकता असेल. आम्हाला त्यांना याची खात्री करून द्यायची होती की आम्ही घेत असलेली जोखीम त्यांच्या फायद्याची होती आणि सध्याच्या काळातही त्यांच्यासाठी ते फायदेशीर होते. आम्ही त्यांना हेही दाखून दिले की जर आमच्या बिल्डरला पैसे दिल्या गेले नाहीत तर ते त्यांच्या तोट्याचे होते. बँकेच्या व्हाइस प्रेसिडेंटला आम्ही भेटण्यास तयार आहोत सांगितले. तो व्यापारी-कर्ज देण्याऱ्या विभागाचा प्रमुख होता.

आम्ही प्रार्थना करून त्याच्या ऑफिस मध्ये गेलो व आमचा अर्ज त्याच्या पुढे सदर केला. ही योजना पवित्र अत्म्याकडूनच आहे असा आमचा विश्वास होता. आमचे सादरीकरण त्याला खूप आवडले. त्याने ताबडतोब आपल्या सचिवाला काही लिहून न घेता 5 लाख डॉलर्स चा चेक मंजूर केला. पुढच्या 5 लाकासाठी मात्र त्याने काही कागद्पतत्रे लिहून घेतली. एकूण 10 लाखाचा चेक बिल्डरला दिला.

**देव-राज्याचे महान सामर्थ्य कसे चालते हे तुम्ही जाणून घेण्वाचा प्रयत्न केला तर पवित्र आत्म्याचे कसे ऐकावे हे तुम्ही शिकणे गरजेचे आहे.**

बँकेने दिलेला 5 लाख डॉलर्स चा चेक घेऊन एक तासाचा प्रवास करून देन्द्रा आणि मी कसे घरी पोहोचलो हे सांगणे कठीणच आहे . आम्हाला खूपच आनंद झाला होता आणि आम्ही खुप मोठे असल्यासार वाटू लागले. आम्हाला त्यावेळी कसे वाटले हे सांगण्यासाठी आमच्या जवळ शब्दच नाहीत. परंतु पवित्र आत्म्याने जे कार्य केले ते पाहून आश्चर्याने भयचकित झालो. ज्या व्यक्तीला आम्ही प्रथम बोलाविले तो म्हणजे आमचा बिल्डर. त्याच्या शब्दातील आनंद अजूनही माझ्या कानात घुमत आहे. “तुम्ही काय केले? त्यांनी

तुम्हाला अगदी त्याच ठिकाणी चेक दिला?" असे तो आश्चर्याने म्हणाला. आम्हा दोघांना माहित होते की हे देवानेच घडून आणले. वर सांगितल्या नुसार आम्ही बिल्डरला 10 लाख डॉलर्स दिले व बांधकाम पूर्ण झाले.

"हे कसे घडले?" पवित्र आत्मा! मित्रहो, तुमच्या गरजेचे देवाजवळ उत्तरे आहेत. देव-राज्याचे महान सामर्थ्य कसे चालते हे तुम्ही जाणून घेण्याचा प्रयत्न केला तर पवित्र आत्म्याचे कसे ऐकावे हे तुम्ही शिकणे गरजेचे आहे. आणि या पुस्तकात हेच सांगितलेले आहे.

जेम्स बॉंड च्या कोणत्याही चित्रपटापेक्षा कोणत्याही परिस्थितीत पवित्र आत्म्याबरोबर चालणे हे जास्त उत्सुकता वाढविणारे आहे. आणि त्या चित्रपटासारखे कोण लढाई जिंकेल हे तुम्हाला अगोदरच माहित आहे.,मग मध्यंतरी कितीही तणावाचे प्रसंग निर्माण झाले तरीही.

## अध्याय 2

# राज्य

मला माहित आहे की कोर्ट मध्ये असलेले काही किरकोळ प्रकरणे काही दिवसांनी बाहेर फेकली जातात. पुढे एक उदाहरण देत आहे.

कोलोराडो कोर्ट मधील एका कैद्याने एक केस 88 बिलिअन डॉलर्स साठी कोर्ट मध्ये टाकली. ही केस .National Football league च्या विरोधात होती. Dallas Cowboys Green Bay Packers यांच्या मध्ये खेळ चाललेला होता व या कैद्याचे म्हणणे असे होते कि खेळाच्या अधिकार्यांनी चुकीचा निकाल दिला होता. तो म्हणत होता Cowboys चा खेळाडू डेज ब्रायंट ने घेतलेला झेल अपूर्ण होता हा अधिकाऱ्याचा निर्णय चुकीचा होता व त्यांचे कर्तव्य त्यांनी योग्यरीतीने पार पडले नव्हते. ब्रायंट च्या जर्सीचा नुंबर 88 होता म्हणून 88 बिलिअन dollars ची केस कोर्ट मध्ये टाकली होती.

वेडा माणूस, नाही का? मला वाटत प्रत्येकाला हे ठाऊक आहे कि ही केस कुठेच चालणार नाही. कायद्यानुसार दोन गोष्टिमुळे केस चालू शकणार नव्हती. एक म्हणजे क्षेत्र वेगळे होते and दुसरी म्हणजे या प्रकरणाला कायेदेशीर पाया नव्हता. काहींना वाटेल पवित्र आत्म्यावरील या पुस्तकात हा मुद्दा मी का आणला? कारण हे आहे की जर पवित्र आत्मा तुमच्या तुमच्या परिस्थितीत कार्य करीत असेल तर तुम्हाला राज्याच्या कायद्या बद्दल स्पष्ट माहिती पाहिजे. देवाचे राज्य असेच आहे. देवाचे राज्य हे राज्याच्या कायद्यांच्या चौकटीतच काम करते

मागच्या दोन पुस्तांकामध्ये देवाचा राज्याचे क्षेत्र व ते कसे काम करते हे मी लिहिलेले आहे. परंतु पवित्र आत्म्याबद्दल सांगतांना आपण थोडे मागे जाऊन त्या तत्वांना पुन्हा लक्षात घ्यावे हे आमच्यासाठी बरे रहील. क्विझ ने सुरुवात करू या,

*येशू त्यांना म्हणाला, "...मात्र त्याच्या (संदेष्ट्याच्या) देशात त्याच्या आप्तेष्टात अथवा त्याच्या घराच्या मंडळीत त्याचा सन्मान होत नसतो. त्याने थोड्याच रोग्यांवर हात ठेवून त्यांना बरे केले. ह्याशिवाय दुसरे कोणतेही महत्कृत्ये त्याला तेथे करता आले नाही. त्यांच्या अविश्वासामुळे त्याला आश्चर्य वाटले."*

—मार्क 6:4-6

या शास्त्रभागानुसार येशू लोकांना बरे करू शकला नाही. काय कारण असेल सांगू शकाल का? धार्मिक उत्तर हे असेल कि देवाची इच्छा नसल्यामुळे ते होऊ शकले नाही, अर्थात देवाला सर्वात चांगले (उत्तम) कळते, त्याची इच्छा असती तर त्याने बरे केले असते. बरोबर आहे? मला महानायाचे आहे कि तो देव देव आहे. तुम्ही असे गृहीत धरता का, की तेथे असे अनेक लोक होते की जे बरे झाले नाहीत? मला वाटते हीच ओष्ट या शास्त्र भागात दिसते. येशूला लोकांना बरे करता आले नी, का? हा महत्वाचा प्रश्न आहे व त्याचे उत्तरही हवे आहे. आम्ही जर शेवट निष्कर्ष पहिला तर असे दिसते की लोकांच्या अल्प विश्वासामुळे ते बरे होऊ शकले नाहीत असे येशू म्हणतो. येशूचे हे उत्तर समजण्यासाठी विश्वास म्हणजे काय व त्याची स्वर्गाला पृथ्वीतलावर कायदेशीर रीतीने जागा मिळण्याची काय गरज आहे हे उत्तम रित्या समजून घेणे आवश्यक आहे.

याबाबतीत मला शेवट करू द्या. येशूच्या दृष्टीने सामर्थ्यातील कमतरता, किंवा येशूची इछा नसणे असे काही नाही.. मुद्दा क्षेत्र किंवा जागेचा होता. स्वर्गाला, त्या ठिकाणी येण्यास कायदेशीर रित्या क्षेत्र किंवा जागा नव्हती. हे पुस्तक काय सांगते याची मला कल्पना नाही असे म्हणून पुस्तक फेकून देण्याच्या अगोदर मला स्पष्टीकरण करण्यासाठी एक मिनिट द्या.

आदम व हवेला पृथ्वीवर ठेवल्यावर त्यांना पृथ्वीवर पूर्ण अधिकार देण्यात आला होता. मला वाटते पुढील वचन मला पाठींबा देईल.

*"तू त्याला देवदूतांपेक्षा किंचित्काल कमी केले आहे.तू त्याला गौरव व थोरवी ह्यांनी मुकुटमंडित केले आहे...तू सर्व काही त्याच्या पायाखाली ठेवले आहे सर्व काही त्याच्या अधीन ठेवले आहे..त्याच्या अधीन ठेवलेले नाही असे काही राहू दिले नाही..."*

—इब्री 2:7-8

पवित्र शास्त्र सांगते की अदामाला देवाने गौरव व थोरवी यांनी मुकुट मंडीत केले आहे. मुकुट म्हणजे अक्षरशः मुकुट नाही तर हा अदामाला दिलेला अधिकार होता ज्याद्वारे तो पृथ्वीवर सत्ता गाजवीत होता. ( गृहीत धरायला काही हरकत नाही की आदमच्या शिराभोवती एक तेजोमय वलय आहे.). तसेच अदामाला गौरव दिले होते गौरव म्हणजे राज्याबद्दलचा अभिषेक आणि वैभव. थोरवी म्हणजे बहुमान व आणि देवराज्याचा अधिकार. म्हणजे गौरव व थोरवी याद्वारे तो पृठीवर सत्ता गाजवीत होता. हा अधिकार देव राज्याच्या वतीने अदामाला देलेला होता. सैतान पृथ्वीवर होता व त्याला मनुष्याबद्दल तिरस्कार होता व त्याचा अधिकार सैतानाला हवा होता. अधिकाराचा मुकुट सैतानाला हवा होता परंतु तो मुकुट सैतान घेऊ शकत नव्हता कारण तोच आदामाच्या अधिकाराच्या खाली होता. म्हणून सैतानाला एक योजना आखावी लागली ती म्हणजे फसवणूक . सैतानाने हवेला फसविले आणि आदामही फसला व त्यानी देवाविरुद्ध बंड केले. त्यामुळे त्यांची देव-राज्यातील स्थान निघून गेले. आणि आता ते सैतांनाच्या अधिपत्याखाली आले. आता तुम्ही विचाराल, “पाहीली गोष्ट तर हीच की देवाने सैतानाला एदेन बागेत येण्याची परवानगीच कशाला दिली? उत्तर आहे, देवाला परवानगी द्यावीच लागली. हे उत्तर ऐकून तुम्हाला धक्का बसला असेल ना? परंतु हे सत्य आहे. त्यासाठी उत्पत्ती 2:8-9 याकडे आपण पाहू या.

> *परमेश्वर देवाने पूर्वेला एदेनात बाग लावली आणि तिच्यात आपण घडवलेल्या मनुष्याला ठेवले. परमेश्वर देवाने दिसण्यात सुंदर व अन्नासाठी उपयोगी अशी सर्व जातींची झाडे, बागेच्या मध्यभागी जीवनाचे झाड, आणि बऱ्यावाइटाचे ज्ञान करून देणारे झाड ही जमिनीतून उगववली.*

याठिकाणी एक महत्वाचे निरीक्षण करणे आवश्यक आहे. मनुष्य स्वतंत्र इच्छा शक्तीशिवाय पृथ्वीवर ठेवणे शक्य नव्हते. मला माहित आहे बहुतेक ख्रिस्ती लोक म्हणतात की आम्हाला इच्चा-शक्ती दिली कारण त्यामुळे देव समजू शकत होता की त्याच्यावर कोण खरच प्रेम करतो. या विधानात काही सत्य आहे. मुळात निवड करण्याच्या क्ष्मतेशिवाय एखादी गोष्ट कायदेशीर होऊ शकत नव्हती. जर मनुष्याला स्वतंत्र इच्छशक्ती दिली नसती तर त्याला पृथ्वीवर ठेवलंच

नसत. या चर्चे मध्ये मी आणखी बरेच काही सांगू शकतो, परंतु ही गोष्ट मागच्या दोन पुस्तकात मी सांगितलेलीच आहे.

> *आदमने मात्र सैतानाची फसवणूक निवडली,. त्यामुले तो देवाला व देवाच्या राज्याला गमावून बसला. "तुझ्यामुळे भूमीला शाप आला आहे. तू आयुष्यभर कष्ट करून तिचा उपज खाशील. ती तुला काटे व कुसळे देईल, तू शेतातले पिक खाशील. तू आपल्या निढळाच्या घामाने भाकर मिळवून खाशील व अंती पुन्हा मातीला जावून मिळशील."*
>
> *–उत्पत्ती 3:17-19*

मुळात देव आदामाला म्हणतो की आदामाने भूमीला शाप दिला.आदामाला सर्व पृथ्वीवर अधिकार-सत्ता होती. तोच होता की ज्याने सैतानाला दरवाजा उघडून दिला होता, आणि प्रामुख्याने देवाला हाकलून लावले. आता देवाचे हात बांलागला. आणि आदाम आता स्वताच्या कष्टाने व घाम गाळून जगू लागला, मात्र सैतान हव्वेला फसवीत असतांना एक गोष्ट सांगण्यास विसरला की त्याला देवाने स्वर्गातून हाकलून लावले होते. देवाने सैतानाचा अगोदरच म्याय केला होता. टायचे सार्वकालिक घर म्हणजे नरक होय. काही लोक म्हणतील, "प्रमस्वरूप देव लोकांना नरकात कसा ढकलून देऊ शकतो. खरे म्हणजे नर्क हा मनुष्यासाठी तयार केलेलाच नव्हता.

> *खालील शास्त्राभाग वाचा: डावीकडच्यानाही तो म्हणेल, 'आहे शापग्रस्तहो, माझ्यापुधून निघून जा, आणि सैतान व त्याचे दूत यांच्यासाठी जो सार्वकालिक अग्नी सिद्ध केला आहे त्याय जा.'*
>
> —मत्तय 25:41

जेंव्हा आदम आणि हव्वा सैतानाच्या अधिकार क्षेत्रात आले तेंव्हा ते सैतानाच्या न्यायाव्यावास्थेखाली आले, सर मानवजात सैतानाच्या अधिपत्याखाली आली. समजा तुमच्या जवळील एका गाईला एक वासरू झाले तर त्या वासराला तुमचा म्हणण्यात येईल. कारण सर्व कळप तुमचा आहे. सर्वसाधारण समाज किंवा मी म्हणेल असामाज असा आहे की व्यक्तीचे शेवटचे ठिकाण मग ते स्वर्ग असेल किंवा नरक असेल ते त्या व्यक्तीच्या चांगले

किंवा वाईट असण्यावर अवलंबून असते. परंतु हा समज चुकीचा आहे. देवाचे मनुष्यावर प्रेम असल्यामुळे माण्ष्याची न्यायापासून सुटका करण्यासाठी येशू ख्रिस्ताच्या द्वारे एक योजना आखली की जेणेकडून मनुष्य देवाराज्यात पुन्हा येईल.

> *त्याने आपल्याला अंधाराच्या सत्तेतून काढून आपल्या प्रिय पुत्राच्या राज्यात आणून ठेविले? (*कलसै 1:13)

सैतानाच्या क्षेत्रातून सोडविण्यासाठी देवाने एक कायदेशीर मार्ग तयार केला. परंतु त्यामध्ये जाण्यासाठी प्रत्येक पुरुषं स्त्री, बालक यांनी स्वताहून येशूच्या नावाने आरोळी मारायला हवी. एखाद्या रस्त्यावरील स्त्रीचा शेवट नरकात होईल जर तिला कोणी ख्रिस्तांचे नाव सांगितले नाही व तिने ख्रिस्ताला हक मारली नाही तर.

आपण चांगले काम केले तर आपण स्वर्गात जाऊ असे काही जणांना वाटते पण तसे नाही. ती सैतानाची लबाडी आहे. जेंव्हा अडमाचे पतन झाले तेंव्हा तो आध्यत्मिक दृष्टीने मरण पावला, व देवाशी त्याचे नाते तुटले. राज्य हे कायद्याने चालते. त्यासाठी सैतान त्याच्या दुष्ट आत्म्यांनी भरलेल्या लोकांचा उपयोग करतो व देव त्याच्या लोकांचा उपयोग करून देव-राज्याचे नियम सांगतो. नोवाद आपली आहे. येशूने वधस्तंभावर कायदेशीर रीतीने विजय मिळविला, व सैतानाच्या राज्यातून बाहेर पडण्याची सोय केली. म्हनून प्रत्येक व्यक्तीने येशूल हाक मारली पाहिजे.

आपण आता पुन्हा एकदा मागे जाऊ व मार्क 6 अध्याय पाहू. येशू त्या ठिकाणी लोकांना बरे करू शकला नाही. आपले अध्यात्मिक क्षेत्र आदामाने सैतानाला सोपविले होते. म्हणून आता त्या क्षेत्रात देव काम करू शकत नव्हता. गोंधळून जावू नका. कायद्याचा विचार करता देव सैतानाच्या क्षेत्रात घुसू शकत नाही. खरे तर सर्व पृथ्वी देवाची आहे, पण अदामाने त्याचे क्षेत्र सैतांच्या ताब्यात दिलेले आहे म्हणून जो पर्यंत आम्ही सैतानी क्षेत्र झुगारून देत नाही तो पर्यंत देव तेथे कार्य करणार नाही. देव राज्याच्या कायद्याने देव तसे करणार नाही.

> *“मग सैतानाने त्याला उंचावर नेऊन जगातील सर्व राज्ये एका क्षणात दाखविली. आणि म्हटले, ह्यावरच सर अधिकार व ह्याचे वैभव मी तुला देईन,कारण हे मला सोपून*

*दिले आहे व माझ्या माबास येईल त्याला मी हे देतो. म्हणून तू मला नमन कर्षित तर हे सर्व तुझे होईल."* (लूक 4:5-7)

या ठिकाणी आम्हाला दिसते की आदामाने पृथ्वीवरील राज्याचा कायदेशीर अधिकार सैतानाला दिला. म्हणून पृथ्वीतलावर स्त्री व पुरुषांसाठी त्याला पाहिजे तसे देव करू शकत नाही. परंतु देवावर विश्वास ठेवणारा एखादा पुरुष किंवा स्त्री ज्याला स्वर्गालीत अधिकार समजलेला आहे त्याल देव शोधू शकतो व आपला अधिकाराचा वापर देव त्या व्यक्तीच्या द्वारे करू शकतो. हीच गोष्ट सैतानाने सुरुवातीला केली. ज्याला पृथ्वीवर कायदेशीर अधिकार आहे त्या आदमाला आपल्या कडे खेचले व पृथ्वीवर आपला अधिकार गाजविण्यास सुरुवात केली. जेंव्हा देवाने आदामाला गमाविले तेंव्हा त्याला पृथ्वीवर पुन्हा येऊन सैतांनापासून सुटका करण्यासाठीची योजना अमलात आणावी लागली, आणि त्या मनुष्याचे नाव होते आब्राहाम.

*"परमेश्वराने आब्राहामास सांगितले, "तू आपला देश ,आपले नातेवाईक, व आपल्या बापाचे घर सोडून मी दाखविण त्या देशात जा; मी तुजपासून मोठे राष्ट्र निर्माण करीन, मी तुला आशीर्वाद देईन, तुझे नाव मोठे करीन; तू आशीर्वादित होशील. तुझे जे अभीष्ट चीन्ततील त्यांचे मी अभिष्ट करीन; तुझे जे अनिष्ट चीन्तातील, त्यांचे मी अनिष्ट करीन; तुझ्याद्वारे पृठीविवरील सर्व कुळे आशीर्वादित होतील."*

–उत्पत्ती 12:1-3

अब्राम किंवा अब्राहम याच्याद्वारे देवाने पृथ्वीवर येण्याचा आपला मार्ग देवाने उघडला आणि मनुष्य जाती साठी तारणाची योजना आणली.

देवाने आब्राहाम व त्याच्या सातानांबरोबर (भवि पिढ्यांबरोबर) करार केला . आणि या कायदेशीर करारामुळे अब्ब्राहामाच्या वंशात येशू ख्रिस्ताला या जगात पाठविण्याचा मार्ग मोकळा झाला. म्हणून येशूचा जन्म आब्राहामाच्याच घराण्यात झाला आणि त्यामुळेच इतर देशातील लोकांबरोबर लग्न करण्याची इस्राएल लोकांना परवानगी नव्हती. आणि म्हणून नव्याकारारातील पहिल्या पुस्तकामध्ये वंशावळीशिवाय काही नाही. ही गोष्ट आम्हाला हेच

सांगते की येशू हा आब्राहामाच्याचं वंशातील होता. या मुळे सैतानाला हे समजले की किंमत मोजण्याचे काम येशू कायदेशीर रीतीने करू शकत होता.

पृथ्वीवर अजूनही स्त्री व पुरुषाला कायदेशीर अधिकार आहे. अर्थात अध्यात्मिक ताबा किंवा अधिकार आणि पृथ्वीवरील अधिकार यामध्ये गोंधळ होऊ देऊ नका. म्हणजे स्त्री व पुरुष या दोघांचाही उपयोग देव व सैतान हे दोघेही त्यांच्या गोष्टी करण्यासाठी करतात किंवा त्यांना करावा लागणारच आहे. साध्या भाषेत, स्त्री व पुरुष हे दोघेच पृथ्वीवर कायदेशीर अधिकार असलेले आहेत. आदाम व हवा यांनी सैतानाच्या बोलण्यावर विश्वास ठेवला आणि त्याद्वारे सैतानाला पृथ्वीवर प्रवेश मिळाला. देवालाही तसेच जे त्याच्यावर विश्वास ठेवतात अशा लोकांना पृथ्वीवर त्याचे म्हणणे काय आहे हे सांगण्यासाठी शोधावेच लागेल. जेंव्हा स्त्री व पुरुष यांची त्यांच्या अंतःकरणात सैताना ऐवजी स्वर्ग काय म्हणतो याची खात्री होते तेंव्हा त्याला विश्वास म्हणतात. आणि त्या व्यक्तीच्या द्वारे देवाचे वचन पृथ्वीवर आणण्यासाठी व सैतानाच्या राज्य विरुद्ध सांगण्यासाठी स्वर्गाला एक कायदेशीर क्षेत्र मिळते. खूप गोष्टी सांगण्यासारख्या आहेत, परंतु अनेक बाबी मी पहिल्या दोन पुस्तकात सविस्तर लिहिलेल्या आहेत .

मुख्य किल्ली हीच आहे. सैतान या पृथ्वीवर असल्यामुळे तो आपल्या राज्याचे संरक्षण करून देवाच्या योजना उलथून टाकण्याचा नेहमीच प्रयत्न करतो.यामुळे देवाला बुरख्या खाली राहून काम करावे लागते, त्यामुळे यशस्वी होण्यासाठी व विजयी जीवन जगण्यासाठी लागणारी गुरुकिल्ली तुम्ह व्युहरचनेचे " किंवा “रणनीतीचे सामर्थ्य” असे म्हणत

अध्याय 3

# विस्मित

एका अनोळखी व्यक्तीकडून मला फोन आला . त्याला मी कधीच भेटलो नव्हतो. स्वताची प्रस्तावना दिल्यावर त्याने म्हटले की माझे “Faith Hunt” हे पुस्तक व देव-राज्याबाद्दचे माझे शिक्षण याचा ते आनंदाने आस्वाद घेत आहेत. त्याने मला विचारले की मी मोन्टाना या ठिकाणी जवळ जवळ 70 लोकांच्या उपस्थितीत शुक्रवारी संध्याकाळी व शनिवारी सकाळी शिकविण्यासाठी उत्सुक आहे काय. मी उत्तर देण्याच्या अगोदर तो म्हणाला, “शनिवारी सकाळचे शिक्षण सत्र झाल्यावर आपण सर्व जन काळविटाच्या शिकारीला जाणार आहोत, ते दिवस शिकारीसाठी चांगले आहेत. अर्थात या प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी मला फार वेळ लागला नाही. तो म्हणाला कि त्याचे मित्रही शक्य झाल्यास येऊ शकतील. येणाऱ्या उन्हाळ्यातच शिकारीचा परवाना.घेण्यासाठी त्यांनी मला मदत केली. माझा मुलगा टीम ह्याने देखील निर्णय घेतला की तोही आमच्या बरोबर येणार आहे. त्यालाही त्याचा परंवाना मिळाला.

हा गट ‘अभिवचने सांभाळणारा’ गट होता. माझ्या पुस्तकात मी शिकारीसम्बंधित जी उदाहरणे दिली होती त्यामुळे माझ्या शिक्षणाकडे ते आकर्षित झाले होते. विश्वासाने माल हरीण कसे मिळाले हे मी पुस्तकात सांगितले होते. मला 30-40 मिनिटात हरीण कसे मिळाले, आणि विशिष्ट प्रकारचे प्राणीच मला कसे मिळाले, मला हवे असलेल्या आकाराचे व लिंगाचे प्राणी कसे शिकार करण्यात आले याबद्दल त्यांना उत्सुकता होती. माझ्या बाबत ज्या गोष्टी घडल्या, त्याच पुन्हा घडणे जवळपास अशक्य होते. आणि जे घडले ते तसे घडले नसते तर मलाही त्यांच्या सारखिच उत्सुकता लागली असती.

शेवटी मोन्टानाला जाण्याचा तो दिवस आला. टीम आणि मी आम्ही उड्डाण केले व त्या आताच्या काही पुढाऱ्यांना आम्ही भेटलो. ते देवावर प्रेम करणारे होते. एका ठिकाणी

मासे पकडण्यासाठी ते आम्हाला घेऊन गेले व नंतर ज्या ठिकाणी आम्हाला शिकारी साठी जायचे होते ते ठिकाण दाखविले. ओहायओ येथे राहिल्यामुळे मला रायफल द्वारे दुरून मारा करण्याची सवय नव्हती. आणि शॉट-गन द्वारे हरीण मारण्याची परवानगी होती. हे अंतर 100 यार्ड कधी कधी 50 यार्ड ही असायचे.. जेंव्हा त्यांनी शिकार करण्याचा पल्ला 200 यार्ड सांगितला तेंव्हा मला थोडी तडजोड करावी लागली. परंतु काही वेळ सराव केल्यावर मी सरावाच्या स्टील-थाळीवर बरोबर मारा केला, आणि खऱ्या शिकारीसाठी तयार झालो.

त्या संध्याकाळी एका स्थानिक मंडळीच्या सभागृहात मी शिकविले तसेच पुढच्या दिवशी सकाळीही सत्र घेतले. सर्वांना उत्सुकता होती कि शिकारीच्या द्वारे मी देव राज्याच्या नियमांबद्दल कसा शिकवितो. दुपारचे जेवण घेतल्यावर ते म्हाणाले, “ठीक आहे , तर चला, आपण काळविटाच्या शिकारीला जाऊ या. या अगोदर मी कालाविताची शिकार केली नव्हती. मला वाटत काय पद्धत वापरावी हे मला समजलेले नव्हते. दोन-तीन जणांना बरोबर घेऊन शिकार करणे मला माहित होते. परंतु त्यांनी तर 3-4 गाद्या भरून लोक सोबतीला घेतले. आदल्या रात्रीच टीम ने मला विहारले होते,” काळविटाच्या शिकारी संबंधी तुम्ही थोडे काळजीत आहात ना?” तूनही त्यांना देव्रज्याबद्दल शिकविणार आहात आणि सांगणार आहात की राज्य प्रत्येक वेळी काम करते. परंतु ते बघत असतांना तुम्हाला जर काळविटाची शिकार करता आली नाही तर कसे?” मी त्याला म्हटले होते कीमी खजील झालेलो नाही, तर देन्द्रा मी आम्ही दोघांनी बी पेरले आहे आणि करार केला की काळविट आम्हाला मिळेल.

ज्या ठिकाणी शिकार करण्याची परवंगी होती तेथे आम्ही जात असतांना, ते सांगत होते की उत्तर अमेरिकेत काळवीट सर्वात सर्वात चपळ जोराने धावणारा प्राणी आहे. आणि संपूर्ण जगात दुसऱ्या नंबरचा आहे. चिता ला प्रथम स्थान आहे. त्यांनी सांगितले की कालाविटाच्ची नजर तीक्ष्ण असून त्याचे स्व-संरक्षण म्हणजे जोराने धावणे

जर त्याने तुम्हाला पहिले तर एका सेकंदात तो नाहीसा होईल. माझा tag काळवीट मादीसाठी ठीक होता व टीम जवळचा tag हरीण-मादीसाठी होता. त्या गवताच्या जंगलात जाऊन वर चढायचे आणि मग पायीच वरच्या शिखरावर चढून खाली दरीत बघून काही प्राणी दिसतात का ते पाहायचे ही आमची योजना होती. आम्ही पायी वर शिखरावर चढतांना आम्ही काही काळविटांचा कळप काही अंतरावर पहिला. डोंगराळ भाग असल्यामुळे आम्हाला वाटले

की आम्ही अरुंद दरीच्या जवळ जावे जेथून मारा करता येईल. शेवटच्या टेकडीवर अगदी काळजीपूर्वक हळूच घुसायाचे होते व हळूच डोंगरमाथ्यावर चढून जर कळवीत तेथे असतील तर नेम धरायचा होता. आम्ही तेथे गेल्यावर आमचे व त्यांचे अंतर 200 ते 250 यार्ड असणार होते.

टीम आणि मी आम्ही पोटावर सरकत टेकडीच्या काठाजवळ गेलो की जेणेकडून अंतर कमी होईल. योजना अशी होती की मी पहिले गोळी मारल्यानंतर टीम हरीण मादीला गोळी मारणार होता. मी हळूहळू वर रांगत गेलो आणि पहिले. आमची योजना सफल झाली त्या कळपाने आम्हाला पहिले नाही. कळवीट नर माझ्या आटोक्यात होता. मी चाप ओढला. पण चुकलो. कळप गोंधळल्यासारखा झाला जेंव्हा मी दुसरी गोळी झाडली. परंतु मी पुन्हा चुकलो. आता मात्र कळप पळू लागला. मी तिसरी गोळी झाडली, चौथी गोळी झाडली पण सर्व भलतीकडेच गेल्या. जेंव्हा मी पाचवी गोळी झाडन्यास गेलो तेंव्हा फक्त क्लिक आवाज झाला. गोळ्या संपलेल्या होत्या. त्या गोंधळात मला समजलेच नाही की कळप दूर निघून गेलेला होता. इतक्या लांब मी गोळी झाडू शकत नवतो. परंतु माझा कळवीट मात्र तेथेच होता जेथे मी पहिली गोळी झाडली होती. मी धांदलीनेच टीमला त्याची बंदूक मागितली. मी उभा राहिलो आणि गोळी झाडली आणि काळवीट पडला.. मी खप उत्साहित झालो व तानावाखालून मोकळाही झालो.

कळवीत माझा होता. मी मागे पाहिल्यावर मला दिसले व आश्चर्य वाटके कारण आमच्या बरोबरचा मुलांचा गट मोठ्याने ओरडून ही गोष्ट साजरी करी होते. काही जनांजवळ cell phones होते. मी एकाला असे बोलतांना ऐकले " ही गोष्ट 'faith hunt' या पुस्तकात सांगितल्यानुसार झालेली आहे. फक्त 40 मिनिट आणि कळवीत मिळाला, पुस्तकात सांगितल्यानुसार. ते सर्व राज्य कार्य करते हे पाहण्यासाठीच आले होते. मी अनेक तास त्यांना शिकवीत होतो आणि ते कार्य करते हे त्यांना पाहायचे होते. माझा बंदुकीचा मारा वाईटच होता, पण तरीही ते घडले आणि मी जे शिकविले त्याची विश्वासार्हता वाढली. टीमलाही हरिणाची मादी दुपारी मिळाली. पळतांना त्याला ती मिळाली . आम्ही खूपच उत्साहित होतो. मोनटाना खूपच सुंदर होते , आणि मी व टीम ला राज्याचा खूप मोठा अनुभव मिळाला. राज्याची व देवाच्या विश्वासुपणाची एक आठवण म्हणून माझ्या ऑफिस च्या डेस्क च्या वर काळविटाचे डोके लटकविले.

**जगाला खरी गोष्ट पहायची आहे आणि देवाला देखील त्यांना आश्चर्यचकित करायचे आहे.**

या पुस्तकात मी ही शिकारीची गोष्ट का सांगावी बरे? कारण राज्याचा अनुभव तुम्ही तुमचे मित्र, शेजारी आणि कुटुंब यांना सांगावी असे देवाला वाटते. राज्य कार्य करते हे हे त्यांनाही पाहायचे आहे. जगाला खरी गोष्ट पहायची आहे आणि देवाला देखील त्यांना आश्चर्यचकित करायचे आहे. जगाला आश्चर्यचकित करण्यासाठी देवाचे राज्य कसे कार्य करते,व पवित्र आत्मा आम्हाला कशा संधी उपलब्ध करतो व जगाला आश्चर्यचकीत करतो करतो हे तुम्हाला शिकायचे आहे. मला नंतर कळले की ज्यांनी सभा भरविली होती त्यांना जे तरुण त्यांच्या धर्म मध्ये अडकलेले होते त्यांना देव-राज्याबद्दल कळावे mhanu मला आमंत्रित केले होते. मला नंतर हेही कळले की अनेकांनी त्या दिवशी आपली अंतःकरणे माझ्या शिक्षणामुळे देवाला दिली होती. पवित्र अत्म्यानेच ही योजना त्याठिकाणी तयार केली होती. आणि पवित्र आत्मा तुम्हाला तुमच्या योजनांमध्ये यश देईल. तुम्हाला मला आणखी एक गोष्ट सांगू द्या. परंतु ही गोष्ट सरळ पवित्र शाश्त्रातील आहे

या गोष्टीद्वारे देवाचे अद्भुत योजना, त्याची युव्हरचना दाखवून त्याच्या सत्यतेचे पुरावे व प्रेम जगाला दाखून आश्चर्यचकित करायचे आहे.

*"नंतर असे झाले की लोकसमुदाय त्याच्या भोवती गर्दी करून देवाचे वचन ऐकत असता तो गनेसरेत सरोवराच्या किनाऱ्याशी उभा होता. तेंव्हा त्याने सरोवराच्या किनाऱ्याला लागलेले दोन माचवे पहिले.त्यावरील कोळी खाली उतरून जाळी धूत होते. त्या माचाव्यापैकी एक शिमोनाचा होता. त्यावर चढून तो किनाऱ्या पासून थोडासा लोटावा म्हणून त्याने त्याला सांगितले. मग तो मचव्यात बसून त्यांना शिक्षण देऊ लागला.*

*आपले बोलणे संपल्यावर त्याने शिमोनाला म्हटले, "खोल पाण्यात हाकार,; मग मासे धरण्यासाठी आपली जाळी खाली सोडा."*

*शिमोनाने त्याला उत्तर दिले, "गुरुजी आम्ही सारी रात्र कष्ट करून काही धरिले नाही, तरी आपल्या सांगण्यावरून मी जाळी सोडतो.*

*मग त्यांनी तसे केल्यावर माशांच्या मोठा घोळका जाळ्यात सापडला आणि त्यांची जाळी फाटू लागली. तेंव्हा त्यांचे जे साथीदार दुसऱ्या मचव्यात होते त्यांनी येऊन आपल्याला सहाय्य करावे म्हणून त्यांनी त्यांना खुणाविले. मग ते आल्यावर दोनही माचवे इतके भरले की ते बुडु लागले.*

*हे पाहून शिमोन येशूच्या पाया पडून म्हणाला, "प्रभू माझ्यापासून दूर जा, कारण मी पापी मनुष्य आहे. कारण त्यांनी धरलेल्या माशांचा घोळका पाहून व त्याच्या बरोबर असलेले सर्व जन विस्मित झाले होते. तेंव्हा येशू शिमोनाला म्हणा, "भिऊ नकोस येथून पुढे माणसे धरणारा होशील" मग मचवे किनाऱ्यावर लावल्यावर सर्व सोडून देऊन ते त्याचे अनुयायी झाले"*

—लुक 5:1-10

पेत्र, याकोब आणि योहान यांनी रात्रभर प्रयत्न केले पण त्यांनी काहीच पकडले नाही. ते अनुभवी मासे धरणारे होते व त्या व्यवसायातच त्याची वाढ झाली होती, तरी त्यांना काहीच मिळाले नाही. अर्थात गोष्ट येथेच थांबत नाही. येशूने पेत्राची नाव उपदेश करण्यासाठी जणुकाय उसनी घेतली. घेतली. उपदेश झाल्यावर त्याने पेत्राला जाळे खोल पाण्यात टाकायला सांगितले. पेत्राला थोडे आश्चर्य वाटून तो म्हणाला की रात्रभर त्यांनी मासे पकडण्याचे प्रयत्न केले पण काहीच हाती आले नाही, तरी येशू म्हणतो म्हणून पेत्र जाळे टाकतो आहे असे म्हणाला. पेत्राने जाळे टाकल्यावर इतसे मासे जाळ्यात अडकले की जाळे फाटू लागले म्हणून आपल्या सहकाऱ्यांना त्याने मदतीसाठी बोलावले. पवित्र शास्त्र सांगते की त्यांच्या सहकाऱ्यांची जाळीही फाटण्याच्याच बेतात होती. आणि दोन्ही नाव इतक्या भरून गेल्या ली जणू काय बुडायाला लागल्या. पवित्र शास्त्र सांगते की हे अनुभवी कोळी इतके आश्चर्यचकीत झाले की त्यांनी मासे धरणे सोडले व ख्रिस्ताच्या मागे चालते झाले.

मला आवडणारी पवित्र शाश्त्रातील ही एक गोष्ट आहे. आणि ही गोष्ट आम्हाला डेन राज्यातील फरक दाखविते. ही राज्ये महणजे अंधाराचे राज्य आणि देवाचे राज्य. खूप कष्ट करायचे पण काहीच मिळत नाही हे सैतानाचे म्हणजे अंधाराचे राज्य दार्शविते. फक्त

जीवन जगण्यासाठी खूप काबाड कष्ट करणे, घाम गळून काम करणे , यालाच मी पृथ्वीवरील शापित व्यवस्था म्हणतो की जी आदामाच्या बंडामुळे निर्माण झाली. त्यामध्ये फक्त जीवन जगण्यासाठी कष्ट करावे लागते. परंतु देव राज्याशी त्याची तुलना करा, त्यामध्ये काय उत्पन्न होते ते पहा. दोन्ही परस्पर विरोधी बाबींकडे दीर्घकाळ लक्ष द्या. आणि लक्षात घ्या की देवाने तुम्हाला दरवाजा नंबर दोन दिला आहे., म्हणजे देवराज्याचा दरवाजा.

आता प्रत्येक ख्रिस्ती व्यक्ती म्हणतील, “होय देवाचे राज्य फार मोठे आहे , बघा त्या माश्याकडे.” पण फारच थोडे म्हणतील की येशूने हे कसे केले. आणि पुष्कळांना हे समजणार नाही की असे करण्याचा अधिकार आणि पात्रता त्यांना देण्यात आलेली आहे की जेणेकडून ते पेत्र, याकोब व योहान यांचा सारखाच आनंद करतील. सर्वात चांगले उत्तर असे असेल की तो येशू आहे म्हणून त्याने हे केले. परतू थांबा. आम्ही अगोदरच पहिले आहे की येशूने मार्क 6 मध्ये सांगितल्यानुसार काही करता आले नाही.कारण त्याठिकाणी देवाच्या राज्याचे क्षेत्र नवते.

या ठिकाणी मात्र देवाराज्याचे अध्यात्मिक नियम कार्यरत होते, आणि म्हणून त्यांना इतक्या मोठ्या प्रमाणात मासे मिळाले.

परंतु येथे आणखी एक बाब आहे.मी ज्यांना भेटलो त्यापैकी अनेक ख्रिस्ती लोकांना ही कल्पना नाही की येशूने जे केले त्या गोष्टी आता देखील होऊ शकतात, आणि समजा त्यां गोष्टी झाल्याच तर येशूने त्या कशा केल्या हह्याची त्यांना पुसटशी देखील कल्पना नसते. मी एक म्हण माझ्या सभेंमध्ये नेहमी सांगतो ती म्हणज्रे ज्या गोष्टीप्रमाणे तुम्ही जीवन जगू शकत नाही ती गोष्ट तुम्ही शिकऊ शकत नाही. मला हे म्हणायचे आहे की किल्यांना खूप मासे मिळण्याची गोष्ट तुम्ही शिकाऊ शकत नाही जोपर्यंत तुम्ही त्याप्रमाणे कधीच करू शकणार नाही. तर मग इतक्या मोठ्या प्रमाणात मासे कसे पकडले? तुम्ही त्याची व्याख्या करू शकता? अशाप्रकारचे यश तुम्हाला हवे असेल तर ते मासे कसे पकडले हे तुम्हाला कळले पाहिजे. मी अशा प्रकारे बोलत असतांना काही लोकांना धक्का बसलेला आहे. परंतु येशूने काय म्हटले?

> *‘मी तुम्हास खचित खचित सांगतो, मी जी कृत्ये करतो ती माझ्यावर विश्वास ठेवानारही करील, आणि त्यापेक्षा मोठी करील, कारण मी पित्याकडे जातो.”*
>
> —योहान 14:12

या ठिकाणी येशी पवित्र आत्म्यासंबंधी बोलत आहे की जो शिष्यांवर येशूचे व पुनरुत्थान या नंतर येणार होता. यार्देन नदीवर येशूवर उतरक्लेला आत्मा तो हाच ज्यामुळे देवाची महत्कृत्ये करण्याची परवानागी येशूला मिळाली की माही त्याला अनुसारण्यामुळे आम्ही पाहू शकतो. मार्क 6 मध्ये या सामर्थ्याला लोकांच्या अविश्वासामुळे अटकाव झाल्याचे आम्हाला दिसते, परंतु लुक 5 मधल्या वृतान्तानुसार तेथे मात्र अटकाव झाला नाही. देवाराज्याच्या नियमाचा आम्ही अभ्यास करणे अवश्यक आहे त्यामुळे कशामुळे अटकाव होतो व पवित्र आत्म्याचे सामर्थ्य कोठे कार्य करते आहे हे समजले पाहिजे. म्हणून या घटने कडे आम्ही पाहू या, व देव्रज्याचे नियम व तत्वे ओळखून त्यापासून शिकू या.

माझे पहिले पुस्तक तुम्ही वाचले असेल तर तुम्हाला समजून येईल की पेत्राने आपली बोट येशूला दिली आणि प्रत्यक्षात आपला व्यवसायच दिला व त्यामुळे देवराज्याचे क्षेत्र बदलून गेले. येशूने पेत्राची बोट घेतल्यावर ही बोट देवराज्याच्या अधिकार क्षेत्राखाली आली. त्यामुळे पवित्र आत्म्याला त्याठिकाणी कार्य करण्याचा कायदेशीर अधिकार मिळाला. आणि खोल पाण्यात मासे कोठे आहेत ह्याचे ज्ञान येशुजवळ प्रकट झाले. या मुले परिणाम हा झाला की भरपूर मासे मिळाले आणि पेत्राला येशूच्या द्वारे पवित्र आत्म्याची व्युव रचना आणि दैवी योजना मिळाली. याला मी रहस्यमय ज्ञान म्हणतो कारण आणि त्यामुळे पेत्र, याकोब आणि योहान यांना इतके मासे मिळाले की जे त्यांना कधीही पाहायला मिळाले नव्हते. आणि पवित्र शास्त्र सांगते की ते व्यावसाईक, अनुभवी कोळी आश्चर्यचकित झाले.

माझा विश्वास आहे की आमचे जीवन आश्चर्यचकित करणारे असावे हे देवाला हवे आहे. असे जीवन की जे देवराज्याबद्दल लोकांना दाखविते की जेणेकडून ते आश्चर्यचकित होतील व ख्रीस्ताचा स्वीकार करतील. माझा विश्वास आहे की धर्माची रिकामी बोट केंव्हाही लोकांना ख्रिस्ताकडे खेचून आणणार नाही. यशयाने एक भाकीत करत असतांना याबद्दल सांगितलेलेच आहे. तो मंडळीबद्दल बोलत आहे.

> *“त्यास (आपण) धार्मिकतेचे वृक्ष, परमेश्वराने लाविलेले रोप म्हणता यावे.”* (याशाया 63:3 ब)

म्हणजे लुक अध्याय 5 मध्ये सांगितलेल्या माश्यांबद्दल मला हे सांगायचे आहे की या गोष्टीमधून अनेक अध्यात्मिक तत्वे तुम्ही काढू शकता., परंतु जर तुम्ही या तत्वात/ विचारात तुम्ही चाललात तर तुमचे जीवन बदलून जाईल.

**कोठे जाळे टाकायचे हे येशूने जर सांगितले तर कोणीही मासे पकडू शकतो. दुसऱ्या भाषेत, कोठे मासे आहेत व ते कसे पकडायचे हे येशूने सांगितले तर कोणीही मासे पकडू शकतो.**

लोक मला म्हणतात, "तू सांगतो ते बरोबर आहे परंतु येशू आता येथे नाही." नाही तसे नाही. ज्या पवित्र आत्म्याने मासे कोठे आहेत हे सांगितले तोच पवित्र आत्मा तुमच्या मध्ये आजही आहे, जर तुम्ही विश्वसणारे आहात तर. येशू शिष्यांना सोडून जाणार होता तेंव्हा त्याने काय सांगितले ते वाचा:

> *" मी तुम्हाजवळ राहत असतांना ह्या गोष्टी सांगितल्या आहेत. तरी पिता ज्याला माझ्या नामाने पाठवील तो कैवारी म्हणजे पवित्र आत्मा तुम्हास सर्वकाही शिकविल आणि ज्या गोष्टी मी तुम्हास सांगितल्या त्या सर्वांची तुम्हास आठवण देईल. मी तुम्हास शांती देऊन ठेवतो; आपली शांती तुम्हास देतो; जसे जग देते तसे मी तुम्हास देत नाही तुमचे अंतःकरण अस्वस्थ किंवा भयभीत होऊ नये."*
>
> —*योहान 14:25-27*

येशूची शांती कोणती होती? तो म्हणजे पवित्र आत्मा ज्याने त्याला प्रत्येक गोष्ट कशी हाताळायची हे सांगितले होते. पवित्र आत्म्याला येशू कैवारी असे म्हणतो. मित्रांनो, हा कैवारी तुमच्यामध्ये वसती करतो, आणि जो तुम्हाला कधीही सोडणार नाही. तुम्ही त्याचे ऐकत आहात का? तुम्हाला हे मान्य करावे लागेल की देवाला तुम्ही असलेल्या कोणत्याही परिस्थितीचे उत्तर माहित आहे. येशू महान आहे की हा कैवारी सर्व परिस्थिती संबंद्धी तुम्हाला सल्ला देवू शकतो, शिकऊ शकतो. strong च्या 'exhaustive

**पवित्र आत्म्याला येशू कैवारी असे म्हणतो. मित्रांनो, हा कैवारी तुमच्यामध्ये वसती करतो, आणि जो तुम्हाला कधीही सोडणार नाही.**

concordance of the Bible (3875) नुसार,. “कैवारी” याला इंग्क्लीष मध्ये counselor म्हटलेले आहे. त्या शब्दाचा शब्दशः अर्थ म्हणजे सांगून पाठविलेला, किंवा कोणाची बाजू घेण्यासाठी आमंत्रित केलेला . एखाद्याच्या बाजूला उभे राहण्यासाठी व मदत करण्यासाठी पाठविलेला असा होतो. आणखी एक अर्थ म्हणजे दुसरयाचा कैवार घेणारा , न्यायाधीशासमोर तुमची बाजू मांडणारा, तुमच्या वतीने बोलणारा, तुमचा कायदेशीर सहकारी असाही अर्थ होतो.

मला तुमच्याबद्दल माहित नाही, पण मला अशा सहकाऱ्याचा उपयोग करून घेऊ शकतो. जेंव्हा कोळ्यांनी रात्रभर प्रयत्न करून काहीच पकडले नाही तेंव्हा पवित्र आत्मा हाच पेत्राचे उत्तर होता. कर्जातून बाहेर पाडण्यासाठी कोठे पैसे मिळवावेत किंवा शोधावेत ह्याची मला काहीच कल्पना नव्हती तेंव्हा पवित्र आत्मा हाच माझे उत्तर होता. पैशांच्या ह्या गोंधळात माझा कुटुंब अनेक वर्ष होते आणि जेंव्हा मी देवाकडे वळलो तेंव्हा स्वप्नात पवित्र आत्म्याने दाखविले की मी काम करत असलेली कंपनी सोडावी आणि माझी स्वताचीच कंपनी शून्यातून सुरु करावी.

पवित्र आत्म्याने मला दाखविले की या नवीन कंपनीचे कार्य हेच की देवाचा चांगुलपणा लोकांना जाहीर करावा आणि कर्जातून बाहेत पाडण्यासाठी त्यांना मदत करणे. त्या वेळी हा विचार कधीही न ऐकलेला,अगदी वेडेपणाचा होता. मी लोकांना त्यांच्या कर्जातून बाहेर काढणार? पैशासंबंधी काय करावे हे माहित नसलेला मी एक मोठी जाहिरातच होतो. माझे आर्थिक बाबी भयावह होत्या. परंतु पवित्र आत्म्याने तर मला हेच करावे असे सांगितले.म्हणून विश्वासाने मी व देन्द्रा बाहेर पडलो व पेत्र जे म्हणाला तेच आम्ही म्हणालो, “ हे प्रभू यात काहीच अर्थ दिसत नाही, परंतु तू म्हणतोस म्हणून आम्ही हे कारू” पवित्र आत्म्याचे ऐकून आम्ही कंपनी सुरू केली, ती वाढू लागली आणि वाढू लागली; देवाने पैसे उपलब्ध केले व आम्ही आमच्या कर्जातून पूर्ण मोकळे झालो. कंपनी अजूनही सुरूच आहे, आणि 30 वर्षानंतरही अजूनही वर्षाला लखो रुपयांचा नफा होत आहे.

मी फार हुशार नाही आणि तुम्हीही नाही, परंतु देवाने आम्हाला पवित्र आत्मा जीवनातील प्रश्न सोडविण्यासाठी मदतनीस म्हणून दिलेला आहे . परंतु या पुस्तकात आम्ही शिकतो की पवित्र आत्म्याबरोबर आम्हालाही आमचा भाग करायचा आहे. त्यामुळे देवाची इच्छा पूर्ण होइल. माझ्या अनुभवानुसार, पुष्कळ ख्रिस्ती लोकांना जीवनातील प्रश्नांची उत्तरे माहित नाहीत. ते

त्यांच्या कार्यक्षमतेनुसार आपली जाळे टाकतच असतात, आणि रात्रभर काम केल्यावरही ते जवळ जवळ रिकामेच राहतात.

त्यांनी हे ऐकलेलेच नाही की प्रत्येक परिस्थितीत पवित्र आत्मा त्यांना मदत करण्यास तयार आहे. पुष्कळ ख्रिस्ती लोक म्हणतात, “देव मला मदत करणार आहे.” परंतु देव कसा मदत करतो किंवा देव त्यांना कसा मदत करतो हे त्यांना समजतच नाही. आपल्या प्रश्नांची उत्तरे मिळण्यासाठी आपण देवाबरोबर काम करावे हेच त्यांना उमजत नाही, उलट पक्षी देवाने काहीतरी करावे याचीच ते वाट पाहत बसतात. खऱ्या परीस्थितीत उत्तर तर त्यांच्या बाजूलाच असते.

अनेक लोक म्हणतात की आर्थिक बाबतीत देव त्यांना समृद्ध करील. मी म्हणतो, “ फारच छान,! पण देव तुम्हाला पैसा कसा पुरवील?” काहीजण दुखावल्या जातात, त्यांना वाटते की मी त्यांच्या विश्वासाला आव्हान करीत आहे. पण मी दुसरा प्रश्न विचारतो, “ पैसे कोठे दिसतात? आणि देव तो तुमच्याकडे कसा पोहोचवील?” मी उत्तराची वाट पाहतो, पण त्यांना त्याची कल्पना नसते. काही काळ कदाचित उत्तर नसेल, पण शेवटी तुमच्याजवळ उत्तर असायलाच हवे. जे तुम्हाला दिसताच नाही त्याची तुम्ही कापणी करू शकत नाही. लक्षात घ्या मासे नक्की कोठे मिळतील हे येशूला माहित होते तेच त्याने पेत्राला सांगितले, आणि ते कसे पकडायचे हे देहील येशूने पेत्राला सांगितले: “तुमची जाळी टाका” येशू म्हणाला. शेवटी, जर तुम्हाला मासे पकडायचे असतील तर जाळी कोठे टाकायचे हे तुम्हाला माहित असायला हवे.

या लोकांची मेल-बॉक्स मनस्थिती असते. देव ते करणार आहे एवढाच विचार ते करतात. आणि 10 ते 20 वर्षे त्याच गोंधळाच्या स्थितीत ते असतात. हे दुख दायक आहे. तुम्हाला माहित आहे ते तसेच का राहतात? कारण त्यांना हे शिकाविलेलेच नसते की पवित्र आत्माच्या, देवराज्याच्या पद्धतीने मासे कसे पकडायचे. त्यांना यश मिळावे म्हणून पृथ्वीतलावर पवित्र आत्मा कसे कार्य करतो हे त्यांना माहित नसते. यशस्वी होण्यासाठी त्यांची भूमिका त्यांनी कशी करावी आणि पवित्र आत्मा त्याची भूमिका कशी करतो हे त्यांना माहित नसते.

आज दुपारच्या जेवणाच्या वेळी एक गृहस्थ मला भेटला त्यासारखे हे आहे. तो खूप धष्ट-पुष्ट जवळ जवळ 375 पौंड वजनाचा असावा. त्याच्या एका पायाला जोडणी-पत्ते होते, व दोन वेताच्या काठ्या होत्या.

मित्रांनो, उत्तर आहे, पवित्र आत्मा, देव, तुम्हाला माहित असायला हवी असणारी उत्तरे देण्यासाठी तुमच्या मध्ये वस्ती करतो. कधी कधी पुढील प्रश्न मला विचारल्या जातात. “मी sally बरोबर किंवा susan बरोबर लग्न करू काय? मी कोणते काम स्वीकारू, हे की ते? आम्ही येथेच राहावे की दुसरीकडे स्थलांतरित व्हावे? मी रोखा (stock) विकत घ्यावा की विकावा?” माझा प्रतिसाद आहे , पवित्र आत्मा याचे उत्तर देईल. हे सांगण्यासाठीच हे पुस्तक लिहिण्यात आलेले आहे. देवाचे राज्य कसे काम करते, पवित्र आत्मा कशी मदत करतो त्याचा आवाज कसा ओळखावा हे सांगण्यासाठीच हे पुस्तक लिहिलेले आहे.

**पवित्र आत्मा, देव, तुम्हाला माहित असायला हवी असणारी उत्तरे देण्यासाठी तुमच्या मध्ये वस्ती करतो.**

म्हणून आता मला पुन्हा एकदा सांगू द्या.

**जर येशूने सांगितले की मासे कोठे आहेत आणि ते कसे पकडायचे तर कोणीही मासे पकडू शकतो.**

Karol तिच्या इ-मेल मध्ये तिचे आयुष्य कसे बदलले हे सांगते.

*“मागच्या नाताळात माझ्या क्रेडीट कार्ड वर मी नाताळाची बक्षिसे घेत होते. काही मर्यादेपर्यंतच मी पैसे देऊ शकत होते. माझ्या मुलीला बक्षीस घ्यायचे होते. सान्ता बक्षिसे आणतो असा तिचा विश्वास होता. मी चिंतेत आणि दू:खात होते, आणि म्हणून मी गेरी पाळक साहेबांना लिहिले की मी पेरलेली गोष्ट काही काम करत नाही, कारण माझ्या बाबतीत काहीच घडले नाही. आणि त्यांनी अगदी शांतपणे मला उत्तर दिले की मी थोडे थांबावे. कारण पिक कधी कधी थोडा वेळ घेते, परंतु दुसऱ्याच दिवशी काही घडेल असे नाही.*

*आणि आता म्हणजे एक वर्षानंतर माझ्या सर्व कुटुंबासाठी मी बक्षिसे घेऊ शकत होते. ज्याची किंमत 300 किंवा 400 डॉलर्स होती असे बक्षिसे मी घेतले. ज्या लोकांनी मला याबाबत मदत केली त्यांचा मी आदर करते. मागच्या वर्षी, माझ्या एका*

*मित्राने मला त्याच्या बेसमेंटमध्ये काही महिने राहण्याची परवानगी दिली होती. जेवण घेण्यासाठी किंवा पेट्रोलसाठी माझ्याजवळ पैसे नव्हते. परंतु आता मी एका सुशोभित अश्या घरात राहते आणि माझ्या रेफ्रिजरेटर मध्ये भरपूर अन्न आहे.*

*डिसेंबर 3, हा माझ्या मुलीचा वाढदिवस आहे, आणि आम्ही तिला हर्षे पार्क, पेनसिल्वानिया येथे घेऊन गेलो. तिच्या जवळच्या मित्राला आम्ही बरोबर घेतले व हर्षे हॉटेल मध्ये आम्ही राहिलो, आणि खर्चाचे सर्व पैसे आम्ही दिले.आणि या वर्षी मी तिला 400 डॉलर्स पेक्षा जास्त किंमतीचे बक्षीस घेतले. मागच्या वर्षी कोणीतरी मला तीचा वाढदिवस साजरा करण्यासाठी 30 डॉलर्स दिले होते त्यामुळे मला फार अपमानित झाले.*

*हे लिहित असतांना मला रडायला येत आहे. पास्टर गेरी आणि त्यांची पत्नी देन्द्रा यांचे मी फार आभार मानते. हे वर्ष माझ्या आयुष्याचे सर्वोत्तम वर्ष आहे. माझ्या आयुष्यात देवाने जे काही केले ते अगदी अद्भुत होते. मी माझ्या अनुभवाचे एक पुस्तक लिहू शकेन. मला मी पृथ्वीवरच स्वर्गात असल्यासारखे राहते. मला शिकाविल्याबद्दल मी आभारी आहे."*

खालील इ-मेल एक अद्भुत गोष्ट आहे की जी मी या अगोदर ऐकलेली नाही. ही गोष्ट मिचीगन मधील शेरोन ची आहे.

*पास्टर गेरी हे मी माझे पती आणि मी या आम्हा दोघांच्या द्वारे लिहित आहे. मी तुमचे व तुमच्या पत्नीचे आभार मानते तुम्ही दोघे आमच्या साठी एक प्रेरना देणारे आहात. तुमच्याबद्दल आम्ही 3-4 वर्षापूर्वी* Sid Roth *येथे ऐकलेले होते. त्यावेळी आम्ही अगदी संकट-काळातून जात होतो. माझ्या पातिला 18 वर्ष काम केल्यावर काढून टाकण्यात आले होते. आणि हे होत असतांनाच आम्ही 2 लाख 80 हजार डॉलर्स चे घर बांधले होते. तणाव आणि कर्ज यामुळे पाणी आमच्या मानेपर्यंत आले होते.*

*तुमच्या काही* CD *आम्ही मागविल्या. कर्ज हे कसे हळूहळू येते व तुमचे जीवन आणि स्वास्थ्य यावर भयानक परिणाम करते याबद्दल आम्ही शिकलो. आम्हाला मार्ग सापडत नव्हता. आम्ही जरी कर्ज फेडले नव्हते तरी त्या घरात आम्ही दोन वर्षे राहिलो. हेच आमच्यासाठी एक आशीर्वाद होते.*

*थोडक्यात सांगते, माझ्या पतीला त्याची नोकरी 4 वर्षानंतर पुन्हा मिळाली, व मागील चार वर्षाचे वेतनही त्याला मिळाले. कारण तो विश्वासात राहत होता आणि देवाच्या अभिवचनावर त्याचा विश्वास होता, या घटनेमध्ये कोणीही वकील किंवा कायदेशीर सल्लागार नव्हता. त्या मागील वर्षाच्या सर्व सुट्ट्याही त्याला मिळाल्या. जेंव्हा त्यांनी त्याला पुन्हा कामावर बोलाविले तेंव्हा पहिली गोष्ट त्यांनी सांगितली ती म्हणजे त्याने सुट्टीवर जावे. आता आम्हाला मागच्या पेक्षाही चांगले घर मिळाले की ज्याचे सर्व पैसे आम्ही भरले. तुम्ही जे काही केले त्याबद्दल आम्ही आभारी आहोत.*

मिस्सुरी मधील ANDREW लिहितो:

*दोन वर्ष अगोदर मे महिन्यात मी एका रखरखीत जागेत राहत होतो. माझ्या पूर्वीच्या नोकरीबद्दल मी आनंदी नव्हतो. दुसऱ्या ठिकाणी मी नोकरीला लागलो. बिल गोळा करणारा माल सारखे फोन करीत होता.* gas *साठी व जेवणासाठी माझ्या जवळ फार कमी पैसे होते.. महिन्याचा शेवट येत होता आणि घरभाडे भरण्याचेही दिवस जवळ येत होते.*

*माझ्या जवळ गेरी च्या CDs होत्या. (*Revolution 2.0 series). *मी एकदा सभेमध्ये बसलो असतांना मला पेरायचे होते पण माझ्याजवळ फक्त 23 डॉलर्स होते. ते माझ्या पेट्रोलसाठी की जे मला आठवडाभर कसेतरी पुरू शकत होते. काम काही फार चांगले चालले नव्हते.आणि मी देवाला म्हणत होतो की मला पेरायचे आहे, परंतु माझ्याजवळ तर पैसे नव्हते. आणि मला माझ्या मनात आवाज ऐकू आला जो म्हणत होता मी (देव) त्या 23 डॉलर्स चा उपयोग माझ्यापेक्षाही जास्त चांगला करू शकत*

*होता. देवाने म्हटल्यानुसार मी 20 डॉलर्स पेरले आणि त्यापासून खूप चांगला परतावा मिळेल असा माझा विश्वास होता.*

*गाड्यांना धूत असतांना मी कोणालातरी मदत करीत होतो, मी मदत करण्यास तयार होतो जरी मला त्याच्यातून जरी मी काही उत्पादित वस्तू विकल्या असत्या तरी फार मोठी रक्कम मिळणार नव्हती. दिवस पूर्ण झाल्यावर देखरेख करणारा आणि मी केलेल्या मदतीबद्दल माझी प्रशांश केली. आणि त्या दिवसाची विक्री पूर्ण झाली असे सांगितले. मला फक्त कमिशन चा पैसा मिळाला असे नाही तर एकंदर नफा जो मला मिळणार होता तो 2000 डॉलर्स एवढा होता. ही गोष्ट एका आठवड्यातच झाली. मला 100 पट अधिक मिळाले.*

*देव खरच विश्वासू आहे. थोडी गोष्ट देखील मोठी होते जर देव त्यामध्ये असेल तर. तेंव्हापासून मी माझा दशांश व वर्गणी देणे ही बाब काळजीपूर्वक व मोठ्या आनंदाने करू लागलो. वाढ होण्याची मला अशा होती. काही महिन्यानंतर एक गोष्ट घडली. ज्यासाठी मी पेरले होते त्यानुसार मला नवीन दर्जा मिळाला. किरकोळ मिळण्यापासून मी वर चढलो व माझे उत्पन्न चार दोन वर्षात चारपट वाढले..देवाची स्तुती असो सर्व गौरव त्याचे आहे. स्तुती करण्यासारखी दुसरी बाब म्हणजे: आता कारसाठी चे कर्ज बँक मध्ये नव्हते आणि मी अगदी नवीन पूर्ण पैसे देऊन विकत घेतलेली कार चालवू लागलो.*

आता कोरिया येथला स्तुतीचा अहवाल ऐका:

*प्रिय गेरी पाळकसाहेब.*

*मी माझे जीवन कोणताही उद्देश नसल्यासारखे जगत होतो, आणि माझ्या स्वतःचे असे काही नव्हते. कोणीतरी दिलेल्या पैशावर व अन्नावर मी जगत होतो. जेंव्हा मला देऊन देऊन लोक थकले तेंव्हा फक्त बिस्किट्स व कोक एवढेच मिळण्याची*

*अशा होती. एवढेच मी माझ्यासाठी व माझ्या दोन लेकरांसाठी करू शकत होतो. घरभाडे किंवा बिल्स भरण्याची मला ऐपत नव्हती. "*Faith Life Church*" ची एक मीटिंग मी पहिली होती हे मला आठवते. तेंव्हा तुमच्या एका पाळकाला मी माझी बिकट परिस्थिती *on line *वर सांगितली. आणि त्याने मला सांगितले जसे येशुने कर भरण्यासाठी कोठे मासे पकडायचे हे पेत्राला सांगितले तसे तू देवाला विचार की तू कोठे आणि कसे मासे पकडायचे. थोडक्यात म्हणजे गेरी पाळक साहेबांचे शिक्षण मी ऐकले व आता माझ्याजवळ एक आफ्रिकन रेस्टोरंट व एक केस कापण्याचे दुकान आहे. देवाची स्तुती असो.*

ह्या खूप मोठ्या घडलेल्या गोष्टी आहेत, तरी तुम्ही म्हणाल, "गेरी, हे फार महान आहे, पण ह्या गोष्टी इतरांच्या बाबतीत घडल्या आहेत, माझ्या बाबतीत नाही." ठीक आहे, पण तुमची गोष्ट संपलेली नाही. आता मला एक पप्रश्न विचारू द्या. " हे पुस्तक वाचत असतांना तुम्ही खुर्चीवर बसलेले आहात, आणि तुम्हाला भीती वाटत आहे की तुम्ही वाहून जाणार आहात म्हणून तुम्ही पक्के धरून ठेवता.? नाही तसे होणार नाही. कारण तुम्हाला गुरुत्वाकर्षणाचा नियम ठाऊक आहे. आणि तुम्हाला हेही ठाऊक आहे की हा नियम सर्वांनाच लागू आहे.

लक्षात घ्या देव-राज्याचा नियमही असाच कार्य करतो. तुम्ही हे नियम शिकू शकता. तुमच्या संबंधी वैशिष्ट्यपूर्ण व्यूहरचना तुम्ही शिकू शकता की ज्यामुळे जीवन देवाचे सामर्थ्य दर्शविणाऱ्या गोष्टीत रुपांतरित होईल. आम्ही अगोदरच सिद्ध केले आहे की पवित्र आत्म्याच्या ज्ञानाने व मदतीमुळे अश्या गोष्टी घडलेल्या आहेत.. म्हणून आता पवित्र आत्म्या संबंधी काही मुलतत्वे आपण पुन्हा पाहू या. मग आम्ही ऐकणे व व्युहरचना या संबंधी सविस्तर रीतीने पाहणार आहोत

अध्याय 4

# मुलतत्वे: या शिवाय घर सोडू नका

पवित्र आत्म्याने दिलेली व्युव्ह-रचना आणि मार्गदर्शित केलेलें विजय यांनी भरलेले जीवन तुम्हाला जगायचे असेल तर प्रथम तुम्हाला पुन्हा जन्म होण्याचा व पवित्र आत्म्याद्वारे होणारा बाप्तिस्मा हे दोन अनुभव असणे आवश्यक आहेत. होय पवित्र अत्म्याद्वारे मिळणारे हे दोन्ही अनुभव भिन्न आहेत.या गोष्टी तुमच्यासाठी पूर्ण नवीन असतील तर हरकत नाही. मी तुम्हाला त्यातून घेऊन जाईल.परंतु आता मुद्दा स्पष्ट करू द्या. पवित्र आत्म्याचा बाप्तिस्मा इतका महत्वाचा होता की येशूने सांगितले की तो होईपर्यंत घर सोडून जाऊ नका. येशू काय म्हणतो बघा.

> *"यरुशलेम सोडून जाऊ नका, तर जे पित्याचे वचन तुम्ही मजपासून ऐकले आहे त्याची वाट पहा. कारण योहानाने पाण्याने बाप्तिस्मा केला ; तुमचा बाप्तिस्मा थोड्या दिवसांनी पवित्र आत्म्याने होईल.*
>
> —प्रेषित 1:4ब-5

> *"पवित्र आत्मा तुम्हावर येईल आणि तुम्हास सामर्थ्य प्राप्त होईल आणि.....तुम्ही माझा साक्षी व्हाल.*
>
> —प्रेषित 1:8

लक्षात घ्या, येशू म्हणतो " याशिवाय (पवित्र आत्मा आल्याशिवाय), यरुशलेम (घर) सोडून जाऊ नका. " ही गोष्ट फार महत्वाची आहे. मूलतः तो हे म्हणतो की देवाचे कार्य करण्यासाठी, राज्याचे साक्षी होण्यासाठी तूम्हाला या सामर्थ्याची गरज आहे . तरी आज

असे अनेक लोक आहेत की ज्यांनी पवित्र आत्म्याच्या बाप्तीस्म्याबद्दल ऐकले नाही किंवा त्यांना तो अनुभव नाही. अनेक ख्रिस्ती लोक मंडळीमध्ये वाढलेले आहेत तरी त्यांनीही पवित्र आत्म्याच्या बाप्तीस्म्याच्या गरजेबद्दल ऐकलेलेल नाही. किंवा त्यांना हे शिकविण्यात आले की हा बाप्तिस्मा त्या वेळेस होता आता त्याची गरज नाही. हा चमत्कार होणे निघून गेलेले आहे.

मी अशा मंडळीत वाढलो की जेथे मी पवित्र आत्म्याच्या बाप्तीस्म्याबद्दल कधीही ऐकले नव्हते. मला जगभरातून पुष्कळ इ-मेल्स येतात, व विचारल्या जाते की या अनुभवाची सत्यता आहे काय? आणि म्हणून मी वेळ काढून त्या बद्दल सांगण्यासाठी हे लिहित आहे.

याबाबतीत पवित्र शास्त्र अगदी स्पष्ट सांगते असा माझा विश्वास आहे. आणि पवित्र शास्त्रानेच ते सांगावे असे मला वाटते. तुमच्या सर्व प्रश्नांची उत्तरे पवित्र शास्त्रच देईल. परंतु सुरुवातीला मला हे सत्य कसे सापडले हे सांगू द्या.

जेंव्हा मी लहान होतो मला देवासाठी भूक लागलेली होती (आता वयस्कर झाल्यावरही मला भूक आहेच) आणि म्हणून मी माझ्या संस्थेच्या एका मंडळीला जाऊ लागलो. नेहमीच्या पद्धतीनुसार सर्व होत होते. हे तुम्हीही केले असेल. दोन गाणी झाल्यानंतर आत्म-परीक्षणासाठी काही वेळ जात असे. प्रभूची प्रार्थना म्हटल्या जायची, त्यानंतर पाळक उपदेश करायचे , नंतर शेवटचे गीत व शेवटचा आशीर्वाद. ह्याप्रकारे प्रत्येक उपासना व्हायची.

लोक छान होते, आणि ते खरोखर देवावर प्रीती करणारे होते. परंतु सुवचनाची वास्तविकता मला खऱ्या अर्थाने दिसलीच नाही. लोकांचे जीवन नाट्यपूर्ण रीतीने

बदलेले किंवा देवाच्या सामर्थ्याने लोक बरे झालेले मी पहिले नाहीत. मी हे सांगू शकतो की देव-राज्याचे कार्य मला तेथे दिसले नाही.

मी 18 वर्षाचा होतो , माझ्या वडिलांचे पिझ्झा-दुकान चालवीत होतो. व मी देवासाठी भुकेला होतो. एके रात्री एक गृहस्थ माझ्याकडे आला व मला संजीवनच्या सभेसाठी आमंत्रण दिले. माझ्याच गावात एका लहान मेथोडीस्ट मंडळीत त्या सभा होत होत्या. पवित्र शास्त्रात सांगितलेल्या गोष्टी आजही येशू करतो याबद्दल ह्याबद्दल सुवार्तिक-वक्ता सांगत होता.

ह्या गोष्टीने मी आकर्षित झालो कारण मला त्या गोष्टी बघण्याची उत्सुकता होती. माझे काही मित्र ह्या मंडळी-उपासनेला येत होती म्हणून मी त्या संजीवनाच्या सभांना जाण्याचे ठरविले. त्या रात्री मी पवित्र आत्म्याच्या बाप्तीस्म्याबद्दल ऐकले नाही तरी त्या सभेत देवाच्या

उपस्थीतीचा मला स्पर्श झाला. माझ्या मित्रांनी मला रविवारच्या सभेला येण्याचे आमंत्रण दिले. मी गेलो आणि जणू मी त्या मंडळीच्या प्रेमातच पडलो, आणि ती मंडळी माझे नवीन घर झाले.

संजीवनाच्या सभा झाल्यावर काही आठवड्यानंतर मला स्त्रियांचा एक गट भेटला की जो प्रत्येक आठवड्याला पवित्र शास्त्राचा अभ्यास करण्यासाठी एकत्र येत असे. पवित्र आत्म्याचा बाप्तिस्मा, पवित्र आत्म्याची दाने, आणि अनेक इतर गोष्टो ज्याबद्दल मी कधीही ऐकले नव्हते त्याबद्दल त्या बोलत असत. पवित्र आत्म्याच्या सामर्थ्याबद्दल मलाही ऐकण्याची उत्सुकता होती, म्हणून त्यांच्या बायबल स्टडी मध्ये मी येऊ का असे विचारले.त्यांची बायबल स्टडी सकाळी असे व रात्री पिझ्झा शॉप मध्ये काम केल्यावर मी सकाळी येऊ शकत होतो. त्या सभेला जाण्याचे मी ठरविले.

मी तेथे पोहोचल्यावर मला समजले की मीच एकटा पुरुष होतो व तेही फक्त 18 वर्षांचा. परंतु त्यामुळे मला काही फरक पडला नाही. मी गेलो कारण देवाबद्दल मी भुकेला होतो. मी अनेक प्रश्न विचारले.

त्या ठिकाणच्या स्त्रिया खूपच शांत वृत्तीच्या होत्या. त्यांनी माझ्याच पवित्र शास्त्रामधून मला दाखविले की पवित्र आत्म्याचा बाप्तिस्मा, व देवाचे सामर्थ्य येशु पृथ्वीवर असतांना जसे होते तसेच आजही आहे. सर्वात चांगला भाग म्हणजे त्यांनी सांगितले की हे सामर्थ्य प्रत्येक विश्वासनाऱ्यासाठी आहे म्हणजेच जो ते मागेल त्याच्यासाठी आहे.

काही आठवडे बायबल स्टडीच्या सभांना उपस्थित राहिल्यानंतर मला त्यांनी सांगितले की “”Women’s Aglow” नावाची एक मिटिंग सर्व शहरासाठी होणार आहे. ही संस्था पवित्र आत्म्याचा बाप्तीस्म्याबद्दल शिकविते. काही स्त्रियांनी त्याला जाण्याचे ठरविले आणि त्यांच्याबरोबर जाण्याचे त्यांनी मला आमंत्रण दिले. त्या दिवसात सर्व मंडळयांचे लोक अशा सभांना पवित्र आत्म्याबद्दल ऐकण्यासाठी जमु लागले होते, जरी आतापर्यंत ह्या सभा फक्त पेंटीकोस्टल लोकांसाठी होत्या असे समजले जात असे. त्यावेळी मात्र ज्या मंडळयांमध्ये पवित्र अत्म्याबाद्दलचे शिक्षण देण्यात येऊ लागले तेथे charismatic म्हणजे नव चैतन्य निर्माण झाले असे म्हणण्यात येऊ लागले.

Women’s Aglow ची मिटिंग ला गेल्यावर तेथे शेकडो स्त्रिया जमा झालेल्या दिसल्या व थोड्या पुरुषांमध्ये मी एक होतो. परंतु त्या खोलीत देवाची उपस्थिती मात्र जाणवत होती.

काही लोक ते बरे झाल्याबद्दल बोलत होते व काहीजन प्रार्थना करतांना जमिनीवर पडत होते. मला आश्चर्य वाटले. मी असे कधीही पहिले नव्हते आणि माल उत्सुकता लागली व मी गोंधळूनही गेलो होतो. ह्या प्रकाराला पवित्र आत्म्यात मारल्या जाने असेही काही लोक म्हणू लागले. हे मला अनभिज्ञ व वेगळेच होते, परंतु ज्या लोकांना तो अनुभव आला ते तेजस्वी भारावलेले व देवाचा स्पर्श झालेले वाटत होते.

नंतर मला कळाले की आपले शरीर देवाचे सामर्थ्य पेलू शकत नाही आणि ते सामर्थ्याने विव्हळ होतात, व त्याला अभिषेक म्हणतात. काही स्त्रिया तसे म्हणत होत्या. येसुच्या कळत हे केंव्हा घडले हे त्यांनी मला सांगितले. जेंव्हा शिपाई येशूला पकडण्यासाठी आले तेंव्हा येशू त्यांना म्हणाला,

> *"तुम्ही कोणाला शोधता?" ते म्हणाले,'नासारेथकर येशूला' तो म्हणाला, 'मीच तो आहे.' मीच तो आहे असे म्हणताच ते मागे हटून जमिनीवर पडले." (योहान 18:4ब-6 )*

ती सभा चालू असतांना माझ्यासाभोवातीच्या स्त्रिया उत्साहित झालेल्या होत्या, आणि अनेक लोकांना मी वेगवेगळ्या भाषेत देवाची स्तुती करतांना ऐकले.हा सर्व अनुभव मला इतका नवीन होता की जवळपास संपूर्ण सभेत मी भीतीयुक्त आदराने उभा होतो.जरी त्या सभेतील काही गोष्टी माझ्यासाठी विचित्र किंवा विलक्षण होत्या तरी त्या ठिकाणातील देवाचे विश्वास ठेवण्यास योग्य व जाणवणारे वास्तव्य मी नाकारू शकत नव्हतो. शुभवर्तमानाची सत्यता व देवाचे सामर्थ्य हे पवित्र वचनात सांगितल्यानुसार आजही कार्य करते हे शोधण्यास मी अति उत्सुक होतो.

सभेच्या शेवटी वक्त्याने आमंत्रण दिले की ज्यांना पवित्र आत्म्याचे दान हवे असेल त्यांनी प्रार्थानेसाठी समोर यावे. म्हणून पुढील स्त्रियांनी माझ्यासाठी प्रार्थना करावी यासाठी मी समोर गेलो. त्यांनी प्रार्थना केली. व प्रार्थना करीत असतांना देवाच्या उपस्थितीने मी इतका भारावून गेलो की मी प्रबळ झालो. जेंव्हा मी त्याच्या उपस्थितीत ओरडू लागलो, तेंव्हा मला आश्चर्य वाटते की मी पवित्र आत्म्यात प्रार्थना करू लागलो आणि मी असे शब्द वापरू लागलो की जे मलाच समजले नाही. मी त्या रात्री काही वेळपर्यंत अन्य भाषेत प्रार्थना केली. त्या अनुभवाने मी इतका भारावून गेलो की, जो मला भेटेल त्याला या अनुभवाबद्दल मी सांगावे असे वाटू

लागले.परंतु माझ्या मंडळीतील मित्रांना मी जेंव्हा हे सांगितले तेंव्हा ते फार उत्सुक दिसले नाहीत. ते म्हणू लागले की अन्य भाषा ही सैतानाकडची आहे, किंवा अन्य भाषा केंव्हाच लुप्त झाली आहे. अशा लोळणाऱ्या लोकांपासून मी दूर राहावे असे त्यांना वाटत होते.

त्या दिवसात मंडळ्या पवित्र आत्म्याच्या दानांबद्दल उत्सुक नव्हत्या, आणि असा सिद्धांत मांडल्या जात होता की चमत्कार प्रेशितान्बरोबरच लुप्त झालेले होते. Women's Aglow च्या या सभेअगोदर मी माझ्या लहान मेथोडीस्ट मंडळीत तरुणाचा पुढारी होतो. दर रविवारी चर्च-इमारतीच्या खालच्या भागात तरुणांची सभा होत असे याशिवाय फार काही जास्त केल्या जात नसे. त्यामध्ये काही खेळ खेळत असू, थोडा नष्टा-पाणी झाल्यावर लहानसा संदेश देण्यात येत असे.

त्या वेळी मीच एक लहान तरुण होतो. परंतु मला जाणवले की मला देवाच्या गोष्टीबद्दल उत्साह होता आणि त्यासाठी मी मदत करण्यास तयार होतो.

आमच्या गटात त्यावेळी 15 जन होते. Women's Aglow च्या मिटिंग मध्ये मला जो पवित्र आत्म्याच्या बाप्तीस्म्याचा जो अनुभव आला होता तो त्यांना सांगावा अशी माझी इच्छा होती. मला कळले की माझ्यासारखेच त्यांनीही या अनुभवाबद्दल ऐकले नव्हते. आणि त्या मंडळीत रविवारी ते त्या अनुभवाबद्दल ऐकणार नव्हते.

पुढे काय घडले हे सांगण्यापूर्वी माझ्या मनात काय उलाढाल होत होती हे मला तुम्हाला सांगायला हवे आहे. माझ्या गटातील तरुणांना हे सांगावे अशी पाळकांची मला परवानगी मिळणार नव्हती. मला काय अनुभव आला हे मी पाळकांना सांगितले नाही..

माझ्या मंडळीच्या विरीधात मी जाण्याचा प्रयत्न करीत नव्हतो, आणि माझ्या पाळक साहेबाच्या भोवती मी फिरकत नव्हतो. परंतु मी अति उत्साहित होतो. या विषयाबाबतचा वाद मला खऱ्या अर्थाने समजलेला नव्हता, आणि आमचे पाळक या गोष्टीच्या विरोधात असतील असे मला खरच माहित नव्हते.

त्या रविवारी रात्री मला पवित्र आत्म्याच्या बाप्तीस्म्याचा जो अनुभव आला तो तरुणांना सांगावा आणि त्यांना प्रेषितांच्या पुस्तकात जे सांगितलेले आहे ते दाखवावे असे मी ठरविले. आम्ही आमच्या चर्च-इमारतीच्या खालच्या खोलीत खाली बसलो होतो आणि मी माझा अनुभव त्यांना सांगितला आणि त्या बाबतची सत्यता सांगण्यासाठी काही वचने दाखविली.

या संध्याकाळी माझे पाळक मात्र आमच्या मिटिंग मध्ये आले व बोलत असतांना माझ्या डावीकडे बसले. माझ्या पाळकांच्या उपस्थितीबद्दल मला काही वाटले नाही. मला वाटले मी जे काही सांगत आहे ते पालकांना माहीतच होते.

म्हणून तरुणांना माझा अनुभव व मी जे काही पहिले ते सांगतिले. अन्य भाषां बोलण्याबद्दल मी काही फार खोलात शिरलो नाही. उलट माझे लक्ष मी प्रिषत 1:9 वर केंद्रित केले. त्या ठिकाणी लहिले होते की पवित्र आत्मा आल्यावर आम्हाला सामर्थ्य प्राप्त होईल की जेणेकडून आम्ही देवाचे साक्षी होऊ.

मिटींगच्या शेवटी आता शेवट कसा करावा हे मला खरच माहित नव्हते. म्हणून मी मुलांना विचारले की ज्यांना पवित्र अत्माचा बाप्तिस्मा हवा आहे त्यांनी हात वर करावे. या क्षणी काय करावे हे मला माहित नव्हते. Women's Aglow च्या मिटींगमध्ये जे पहिले त्याशिवाय पवित्र अत्माय्च्या बाप्तीस्म्या संबंधी कसे मार्गदर्शन करावे हे मला माहित नव्हते. मला फक्त दोन तीनच शाश्त्राभाग त्यावेळी माहित होते.

म्हणून मी म्हणालो पवित्र आत्म्याची मोफत देणगी जर कोणाला हवी असेल तर त्यांनी हात वर करावे, आणि डोके लववून प्रार्थना करावी. मी फक्त एवढेच म्हणालो. मी त्यांना स्पर्श केला नाही किंवा पवित्र आत्मा कसा मिळवावा हे शिकविलेही नाही.आम्ही डोके लववून प्रार्थना केली अर्थात सर्वसाधारण ख्रिस्ती डिनोमिनेशन जशी प्रार्थान करतात तसे डोळे लाऊन प्रार्थना केली.

आमेन म्हटल्यानंतर मी बसूनच होतो आणि मुलांमध्ये काही गडबड मला जाणवली. मी डोळे उघडून पहिले की काही ओरडत होते, काही थरथर कपात होपे आणि सात मुलांनी अन्य भाषेत प्रार्थना करायला सुरुवात केली. त्यांच्या चेहऱ्यावर एक प्रकारचे तेज मला दिसले. ते जणुकाय लाईट-बल्बसारखे होते. मला धक्का बसला.

माझे पाळक आपर्यंत काहीच बोलले नाही त्यांनी माझ्या पाठीवर थाप मारून म्हटले मला तुझ्याशी बोलायचे आहे. आम्ही दुसऱ्या खोलीत गेलो तयंनी माझ्या डोळ्यात पाहून म्हटले, “हे सैतानापासून आहे, येथून पुढे तू तरुणांचा पुढारी राहणार नाही. हे असे चालणार नाही.”

माझ्या मनात विचार आला हे सैतानापासून आहे असे तुम्ही कसे म्हणू शकता. मुलांकडे पहा ते प्रकाशित झाले आहेत, भौतिक रीतीने ते अभिषेक झालेले दिसून येते. अर्थात अभिषेक

होणे म्हणजे काय हे मला माहित नव्हते. ते मात्र प्रकाशित झाले होते एव्हढेच मला माहित होते, मी त्यांना स्पर्श केला नव्हता किंवा कसे वागावे हे मी त्यांना सांगितले नव्हते. पाळकाने मला अशा प्रकारे धामकवावे ही गोष्ट माझ्यासाठी खूपच निराशा आणणारी व गोंधळात टाकणारी होती. काय करावे हे मला कळत नव्हते.

पुढील रविवारी मी माझ्या मंदिरात गेलो व नेहमी सारखा पुढच्या लीत न बसता मी मागे बसलो.माझ्या तरुणाच्या मिटिंग मुळे मी पाळकाच्या दृष्टीने मीजासेकाय कुत्र्याच्या घरात होतो. माझी परिस्थिती खालच्या स्थराला गेली होती हे मला समजले.

रविवारच्या सकाळच्या मिटिंग मध्ये मननासाठी नेहमीसारखा वेळ दिल्या गेला.ही वेळ माझ्या मंडळीमध्ये खूप आदरणीय व शांत वेळ होती. प्रत्येकाची डोकी खाली होती,आणि मंदिरात कोणताच आवाज नव्हता. सुई पडली तरी आवाज आला असता. या वेळी मला जाणवले की कोणीतरी माझ्या पाठीवर हळूच थाप मारली. शेवटच्या बाकावर मी होतो, आणि मधल्या जागेत उभे राहून कोणीतरी माझ्या खांद्यावर हळूच थाप मारीत होते. या शांत वेळेत कोणीतरी चालत येणे हेच मला धक्का देणारे होते. मी वर पहिले तेंव्हा दिसले की एक आठवड्यापूर्वी जमा झालेल्या तरुणांपैकी एक मुलगा उभा होता. मला माहित होते की ज्या सात जणांना त्या रात्री पवित्र आत्म्याचा बाप्तिस्मा मिळाला होता त्या पैकी तो एक होता. तो मला म्हणाला, “चल जाऊ या” पण कोठे?

त्या रात्री पवित्र आत्मा मिळाल्यावर जसा तो प्रकाशमय झाला होता तसाच आताही दिसत होता., आणि मला समजले की काहीतरी कार्य करीत होता. परंतु या वेळी व याजागेवर काही करावे याबद्दल मला खात्री नव्हती. कारण पाळकाबरोबर मी आधीच अडचणीत होतो. रविवारी सकाळच्या सभेत आम्हाला पाहिजे तसे आम्ही काही करू शकत नव्हतो. त्या वेळी तो मुलगा म्हणाला, “ माझ्या आई साठी प्रार्थना करणार आहे.”

आता मला समजयाला लागले की काय होत आहे. त्याची आई मला ठाऊक होती. ती उंचीने लहान,अशक्त आणि खूप दिवसांपासून आजारी होती. तिची मणक्याची पाच हाडे वाईट रीतीने कमकुवत झाली होती. आणि डॉक्टरच्या म्हणण्यानुसार त्यांना एकत्र आणणे हाच एक उपाय होता. शस्त्रक्रिया गंभीर स्वरूपाची होती, आणि माझा मित्र तिचा एकाच मुलगा होता. अर्थात त्याला त्याच्या आईची काळजी होती.

पवित्र आत्म्याचा बाप्तिस्मा मिळाल्यानंतर, त्या मुलाला खात्री झाली की येशू त्याच्या आईला बरे करणार. म्हणून जेंव्हा तो म्हनामाल “चला आता जाऊ या.” तेंव्हा मला वाटले की तो वर जाऊन आपल्या आईच्या डोक्यावर हात ठेवून प्रार्थना करेल.पण त्याने तसे केले नाही. तो आपल्या आईच्या बेंचजवळ गेला व तिला तेथून बाजूला केले आणि मंदिराच्या समोरच्या जागी आणले.

आईला तेथे बसविले व अगदी मोठ्या आवाजात त्याने अन्य भाषेत प्रार्थना करण्यास सुरुवात केली. लक्षात घ्या प्रार्थनेच्या शांत काळात हे घडले की ज्या ठिकाणी आता शांतता नव्हती. मला धक्का बसला.नंतर तो माझ्याकडे वळला व म्हटले की आता काय घडत आहे याचे तू स्पष्टीकरण दे.

मी त्याच्या बरोबर जावे असे त्याला का वाटत होते हे आता मला कळाले. मी त्याला पवित्र आत्म्याच्या बाप्तीस्म्याबद्दल सांगितले होते हे समजून त्याला हे वाटले की मीच मंडळीला हे काय घडत आहे व अन्य भाषेत प्रार्थना का होत आहे हे सांगू शकेन.

मग मी मंडळीसमोर त्याच्या वतीने बोलणारा म्हणून उभा राहिलो व त्याच्या आईसाठी अन्य भाषेत प्रार्थना करू लागलो. माझे पाळक समोरच माझ्याकडे तक लाऊन पाहत बसले होते त्यामुळे काय बोलावे हे मला समजत नव्हते. मी फालत एव्हडेच सांगितले की त्याची आई आजारी होती व तिच्यासाठी तो अन्य भाषेत प्रार्थना करीत होता की जे पवित्र शास्त्रात लिहिलेले आहे. आणि काय झाले माहित आहे? ती आई त्याच क्षणी मंदिरामध्ये बरी झाली.

हा त्या मुलाचा विश्वास होता की त्याने प्रार्थना केल्यावर कोण काय म्हणेल. त्याची खात्री होती की पवित्र आत्मा जिवंत आहे आणि तो त्याच्या आईला बरे करू शकतो.

जरी ती ताबडतोब बरी झाली तरी मंडळीने ते मान्य केले नाही. काहीजण नंतर माझ्याकडे आले व म्हणाले, “ त्या मुलाने आपल्या आईसाठी प्रार्थना केली हे आम्ही समजू शकतो, परंतु अन्य भाषा? हे हाताळणे कठीण आहे. मी एक गोष्ट खात्रीपूर्वक सांगतो ती म्हणजे, सैतान अन्य भाषेचा देखील द्वेष करतो. आणि तो अन्य भाषेचा का द्वेष करतो हे मी तुम्हाला समजण्यासाठी या पुस्तकात मदत करीन.

तुम्ही अशा मंडळीत वाढला असाल ज्याठिकाणी अन्य भाषा व आत्म्याची दाने हे प्रत्यक्षात उतरले नसतील. किंवा तुम्हाला असेही शिकविले असेल की अन्य भाषा आज साठी नाही ती संपलेली आहे.

या प्रश्नांची उत्तरे देणे अवघड नाही. या विषयावर पवित्र शास्त्र अगदी स्पष्ट सांगते. म्हणून पवित्र आत्म्याचा बाप्तिस्मा या सत्यावर एक दृष्टीक्षेप टाकू. या अध्याच्या सुरुवातीला जे वचन आपण पहिले त्याकडे पुन्हा जाऊ या.

> *"यारुशालेम सोडून जाऊ नका,तर पित्याने देऊ केलेल्या ज्या देणगीविषयी तुम्ही माझ्याकडून ऐकले आहे तिची वाट पहा. कारण योहानाने पाण्याने बाप्तिस्मा केला खरा; पण तुमचा बाप्तिस्मा थोड्याच दिवसांनी पवित्र आत्म्याने होईल."*
>
> —प्रेषित 1:4ब-5

**ज्या गोष्टी मी तुम्हाला सांगतो त्या मी आपल्या मनाच्या सांगत नाही. माझ्यामध्ये राहणारा पिता स्वत:ची कार्य करितो"**

**—योहान 14:10ब**

या वाचनात अनेक महत्वाची मुद्दे आम्हाला पहावयास मिळतात.

1. पाण्याने झालेल्या बाप्तीस्म्यापेक्षा पवित्र आत्म्याचा बाप्तिस्मा वेगळा आहे.

2. येशूने म्हटले की हा बाप्तिस्मा अतिशय महत्वाचा आहे. इतकेच नाही तर येशूने हेही स्पष्ट केकेल की त्यावाचून तुम्ही काहीच करू शकत नाही.

ध्यानात घ्या की येशुबे त्यांना नुकतेच सांगितले होते की त्यांनी जावून रस्त्रातील लोकांस सुवृत्त सांगावे .परंतु हे करण्यासाठी व देव-राज्याबद्दल सांगण्यासाठी पवित्र आत्म्याच्या बाप्तीस्म्याशिवाय पर्याय नव्हता. येशू म्हणतो, सामर्थ्य प्राप्त होई पर्यंत येथेच वाट पहा. वचन पुन्हा वाचा,

> *"परंतु पवित्र आत्मा तुमच्यावर येईल तेंव्हा तुम्हाला सामर्थ्य प्राप्त होईल आणि यारुशलेमेत, सर्व याहुदियात, शोमारोनात, व पृथ्वीच्या शेवटपर्यंत तुम्ही माझे साक्षी व्हाल."*
>
> —प्रेषित 1:8

सामर्थ्य! ग्रीक भाषेत द्युनामीस (dunamis) हा शब्द वापरलेला आहे. त्या पासूनच 'dynamite हा इंग्रजी शब्द आलेला आहे. आम्ही पाहतो की देवाचे सामर्थ्य त्याचे कार्य

करण्यासाठी आमच्यावर आलेले आहे. येशूच्या सेवाकार्यामध्ये तो म्हणतो की हे सामर्थ्य किंवा ज्या अभिषेकाखाली तो कार्य करीत होता ते पित्यापासून आलेले आहे.

> *"ज्या गोष्टी मी तुम्हाला सांगतो त्या मी आपल्या मनाच्या सांगत नाही, माझ्यामध्ये राहणारा पिता स्वतःची कार्य करितो.*
>
> —योहान 14:10ब

> *"मी तुम्हाला खचित खचित सांगतो, ...पुत्राला स्वतःहून काही करिता येत नाही..."*
>
> —योहान 5:19

आम्ही पाहतो की येशूला कार्य करण्यासाठी देवाच्या आत्म्याचे सामर्थ्य हवे होते. अभिषेक (annointing) म्हणजे लागू करणे. हा अभिषेक येशूला यार्देन नदीच्या काठी पित्यापासून झाला जेंव्हा पवित्र आत्मा त्याच्यावर कबुतराच्या स्वरुपात आला. हा अभिषेक झाल्यावरच येशूला देव राज्याचे कार्य करता आले. जर येशूला त्याची आवश्यकता होती तर आम्हाला सुद्धा आहे. हेच सामर्थ्य ज्यांना देवाची खरी ओळख नाही त्यांना प्रत्यक्ष काही करून साक्ष देईल.

पवित्र शास्त्र सांगते की जेंव्हा पवित्र आत्मा तुमच्यावर येईल तेंव्हा तुम्हाला सामर्थ्य प्राप्त होईल. तो तुमच्या मध्ये येऊन तुमचा नवीन जन्म होईल तेंव्हा हे सामर्थ्य मिळणार नाही. जेंव्हा आम्ही पवित्र आत्म्याच्या बाप्तीस्म्याबद्दल बोलतो तेंव्हा काहीजण म्हणतात की त्यांनी जेंव्हा येशूला स्वीकारले तेंव्हाच त्यांना पवित्र आत्मा मिळाला आहे. येशूला स्वीकारले तेंव्हा पवित्र आत्मा मिळाला हे खरे आहे. पवित्र आत्मा त्यांचे आत्मे देवाजवळ जिवंत राहण्यास तयार करतो. आणि ते देवाशी एक होतात.

आमचा पुन्हा जन्म होतो तेंव्हा पवित्र आत्म्याच्या सामर्थ्याने आम्ही देवाजवळ जिवंत असतो

परंतु आमचा हा शास्त्राभाग आम्हाला सांगतो की "जेंव्हा पवित्र आत्मा तुम्हावर येतो तेंव्हा".... ही बाब फार महत्वाची आहे ती बाब आम्ही याच पुस्तकात पुढे पाहणार आहोत.

पुन्हा जन्म होणे व पवित्र आत्म्याचा बाप्तिस्मा किंवा अभिषेक या दोन वेगवेगळ्या गोष्टी आहेत. योहान 20:21-22 मध्ये ही गोष्ट स्पष्ट होते.

> *"येशू त्यांना पुन्हा म्हणाला, तुम्हास शांती असो. जे पित्याने मला पाठविले तसे मीही तुम्हाला पाठवितो. असे बोलून त्याने त्यांचावर फुंकर टाकला आणि म्हटले 'पवित्र आत्म्याचा स्वीकार करा'*

येशूच्या पुनरुत्थानानंतर येशू शिष्यांना अभिवादन करतो , त्यांच्यावर फुंकर टाकतो व पवित्र आत्मा स्वीकाराण्याबद्दल सांगतो. हा तो क्षण आहे की त्यांचा पुन्हा जन्म झाला आणि त्यांचे आत्मे आंतरिक रित्या देवाजवळ जिवंत आहेत. तरी येशू त्यांना म्हणतो की पवित्र आत्म्याच्या बाप्तीस्म्याची की जो तुमच्यावर नंतर येईल त्याची वाट पहा

येशूने फुंकर टाकली तेंव्हाच पूर्ण पवित्र आत्मा मिळाला असता तर पवित्र आत्माचे त्यांच्यावर येण्याचे अभिवचन त्यांना का देण्यात आले आणि तो येइपर्यन्त यरुशलेम मध्ये राहा असे त्याने शिष्यांना का सांगितले असते. म्हणून ह्या दोन वेगवेगळ्या घटना आहेत व त्यांचे कार्यही वेगवेगळे आहे. मला हे सांगू द्या की येशुलाही पवित्र आत्म्याचचा बाप्तिस्मा त्याची सेवा सुरु करण्याच्या अगोदर घेण्याची आवश्यकता होती. पवित्र आत्माचा बाप्तिस्मा होण्याच्या अगोदर येशूने चमत्कार करण्याची एकही घटना दिसत नाही. येशू वाढत असतांना त्याने टेबलवरील भाकरीचा चमत्कार केला का? किंवा त्याने तो बाळ असतांना एखादा चमत्कार केला का? किंवा त्याने जास्त भूक लागली म्हणून आपल्या जेवणात चमत्कारीकरित्या वाढ केली का? नाही त्याने तसे केले नाही. त्याने तसे का केले नाही? अगदी साधे उत्तर आहे: तो तसे करू शकला नाही.

यार्देनन नदीवर पवित्र आत्मा मिळे पर्यंत त्याने चमत्कार करण्यास सुरुवात केली नाही. तुम्हाला माहित आहे येशू मनुष्य म्हणून आला. देवाचा पुत्र म्हणून सामर्थ्य व गौरव याने मंडीत होऊन तो आला नाही. मनुष्य म्हणून त्याला काही मर्यादा होत्या. जसे तुम्ही किंवा मी स्वताहून चमत्कार करू शकत नाही, तसेच येशुही लोकांना बरे करू शकला नाही किंवा चमत्कार करू शकला नाही.

अर्थात आपल्या सारखा येशूचा आत्मा जेंव्हा त्याचा जन्म झाला तेंव्हा मृत नव्हता. तर त्याचा आत्मा सदैव देवासाठी जिवंत होता.पुन्हा जन्म होणे ह्याची त्याला आपल्यासारखी आवश्यकता नव्हती. त्याचा आत्मा जरी देवासाठी जिवंत होता तरी सेवाकार्य सुरु करण्यासाठी जसे आम्हाला आवश्यक आहे तसे त्यालाही पवित्र आत्म्याच्या बाप्तीस्म्याची आवश्यकता होती.

> *मग बाप्तिस्मा घेतल्यावर येशू लागलीच पाण्यातून वर आला आणि पहा आकाश उघडले तेंव्हा त्याने परमेश्वराचा आत्मा कबुतरासारखा उतरतांना व आपणावर येतांना पाहिला. आणि पहा, आकाशातून अशी वाणी झाली की, हा माझा 'पुत्र' मला परमप्रिय आहे, ह्याच्याविषयी मी संतुष्ट आहे.*
>
> –मत्तय 3:16-17

येशू हा राज्यांचा राजा आणि प्रभूंचा प्रभू आहे असा विचार आम्ही करतो परंतु या स्थानाचा उपयोग करून त्याने सेवा केली नाही, तर पवित्र आत्मा यार्देनेच्या काठी आल्यावर त्याने चमत्कार करण्यास सुरुवात केली. प्रतेक विश्वसणारी व्यक्ती येशूचे कार्य करण्यासाठी बोलावलेली आहे आणि जोपर्यंत तुमचा पवित्र आत्म्याने बाप्तिस्मा होत नाही तो पर्यंत तुम्ही सेवा करू शकत नाही. काही घडण्यासाठी तुम्हाला पवित्र आत्माच्या सामर्थ्याची आवश्यकता आहे. आणि ते कार्य कसे करावे हे समजण्यासाठी आत्म्यात प्रार्थना करण्याची तुमची पात्रता पाहिजे. याबद्दल आपण नंतर पाहणार आहोत.

अर्थात तुमच्या नवीन किंवा पुन्हा जन्माच्या आधारे तुम्ही पवित्र शास्त्रात तारणाबद्दल काय सांगितले आहे हे तुम्ही सांगू शकता.पवित्र आत्म्याचा बाप्तिस्मा न झालेले अनेक ख्रिस्ती लोक सुवृत्त इतरांना सांगू शकतात. परंतु येशूने जसे देव-राज्याचे बद्दल स्पष्ट दाखविले तसे ते करू शकत नाहीत. त्यामुळे आमचे संदेश हे बरेच कमकुवत असतात.

जेंव्हा येशूने परुशी लोकांना त्यांच्या अविश्वासाबद्दल सांगितले तेंव्हा तो करीत असलेल्या चमत्कारांचा त्याने उल्लेख केलेला दिसतो.

> *"मी पित्यामध्ये व पिता माझ्यामध्ये आहे हे माझे तुम्ही खरे माना' नाहीतर माझ्या कृत्यांमुळे तरी माझे खरे माना." (योहान 14:11)*

या द्वारे येशू हे दाखविण्याचा प्रयत्न करत आहे की आता वादाला वाव नाही ' वाद येथेच थांबत आहे. येशूने ज्यासाठी किंमत मोजली त्या सर्व गोष्टींसाठी विश्वासनाऱ्याला पूरक कायदेशीर अधिकार आहे, यांमध्ये रोगनिवारणही अंतर्भूत आहे. प्रत्येक विश्वासनाऱ्याला त्यांच्या विश्वासामुळे (स्वर्गाबरोबरचा करार) देवाने दिलेले अभिवचन मिळू शकते.

परंतु पवित्र आत्म्याचे सामर्थ्य, तुमच्यामधून दुसऱ्यामध्ये प्रभावित होण्यासाठी, तुमच्यामधून देवाच्या देणग्या वाहण्यासाठी आणि अन्याभाषेत बोलून स्वर्गीय रहस्यामधील चालण्याचा आनंद घेण्यासाठी तुम्हाला त्या सामर्थ्याचा अभिषेक आवश्यक आहे. मला कळतंय की अन्य भाषेत प्रार्थना करणे म्हणजे काय हे तुम्हाला कळले नसेल. त्या मुळे घाबरू नका, नंतर मी तुम्हाला स्पष्टीकरण देईलच.

माझी मुलगी अमी काही वर्षांपासून आमच्या मंडळीत (Faith life चर्च), न्यूअल्बानी, ओहिओ) भक्तीचे पुढारीपण करते.  तिला एक समस्या होती. तिचे पोट हळूहळू वाढत होते. पुष्कळ डॉक्टर लोकांना दाखविले . कोणालाही काही कारण सापडले नाही. ते म्हणत होते तिचे शरीरच तसे आहे.

हे असे होत असतांनाच असे दिसू लागले की ती जशीकाय सहा महिन्याची गरोदर आहे. त्यावेळी X-ray काढण्यात आला व त्यात दिसून आले की तिच्या पोटामध्ये एक गोळा वाढत आहे. X-ray बघितल्यावर अमिला समजले की आता त्यावरच उपाय म्हणजे शस्त्रक्रिया. नुकतेच लग्न झाले होते व तिला समजले की अशी शस्त्रक्रिया होती की ज्यामुळे ती पुढे आई होण्यासाठी अडखळण होणार होते किंवा आई होणे शक्य नव्हते.

शस्त्रक्रिया हा तिच्या साठी पर्याय नव्हता. आई होण्याची स्वप्ने ती पाहत होती. पोटातील त्या वाढीमुळे तिचा महत्वाचा अवयव बाजूला झालेला होता.

त्यामुळे तिला पचन क्रियेचा त्रास होत होता आणि किडनी ची समस्या ही तयार झाली होती. पवित्र वचनाचा अभ्यास ती गंभीर रीतीने करू लागली आणि विशेष रीतीने रोग बरे होण्या संबंधी ती अभ्यास करू लागली. त्याच आठवड्यात मी मंडळींमध्ये रोगनिवारण्यावर शिकवीत होतो.

माझे शिकविणे संपल्यानंतर तिने मंडळीच्या सर्व वडिलांना तिच्यासाठी डोक्यावर हात ठेऊन प्रार्थना करण्यास याकोब 5:14-15.

*"तुमच्या पैकी कोणी दुखणाईत आहे काय, त्याने मंडळीच्या वडिलांना बोलवावे आणि त्यांनी प्रभूच्या नावाने त्याला तेल लावावे व त्याच्यावर ओनावून प्रार्थना करावी. विश्वासाची प्रार्थना दुज्खानैतास वाचवील आणि प्रभू त्याला उठवील, आणि त्याने पापे केली असली तर त्याला क्षमा होईल.*

—याकोब 5:14-15


अमीचा देवाच्या वाचनावर विश्वास होता.आणि आम्ही तिच्व्वर हाथ ठेवल्याने ती बरी होईल हे तिने सांगितले. शारीरिक दृष्टीने तशी काही चिन्हे दिसली नाहीत परंतु तिचा विश्वास होता की ती बरी झालेली आहे.

दोन आठवड्यानंतर एके दिवशी ती झोपायला गेली, तरी शारीरिक दृष्टीने बरी होण्याची चिन्हे दिसत नव्हती.परंतु दुसऱ्या दिवशी सकाळी उठल्यावर तिला धक्काच बसला. तिचे वजन 13 पौंड ने कमी झाले होते आणि थीच्या कंबरेचा घेर 9 इंचाने कमी झाला होता. तिची वाकलेली पाठ पूर्ण दुरुस्त झाली होती. ती क्षणात बरी झालेली होती.



**अगोदर** **नंतर**

ही चित्रे अद्भूतरीतीने रोगनिवारण झाले हे दाखवितात. डावीकडचे चित्र झोपायला जाण्याच्या अगोदरचे आहे. उजवीकडचे चित्र ती सकाळी जेंव्हा उठली तेंव्हाचा आहे.




ती बरी होण्याच्या अगोदरच X-ray डावीकडे आहे आणि बरी झाल्यावर एक आठवड्यानंतरचा आहे. तिच्या पाठीच्या कण्यामध्ये झालेला नाट्यपूर्ण बदल पहा.

त्या वेळी अमी आमच्या भक्ती गटाची पुढारी होती. येणाऱ्या रविवारी ती मंदिरात गेली तेंव्हा काय घडले असेल याची तुम्ही कल्पना करू शकता. लोक तिच्याकडे टक लाऊन पाहू लागले. लोक लॉबी मध्येच धक्का बसलेल्या अवस्थेत थांबले आणि म्हणू लागले, "तुला काय झाले? तुला नवीन शरीर मिळाले काय? संपूर्ण मंडळी धक्का बसलेल्या अवस्थेतच होती जेंव्हा अमी भक्ती चालवू लागली तेंव्हा. आणि देवराज्याचे ह्या निर्देशनाने अनेक लोकांना देवाकडे आणले आणि अनेकजण त्याच्या आजारांपासून बरे झाले.

तुम्हाला हे मानावेच लागेल की देवराज्य प्रत्यक्ष दिसावे असे लोकांना वाटते. प्रेषित 1:8 मध्ये आम्ही अभिषेक पाहतो, हा अभिषेक म्हणजे पवित्र आत्म्याचा बाप्तिस्मा.

> *पवित्र आत्मा येईल तेंव्हा तुम्हाला सामर्थ्य प्राप्त होईल. आणि यरुशलेमेत, सर्व याहीदियात, शोमारोनात व पृथ्वीच्या शेवटपर्यंत तुम्ही माझे साक्षी व्हाल.*
>
> —प्रेषित 1:8

येशूच्या संधर्भात विचार करता, देव-राज्याचे प्रदर्शन होणे आवश्यक होते.

> *आणि विश्वास धरणाऱ्याबरोबरही चिन्हे असत जातील: ते माझ्या नावाने भुते काढतील, नव्या नव्या भाषा बोलतील, सर्प उचलतील, व कोणताही प्राणघातक पदार्थ प्याले तरी तो त्यांना कधीच बधणार नाही; त्यांनी दुखानैतावर हाथ ठेवले म्हणजे ते बरे होतील.*
>
> —मार्क 16:17-18

सर्प उचलणे प्राणघातक पदार्थ पिणे हे सैतानाच्या राज्याचे दर्शक आहे व त्यामुळे सरळ सरळ भीती वाटते. सैतांचे राज्य हरलेले आहे. येशू आम्हाला सर्प उचलणे किंवा प्राणघातक पदार्थ पिणे म्हणजे प्रत्यक्ष तसे करणे असे नाही. परंतु शत्रूवर आमचे सामर्थ्य कसे कार्य करते हे सांगण्यासाठी त्याने हे वाक्यांश वापरलेले आहेत. देवाचा हाच अधिकार व सामर्थ्य आम्ही घेऊन लोकांना सैतानाच्या अधिपत्याखालुन सोडवावे हे देवाला हवे आहे.

लक्षात घ्या येशू म्हणतो की जे विश्वास ठेवतात त्यांच्याबरोबर ही चिन्हे असतील. जेंव्हा ही चिन्हे किंवा देव-राज्याचे प्रदर्शन लोक पाहतील तेंव्हा हे कसे घडले असे ते विचारतील. चिन्ह काहीतरी दर्शवितात. ते स्वतः प्रश्नांची उत्तरे नाहीत. परंतु चिन्ह येशुकडे निर्देश करते.

येशू प्रभू आहे किंवा नाही याची चर्चाच येथे संपते. तो आहेच. आणि जेंव्हा लोक पाहतील की तो आहे तेंव्हा लोक पश्चाताप करतील आणि देवाकडे येतील. व त्यासाठीच तुम्हाला आणि मला पवित्र आत्म्याचा बाप्तिस्मा हवा आहे. त्याच्याशिवाय मात्र आम्ही प्रभावी ठरणार नाही.

पवित्र आत्म्याचा बाप्तीस्म्याची आवश्यकता का आहे याचा काही पाया आम्ही तयार केलेला आहे. या अभीशेकासाठी लागणारे काही पवित्र शास्त्रातील वचने पाहू या.

अध्याय 5

# पवित्र शास्त्रीय पुरावा

पवित्र आत्मा म्हणजे काय हे समजून घेण्याचा सर्वात चांगल्या मार्गांपैकी एक मार्ग म्हणजे ज्यांना प्रेषितांच्या पुस्तकात दिल्यानुसार ज्यांना पन्नासाव्या दिवशी पवित्र आत्मा मिळाला त्यांना अनुसरणे. जेंव्हा आम्ही प्रत्येक शास्त्रनानार पेन्तेकॉष्टभागाचा अभ्यास करतो तुमचा विश्वास आणि खात्री वाढत जाईल.

*“नंतर पेंटेकॉस्ष्ट म्हणजे पन्नासावा दिवस आला तेंव्हा ते सर्व एकत्र जमले असता. अकस्मात मोठ्या वार्याच्या सुसात्यासारीखा आकाशातून नाद आला, आणि ज्या घरात ते बसले होते ते सर्व त्याने भरले.अग्नीच्या जीभासारख्या वेगवेगळ्या झालेल्या जीभ त्यास दिसल्या; आणि त्या प्रत्येकावर एकेक अशा बसल्या. तेंव्हा ते सर्व पवित्र आत्म्याने परिपूर्ण झाले. आणि आत्म्याने जसे त्यास वदविले तसे ते अन्य भाषेत बोलू लागले. त्यावेळी आकाशातील प्रत्तेक राष्ट्रातील भक्तिमान यहुदी यरुशलेमात राहत होते.तो नाद ऐकल्यावर लोकसमुदाय एकत्र येऊन गोंधळून गेला कारण की प्रत्येकाने आपापल्या भाषेत त्यास बोलतांना ऐकले.ते सर्व चकित व विस्मित होवून म्हणाले पहा, हे बोलणारे सर्व गालीली ना? तर आपण प्रत्येकजण आपापली जन्मभाषा ऐकतो हे कसे?*

*पार्थी, मेडी, एलामी, मेसोपटेम्या, याहुदिया, काप्पुदुकीय. पंत, असिंया, फ्रुगीया, पाम्फुलीया, मिसर, व कुरानेच्या जवळचा लिंबू देश ह्यात राहणारे यहुदी व याहीदीय मातानुसरी असे रोमन प्रवासी, क्रेतीय, अरब असे आपण त्यांना आपआपल्या भाषांत*

> *देवाची महात्कृते सांगतांना ऐकतो. तेंव्हा ते सर्व गोंधळून जावून एकमेकास म्हणाले, हे काय असेल? परंतु दुसरे कित्तेक चेष्टा करीत म्हणाले, हे द्रक्षरासाने मस्त झाले आहेत.*
>
> *—प्रेषित 2:1-13*

पहिली बाब तुम्ही सर्वांनी लक्षात घ्यावी आणि ती म्हणजे ते सर्व पवित्र आत्म्याने भरून गेले (परिपूर्ण झाले). दुसरी बाबा म्हणजे, ते सर्व अन्य भाषेत बोलू लागले. पन्नासाव्या दिवसाबद्दलचे स्पष्टीकरण तुम्ही अनेक लोकांकडून ऐकले असेल. काही जन म्हणतात की तो त्या दिवसाचा अनुभव होता कारण त्याठिकाणी अनेक राष्ट्रांमधून लोक एकत्र जमलेले होते व त्यांना सुवृत्त सांगण्यासाठी अनेक भाषांची आवश्यकता होती. परंतु तुम्ही पवित्र शास्त्र चांगले वाचले तर तुम्हाला समजेल की त्याठिकाणी एका खोलीत 120 जन होते व ते सर्व देवाच्या अद्भुत कार्याबद्दल बोलत होते. ते सुवृताचा संदेश देत नव्हते, ते फक्त देवाची स्तुती करीत होते.

> *“आपण त्यांना आपआपल्या भाषांत देवाची महात्कृते सांगताना ऐकतो..... विस्मित होवून ते एकमेकास म्हणाले, “हे काय असेल?”*
>
> —प्रेषित 2:11ब-12

सभोवताली जमलेल्या लोकांनी त्यांना (120 लोकांना) प्रत्येकाच्या भाषेमध्ये देवाची स्तुती करतांना ऐकले. आणि ते गोंधळून विस्मित झाले. त्यावेळी पेत्र उठून उभा राहिला आणि त्याने तारणाचा संदेश दिला. आणि मंडळीमध्ये 3000 लोकांची भर पडली. जर इतर लोक अन्य भाषेत संदेश देत होते तर पेत्राला उभे राहून संदेश देण्याची आवश्यकता नव्हती. जोपर्यंत पेत्राने संदेश दिला नाही तोपर्यंत इतर शिष्य काय बोलत होते हे त्यांना कळले नव्हते. तेंव्हा अन्य भाषांचा उपयोग सुवृताचा संदेश देण्यासाठी करण्यात आलेलेला नव्हता, आणि आताही संदेश देण्यासाठी तो करण्यात येत नाही. अन्य भाषांचा फायदा विश्वसणाऱ्यासाठी काय आहे ते आपण नंतर पाहू. येथे जी काही सर्वसाधारण चर्चा केली जाते ते मी सांगत आहे.

मला पुन्हा सांगू द्या पवित्र वाचनात म्हटले आहे की, त्या सर्वांन पवित्र आत्मा मिळाला आणि ते सर्व अन्य भाषेत बोलू लागले. जर पवित्र शास्त्राला आम्ही तेथेच थांबविले तर अन्य भाषा सर्व मंडळीतील लोकांसाठी आहे या बद्दल थोडं संशय निर्माण होईल. परंतु पवित्र शास्त्र

येथेच थांबत नाही. कारण आम्हाला पुढे हे पाहायला मिळते की ही बाब प्रत्येक व्यक्तीसाठी आहे. पन्नासाव्या दिवसानंतर ज्या व्यक्तीला पवित्र आत्म्याचा बाप्तिस्मा मिळालेला आहे त्या सर्वांसाठी अन्य भाषा आहे. पन्नासाव्या दिवशी जी व्यक्ती तेथे हजर होती त्या व्यक्तीचे नाव मला सांगू द्या.

"तेंव्हा ज्यांची पांगापांग झाली होती ते वाचनाची सुवार्ता सांगत चहूकडे फिरले; आणि फिलीप्पाने शोमरोन शहरी जाऊन तेथील लोकांपुढे ख्रिस्ताची घोषणा केली. तेंव्हा फीलीप्पाचे भाषण ऐकून व तो करीत असलेली चिन्हे पाहून लोकसमुदायांनी त्याने सांगितलेल्या गोष्टीकडे एकचित्ताने लक्ष दिले." (प्रेषित 8:4-6)

या ठिकाणी फिलीप्प देव-राज्याचे प्रदर्शन करीत होता व लोक ऐकत होते. हीच गोष्ट आजही होऊ शकते. जेंव्हा लोक चिन्ह पाहतात, जेंव्हा देव-राज्याचा पुरावा ते पाहतात, तेंव्हा तुम्ही काय बोलता त्याकडे ते लक्ष देतात.

> *"कारण ज्यांना अशुद्ध आत्मे लागले होते त्यांच्यातील पुष्कळातून ते मोठ्याने ओरडून निघून गेले; पुष्कळ पक्षाघाती व पांगळी माणसे बरी झाली. आणि त्या नगरात आनंदी आनंद झाला."*
>
> —प्रेषित 8:7-8

लक्षात घ्या यरुशलेम मध्ये जे सामर्थ्य फिलीप्पाला मिळाले होते त्याच सामर्थ्यात तो चालत होता. चिन्हे त्याच्या मागे चालत होती, आणि देवाचे सामर्थ्य सर्वांना दिसले. त्याला DUNAMIS(ग्रीक शब्द) म्हणजे सामर्थ्य मिळाले व देव-राज्याचा तो साक्षी झाला.

> *"मग शोमरोनाने देवाचे वचन स्वीकारले हे यरुशलेमेतल्या प्रेषितांनी ऐकून त्यांच्याकडे पेत्र व योहान ह्यांना पाठविले. ते तेथे आल्यावर त्यांनी त्यास पवित्र आत्मा मिळावा म्हणून त्यांच्यासाठी प्रार्थना केली; कारण तोपर्यंत त्यांच्यापैकी कोणावरही तो उतरला नव्हता. प्रभू येशूच्या नामात मात्र त्यांचा बाप्तिस्मा झाला होता. तेंव्हा त्यांनी त्यांच्यावर आपले हात ठेवले आणि त्यांना पवित्र आत्मा मिळाला."*
>
> —प्रेषित 8:14-17

हे घडण्याच्या अगोदर आम्ही हे वाचतो की अशुद्ध आत्मे मोठ्याने ओरडून निघून गेले, लोक बरे झाले देवाची अद्भुत कृते लोकांनी पाहिली आणि लोकांनी येशूवर विश्वास ठेवला व त्यांचा पाण्याने बाप्तिस्मा झाला. परंतु नंतर असेही म्हटले आहे की त्यांच्यापैकी कोणावरही पवित्र आत्मा अजून उतरला नव्हता.

आम्ही पाहतो फिलीप्पाने तारणाची वार्ता सांगितली, लोकांनी ते स्वीकारले व त्यांना तारण प्राप्त झाले, परंतु त्यांना पवित्र आत्म्याचा बाप्तिस्मा मिळाला नव्हता. त्यांचा पुन्हा जन्म झाला होता पुढे वचन काय सांगते याकडे लक्ष द्या: तो पर्यंत पवित्र आत्मा त्यांच्यापैकी कोणावरही उतरला नव्हता. हाच फरक महत्वाचा होता. आमच्यामध्ये पवित्र आत्मा असणे (पुन्हा जन्माचा अनुभव) आणि पवित्र आत्माचे सामर्थ्याने उतरणे ह्यात फरक आहे.

फिलीप्पाने त्यांना पवित्र आम्याच्या बाप्तीस्म्याबद्दल का संगीतले नाही हे पवित्र शास्त्र आम्हाला सांगत नाही. शक्यता ही आहे की यरुशलेम मध्ये पवित्र आत्म्याचा चा बाप्तिस्मा झाल्याबरोबर फिलीप्प तेथून निघाला असेल व पवित्र आत्मा सर्वांसाठी आहे हे कदाचित त्याला कळले नसेल. कारण काही का असेना परंतु हे मात्र खरे आहे की लोकांनी सुवृतावर विश्वास ठेवला, त्यांचा पाण्याने बाप्तिस्मा झाला व त्यांचा पुन्हा जन्म झाला. परंतु प्रेषितांच्या दृष्टीने जसे त्यांना पवित्र आत्मा मिळाला तसेच शोमारोन येथील लोकांनाही तो ताबडतोब मिळावा हे महत्वाचे होते.

लोकांनी कसे कपडे घालावेत, मंडळीत सभा केंव्हा भरवाव्यात, सिद्धांताचे नियम काय असावेत हे लोकांना सांगावेत हा विचार प्रेषितांच्या मनात आला नाही. त्याला प्रथम स्थान नव्हते. तर मग प्रथम स्थान कशाला होते? पवित्र आत्म्याचा बाप्तिस्मा! म्हणून शोमरोनातील लोकांना संगण्यासाठी प्रेषित ताबडतोब तिकडे धावले.

पेत्र आणि योहान ह्यांनी आपले हात त्यांच्यावर ठेवले आणि त्या लोकांना पवित्र आत्मा मिळाला. अगदी त्याच ठिकाणी व त्याचं वेळी. पुरावा काय होता? इतरांच्या सारखाच, आणि तो म्हणजे अन्य भाषेत प्रार्थना करणे

> *शिमोन नावाचा एक जादुगार होता. प्रेषितांचे हात ठेवल्याने पवित्र आत्मा मिळतो हे जेंव्हा शिमोनाने पहिले, तेंव्हा त्यांना पैसे देऊ करून शिमोनाने म्हटलो, "ज्या कोणावर*

*मी आपले हात ठेवीन त्याला पवित्र आत्मा मिळावा असा अधिकार मलाही द्या." तेंव्हा पेत्र म्हणाला, "तुझ्या रुपयाचा तुझ्याबरोबर नाश होवो....या सेवाकार्यात तुला भाग किंवा वाटा नाही; कारण तुझे अंतःकरण देवाच्या दृष्टीने निट नाही. तू आपल्या दुष्टतेचा पश्चाताप करून प्रभू जवळ विनंती/ प्रार्थना कर, म्हणजे तुझ्या अंतःकरणातल्या कल्पनेची तुला कदाचित क्षमा होईल; कारण तू अतिशय कटूतेत व अनीतीच्या बंधनात आहेस असे मला दिसते." तेंव्हा शिमोन म्हणाला, "तुम्ही सांगितलेल्या गोष्टींपैकी काही माझ्यावर येवू नये म्हणून माझ्यासाठी तुम्ही प्रभूजवळ विनंती करा.*

—प्रेषित 8:18-24

हात ठेवल्याने पवित्र आत्मा दिल्या जातो असे जेंव्हा शिमोनाने पहिले तेंव्हा त्याने प्रेषीतांना ते समर्त्या विकत घेण्यासाठी पैसे देऊ केले . प्रेषित तेथे अन्य भाषा बोलले असा उल्लेख नाही तरी प्रत्यक्ष दिसणारे पुरावे शिमोनाने पहिले म्हणुंन त्याला ते सामर्थ्य पाहिजे होते. शिमोनाने असे काहीतरी पहिले की जे सामर्थ्याने भरलेले होते. ते करण्याची त्याची पात्रता त्याला हवी होती. शिमोन जे बोलला त्यावरून मला वाटते की त्या लोकांनाही पवित्र आत्म्याचा बाप्तिस्मा होऊन ते अन्य भाषेत बोलतांना त्याने पहिले. मला हे प्रामुख्याने सांगायचे आहे की मंडळीच्या दृष्टीने पवित्र आत्म्याचा बाप्तिस्मा किती महत्वाचा होता.

*जेंव्हा दमास्कसच्या रस्त्यावर पौलाचे परिवर्तन झाले. हनन्या नावाच्या माणसाला प्रार्थना करण्यासाठी त्याच्याकडे पाठविण्यात आले. हनन्या म्हणाला, "शौल भाऊ , तू वाटेने येत असता ज्या प्रभुणे म्हणजे येशूने तुला दर्शन दिले त्याने तुला पुन्हा दृष्टी यावी व तू पवित्र आत्म्याने परिपूर्ण व्हावे म्हणून मला पाठविले आहे.*

—प्रेषित 9:17ब

पवित्र शास्त्र हे सांगत नाही की पवित्र आत्म्याचा बाप्तिस्मा झाला तेंव्हा पौल अन्य भाषेत बोलला; परंतु आम्हाला हे माहित आहे की पौल अन्य भाषेत बोलला असेलच, आणि इतरांना जसा तो मिळाला तसाच पौलालाही मिळाला. तुम्ही म्हणाल, मी असा विश्वास का धरतो की इतरांना मिळाला तसा पौलालाही मिळाला.

1 करिंथ 14:18 मध्ये पौल जे म्हणतो त्यावरून माझा विश्वास आहे की पौलही अन्य भाषेत बोलला असला पाहिजे.

> *तुम्हा सर्वांपेक्षा मी अधिक भाषा बोलतो म्हणून मी देवाचे आभार मानतो.* (1 करिंथ 14:18)

म्हणून आम्ही असा निष्कर्ष काढतो की जेंव्हा त्याचा पवित्र आत्म्याचा बाप्तिस्मा झाला तेंव्हा तो अन्य भाषेत बोलला. प्रशितांची कृत्ये हे पुसाक आम्ही वाचले तर आम्हाला समजते की दिवसेनदिवस मंडळीमध्ये हे चालतच होते.ही गोष्ट फक्त पन्नासाव्या दिवशीच घडली असे नाही.

पुढे आम्ही प्रेषित 10 मध्ये वाचतो की पेत्राला एका विदेश्याच्या घरी पाठविण्यात आले आणि त्याला विदेश्यांना सुवार्ता सांगण्यास सांगितले. पेत्र यहुदी होता व त्याला विदेशाच्या घरी जाणे हे फारच कठीण होते. पेत्र तेथे गेला कारण पवित्र आत्म्याने त्याला त्याबाबतीत सांगितले होते.

> *"पेत्राचे हे भाषण चालू असतांनाच वचन ऐकणाऱ्या सर्वांवर पवित्र आत्मा उतरला. मग परराष्ट्रीयान्वरही पवित्र आत्म्याच्या दानांचा वर्षाव झाला आहे असे पाहून पेत्राबरोबर आलेल्या विश्वास ठेवणाऱ्या व सुंता झालेल्या सर्व लोकांना आश्चर्य वाटले. कारण त्यांनी त्यांना अनेक भाषांतून बोलतांना व देवाची थोरवी गातांना ऐकले. तेंव्हा पेत्राने म्हटले, ' आम्हाला मिळाला तसा पवित्र आत्मा ज्यांना मिळाला आहे त्यांचा बाप्तिस्मा होवू नये म्हणून कोणाच्याने पाण्याची मनाई करवेल? मग येशू ख्रिस्ताच्या नावात त्यांचा बाप्तिस्मा व्हावा अशी त्याने आज्ञा केली. तेंव्हा काही दिवस राहावे म्हणून त्यांनी त्याला विनंती केली."*
>
> — प्रेषित 10:44-48

विदेश्याच्या घरी पेत्र सुवृत्त सांगत असतांना जे ऐकत होते त्या सर्वांवर पवित्र आत्मा उतरला. तुम्ही पवित्र आत्म्याला पाहिलेले नाही, मग पवित्र आत्मा त्यांच्यावर उतरला हे त्यांना कसे समजले. देवाचे वचन सांगते की सुंता झालेले जे विश्वासणारे होते ते देखील पवित्र

आत्मा विदेश्यांवर उतरला हे पाहून विस्मित झाले,कारण त्यांनी त्यांना अन्य भाषेत बोलतांना व देवाची स्तुती करतांना ऐकले.

तर याठिकाणी पवित्र आत्मा मिळाल्याचा पुरावा काय होता? देवाने वेदाशांचाही स्विकार केलेला आहे याचा पुरावा पेत्राजवळ काय होता? या लोकांना पेत्राने कधीही पवित्र आत्म्याच्या बाप्तीस्म्याबद्दल सांगितले नव्हते, परंतु त्याने त्यांना अन्य भाषेत बोलतांना ऐकले आणि तोच एक पुरावा त्याच्याजवळ होता. पेत्राला जसा पवित्र आत्मा मिळाला होता तसाच त्या लोकंनाही मिळाला होता कारण ते अन्य भाषेत प्रार्थना करीत होते

आधुनिक युगात मंडळी काय विचार करते आणि त्या वेळी मंडळी काय विचार होती यातील मोठा फरक तुम्हाला सापडेल. एक शास्त्राभाग अगदी स्पष्टपणे सांगतो की प्रत्येकाचा पवित्र आत्म्याने बाप्तिस्मा व्हायला पाहिजे. आणि हे कार्य पुनः जन्म होणे यापेक्षा वेगळे आहे. तो शाश्त्राभाग म्हणजे

> *"मग असे झाले की अपुल्लो करिथात असता पौल वरच्या प्रांतामधून जावून इफिसास पोहोंचला; इथे कित्तेक शिष्य त्याला आढळले; त्यांना तो म्हणाला, तुम्ही विश्वास ठेवला तेंव्हा तुम्हाला पवित्र आत्मा मिळाला काय? त्यांनी त्याला म्हटले, पवित्र आत्मा आहे की काय हे आम्ही ऐकलेही नाही."*
>
> —प्रेषित 19:1-2

वरील वचनावरून दिसते की पौ एफिसमध्ये आल्यावर पहिला प्रश्न त्याने विचारला, "तुम्ही विश्वास ठेवला तेंव्हा तुम्हाला पवित्र आत्मा मिळाला काय?" पवित्र आत्मा मिळणे किती महत्वाचे आहे हेच पौलाला वाटत होते. कारण पौलाला माहित होते की पुन्हा जन्म होणे आणि पवित्र आत्म्याचा बाप्तिस्मा होणे ह्यात मोठा फरक आहे, आणि त्याचा पुरावा म्हणजे अन्य भाषेत बोलणे.

हीच पहिली गोष्ट पौलाने त्यांना का बरे विचारली? कारण मूलतः हीच गोष्ट येशूने प्रेषित 1:4 मध्ये सांगितलेली आहे. ती म्हणजे यरुशलेम सोडून जावू नका."  आता जेंव्हा शोमारोन येथे काय घडले ते ऐकून प्रेषितांनी काय केले? ते म्हणाले, "मुलांनो, आता तबडतोब

शोमरोनात जा, घडलेले सर्व योग्य चौकटीत बसवायचे आहे. तिकडे लवकर जा आणि त्यांना पवित्र आत्म्याचा बाप्तिस्मा झालेला आहे काय ते पहा." पौल जेंव्हा इफिस येथील शिष्यांना भेटला तेंव्हा त्याने पहिला प्रश्न विचारला, " जेंव्हा तुम्ही विश्वास ठेवला तेंव्हा तुम्हाला पवित्र आत्मा मिळाला काय?"

जेंव्हा त्यांनी म्हटले ,"पवित्र आत्मा आहे की काय हे आम्हाला माहित नाही, आम्ही त्याबद्दल ऐकलेही नाही, तेंव्हा पौलाने विचारले, "तुम्हाला कोणता बाप्तिस्मा मिळाला ?" त्यांचे उत्तर होते, "बाप्तिस्मा करणाऱ्या योहानाचा." पौलाने सांगितले की योहानाचा बाप्तिस्मा हा पश्चातापाचा बाप्तिस्मा होता . आणि त्याच योहानाने सांगितले होते की जो माझ्या मागून येतो , तो म्हणजे येशू, त्यावर विश्वास ठेवा.

**मला माहित आहे की हा विषय अनेक मंडळयांमध्ये वादग्रस्त आहे. पवित्र शास्त्रात तसे नाही तरी सैतान मात्र त्याचा द्वेष करत आहे.**

पौलाचे हे बोलणे ऐकून, त्यांनी येशूच्या नावात बाप्तिस्मा घेतला (पाण्याचा बाप्तिस्मा). त्यानंतर पौलाने त्यांच्यावर हात ठेवले तेंव्हा त्यांना पवित्र आत्मा मिळाला व ते अन्य भाषेत बोलू लागले. लक्षात घ्या जेंव्हा पौलाने हा प्रश्न विचारला तेंव्हा त्याने गृहीत धरले होते की ते विश्वासणारे आहेत. पौलाला माहित होते की 'पवित्र आत्म्याचा बाप्तिस्मा' ही बाब 'पुन्हा जन्म घेणे' या अनुभवापासून वेगळा होता.

मला माहित आहे की हा विषय अनेक मंडळयांमध्ये वादग्रस्त आहे. पवित्र शास्त्रात तसे नाही तरी सैतान मात्र त्याचा द्वेष करत आहे.

परंतु जर ते सामर्थ्य आहे तर आणि त्याच्यामध्ये जीवन बदलण्याची पात्रता आहे तर तुम्ही जगाच्या देवाविरुद्ध उभे राहू शकता. हे सामर्थ्य पवित्र आत्म्याच्या बाप्तीस्म्यात आहे. त्यामुळे देवाचे गौरव होते

अध्याय 6

# सर्व अन्य भाषेत प्रार्थना करतात काय?

तुम्ही असे म्हणतांना ऐकले असेल की काहीजन म्हणतात की ते अन्य भाषेत बोलत नाहीत व सर्वच बोलू शकत नाहीत किंवा बोलायला नकोत. त्यासाठी ते 1 करिंथ 12:27-30 ही वाचणे सांगतात की ज्या ठिकाणी पौल सांगतो सर्वच अन्य भाषेत बोलत नाहीत.

> *पौल खरच तसे सांगतो का ते पहा: तुम्ही ख्रिस्ताचे शरीर असून वैयक्तिक रित्या त्याचे अवयव आहात. तसे देवाने मंडळीत केतेकांना नेमले आहे; प्रथम प्रेषित, दुसरे संदेश्ते, तिसरे शिक्षक, शिवाय अद्भुत कृते करणारे निरोगी करण्याची क्र्फुपादाने मिळलेले, विचारपूस करणारे, व्यवस्था पाहणारे, भिन्न भिन्न भाषा बोलणारे, असे नेमले आहेत. सगळेच प्रेषित आहेत काय? सगळेच संदेष्ट आहेत काय? सगळेच शिक्षक आहेत काय? सगळेच अद्भुत केरुते करणारे आहेत काय? निरोगी करण्याची कृपादाने सगळ्यांचा आहेत काय? सगळेच भिन्न भिन्न भाषा बोलतात काय? भाषांचा अर्थ सगळेच सांगतात काय?*
>
> —1 करिंथ 12:27-30

मंडळीमध्ये व्यवस्थित रीतीने कसे काम करायचे हे पौल करिंथ येथील मंडळीला सांगत आहे महणजे एकत्र जमल्या नंतर सर्व व्यवस्थित होईल. त्या वेळी प्रत्येक जन स्वताच्या दानाचा वापर इतरांच्या वरचढ दिसण्यासाठी किंवा संदेश देणाऱ्यापेक्षाही मोठे दिसण्यासाठी वापरत असत.

पौल त्यांना हे सांगत आहे की एक शरीर या नात्याने एकतेत व प्रीतीत कसे कार्य करावे. त्यासाठी 1 करिंथ 12:27-28 लक्षपूर्वक वाचा:

*“तुम्ही ख्रिस्ताचे शरीर असून वैयक्तिक रित्या त्याचे अवयव आहात. तसे देवाने मंडळीत केतेकांना नेमले आहेत. प्रथम प्रेषित, दुसरे संदेश्ते, तिसरे शिक्षक, शिवाय अद्भित कृत्ये करणारे, निरोगी करण्याची कृपादानी मिळालेले, विचारपूस करणारे, व्यवस्था पाहणारे, भिन्न भिन्न भाषा बोलणारे असे नेमले आहेत.*

पौल म्हणत आहे मी अनेक भाषा बोलतो परंतु ‘मंडळीत’... या ठिकाणी लोक एकत्र जमल्यानंतर काय करायचे याबद्दल पौल बोलत आहे. जागतिक मंडळीबद्दल तो बोलत नाही.

*आम्हाला माहित आहे व आम्ही सहमत होऊ की पौल ख्रिस्ताच्या शरीराचा एक भाग आहे. त्याला अनेक भाषा येतात व इतरांपेक्षा जास्त भाषा येतात यामध्ये त्याला आनंद आहे. परंतु करिंथ येथील मंडळीत अन्य भाषा बोलण्यामुळे अव्यवस्थितपणा व गोंधळ होत होता.*

— 1 करिंथ 14:18-19

मुळात पौल हे म्हणत आहे, “लोकहो ऐका, मला तुमच्यापेक्षा जास्त भाषा बोलता येतात परंतु त्याचा उपयोग मंडळीमध्ये कसा करायचा हेही महत्वाचे आहे की ज्यामुळे गोंधळ दूर होईल.” पुढे तो असेही म्हणतो की मंडळीमध्ये(जेंव्हा लोक एकत्र जमतात तेंव्हा तो समजणाऱ्या भाषेमध्येच बोलेल की जेणेकडून ऐकणार्यांना बोध होईल.

सभेमध्ये काहीजण अन्य भाषा बोलतात व त्याचे भाषांतरः होते.(1 करीन्थ 12) परंतु सर्वांनीच या देणगीचा बोध करण्यासाठी उपयोग करू नये. लोकांनी अन्यभाषेचा उपयोग भाषांतरासह करावा पण त्यांची संख्या 2 किंवा 3 असावी असे स्पष्टीकरण पौल देतो.

*“भाषा बोलायच्या तर दोघे किंवा फार तर तिघे असावे; अधिक नसावे व त्यांनी आळीपाळीने बोलावे, आणि एकाने अर्थ सांगावा.* (1 करिंथ 14:27)

म्हणू जेंव्हा पौल म्हणतो की सर्व अन्य भाषा बोलत नाही तेंव्हा मंडळीतल्या साभांसंबंधी तो बोलतो. येथे एक भाग समजून घेतला पाहिजे तो म्हणजे, प्रत्येक विश्वासानायामध्ये अन्य भाषा बोलण्याची पात्रता असते. परंतु प्रत्येकालाच अन्य भाषेत बोलणे व त्याचे भाषांतर करणे याचा अभिषेक नसतो.जर तुम्हाला तसा अभिषेक असेल तर त्याचे भाषांतर करण्यासाठी तुम्ही प्रार्थना करावी.

> *"भाषा बोलणार्याने आपणाला अर्थ सांगता यावा म्हणून प्रार्थना करावी."* (1 करिन्थ 14:13ब)

माझा असा विश्वास आहे की जो अन्य भाषा बोलतो तो त्याचा अर्थ सांगण्यासही तयार असतो कारण त्याच्या मधून अगोदरच संदेश वाहतो आहे.

तुम्ही अन्य भाषेत का प्रार्थना करावी? सैतान जे अन्यभाषेत प्रार्थाना करतात त्यांचा द्वेष करतो. याचे कारण तुम्हाला माहित असावे ही माझी इच्छा आहे. इतर कोणाही पेक्षा जास्त भाषेत पौल प्रार्थना करतो ह्याबद्दल त्याला आनंद होतो. हा आनंद होण्या मागे काहीतरी कारण असले पाहिजे. 1 करीन्थ 14 मध्ये पौल काय म्हणतो हे आम्ही वाचले पाहिजे.

> *"भाषा बोलणारा स्वताचीच उन्नती करतो, संदेष्टा मंडळीची उन्नती करितो."* (1 करिंथ 14:4)

**तसेच आत्माही आपल्या अशक्तपणात आपल्याला हातभार लावतो. 'कारण आपण यथायोग्य प्रार्थना कशासाठी केली पाहिजे हे आपल्याला ठाऊक नाही.**
—रोम 8:26अ

यामध्ये आता आपण खोलवर जाऊ या. "उन्नती" या शब्दाचा अर्थ "शिकविणे किंवा फायदेशीर करणे असा होतो, विशेश रीतीने, नैतिक किंवा अध्यात्मिक दृष्टीकोनातून.

अनेक वेळेस एखादी परिस्थिती समजण्यासाठी, कोणत्या मार्गाने जावे हे समजण्यासाठी,, किंवा योग्य निर्णय घेण्यासाठी आम्हाला काही सूचनांची आवश्यकता असते ह्या माझ्या विचारांशी तुम्हाला

सहमत व्हावे लागेल. या साठी अन्य भाषेत बोलणे हे तुम्हाला मदत करू शकते. त्याद्वारे आम्हाला शिक्षित करण्याची किंवा सूचना मिळण्याची गरज आहे. रोमाकारास पत्र 8:26-27 मध्ये पौल ही बाब स्पष्ट करतो.

> *तसेच आत्माही आपल्या अशक्तपणात आपल्याला हातभार लावतो. 'कारण आपण यथायोग्य प्रार्थना कशासाठी केली पाहिजे हे आपल्याला ठाऊक नाही. पण आत्मा स्वतः अनिर्वाच्य कन्हण्याने मध्यस्थी करतो. पण अंतर्मने पारखणाऱ्याला त्या आत्म्याचा मनोभाव काय आहे हे ठाऊक आहे.. कारण हा आत्मा पवित्र जणांसाठी देवाच्या मर्जीप्रमाणे मध्यस्ती करतो.*

पौउल हे सांगत आहे की आपल्याला समस्या आहेत आपण अशक्त आहोत. आपल्याला माहित नसते काय प्रार्थना करावी.

तुम्ही म्हणाल, "पण आमच्यामध्ये हा अशक्तपणा का आहे? 1 योहान 5:14-15 ही वाचणे वाचल्यावर आम्हाला ते समजेल.

> *"त्याच्यासमोर येण्यास आपल्याला जे धैर्य/खात्री आहे ते ह्यावरून की , आपण त्याच्या इच्चेप्रमाणे काही मागितले तर तो आपले ऐकेल.आणि आपण जे काही मागतो ते तो ऐकतो, हे आपल्याला ठाऊक आहे; म्हणून ज्या मागण्या आपण त्याच्याजवळ केलाय आहेत त्या आपल्याला मिळाल्या आहेत हेही आपल्याला ठाऊक आहे. "*

देवाला ओळखण्याशिवाय, किंवा देवाच्या इच्छेमध्ये आम्हाला धैर्य किंवा खात्री असल्याशिवाय आम्ही आमचा विश्वास कार्यरत करू शकत नाही. आणि जर आमचा विश्वास कार्य करू शकत नाही तर आम्ही निश्चितच कमकुवत/अशक्त आहोत कारण विश्वासाशिवाय देवाच्या सामर्थ्याच्या कृपेला आम्ही मिळवू शकत नाही. म्हणून पौल म्हणतो की प्रार्थना कशी करावी हे माहित नसणे आमचा अशक्तपणा आहे आणि अन्य भाषेत प्राराथाना करणे हा अशक्तपणा काढू शकते. आमचा शास्त्राभाग पुन्हा एकदा वाचू या.

*“तसेच आत्माही आपल्या अश्क्तापानात आपल्याला हातभार लावतो; कारण आपण यथायोग्य प्रार्थना केली पाहिजे हे आपल्याला ठाऊक नाही. “*

—रोम 8:26अ

आमचा अशक्तपणा हा आहे की प्रार्थना कशी करावी हे आम्हाला माहित नाही.आम्ही कोणाशी लग्न करावे, कोठे राहावे, काय काम करावे हे पवित्र शास्त्र सांगत नाही. देवाची इच्छा समजल्याशिवाय आम्ही प्रार्थना केल्यावर देवापासून मिळते हे आम्हाला समजणार नाही व तसा विश्वासही आम्ही ठेवणार नाही.देवाची इच्छा काय आहे ते समजल्याशिवाय आमची देवाबद्दल खात्री होणार नाही. परंतु देवाची इच्छा समजण्यासाठी माच्यासाठी मार्ग आहे. देवाची इच्छा समजण्याचा मार्ग आहे की जेणेकडून देवाचा विश्वास आणि खात्री प्रत्यक्षात कार्य करेल.

हीच गोष्ट पौल याठिकाणी सांगत आहे. आम्हाला बोध होण्यासाठी किंवा शिकण्यासाठी व हे ज्ञान मिळण्यासाठी पौल मार्ग दाखवीत आहे.

हे ज्ञान देवाच्या आत्म्याकडून येते. आणि पवित्र आत्म्याची वाणी त्याच्यामध्ये म्हणजे अन्य भाषेत बोलाण्याद्वारे होते.पौलाचा उपदेश आम्ही आता पुढे पाहू या. रोम 8:26ब-27 वाचा.

*“पण आत्मा स्वतः अनिर्वाच्य कन्हण्याने मध्यस्थी करतो. पण अंतर्यामे पारखणाऱ्यालात्या आत्म्याचा मनोभाव काय आहे हे ठाऊक आहे. कारण हा आत्मा पवित्र जणांसाठी एवच्या मर्जीप्रमाणे मध्यस्थी करतो.*

आम्ही जेंव्हा प्रार्थना करितो तेंव्हा आम्ही कण्हतो असे पौल म्हणत नाही, तर पौल त्यासाठी पुढील वचन देतो.

*“कारण आपल्याला ठाऊक आहे की संबंध सृष्टी आज पर्यंत कण्हत आहे व वेदना भोगीत आहे.इतकेच केवळ नव्हे तर ज्या आपणाला आत्मा हे प्रथम फळ मिळाले आहे ते आपणही स्वतः दत्तकपणाची म्हणजे आपल्या शरीराच्या मुक्ततेची वाट पाहत असता*

*आपल्या ठाई कण्हत आहो. कारण आपण अशी आशा धरून तरलो; जी आशा दृश्य झाली आहे, ती आशाच नव्हे. जे दृश्य झाले आहे त्याची आशा कोण धरील? पण जे अदृश्य त्याची जर आपण आशा धरली तर धीराने आपण त्याची प्रतीक्षा करीत असतो.*

*तसेच आत्माही आपल्या अशक्तपणात आपल्याला हातभार लावितो' कारण आपण यथायोग्य प्रार्थना कशासाठी केली पाहिजे हे आपल्याला ठाऊक नाही; पण आत्मा स्वतः अनिर्वाच्य कन्हण्याने मध्यस्थी करतो. आणी अंतर्यामे पारखण्याऱ्याला त्या आत्म्याचा मनोभाव काय आहे हे ठाऊक आहे. कारण हा आत्मा पवित्रजनांसाठी देवाच्या मर्जीप्रमाणे मध्यस्थी करितो.*

—रोम:8 :22-27

पौल 'कण्हणे' हा शब्द वापरतो, आपल्या मनामध्ये काय घडते ते समजण्यासाठी हे एक उदाहरण आहे. आम्ही अंतर्यामी कण्हतो

स्त्री जशी मुलाला जन्म देतांना कण्हते तसे आम्ही कण्हत आहोत. म्हणजे आम्ही कोणालातरी जन्म देत आहोत की ज्याचा उद्भव या अगोदर झालेला नाही, किवा जे आमचे नाही त्याला आम्ही जन्म देत आहोत. ते काय आहे? कदाचित आम्हाला नसलेले ज्ञान, काहीतरी आत्म्याद्वारे निर्माण झालेले नवीन गोष्ट. पवित्र शास्त्र सांगते की आमच्या आत्म्या द्वारे पवित्र आत्मा देवाच्या इच्छेनुसार प्रार्थना करतो. असे म्हणता येईल की आमच्या मानवी अत्म्यांद्वारे देव आमच्यासाठी प्रार्थना करतो,तो कण्हतो, कारण त्यासाठी शब्द अपुरे पडतात.

म्हाणून या ठिकाणी आम्ही जे पाहतो की पवित्र आत्मा आमच्यासाठी मध्यस्थी करतो. त्यासाठी तो कण्हतो, ते शब्द आम्हाला स्पष्टपणे समजत नाहीत. आणि जो आमची अंतर्यामे पाहतो त्याला आमचे मन कळते कारण देवाचा आत्मा देवाच्या पवित्र देवाच्या इच्छेनुसार पवित्र जणांसाठी मध्यस्थी करतो. देवाचा आत्मा देवाची ईच्छाच प्रत्येक परीस्थितीनुसार प्रार्थने मध्ये मांडतो. हीच प्रार्थना आम्ही वेगळ्या भाषेमध्ये (अन्य भाषेत) देवाजवळ मांडतो.

म्हणून जेंव्हा आम्हाला देवाची इच्छा कळत नाही तेंव्हा आम्ही अशक्त असतो. विश्वास बाहेर पडू शकत नाही जोपर्यंत जोपर्यंत आम्हाला देवाची इच्छा कळत नाही तो पर्यंत. पौल हेच

सांगत आहे की जर आम्ही आत्म्यात प्रार्थना करतो तर देवाचा आत्मा आमच्या द्वारे त्याच्या परिपूर्ण इच्छेनुसार आमच्या जीवनातील प्रत्येक परिस्थितीसाठी प्रार्थना करतो.

जेंव्हा देवाचा आत्मा आमच्या द्वारे अन्य भाषेत प्रार्थना करतो तेंव्हा आम्हाला तर भाषा कळत नाही तर मग आमची मानसिक-अध्यात्मिक दृष्टीने कशी सुधारणा होईल? ह्या प्रश्नाचे उत्तर आम्हाला दुसऱ्या पत्रात मिळते.

> *"डोळ्यांनी जे पहिले नाही, कानाने जे ऐकले नाही, व माणसाच्या मनात जे आले नाही ते आपणावर प्रीती करणाऱ्यांसाठी देवाने सिद्ध केले आहे; कारण देवाने ते आत्म्याच्या द्वारे आपल्याला प्रगट केले, कारण आत्मा हा सर्व गोष्टींचा व देवाच्या गहन गोष्टींचाही शोध घेतो. मनुष्याच्या ठाई वसणारा जो आत्मा त्याच्यावाचून मनुष्याच्या गोष्टी ओळखणारा मनुष्यामध्ये कोण आहे? तसा देवाच्या गोष्टी ओळखणारा देवाच्या आत्म्याशिवाय कोणी नाही. आपल्याला जगाचा आत्मा नव्हे, तर देवापासून निघणारा आत्मा मिळाला आहे; ह्यासाठी की, जे देवाने आपल्याला कृपेने दिले ते आपण ओळखून घ्यावे. ते आम्ही मानवी ज्ञानाने शीकविलेल्या शब्दांनी नव्हे तर आत्म्याने शिकविलेल्या शब्दांनी अध्यात्मिक गीष्टींबरोबर अध्यात्मिक गोष्टींची संगती लाऊन सांगतो.*
>
> —1 करिंथ 2:9ब- 13

प्रथम पौल हे सांगण्याचा प्रयत्न करतो की ज्या गोष्टी आम्ही ऐकल्या नाहीत, ज्यांचा आम्ही कधी विचार केला नाही, ज्या गोष्टी आम्ही कधी पहिल्या नाहीत, त्या आम्हाला उपलब्ध होऊ शकतात, जसे आता मी तुम्हाला सांगत आहे. मी तुम्हाला सांगत आहे . परंतु पौल हे कसे कार्य होते ते तो पुढे सांगत आहे.

> *"मनुष्याच्या ठाई वसणारा जो आत्मा त्याच्यावाचून मनुष्याच्या गोष्टी ओळखणारा मनुष्यामध्ये कोण आहे? तसा देवाच्या गोष्टी ओळखणारा देवाच्या आत्म्याशिवाय कोणी नाही.*
>
> —1 करिंथ 2:11

शास्त्रवचनातला हा भाग सांगण्या अगोदर या बाबतीतला मुलभूत धडा आपण बघू या. थेस्सलनिकाकरास 1 ले पत्र यामध्ये आपण जाऊ या.

> *"शांतीचा देव स्वतः तुम्हास परिपूर्णपणे पवित्र करो; आणि आपला प्रभू येशू ख्रिस्त ह्याच्या अगमनासमयी तुमचा आत्मा, जीव, व शरीर ही निर्दोष अशी संपूर्णपणेराखली जावोत.*
>
> —1 थेस्सल 5:23

आपला आत्मा म्हणजे आपल्यामध्ये असलेला देवाचा भाग, जीव म्हणजे आपले मन, इच्छा आणि भावना; आणि शरीर म्हणजे शरीर. पौल या ठिकाणी हे म्हणत आहे की आपला जीव (मन, इच्छा,आणि भावना) आणि आत्मा हे एकमेकांशी घट्टरीतीने जोडले आहेत.त्यामुळे आपल्या आत्म्याला आपले विचार कळतात.

या गोष्टीच्या नेमक विरुद्ध देखील सत्य आहे. आपले मन आत्म्याचे विचार समजू शकते. पौल सांगतो, देवाचा आत्मा, देवाचे विचार समजतो. तसेच आणि आम्हाला देवाचा आत्मा मिळाल्यामुळे देव आम्हाला मोफत काय देत आहे हे देखील त्याला कळते.

> *"आपल्याला जगाचा आत्मा नव्हे, तर देवापासून निघणारा आत्मा मिळाला आहे; ह्यासाठी की, जे देवाने आपल्याला कृपेने दिले ते आपण ओळखून घ्यावे. ते आम्ही मानवी ज्ञानाने शिकविलेल्या शब्दांनी नव्हे तर आत्म्याने शिकविलेल्या शब्दांनी, अध्यात्मिक गोष्टींबरोबर अध्यात्मिक गोष्टींची संगती लावून सांगतो."*
>
> —1 करिंथ 2:12-13

पौल पुढे सांगत आहे. की हे महित नसलेले ज्ञान आपल्याला देवाच्या आत्म्याद्वारे आपल्याला प्रगत झाले. आणि ती गोष्ट आम्ही पवित्र आत्म्याने दिलेल्या शब्दांद्वारे बोलतो. ती गोष्ट आम्ही आमच्या नेहमीच्या भाषेमध्ये न बोलता आत्मिक भाषेत बोलतो. अन्य भाषेत प्रार्थना करण्याबद्दल पौल येथे बोलत आहे. आत्मिक शब्द म्हणजेच अन्य भाषा. 1 करिंथ 14:14-15 मध्ये पौल हेच सांगत आहे.

*“कारण जर मी अन्य भाषेत प्रार्थना केली तर माझा आत्मा प्रथांना करतो, पण माझ्या बुद्धीचा उपयोग कोणाला होत नाही. तर मग काय? मी प्रार्थना आत्म्याच्या समत्र्याने करणार व बुद्धीच्या सामार्थ्यानेही करणार; मी स्तोत्र आत्म्याच्या सामर्थ्याने गाणार व बुद्धीच्या सामर्थ्यानेही गाणार.”*

पौल “आत्म्याच्या सामर्थ्याने प्रार्थना करणे” असे म्हणतो. या ठिकाणी तो अन्य भाषेबद्दल बोलत आहे. जेंव्हा पौल म्हणतो की मी आत्म्याने शिकविलेल्या शब्दात बोलतो तेंव्हा त्याचा अर्थ अन्य भाषा हाच आहे.

*कारण भाषा बोलणारा माणसांबरोबर नव्हे तर देवाबरोबर बोलतो; कारण ही बाब माणसाला समजत नाही.तो आत्म्याने गूढ गोष्टी बोलतो.*

*—1 करिंथ 14:2*

पौल पुन्हा म्हणतो की आपला आत्मा अशा गोष्टी बोलतो की ज्या आम्ही कधीही न पाहिलेल्या, ऐकलेल्या, किंवा ज्याचे आम्हाला ज्ञान नाही अशा आहेत. पौल या ठिकाणी असेही म्हणतो की आमच्या आत्म्याने आम्ही गूढ गोष्टी बोलतो; देवाच्या आत्म्याने नाही. ज्या गोष्टी आम्हाला माहित नाहीत त्या आमच्या आत्म्यात कशा येतात? उत्तर सोपे आहे. देवाच्या आत्म्याने त्या येतात कारण देवाचा आत्मा आमच्या आत्म्याशी एक होतो.

**पवित्र आत्म्याचा बाप्तिस्मा देवाचे रहस्यमय शस्त्र आहे. देव काय करणार आहे हे सैतानाला न कळता देव आपली इच्छा आपल्याला कळवू शकतो.**

*”मनुष्याच्या ठायी वसणारा जो आत्मा त्याच्यावाचून मनुष्यांच्या गोष्टी ओळखणारा मनुष्यांमध्ये कोण आहे? तसा देवाच्या गोष्टी ओळखणारा देवाच्या आत्म्याशिवाय कोण आहे?*

*—1 करिंथ 2:11*

*आत्मिक मनुष्य सर्व गोष्टीबद्दल न्याय करतो, परंतु तो स्वतःमनुष्याच्या न्यायाखाली नाही.प्रभूचे मन कोणाला माहित आहे की जेणेकडून तो त्याला शिकविल? परंतु आम्हाला ख्रिस्ताचे मन आहे.*

मनुष्याच्या न्यायापुरते आम्ही मर्यादित नाही. परंतु आम्ही देवाच्या मदतीने सर्व गोष्टींचा न्याय करू शकतो. ही फार मोठी बातमी आहे. पवित्र आत्म्यात प्रार्थना करण्याद्वारे म्हणजे अन्य भाषेत प्रार्थना करण्याद्वारे आम्हाल गूढ समजते. की जे आम्हाला माहित नव्हते, आणि आता त्या ज्ञानाद्वारे आम्ही सर्व गोष्टींबाबत योग्य न्याय व निर्णय घेवू शकतो.

पवित्र आत्म्याचा बाप्तिस्मा देवाचे रहस्यमय शस्त्र आहे. देव काय करणार आहे हे सैतानाला न कळता देव आपली इच्छा आपल्याला कळवू शकतो. पवित्र आत्म्यात प्रार्थना करणे हे एक अध्यात्मिक/आत्मिक शस्त्र आहे (इफिस 6:18अ वाचा)

*"सर्व प्रकारची प्रार्थना व विनवणी करा सर्व प्रसंगी आत्म्याच्या प्रेरणेने प्रार्थना करा.".*

आत्म्यात प्रार्थना केल्याने तो आम्हाला शत्रूला बाजूला टाकून आमची युवरचना करण्यास परवानगी देते किंवा आमचे नवीन व असाधारण डावपेच करण्यास परवानगी देते. याचा फायदा म्हणजे ख्रिस्ताच्या मनात शिरून आम्ही योग्य निर्णय घेऊ शकतो. हे अतिशय महत्वाचे आहे याच्याशी तुम्ही सहमत व्हाल. मला हे सापडले आहे.

उदाहरण द्यायचे झाले तर माझ्या व्यवसायामध्ये मी फार मोठा निर्णय घेतला हे मला आठवते. माझा एक विक्री करणारा प्रतिनिधी होता जो एका मोठ्या विक्रेत्याकडे जात असे. त्याने मला कोर्ट मध्ये खेचण्याची धमकी दिली कारण हे की मी नवीन कंपनीकडे त्याच्या म्हणण्यानुसार गेलो नाही. मी त्याच्याद्वारे ज्या विक्रेताय्शी व्यवसाय करीत होतो त्याच्याशी त्याने संबंध तोडला होता व नवीन कंपनीशी संबंध जोडला होता. माझा विक्री करणारा प्रतिनिधी चांगला होता परंतु ज्या मोठ्या विक्रेताय्शी मी संबंधित होतो त्याच्याशी संबंध तोडावे हे मला नको होते.

ज्या कंपनी बरोबर तो काम करीत होता त्या कंपनीने त्याला म्हटले की त्याचे सर्व गीर्हिके तो त्याच्या नव्या कंपनीबरोबर नेवू शकत होता. म्हणून त्याच्याबरोबर जाण्याबाबत मी काही चूक करीत नव्हतो.परंतु बळजबरीने त्याच्याबरोबर जाण्यात मला आवडले नाही

मी त्याच्याबरोबर जाण्यास तयार नव्हतो म्हणून त्याने मला कोर्ट मध्ये खेचण्याची धमकी दिली. काही महिने अगोदर त्याने मला म्हटले होते की तो नवीन कंपनीला जोडल्या जाणार आहे तर मी त्याच्याबरोबर एल का? मी फारसा विचार न करता होय म्हटले होते. तो माझ्या व्यवसायावर अवलंबून होता आणि त्याने कंपनी बदलण्याचा निर्णय घेतला व त्याची तारीखही ठरवली. परंतु या गोष्टीमुळे मी बेचैन झालो. मी काही दिवस आत्म्यामध्ये प्रार्थना केली. परंतु मला हवे असलेले उत्तर मिळत नव्हते.

देन्द्रा आणि मी आमच्या लेकरांना अनेकदा cedar point नावाच्या एका पार्क मध्ये घेऊन जात असू. अमेरिकेतला हा एक मोठा roller coaster park होता आणि दोन वेळेस आम्ही त्या ठिकाणी जात असू. तो दोन तासांच्याच अंतरावर होता. तो शुक्रवारची रात्र होती आणि मला सोमवारी सकाळ पर्यंत उत्तर हवे होते. माझे मन दुसरीकडे वळवीण्यासाठी मी निर्णय घेतला की देन्द्राला घेऊन त्या संध्याकाळी त्या पार्क मध्ये जावे. मी लाईन मध्ये उभा होतो, आणि सोमवारी सकाळी काय निर्णय घ्यायचा याबद्दल विचार करीत नव्हतो तरी अचानक मला समजले की मी नक्की काय करावे. ते अगदी दिवसासारखे स्पष्ट होते. पवित्र आत्मा माझ्यासोबत बोलला आणि मी जुन्याच कंपनी सोबत राहिलो. माझ्या प्रतिनिधीची नवीन कंपनी काही महिन्यातच गुंडाळल्या गेली.

इथच महत्वाची यशाची किल्ली आहे. प्रार्थना! आत्म्यात प्रार्थना करा, म्हणजे तुमचे सर्व काही चांगले चालेल आणि तुम्ही योग्य निर्णय घ्याल, तसेच युव्हारचनेचे गूढ तुम्ही शोधाल की जेणेकडून तुम्ही विजयी व्हाल.

*“ निरंतर प्रर्थना करा.” (1 थेस्सल 5:17)*

अध्याय 7

# संपत्तीची/ धनाची तिजोरी

दान ला मी भेटलो तो पहिला दिवस मला आठवतो. माझा चुलत बहिण जेन्निफर बरोबर मंदिरातल्या मागच्या रांगेत तो उभा होता. मला कळले की ते दोघे एकमेकांना भेटत असतात. परंतु त्यावेळी दान वेगळ्याच विचारतर होता हे मला त्याच्या अविर्भावावरून कळले. तो समाधानी दिसत नव्हता. नंतर मला कळाले की त्याच्या मंडळीपेक्षा माझी मंडळी वेगळी दिसत होती. परंतु जेंव्हा त्याने राज्याबद्दल ऐकायला सुरवात केली तेंव्हा तो थोडासा आरामात बसला. आणि त्याने माझ्या चूलत बहिणीबरोबर लग्न केले.

Central Ohio मध्ये तो 1400 एकर जमिनीची मशागत करीत होता. परंतु शेती काही चांगली होत नव्हती. खरे म्हणजे त्याला नफा होत नव्हता त्याबद्दल त्याला चिन्त वाटत होती. जेंव्हा तो देव-राज्याबद्दल ऐकू लागला व पवित्र आत्मा कसा मदत करतो हे बघू लागला तेंव्हा एके दिवशी जेनिफर कडे आला व म्हणाला आपण आपले देणे दुप्पट करू या. हे ऐकून जेनिफर ला धक्का बसला पण याबाबत तिला उत्सुकताही निर्माण झाली. आणि झाले काय की त्यावर्षी त्याच्या 1400 एकर जमिनीत 128% उत्पन्न झाले. ते मागच्या वर्षापेक्षा इतके जास्त होते की त्यामध्ये त्याने ने कर्ज न काढता एक कार विकत घेतली, दुसरी शेतीही विकत घेतली. म्हणजे त्याचा अर्थ हा की येणाऱ्या वर्षात अधिक उत्पन्न होणार. दान खूपच उत्सुक झाला. तो म्हणाला की माझ्या वडिलांना नवीन शेत विकत घेण्यासाठी जे पैसे द्यावे लागले असते ते देण्यासाठी त्यांना 10 वर्षे लागली असती. मग मी दान ला विचारले हे कसे घडले सांग पाहू.

दान व जेनिफर दुप्पट देण्यास सुरुवात केल्यावर त्यांनी प्रार्थना करायला देखील सुरुवात केली की देवा आम्हाला आता काय करायचे ते दाखीव. दान म्हणाला, त्याला नेहमी अनेक पत्रे येत असत त्यातील बरेच शेतकऱ्याच्या विक्रीसंबंधी असत. आणि एके दिवशी हे करत

असतांना त्याने काही लहन दिसणारे एक 3x5 आकाराचे कार्ड कचऱ्याच्या पेटीत टाकले. परंतु हे करताच त्याला एक सूचना झाली की ते परत घ्यावे. काही विशेष नव्हते, तर शेतीच्या एका अवजाराची जाहिरात होती. शेतकऱ्यांना त्याबद्दल चर्चा करण्यासाठी आमंत्रण देण्यात आले होते.

या मिटींगला जावे असे त्याला वाटू लागले. हे नवीन प्रकारचे अवजार होते त्यामुळे जमीन नीट करून बी पेरण्याचे ते अवजार होते. काही शास्त्रीय करणे सांगून अधिक उत्पन्न साठी ते कसे उपयोगाचे होते हे दान मला स्पष्ट करण्याचा प्रयत्न करीत होता. अर्धे बोलणे झाल्यावर मी थोडासा ऐकण्यापासून भरकटलो. हे त्याच्या लक्षात आले, पण तेच महत्वाचे होते. दान ने मला सांगितले की ohio मध्ये तो दुसराच शेतकरी होता की ज्याने ते अवजार विकत घेतले होते. या लहान अवजाराने मात्र काहीतरी केले व त्या वर्षी त्याचे उत्पन्न 128% झाले. त्यामुळे दान ने आणखी शेत विकत घेतले, आणि आज तो हजारो एकर शेतीची मशागत करत आहे. त्याच्याजवळ अशा अनेक घटना आहेत की त्यात तो सांगतो की पवित्र आत्म्याने योग्य निर्णय घेण्यासाठी कशी मदत केली, की ज्यामुळे त्याची खूप गतीने प्रगती झाली की ज्याचा त्याने विचारही केला नव्हता.

कशीबशी शेती करण्यापासून मोठा नफा मिळविण्यापर्यंत दान कसा गेला?

त्याने त्याच्या सल्लामसलत करणाऱ्याचे ऐकले, त्याने पवित्र आत्म्याचे ऐकले. अनेक ख्रिस्ती लोकांनी ही गोष्ट ऐकली पण हे कसे घडले ही गोष्ट त्यांना माहित नाही. म्हणूनच हे पुस्तक लिहावे असे मला वाटले. पुष्कळ ख्रिस्ती लोक हे ऐकून आनंद साजरा करतात. देव किती मोठा आहे हे ते स्वीकारतात. परंतु हीच गोष्ट पुन्हा कशी घडू शकते हे त्यांना माहित नाही. मग हे लोक भ्रमातच असतात आणि त्यांच्या त्रासाबद्दल ते देवालाच दोष देतात. ते म्हणतात, "देव कोठे आहे? मला माहित नाही देव मला का मदत करीत नाही. असे मी ऐकतो.

मला वाटते आता तुम्हाला कळले असेल . राज्य नियमांनी चालते, ते कोणाच्या बाजूचे नसते. ज्याला आशीर्वाद द्यायचा त्याला किंवा ज्याल आशीर्वाद द्यायचा नाही त्याला देव असे उचलून बाजूला करत नाही.तुमच्या पेक्षा दान काही वेशेष किंवा वेगळा नाही की देवाने त्याला निवडले. दान इतकेच तुम्हालाही राज्यामध्ये कायदेशीर अधिकार आहे. जसे कोणते बी पेरायचे हे निवडण्याचा अधिकार प्रत्येकाला आहे तसेच ज्याला देव-राज्याचे नियम माहित

आहेत त्या सर्वांसाठी देव कार्य करतो. देवाच्या घराचे तुम्ही सभासद आहात व त्याच्या राज्याचे नागरिक आहात म्हणून देवाजवळ जे आहे त्या सर्वांपर्यंत पोहोचण्याचा तुम्हाला अधिकार आहे.

**म्हणून आता मला तुम्हाला सांगू द्या की देवाचे बरेच लोक आयुष्यात का अपयशी ठरतात. देवाचे राज्य कसे कार्य करते हेच त्यांना माहित नाही, पवित्र आत्म्याचे कसे ऐकायचे हे त्यांना ठाऊक नाही.**

*"परमेश्वर तुझा उद्धारकर्ता , इस्रायेलचा पवित्र प्रभू म्हणतो, तुला जे हितकारक ते मी परमेश्वर तुझा देव तुला शिकवितो; ज्या मार्गाने तुला गेले पाहिजे त्याने तुला नेतो."*

—यशया 48:17

दान ने ज्याबद्दल विचार केला असेल त्यानुसार त्याला यश मिळाले असे नाही. पवित्र आत्म्याची एक वैशिटयपूर्ण युव्हरचना होती, कारण दान ने राज्याबद्दल योग्य पावले उचलले होते, आणि दान व त्याची पत्नी पवित्र आत्म्याने त्यांच्याबरोबर बोलावे व योजना सांगावी यासाठी प्रार्थना करीत होते. खालील बाब तुम्ही लिहावी असे मला वाटते.

## पवित्र आत्म्याजवळ योजना आहे.

**योजना असणे यापेक्षा सामर्थ्यशाली दूसरे काहीच नाही. योजनेशिवाय तुमाच्यामनातील चित्र फक्त स्वप्नच असते. परंतु योजनेमुळे स्वप्न बांधता येते.**

एक मोठे घर असावे असे स्वप्न एखादे कुटुंब पाहू शकते. पुष्कळ बेड-रूम्स, विस्तीर्ण राहण्याची जागा, आधुनिक मोठे स्वयंपाक घर, आणि शेवटचे सुंदर रंगकाम.

परंतु हे फक्त एक स्वप्न किंवा चित्र आहे. परंतु हे चित्र काढून त्याची blue-print किंवा नकाशा तयार करणे म्हणजे योजना होय. बांधकाम कारानाऱ्याजवळ हा नकाशा असला म्हणजे ते घर बांधल्या जावू शकते. काही कारणांमुळे बहुतांश ख्रिस्ती लोकांची विचारधारा पत्र ठेवण्याच्या टोपलीसारखी असते. जेंव्हा त्यांना पैशाची आवशकता असते तेंव्हा ते देवाजवळ प्रार्थना करतात आणि शांत राहून आपल्या पत्राची टोपली पाहतात, किंवा कोणीतरी त्यांना पैसे द्यावेत याची अपेक्षा करतात. परंतु खरी गोष्ट कशी घडते याची त्यांना कल्पनाच नसते.

होय, प्रथम तुमच्या जवळ चित्र हवे आहे. परन्तु ते चित्र प्रत्यक्षात आणण्यासाठी काही कार्यपद्धती असते, आणि ते करतांना तुम्हाला नक्कीच आनंद होतो. उत्तर हे आहे की तुमच्याजवळ योजना किंवा युव्हरचना हवी.. मी एक उदाहरण देतो. जर मी तुम्हाला म्हटले की तुमचा पैशासम्बंधीचा विषय लवकर सम्पवायचा असेल तर तुम्ही एक कागद व पेन्सील घ्या. मी असे म्हटल्याबरोबर , तर तुम्ही ताबडतोब पेन व पेन्सील घेऊन मी सांगतो ते लिहिण्यासाठी तयार व्हाल. मी हे सांगील की जे लोक हे पुस्तक वाचतील त्यांचे आर्थिक विवंचनेच्या समस्या दूर होतील आणि हे वर्ष संपण्याच्या अगोदर तुम्ही कर्जमुक्त व्हाल

आता हे ऐकल्यावर तुम्ही तुमचा पेन घट्ट दाबाल व तुमच्याकडून मी जे सांगणार आहे त्यातले काहीच सुटणार नाही यासाठी प्रयत्न कराल. ,

उत्तर आगदी सोपे आहे. मी स्पष्टीकरण करतो. समजा मी म्हटले की या वर्षी तुमचा नफा 10 दस लक्ष मिळावा. हे म्हटल्याबरोबर तुम्ही माझ्याकडे क्षणभर टक लाऊन पाहाल व गालातल्या गालात हसाल. तुमच्या त्या हसण्यामुळे मी समजेन की 10 दसलक्ष डॉलर्स पुरेसे नाहीत. मग मी म्हणे, " ठीक आहे, जर ते पुरेसे नसतील तर 25 दसलक्ष डॉलर्स करा. हे ऐकल्यावर तुम्ही गालातच हसणार नाही तर मोठ्याने हसाल. कारण काय? आता काय घडले ते मला तुम्हाला सांगू द्या. पुष्कळ लोकांना 10 दसलक्ष डॉलर्स कर्जमुक्त करेल पण परंतु त्यांचे गालात हसणे हे दाखविते की एका वर्षात ते तेव्हढे पैसे नफा म्हणून मिळवू शकत नाहीत. 25 दसलक्ष डॉलर्स तर त्यांना अशक्यच वाटते, ते खूप हास्यापद वाटते.

परंतु असे समजा की माझी एक वस्तू दुसऱ्या देशात पाठविण्याची कंपनी आहे. एक बॉल एका पेटीत ठेवण्याचे मी तुम्हाला 1000 डॉलर्स देणार आहे. समजा एका दिवशी तुम्ही असे 5000 पेट्या तयार कराल . या साठी मी 12 महिन्याचा करार करत आहे. (हे उदाहरण थोडे अतिशयोक्ती वाटते पण त्यामुळे माझा मुद्दा स्पष्ट होईल)

**मला पुन्हा सांगू द्या- पुन्हा ऐका, देवाजवळ तुमच्या/ तुमच्यासाठी योजना आहेत.**

समजा हा तुमचा वास्तवात करार झाला. आता तुम्हाला एक वर्षात 10 दस लक्ष मिळवायचे आहेत, तर वरील करारानुसार तुम्हाला किती पैसे मिळतील.? आता गालातले हास्य राहणार नाही तर विजयी आनंदाची आरोळी असेल. असे का होईल? कारण, या करारानुसार 10 दसलक्ष डॉलर्स मिळणे सहज सोपे होईल. अर्थात 25

दस लक्ष डॉलर्स मिळणेही सोपे होईल व 100 दस लक्ष डॉलर्स मिळणेही शक्य आहे. कशामुळे बदल झाला? फक्त एकाच गोष्टीमुळे आणि ती म्हणजे तुमच्याजवळ योजना आहे. मी मागेच तुम्हाला सांगितले की कोणीही मासे पकडू शकतो केंव्हा? जेंव्हा येशू त्यांना सांगतो कोठे आणि कसे मासे पकडायचे तेंव्हा. आता हे तुमच्या साठी आहे. तुम्ही करू शकाल अशी योजना तुमच्याजवळ असेल तर तुमचा प्रश्न सुटलाच म्हणून समजा.

> *परमेश्वर म्हणतो, “तुम्हाविषयी माझ्या मनात जे संकल्प आहेत ते मी जाणतो, ते संकल्प हिताचे आहेत, अनिष्टाचे नाहीत; ते तुम्हास तुमच्या भावी सुस्थितीची आशा देणारे आहेत.”* (यिर्मया 29:11)

मला पुन्हा सांगू द्या- पुन्हा ऐका, देवाजवळ तुमच्या/ तुमच्यासाठी योजना आहेत.

काही महिन्यापूर्वी, माझ्याकडे माझे काही सहकारी मी शिक्षण सत्र घेत असतांना शेवटी शेवटी आले. एकीने मला विचारले, नव्हे विधानच केले. “ हे काही प्रत्यक्षात उतरले नाही. मी बी पेरले माझ्या पतीबरोबर सहमत झाले की मला एक मोठे हरीण मिळणार आहे. पण तसे काही झालेच नाही.?” एका विशिष्ट मोठ्या हरीनासाठी बी पेरले की ज्याला मोठा शॉट (मोठी गोळी) लागणार होती. अनेक प्रश्न विचारल्यानंतर मी विचारले की ज्या दिवशी ते शिकारीला गेले त्या दिवशी त्यांनी तसे हरीण पहिले तरी का? ते म्हणाली,” होय, ज्या हरीनासाठी मी बी पेरले तशाच प्रकारचे हरीण दिसले ते अगदी आडवे व योग्य अंतरावर उभे होते.”

हे ऐकल्यावर मला थोडा धक्का बसला. बर तर मग पुढे काय झाले? मी विचारले. तिने म्हटले होय माझ्या एका मित्राला मी नेम धरण्यास सांगितले आणि मित्राने ते बरोबर केले असे समजून तिने चाप ओढला आणि नेम चुकला. असा नेम चुकेल हे मला माहित होते पण तिला के कळाले नाही.

आणि मला वाटते येथेच काही ख्रिस्ती लोक चुकतात. कार्य करण्यची पद्धत त्यांना कळत नाही. देवाने त्याची भूमिका केली, पण तिने तिची भूमिका निभावली नव्हती.

लक्षात घ्या देव तुम्हाला योजना देतो, परंतु त्यात तुम्हाला तुमची भूमिका केली पाहिजे. हे तुमच्या आणि देवाच्या मधील गोष्ट आहे.

*स्वर्गाचे राज्य शेतात लपविलेल्या ठेविसारखे आहे, ती कोण एका मनुष्याला सापडल्यावर त्याने ती लपवून ठेवली, आणि आनंदामुळे त्याने जाऊन आपले सर्वस्व विकले , मग ते शेत विकत घेतले.*

—मत्तय 13:44

या शास्त्राभागात राज्याबद्दल पुष्कळ सत्य दडलेले आहे. प्रथम ठेव महणजे काय ते पाहू. ठेव म्हणजे कोणत्याही प्रकारचा एखादा मौल्यवान खजाना. म्हणजे ठेव म्हणजे सोन्याचा तुकडा नाही. तुम्हाला जे त्या वेळी आवश्यक असते तो तुमचा खजाना, तीच तुमची ठेव. शास्त्रभाग हे सांगतो की स्वर्गाचे राज्य म्हणजे तुमची ठेव किंवा खजाना आहे.

किंवा तूम्ही असे म्हणू शकता की या आयुष्यात जे तुम्हाला हवे आहे ते त्या राज्यात आहे. मग प्रश्न हा आहे की हे राज्य कोठे आहे? या शास्त्राभागात येशू म्हणतो, की ते शेतात लपवून ठेवलेले आहे. मग ते शेत कोठे आहे हे तुम्हाला माहित असायला हवे की नाही? तर मग, आनंदाची बातमी ही की येशू आम्हाला सांगतो की ते शेत कोठे आहे आणि ती ठेव कशी शोधायची.

आम्ही मार्क 4 मध्ये पेरणी करणाऱ्याच्या दृष्टांताकडे पाहिल्यास येशू शिकवितो की मनुष्याच्या हृदयात विश्वास कसा उत्पन्न करायचा. या ठिकाणी तो जमीन म्हणजे मनुष्या आत्मा आणि बी म्हणजे देवाचे वचन अश्या उपमा देतो. ह्याच उपमा मत्तय 13 मध्ये देता येतात, जमीन म्हणजे मनुष्याचा आत्मा. एक सेकंद थांबा आपण अध्याय 6 मध्ये काय शिकलो बरे? आम्ही हे शिकलो की जेंव्हा आम्ही पुन्हा जन्मतो तेंव्हा आमचा आत्मा आणि देवाचा आत्मा एक होतात की जेणेकडून आम्ही देवाचे विचार समजू शकतो. म्हणून ठेव किंवा खजिना आमच्यासाठी मर्यादित नाही. देवाजवळ जे आहे ते सर्व आमचे आहे.

*डोळ्याने पहिले नाही, कानाने ऐकले नाही, व माणसाच्या मनात आले नाही, ते आपल्यावर प्रीती करणाऱ्यांसाठी देवाने सिद्ध केले आहे. परंतु देवाने ते स्वतःच्या आत्म्याद्वारे आपल्याला प्रगट केले, कारण आत्मा हा सर्व गोष्टींचा व देवाच्या रहस्याचाही शोधक आहे. मनुष्याचा आत्मा जो मनुष्यात असतो त्याशिवाय मनुष्यातील गोष्टी कोण ओळखतो? तश्या देवाच्या गोष्टी देवाच्या आत्म्याशिवाय कोणीही ओळखत नाही.*

*आपल्याला जगाचा आत्मा नव्हे तर देवापासून जो आत्मा आहे तो मिळाला; यासाठी की जे देवाने देवाने आपल्याला कृपेने दिले ते आपण ओळखून घ्यावे."*

*—1 करिंथ 2:9-12*

आणि 1 करिंथ 2:16 त्यात आणखी भर टाकते., *"आपल्याला तर ख्रिस्ताचे मन आहे."* लुक 17: 20-21 मध्ये येशू सांगतो की ही ठेव/खजिना कोठे आहे.-

*येशूने म्हटले, " स्वर्गाचे राज्य दृष्यारुपाने येत नाही ...... कारण पहा देवाचे राज्य तुम्हा मध्ये आहे."*

—लुक 17:20-21

*"तुमचे शरीर, तुम्हमध्ये वसणारा जो पवित्र आत्मा देवापासून तुम्हास मिळाला आहे त्याचे मंदिर आहे हे तुम्हास ठाऊक नाही काय? आणि तुम्ही आपले नव्हा; कारण तुम्ही मोलाने विकत घेतलेले आहा; यास्तव तुम्ही आपल्या शरीराने देवाचे गौरव करा."*

—1 करिंथ 6:19-20

मला जे सांगायचे आहे ते थोडक्यात सांगू द्या.

## तुमच्यामध्ये ठेव/ खजिना आहे.

ही ठेव किंवा खजिना किती आहे? तुम्ही स्वप्नातही पाहणार नाही इतका मोठा, ज्याचे आपण मोज-माप करू शकत नाही.

*आपण ज्याची काही मागणी किंवा कल्पना करतो त्यापेक्षा आपल्यामध्ये कार्य करणाऱ्या शक्तीने फारच फार करण्यास जो शक्तिमान आहे..."*

—एफिस 3:20

**हे सर्व तुमचे आहे,सर्व राज्य तुमचे आहे. देवाने तुम्हाला जे काही दिले त्यात तो अधिकाची भर घालणार कारण त्याने सर्व तुम्हाला दिलेले आहे.**

आणि याच ठिकाणी आपण आपल्याला वेगळ्या रीतीने प्रशिक्षित काराब्वयास हवे आहे. ही ठेव किंवा खजिना आपण कल्पना करू शकणार नाही त्यापेक्षाही अधिक आहे. जेंव्हा आम्हाला काहीतरी हवे असते किंवा कशाचीतरी गरज असते, तेंव्हा आपल्या पासून दूर पाहण्यासाठी आपण स्वतःला प्रशिक्षित केले पाहिंजे. परंतु आता, पवित्र आत्मा, देव स्वतः आमच्यामध्ये राहतो व आपला मदत्कर्ता आहे. आत्म्यामध्ये किंवा अन्य भाषेत कशी प्रार्थना केल्यावर आम्हास कशा सूचना मिळतात किंवा रहस्य कसे उलगडते याबद्दल आपण चर्चा केली आहे. ही बाब मनात साठविण्यासाठी पुष्कळांना कठीण जाते . देव कशी मदत करतो,किंवा तुमच्या जीवनातील प्रत्येक गोष्टीठी त्याच्याजवळ उत्तर आहे हे त्यांना समजने कठीण जाते.

जेंव्हा तुमचा पुन्हा जन्म होतो तेंव्हा तुम्ही देवाच्या घराचे सभासद होता, व त्याच्या मोठ्या राज्याचे नागरिक होता. त्याच्याजवळ जे आहे ते त्याने तुम्हाला दिलेलेच आहे. लुक 12:32 मध्ये म्हटले आहे की म्हणून तुम्हाला घाबरण्याची , भयभीत होण्याची गरज नाही, कारण तुमच्या पित्याने तुम्हाला त्याचे राज्य दिलेले आहे.

> *‘हे लहान काळापा, भिऊ नकोस कारण तुम्हास राज्य द्यावे हे तुमच्या पित्याला बरे वाटते.” (लुक 12:32)*

राज्य तुमचेच आहे , पूर्ण राज्य तुमचे आहे. देव त्यात काही भर घालणार नाही कारण त्याच्याजवळ जे आहे ते त्याने तुम्हाला दिलेलेच आहे. पुष्कळांना असे वाटते की जर प्रत्येक दिवसाच्या गोष्टी देवाजवळ आणल्या तर त्याला त्रास होईल. परंतु ही गोष्ट म्हणजे देवासंबंद्धीचे अज्ञान आहे. जर मी तुम्हाला म्हटले किं तुम्ही अमेरिकेचे नागरिक आहात आणि तुम्ही उत्तर दिले, “मला माहित नाही. मी जर एक दुकान येथे टाकले, आणि मला वाटते , जरी मी देशाचे नियम पळून हा व्यवसाय सुरु करीत आहे तरी कोणालातरी त्रास होईल याची मला भीती वाटते.” मला हे सांगायचे आहे की नागरिक म्हणून तुम्हाला सर्व कायद्यांचा व हक्क वापरण्याचा

अधिकार आहे. सर्व कायदे व हक्क तुमचे आहेत. म्हणून काढता पाय घेऊ नका. सर्व हक्कांचा उपयोग करा कारण कायद्याने ते तुमचे आहे.

**देवाच्या राज्याची तुलना ठेवी बरोबर किंवा खाजीण्याबरोबर का केली आहे.?**

कारण जर तुम्हाला स्वर्गाचे ज्ञान आहे तर प्रत्तेक परिस्थितीत व विशिष्ट परिस्थितीत देवाने दिलेल्या योजनेनुसार काय करायचे हे तुम्हाला समजेल. मला तुम्हाला आणखी एक उदाहरण देऊ द्या.

जेंव्हा मी व देन्द्रा देवाच्या राज्याबद्दल शिकू लागलो, आमचे जीवन मोठ्याप्रकारे बदलले गेले. कर्जातून पूर्ण मुक्त होणे म्हणजे ताजी हवा घेण्यासारखे होते, आणि आमच्या जीवनाने पूर्ण नवीन सुगंध निर्माण केला. 55 एकर जमिनीसाठी पूर्ण पैसे देणे हे एका स्वप्नासारखे होते.

ते आश्चर्यकारक होते. परंतु आम्हाला एका घराची आवश्यकता होती. नवीन घर कसे बांधायचे आणि सुरुवात कशी करायची हे माहित नव्हते. परंतु त्या जागेवर घर कसे बांधायचे यासाठी आम्ही प्रार्थना करू लागलो. पवित्र आत्मा आम्हाला मदत करील यावर आमचा विश्वास होता.

कर्ज न काढता घर बांधण्यावर आम्ही वेगवेगळ्या मार्ग शोधण्याला सुरुवात केली. एका विशिष्ट आकाराचे घर बांधण्याचे आम्ही ठरविले की ज्यामुळे खर्च कमी येईल. हे ट्रेलर सारखे फिरते घर नव्हते. परंतु अनेक भाग कारखान्यात तयार करायचे व नंतर प्लॉट वर आणून त्या एकत्र जोडायच्या. अशी ही घरे म्हणजे काही विशिष्ठ आकाराची व पद्धतीची होती, प्रांती अनेक गोष्टी कारखान्यात तयार केल्यामुळे, खर्च कमी होणार होता. आणखी 2-3 कारखान्यात विचारणा केली . बरीच विचारपूस केल्यावर आम्ही ठरविले की त्या कारखान्यात जायचे ज्यामुळे आम्हाला पाहिजे असलेले घर आम्ही बांधू शकत होतो . व्हर्जिनिया येथे होम-स्कूल-कन्वेन्शन संपल्यावर आम्ही करार करण्याचे ठरविले. .आमच्या योजनेनुसार करावे आणि आम्ही काही गोष्टी चुकून सोडल्या असतील तर करार करण्याच्या अगोदर चर्चा करावी असे ठरविले.

आम्हाला वर्जिनिया येथे शिकविण्यासाठी कसे बोलावले हे मला आठवत नाही , परंतु त्याठिकाणी एका होम-स्कूल कुटुंबाबरोबर राहण्यासाठी आम्ही गेलो. दक्षिणेकडल्या त्यांच्या सुंदर घरात आम्ही गेलो आणि त्या सुंदर घराबद्दल आम्ही बोलू लागलो. बोलत असतांना आम्हाला कळले की ते घर त्यांनी स्वतः बांधलेले होते. ते ऐकून मला प्रथम धक्का बसला.

मी विचारले, “तुम्ही घर बांधणारे आहात काय?” “नाही” त्यांनी उत्तर दिले. त्यांचे वडील एका मोठ्या कंपनीमध्ये अर्थ व्यवस्था पाहणारे होते. मग मी विचारले “तर मग, स्वतःचे घर कसे बांधावे हे तुम्हाला कसे समजले?”

अनेक गोष्टींबद्दल ते बोलू लागले. आणि बोलत असतांना आम्ही त्यांना सांगितले की आम्ही देखील परत गेल्यावर आमचे घर बांधणार आहोत. त्यांची उत्सुकता वाढली आणि आमच्या नवीन घराबद्दल ते विचारू लागले. आम्ही देवराज्याबद्दल बोलू लागलो आणि आमचे जीवन कसे बदलले ते सांगितले. आम्ही 55 एकर शेत रोख पैसे देऊन कसे विकत घेतले आणि आमच्या फार्म च्या घरातून आम्ही कसे बाहेर पडणार ते सांगितले.

आम्ही सांगितले की आमच्याजावळ योजना आहे . त्यांनी विचारले आम्ही ते पाहू शकतो का? ते ऐकून आम्हाला आनंद झाला. घरातील पत्नीला ते पाहून तिचे मत मांडायला फार वेळ लागला नाही. ती म्हणाली, “नाही, ही जागा लहान आहे. तुम्हाला मोठे स्वयंपाकगृह पाहिजेत. आणि तुमचे लेकरे मोठे झाल्यावर काय होईल याचा तुम्ही विचार केला काय? तुम्हाला मनोरंजनासाठी एक मोठी जागा पाहिजे. आणि मुळात आमच्या योजनेनुसार हे घर बांधणे योग्य नाही असे त्यांच्या बोलण्यावरून कळाले, आणि त्यांचे प्रत्येक मुद्दे आम्ही स्वीकारले. “आम्ही विचारले , “मग आता जवळ असलेल्या पैशात मोठे घर कसे बांधावे?” “फार सोपे आहे,” तुम्ही बांधा, असे ते  म्हणाले, जेंव्हा हे शब्द मी ऐकले, तेंव्हा मी जावज जवळ मोठ्याने हसलो,” मी माझे घर स्वतः बांधावे “? मला बांधकामाविषयी काही माहित नव्हते. परंतु हे काही फर कठीण नाही असे म्हणून त्यांनी आम्हाला उत्तेजन द्यायला सुरुवात केली. त्यांनी आम्हाला एक पुस्तक सांगितले, *Save up to $50,000 or more as your own General Contractor: How to Plan, Subcontract and Build Your Dream House* by Warren V. Jaeger.

म्हणून जेंव्हा आम्ही घरी आलो तर ते विशिष्ट घर बांधण्याचा करार करू नये असे आम्ही ठरविले. आम्ही पुस्तकाची ओर्डर दिली व प्रत्येक अध्याय काळजीपूर्वक वाचला. custom house plan आम्ही पाहू लागलो. शेवटी आम्हाला एक घर सापडले की ज्याची प्रत्येक गोष्ट पायरी पायरीने आम्ही पाहण्यास सुरुवात केली.

शेवटी आम्ही ठरविले की हे आम्ही करू शकतो. आम्ही स्वतःला प्रश्न विचारला, “आमच्या बजेट मध्ये हे घर बसण्यासाठी आम्ही काय करायला पाहिजे? तुमचा विश्वास बसणार नाही पण 12/2 ची wire कधीही हातात घेतली नव्हती. मी निर्णय घेतला की संपूर्ण घरात wire लावावी. wiring कशी करावी हे माहित असलेल्या माझ्या एका मित्राने त्याबद्दल मला सांगितले.

मी माझ्या व्यवसायात व्यस्त असल्यामुळे देन्द्राने घर बांधण्याची जबाबदारी स्वीकारली ती sub-contractors बरोबर काम करू लागली. एका contractor कडून घराची frame तयार करून घेतली व बाकीचा भाग आम्ही सांभाळू लागलो. त्यानंतरचे आमचे दिवस काहीसे तणावाखाली पण उत्साहात गेले. थोडक्यात सांगायचे म्हणजे, आम्ही बांधलेले घर पहिल्या योजनेवरील घरापेक्षा दुप्पट मोठे होते. लाकडाचे मजबूत दरवाजे होते, तक्तपोशी मजबूत लाकडाची होती. वरचा भागही सुंदर लाकडाचा होता, स्वयंपाक गृहातील कपाटे छानशा स्टेनलेस स्टील च्या वस्तूंनी भरलेले होते. आम्ही स्वतः घर बांधल्यामुळे जवळजवळ 2 लाख डॉलर्स वाचवले होते.

**मी नेहमीच म्हणतो की देवाचे तुमाच्यासाठीचे गूढ तुच्यासाठी लपविलेले आहे तुमच्यापासून काढून घेतलेले नाही. सैतान अंधारात राहतो आणि त्याला देवाच्या योजना समजत नाहीत.**

आज मी खुप खुश आहोत कारण आम्ही पवित्र आत्म्याला मदत मागितली होती. आणि परिणाम असा दिसून आला की आम्ही बघितलेल्या स्वप्नापेक्षाही जास्त दर्जाचे मिळाले. मला अजूनही भीतीयुक्त आदर वाटतो की आम्ही वर्जिनिया येथे जाऊन त्या कुटुंबाला भेटावे की ज्यांनी स्वतः घर बांधले. ही देवाचीच योजना होती. जर तसे घडले नसते तर आम्ही आमच्या पहिल्या योजनेनुसारच घर बांधले असते. आमचे पहिल्या योजनेतील घर चांगले नव्हते असे मी म्हणत नाही आम्ही ते आणखी वाढविलेच असते. परंतु प्रत्येक परिस्थितीत पवित्र आत्मा आम्हाला कसे सहाय्य करतो त्याचे आम्ही एक फार चांगले उदाहरण आहोत. तो तुम्हाला योजना देतो आणि मार्गदर्शनही देतो त्यामुळे तुमच्या अपेक्षेपेक्षाही तूम्हाला जास्त देतो.

मग मला पुन्हा एकदा सांगू द्या:

**देवाजवळ तुमच्यासाठी/तुमच्या योजना आहेत.**

तुम्ही कदाचित म्हणाल, “परंतु गेरी हे सर्व चांगले आहे पण मत्तय 13:44 नुसार योजना लपविलेल्या आहेत.” होय बरोबर आहे पण त्यात तुमचा फायदा आहे. मत्तय 13:10-11 मध्ये येशू काय म्हणतो पहा.

> *“मग शिष्य जवळ येवून त्याला म्हाणाले, आपण त्यांच्याबरोबर दाखल्यांनी का बोलता? त्याने त्यास उत्तर दिले, की स्वर्गाच्या राज्याची रहस्ये जाणण्याचे दान तुम्हाला दिलेले आहे, परतू त्यास दिलेले नाही.”*
>
> —मत्तय 13:10-11

रहस्ययुक्त ज्ञान तुमच्यासाठी आहे, ते सैतान किंवा दुष्ट लोकांसाठी नाही कारण ते त्याचा दुरुपयोग करू शकतात. सैतान त्याच्या चाली/ डावपेच बदलू शकतो जर त्याला देव काय करणार आहे ते समजले तर.

> *“दैवी ज्ञानाचे रहस्य आम्ही सांगतो, ते गुप्त ठेवलेले होते, ते युगाच्या पूर्वी तुमच्या आमच्या गौरावाकरिता देवाने नेमले, ते या युगातील अधिकाऱ्यातील कोणालाही कळत नाही, त्यांना कळले असते तर त्यांनी गौरवाच्या प्रभूला वधस्तंभावर खिळले नसते.”*
>
> —1 करिंथ 2:7-8

मी नेहमी सांगतो की देवाचे रहस्य तुमच्यासाठी लपविलेले आहे तुमच्यापासून नाही! सैतान अंधकारात राहतो आणि देवाच्या योजना त्याला कळत नाहीत. देव जो करतो त्याला तो फक्त प्रतिरोध करतो. जेंव्हा काय घडत आहे ते त्याला कळते तेंव्हा उशीर झालेला असतो. म्हणून पुढच्या वेळी, निराश होऊ नका. जरी मध्यरात्र झाली आणि तरी लक्षात ठेवा देव उशीर करीत नाही. आणी तुम्हाला जरी उशीर होत आहे असे वाटत असेल तरी तो उशीर तुमच्यासाठी असलेले उत्तर प्रगट होण्याची योग्य वेळ येईपर्यंत लपवून ठेवतो

*"स्वर्गाचे राज्य शेतात लपविलेल्या ठेविसारखे आहे, ती कोणेका मनुष्याला सापडल्यावर त्याने ती लपवून ठेवली, आणि आनंदामुळे त्याने जाऊन आपले सर्वस्व विकले, मग ते शेत विकत घेतले.*

*—मत्तय 13:44*

हे शेत कोठे आहे त्याबद्दल आणि ठेव का लपवून ठेवली त्याबद्दल आम्ही चर्चा केलेली आहे. पवित्र आत्म्याला प्रार्थना करून व त्याची वाणी ऐकून देवराज्यात लपविलेल्या ठेविबद्दल कसे समजून घ्यावे याबद्दलही आम्ही चर्चा केलेली आहे. परंतु याबाबत आणखी एक तत्व पवित्र शास्त्रात दिलेले आहे ते आम्हाला माहित असणे आवश्यक आहे. त्याकडे लक्ष न दिल्याने अनेक चांगले लोक खाली खेचल्या गेलेले आहेत आणि काहींच्या जीवनात अनर्थ आलेला आहे. आम्ही शास्त्र वचन वाचतो की त्या गृहस्थाने ठेविबद्दल ऐकले, कल्पना केली, मार्गदर्शन घेतले, किंवा देवापासून योजना घेतली, आणि पुढे म्हटले आहे की त्याने ती ठेव लपवून ठेवली. त्याने ताबडतोब कृती केली नाही. देवापासून त्याने काय ऐकले, किंवा त्याची योजना काय आहे हे त्याने आपल्या मित्रांना आणि शेजाऱ्यांना सांगितले नाही. शास्त्र सांगते ती ठेव त्याने पुन्हा लपवून ठेवली. आणि आपले सर्व विकले आणि ते शेत विकत घेतले.

साध्या भाषेत सांगायचे झाले तर ठेवीची जागा कोणालाही सांगण्याची त्याची तयारी नव्हती जोपर्यंत तो ते शेत विकत घेणार नव्हता तोपर्यंत. ते शेत त्याचे झाल्यावर ते त्याच्यापासून कोणी चोरून घेऊ शकणार नव्हते. पवित्र वचन असेही सांगते की ज्यावेळी त्याला ठेव सापडली त्यावेळी ते शेत विकत घेण्याची त्याची ऐपत नव्हती. त्यासाठी त्याला तयारी करण्याची आवश्यकता होती . पैशाने विकत घेणे यापेक्षाही हे तत्व पुढे काही सांगते. हे तत्व आपल्याला जीवनातील एक गोष्ट सांगते ती म्हणजे, पवित्र आत्मा जे दाखवितो त्यानुसार कसे कार्य करावे हे समजून घेणे हेच ते तत्व आहे.

शास्त्र वचन सांगते की एकदा तुम्हाला दिशा कळाली म्हणजे ते कार्य करण्याची तुमची पात्रता झाल्याशिवाय तुम्ही पुढे जाऊ नये. पैशा संबंधी हे कसे कार्य करते हे तुम्ही सहज पाहू शकता. जो पर्यंत ती एक जागा घेण्याची तुमची पात्रता नसेल तर पैसे जमा होईपर्यंत त्या ठीकाणी ठेव आहे हे कोणाला सांगू नका.

जर त्या जागेवर ठेव आहे हे कोणाल समजले तर तुमच्या अगोदर तो ती जागा विकत घेईल. म्हणून तुम्ही जा पैशाची तयारी करा, जागा विकत घ्या, तोपर्यंत ठेवी बद्दल चे गूढ तुमच्या जवळच ठेवा.

हे तत्व देवाकडून आलेले मार्गदर्शन व सूचना यासाठी लागू आहे. पुष्कळदा ख्रिस्ती लोक सुरुवातीलाच चुकतात. पुष्कळदा पवित्र आत्मा आम्हाला विचार व कल्पना सुचवितो परंतु त्यासाठी पुढे कसे जायचे ते प्रगट करीत नाही परंतु त्यासाठी आम्ही तयारी करावी या साठी संधी देतो. की जेणेकडून आम्ही योग्य त्या संधीचा फायदा घ्यावा. कोणत्याही नवीन गोष्टीसाठी तयारीचा काळ हा फार महत्वाचा आहे. खेळांमध्ये एक टीम जिंकते कीवा हरते त्याचे कारण त्यांनी सराव करून कशी तयारी केली (जे कोणी पाहत नाही) त्यावर सर्व अवलंबून असते. परंतु सराव काही गंमतीची गोष्ट नाही हे तुम्ही जाणून आहात.

सराव म्हणजे खडतर व थकवा आणणारी बाब आहे. परंतु प्रत्यक्ष खेळाचा विचार केला तर त्यात उत्सुकता, प्रकाश झोत, विजयातील आनंद व प्रेक्षक हे सर्व आनंद देणारे असतात. परंतु तयारीकडे लक्ष दिले नाही तर दुख: व त्रासच आहे.

हे तत्व माहित नसल्यामुळे कितीतरी लोकांनी आपल्या जीवनात आघात व मोडतोड झालेली अनुभवली आहे. पुष्कळ लोक देवाने पाचारण केलेले, अभिषिक्त केलेले मी बघितले आहेत त्यांनी भावनांचा व पैशाचा विचार न करता, व योग्य तयारी न करता मंडळीची सुरुवात केली परंतु त्यांचा शेवट त्यांनी पाहिलेल्या स्वप्नात न होता विदारक झाला. मला असे लोक माहित आहेत की ज्यांनी देवाकडून आलेले विचार स्वीकारले व आपल्याला यश मिळेल या खात्रीने आपला पूर्ण वेळेची नोकरी सोडून व्यवसायात उडी घेतली परंतु योग्य तयारी नसल्याने शेवटी त्यांचे दिवाळे निघाले. या बाबतची शोकदायक गोष्ट ही आहे की ते शेवटी देवाला दोष देतात, आणि या प्रक्रियेत समाविष्ट लोक स्वतःबद्दल व देवाबद्दल च्या भ्रामक कल्पनेत राहतात. काही लोकांना वाटते की यश हे एका रात्रीत येते, पण मला हे समजत नाही. परंतु या शास्त्राभागात असलेले साधे तत्व लोकांना शिकविण्याची गरज आहे.

लोक माझ्याकडे येतात व म्हणतात, “पाळक साहेब, देवाने मला सांगितले की ही माझी मंडळी आहे” परंतु नंतर तुम्ही या लोकांना कधीच पाहत नाही. “पाळक साहेब देवाने मला व्यवसाय संबंधी हा विचार दिलेला आहे. परंतु नंतर तुम्ही ऐकता की त्यांचे घर त्यांनी

विकण्यास काढले आहे, व त्यांची कार त्यांच्यापासून घेण्यात आली आहे. अशा गोष्टी तुमच्यासाठी देवापासून नाहीत.

जेंव्हा पवित्र अत्म्याकडून आम्हाला काही विचार मिळतात त्याचा अर्थ हा नाही की त्या ठिकाणी आम्ही ताबडतोब उडी घ्यावी.पुष्कळ वेळा आमचे स्वप्न लपवून ठेवावे लागते आणि ते मिळविण्यासाठी तयारी करावी लागते. त्या दृष्टांतानुसार यश मिळण्यासाठी आमच्या जवळ सर्वच गोष्टी नसतात. तयारीसाठी कदाचित एक आठवडा किंवा काही वर्षेही लागू शकतात. देवाने आम्हाला काय दाखविले त्यावर वेळ अवलंबून आहे. तुम्ही हे समजून घ्या की तयारी आणि वेळ ह्या बाबी आम्हाला देवाने दिलेल्या विचारापेक्षाही महत्वाच्या आहेत.

माझ्या बाबतीतच म्हणायचे झाले तर मी 19 वर्षाचा असतांनाच संदेश देण्यासाठी मला पाचारण झाले होते. मला दृष्टांत झाला होता की मी पवित्र शास्त्र घेऊन उभा होतो आणि देव मला म्हणाला, “मी तुला संदेश देण्यासाठी पाचारण करीत आहे.” हे तीन वेळेस झाले. हा अतिशय सामर्थ्यशाली व खरा अनुभव होता. परंतु त्याच वेळेस मी जावे व संदेश देण्यास सुरुवात करावी असे देवाने मला सांगितले नाही. त्या ऐवजी मी कॉलेज मध्ये जावे असे देवाने सुचविले. वस्तुतः मी हायस्कूलच सोडून दिले होते. मी लाजाळू वृतीचा असून माझ्याभोवती लोक असणे मी टाळत होतो. मला स्पष्टपणे सांगू द्या, लोकांचा पाळक होण्याच्या परिपक्वतेच्या जवळही मी नव्हतो. म्हणून मी कॉलेज मध्ये गेलो. आणि त्या ठिकाणी मला फारच कठीण गेले. परंतु मी टिकून राहिलो व 4 वर्षाचा डिग्री अभ्यासक्रम पूर्ण केला.

कॉलेज मधून बाहेर पडल्यावर आता संदेश देण्याची वेळ आहे का याबद्दल मी विचार केला. परंतु प्रभुने मला सांगितले की एका आर्थिक व्यवसायाच्या insurances व securities विकणाऱ्या संस्थेमध्ये मी काम करावे. ही नोकरी कॉलेज पेक्षाही कठीण होती. मला दररोज अनेक वेळा लोकांबरोबर थंडरीतीने फोन वर बोलावे लागत असे व लोकांचे भय मला वाटेनासे झाले. कमिशन वर मला राहावे लागत होते. व हे आणखीनच कठीण होते. आणि खरे सांगायचे म्हणजे प्रत्येक दिवशी मला वाटायचे की आता नोकरी सोडून द्यावी. परंतु मला तसे करता येऊ शकत नव्हते. काही वर्षानंतर मात्र मी चांगल्या स्थितीत आलो.

खऱ्या परिस्थितीत मी व देन्द्रा आमचे ऑफिस देशातील 5000 ऑफिसेस मध्ये पहिल्या क्रमांकावर आणले होते.

आणि यावेळेस देवाने मला सांगितले की आता तू मंडळी सुरु करावी. मी त्यावेळी 40 वर्षांचा होतो. 19 वर्षाचा असतांना मला संदेश देण्याचा जो दृष्टांत झाला होता त्यासाठी तयारी करण्यासाठी 21 वर्षांचा काळ गेला. मी पाळकीय सेवा करण्यास सुरुवात केल्यावर मला समजले की मला तयारीसाठी इतका वेळ का लागला. मी पाळकीय सेवेचा जो विचार केला होता त्या दृष्टीने विचार करता ही सेवा फार कठीण होती. लोकांसोबत मिळालेले प्रशिक्षण, आणि व्यवसायात नकारात्मक आलेले अनुभव यामुळे देवाने दिलेल्या पाचारण संबंधी मी विश्वासू झालो. अर्थात प्रत्येकच पाचारण अश्याप्रकारे 21 वर्षे घेणार नाही,परंतु तत्व मात्र तेच आहे ते म्हणजे तयारी करणे.

म्हणून हे तत्व मला मत्तय 13:44 मध्ये सांगितल्यानुसार माझ्या शब्दात सांगायचे आहे,

> *"तुमच्या मध्ये असलेले स्वर्गाचे राज्य गुपित गोष्टीचे किंवा रहस्याचे ज्ञान तुम्हाला देईल किंवा त्याकडे पोहोचण्याचा मार्ग दाखवील. हे देवाला माहित आहे. देवाच्या आत्म्याद्वारे हे ज्ञान मिळेल, देवाचा आत्मा तुमच्यामध्ये आहे. जेंव्हा मनुष्य ते गुपित-ज्ञान ऐकतो की जे त्याच्यासाठी ठेव किंवा खजिना आहे किंवा देवाकडून उत्तर आहे तेंव्हा ते ज्ञान तो आपल्या मनात व हृदयात लपवून ठेवतो आणि मग आनंदाने आपल्या सर्व शक्तीनिशी व चांगली तयारी करून त्याला मिळालेल्या सूचनांनुसार व दिशानुसार ती ठेव आपल्या ताब्यात घेतो.*

## अध्याय 8
# बढतीची कठीण जागा

माझा मित्र पिटर पाळक साहेब व त्याच्या पत्नी बेव जे new zealand मध्ये पाळकीय सेवा करीत होते काही दिवसंद्साठी अमेरिकेत येणार होते. ते नाताळचे दिवस होते व colorado springs येथील Broadmoor (ब्रॉडमूर) येथील हॉटेलमध्ये काही दिवस राहून नाताळचा आनंद घेणार होते. Boadmoor (ब्रॉडमूर) हे अमेरिकेतील सर्वात सुंदर resorts पैकी एक आहे की जे rocky mountain च्या जवळ उभे केलेले आहे, आणि नाताळच्या decoration साठी ते खूप प्रसिद्ध आहे. peter पाळक साहेबांनी मला त्याठिकाणी येण्याचे आमंत्रण दिले. आम्ही लगेच उडी मारली आणि आमचे तीन मजेशीर दिवस त्याठिकाणी घालविले. जेंव्हा मी peter पाळक साहेबांबरोबर असतो तेंव्हा बहुतेक सेवाकार्याबद्दल बोलतो कारण माझ्या संस्थेच्या बोर्ड वर ते आहेत. या ट्रीप मध्ये तेच झाले. आम्ही दोघे बोलत होतो. येणाऱ्या वर्षाच्या योजना अखात होतो व आपापले विचार मांडत होतो.

आम्ही दोघे येणाऱ्या वर्षाच्या योजनेबद्दल बोलून एकमेकांचे विचार सांगत होतो. शेवटी समारोपाचा दिवस आला, हा क्षण दुखाचा वाटत होता कारण ते आमचे फरच जवळचे मित्र होते. वर्षातून एकदा आम्ही त्यांना New zealand ला भेटत असू, किंवा दोन वर्षातून एकदा. परंतु यावर्षी मी फारच कामात व्यग्र होतो म्हणून या वर्षी आमची जाण्याची योजना नव्हती..

म्हणून आम्ही घरी आलो व मोठ्या आशेने नवीन वर्षाची वाट पाहू लागलो. आणि एक लक्षवेधक स्वप्न 9 जानेवारीला पडले. त्या स्वप्नात peter पाळक साहेब मला फेब्रुवारी महिन्यात new Zaealand ला त्याच्या मंडळीमध्ये बोलण्यासाठी बोलावीत होते. मी विचार केला की हे असाधारण आहे. मी त्यांच्यासोबत तीन दिवस होतो , आणि त्यावेळी त्याने मला या बद्दल काहीच सांगितले नव्हते. मी देन्द्राला न्याहारीच्या वेळी या स्वप्नाबद्दल सांगितले.

माझे कम्प्यूटर स्वयम्पाक गृहाच्या एका टेबल वर होते आणि कधीतरी मी ते सुरु करीत असे. कॉफी पीत असतांना मी peter पाळक साहेबांकडून आलेला मेल पहिला. त्यात मी वाचले की तीन आठवड्यानंतर होणाऱ्या आर्थिक कॉन्फरन्स मध्ये मला त्यांनी संदेश देण्याचे आमंत्रण दिले होते. मला आश्चर्य वाटले, परंतु मला अगोदरच स्वप्न पडल्यामुळे धक्का बसला नाही.

माझ्या कार्यक्रम यादीकडे मी पहिले. कारण त्याच सुमारास मला अनेक ठिकाणी प्रवास करायचा होता. देन्द्रा आणि मी त्या सुमारास Buenos Aries, Argentina येथे जाणार होतो. काही दिवस अगोदर मी Auckland येथे जाणार होतो. एकच उपाय होता आणि ती म्हणजे Buenos Aries वरून सरळ SYNDEY, Australia येथे जाणे आणि नंतर दुसरे विमान पकडून Auckland ला जाणे. अशा प्रकारचा प्रवासाची योजना मी कधीच केली नव्हती. परंतु मला कळले की देव माझ्याशी बोलला व मी तेथे जाणार होतो.

Argentina येथील trip व्यावसाईक होती व ज्या एका व्यापाऱ्यांसोबत मी काम करीत होतो त्याने तशी योजना आखली होती. परंतु ही trip चांगलीच राहिली कारण अनेक मित्रांना मी भेटलो की ज्यांना सर्वसाधाराणपणे मी वर्षातून एकदा भेटत असे. Argentina त्यावेळी काही गंभीर आर्थिक स्थितीतून जात होता, काही शहरात दंगे देखील झाले होते. तरी आमची ट्रीप चांगली झाली जी मी यापूर्वी या अगोदर पहिली नव्हती. आता Sydney ला पोहोचण्यासाठी 16 तास लागणार होते. या अगोदर इतके तास विमानाचा प्रवास मी केला नव्हता. दक्षिण पोल वरून आम्ही जाणार होतो. आणि हवेतून तो भाग पाहणे नक्कीच आनंदयुक्त दरारा वाटेल असे असेल असा मी विचार केला.

खिडकीतून पाहिल्यावर मला बर्फच बर्फ दिसले, मला कळले की आम्ही Argentine Airline ने जात आहोत.

हे Argentina चे विमान होते व तो देश आर्थिक संकटातून जात होता. माझ्या मनात विचार आला की कदाचित पैसे वाचविण्याच्या दृष्टीने हे विमान सुस्थितीत ठेवण्यासाठी त्या भागात खाली उतरले तर मात्र देखावा फारसा उत्साहवर्धक नसेल. परंतु मला माहित होते की मी देवाच्या हातात सुरक्षित आहे, कारण त्यानेच मला या ट्रीप बद्दल सांगितले होते.

**“जीतक्यांना देवाचा आत्मा चालवितो ते देवपुत्र आहेत.”**
**— रोम. 8:14**

Sydney ला आल्यानंतर आम्ही peter पाळकसाहेबांना आणि बेव ला ताबडतोब फोन केला. आणि आम्हाला धक्काच बसला कारण peter पाळकांना हृदयाचा एक मोठा झटका आला होता व ते दवाखान्यात भरती होते. ते त्यांच्या आर्थिक संमेलनात बोलू शकत नव्हते व मलाच पूर्ण वेळ सर्व सत्रांमध्ये बोलावे लागणार होते. मला आता कळले की देवाने मला new zealand ला येण्यासाठी का मार्ग दाखविला. आणि मी थोडं भयचकित झालो कारण पवित्र आत्मा आपल्या पायऱ्या आपल्याला दाखवितो. रोमकरास पत्र 8:14 ची मला आठवण झाली,

*“जीतक्यांना देवाचा आत्मा चालवितो ते देवपुत्र आहेत.”*

— रोमकरास पत्र 8:14

आम्ही पुन्हा एकदा पवित्र आत्म्याचे मार्गदर्शन, त्याचे विचार, व अर्थ समजून घेण्याच्या आमच्या पत्रातेबद्दल बोलाट आहोत.दनिएल च्या गोष्टींमध्ये आम्हाला हे शिकायला मिळते की, पवित्र आत्म्याचे ऐकून त्याचे उत्तरे कशी मिळतात. यापेक्षा अधिक चांगली गोष्ट पवित्र शास्त्रात दिसत नाही. दनिएल 2:1-6 वाचू या:

*“नबुखद्नेसराला त्याच्या कारकीर्दीच्या दुसऱ्या वर्षी स्वप्ने पडली, तेणेकडून त्याच्या मनाला तळमळ लागली आणि त्याची झोप उडाली. तेंव्हा राजाने हुकुम केला की माझी स्वप्ने काय आहेत ते सांगायला ज्योतिषी, मांत्रिक, जादुगार व खास्डी यास बोलावून अन; मग ते सर्व राजासमोर उभे राहिले. राजा त्यास म्हणाला मला पडलेले स्वप्न समजण्याविषयी माझ्या मनाला तळमळ लागली आहे. ते खासदी-आरामी भाषेत राजाला म्हणाले, महाराज चिरायू असा; आपले स्वप्न या आपल्या दासांस सांगा, म्हणजे आम्ही त्याचा अर्थ सांगू. राजाने खास्द्यास म्हटले माझा ठराव होवून चुकला आहे की माझे स्वप्न व त्याचा अर्थ ही मला तुम्ही कळविली नाहीत तर तुमचे तुकडे तुकडे करून तुमची घरे उकिरडे करावेत; पण तुम्ही स्वप्न व त्याचा अर्थ*

*मला सांगाल तर तुम्हास मजकडून देणग्या, इनामे व मोठा मन मिळेल; यास्तव स्वप्न व अर्थ मला सांगा."*

—दनिएल 2:1-6

*"ज्योतिषांनी (खास्द्यांनी) राजास उत्तर दिले, महाराजांची ही गोष्ट सांगेल असा कोणी मनुष्य साऱ्या दुनियेत नाही; असली गोष्ट ज्योतिष्यास, मांत्रिकास, किंवा खास्द्यास कोणीही पराक्रमी राजाने आजपर्यंत विचारली नाही. महाराज जी गोष्ट विचारतात ती दुर्घट आहे; मानवात वास न करणाऱ्यादेवाशिवाय कोणाच्याने ती महाराजांच्या हुजुरास संगावणार नाही. हे ऐकून राजा क्रोधाने संतप्त झाला आणि बाबेलाच्या सर्व ज्ञान्यांचा वध करावा अशी त्याने आज्ञा केली. ज्ञान्यांचा वध करावा असा हुकुम सुटला तेंव्हा दनिएलचा व त्याच्या सोबत्यांचा वध करावा म्हणून लोक त्यास शोधू लागले."*

—दनिएल 2:10-13

*"तेंव्हा दनिएल आपल्या घरी गेला व आपले सोबती हनन्या, मिशायेल, व अजऱ्या यास ही हकीकत कळविली." तेंव्हा दनिएल आपल्या घरी गेला व आपले सोबती हनान्या, मिशायेल, व अजऱ्या यास ही हकीकत कळविली. आणि बाबेलाच्या इतर ज्ञान्यांबरोबर आपला व आपल्या सोबत्यांचा घात होऊ नये म्हणून दनिएलने त्यास विनंती केली की या रहस्यासंबंधाने स्वर्गीय देवाने आपणावर दया करावी असे त्याजवळ मागावे. मग रात्री दृष्टांतात हे रहस्य दनिएलस प्रगत झाले; त्यावरून दनिएलने स्वर्गीय देवाचा धन्यवाद केला, दनिएल म्हणाला, देवाचे नाम युगानुयुग धन्यवादित असो, कारण ज्ञान व बाल ही त्याचीच आहेत; तोच प्रसंग आ समय बदलतो' तो राजास स्थानापन्न किंवा स्थानभ्रष्ट करतो: तो ज्ञान्यास ज्ञान देतो व बुद्धीमानास बुद्धी देतो. तो गहन व गूढ गोष्टी प्रगत करतो. अंधारात काय आहे हे त्याला ठावूक असते. त्याच्याजवळ प्रकाश वसतो.*

—दानिएल 2:17-22

दनिएल जीवन व मरण या परिस्थितीमध्ये सापडलेला आहे. परंतु तुमच्या बढतीसाठीची महत्वाची किल्ली येथे आहे. देवाने तिचा उपयोग दनिएलच्या पतन होण्यासाठी नाही तर बढतीसाठी केला. पवित्र आत्म्याच्या गुपित ज्ञानाने नबुखद्नेस्सराला दनिएलने स्वप्न सांगितले व अर्थही सांगितला. राजा हे ऐकल्यावर खूप रोमांचित झाला. दनिएल 2:46-49 वाचा:

> *"तेंव्हा नबुखद्नेस्सर राजाने पालथे पडून दनिएलास साष्टांग नमस्कार घातला. आणि त्याजपुढे नैवद्य ठेवून त्याला धूप दाखवा अशी आज्ञा केली. राजाने दनिएलस म्हटले, उमाचा खरोखर देवाधी देव आणि राजराजश्वर आहे, आणि तुला हे रहस्य प्रगट करता आले, म्हणून तो रहस्य प्रगट करणारा देव आहे. मग राजाने दनिएलास थोर पदास चढविले. त्याला मोठा मोठी इनामे दिली. त्याला सगळ्या बाबेल परगण्याची सत्ता दिली आणि त्यास बाबेलाच्या सर्व ज्ञान्यांचा प्रमुखांचा अध्यक्ष केले. राजाने दनिएलास विनंती करून शाद्रख, मेशाख व अबेदनगो यास बाबेल परगण्याचा कारभार सांगितला; दनिएल राजदरबारी असे."*
>
> —दानिअल 2:46-49

देवाचे ऐकण्याची पात्रता असल्यामुळे परिणाम काय झाला? बढती आणि संपत्ती.

वर पाहिलेलाच परिणाम आणखी एका गोष्टीमध्ये पाहायला मिळतो. वरील सारख्याच परिस्थितीत योसेफालाही फारोच्या स्वप्नांचा अर्थ सांगण्याची संधी मिळाली. योसेफाने यशस्वी रीतीने फारोच्या स्वप्नाचा अर्थ सांगितला आणि त्या दुष्काळाच्या काळात मिसर देशाला वाचविण्यासाठी व्यवस्थापन कसे करावे हे देखील स्वप्नाचा अर्थ सांगून सांगितले. त्यावर फारोचा प्रतिसाद काय होता पहा.

> *"आणि फारो योसेफास म्हणाला, देवाने तुला ह्या सर्व गोष्टींचे ज्ञान दिले आहे त्या अर्थी तुजसारखा चतुर व शहाणा कोणी नाही. तर तू माझ्या घराचा अधिकारी हो. तुझ्या आज्ञेप्रमाणे माझी सर्व प्रजा चालेल, गादिपुरताच काय तो मी तुझ्यापेक्षा मोठा."*
>
> —उत्पती41:39-40

वरील दोन्ही गोष्टींमध्ये सुरुवातीला अशाहीनता हीच मोठी बाब दिसते, परंतु बढती व सधनता हेच परिणाम दिसतात. सध्या भाषेत, तुम्ही मोठा प्रश्न सोडविल्यामुळे जग तुम्हाला मोठा पैसा देईल. मोठ्या समस्यांमध्ये तुम्हाला चांगल्या स्थितीत ठेवण्यासाठी तुमच्या मध्ये असलेला पवित्र आत्म्याला ते आवडते. हे कधी घडेल याचे भय धरू नका, परंतु देवाची स्तुती करण्यास सुरुवात करा. कारण जसे त्याने दनिएल व योसेफ यांना मदत केली तशी तुम्हालाही करील. मी नेहमीच असे म्हणतो की सर्व गौरव देवाला आहे. आणि मला चेक मिळतो दनिएल देवाबद्दल काय म्हणाला ते मला सांगायला आवडते, “तो खोल व लपविलेल्या गोष्टी प्रगट करतो. अंधकारात खोटेपणा वसती करतो व आणि त्याच्यामध्ये प्रकाश राहतो.” दानिएल म्हणतो, त्याच्या (देवाच्या) ठायी प्रकाश वसती करतो. अर्थ असा की अंधाऱ्या रात्री चालत असतांना प्रकाश आल्याबरोबर तुम्ही कोठे जात आहात हे तुम्हाला समजते. प्रकाशामुळे भीती निघून जाते आणि तुम्हाला समजते की कोठे जायचे आहे. पौल सांगतो की संकटाच्या वेळी देव आमच्याशी बोलतो व आम्हाला मदत करतो.

> *“तुम्ही विदेशी होता तेंव्हा जसजसे वळण तुम्हाला मिळाले तसतसे तुम्ही त्या मुक्या मूर्तीकडे बहकत गेला हे तुम्हास ठाऊक आहे.” (1 करिंथ 12:2)*

*मुर्त्या* बोलत नाहीत परंतु देव मात्र बोलतो, असे पौल म्हणतो.

तुम्हाला वाटत असेल की या अध्याचे नाव मी “बढतीची कठीण जागा “ असे का ठेवले असेल. त्याचे कारण एखाद्या कठीण जागीच तुमच्यामध्ये असणाऱ्या पवित्र आत्म्याचे उत्तर असते. कठीण जागाच तुम्हाला योग्य उत्तर मिळण्याचे योग्य संधी देते. तुमच्या पुढच्या बढतीसाठी कठीण जागा हीच योग्य असते. कठीण जागेपासून पुष्कळ ख्रिस्ती लोक बाजूला होतात. काही जणांना वाटते की ते कठीण जागेवर सापडणे म्हणजे देवाजवळ जाण्यास चुकणे.

TV कार्यक्रम जेव्हा आम्ही सुरु केला तेंव्हा त्याचे महिन्याचे बिल जवळ जवळ 9,000 डॉलर्स होते. आणि प्रत्येक महिन्यात इतके पैसे जमा होणे कठीणच होते. परंतु पुढे हेच बिल 20,000 डॉलर्स प्रतीमहा झाले, व त्यानंतर 50,000 डॉलर्स झाले. एकदा आम्ही प्रार्थना करीत असतांना माझी मुलगी अमी भविष्य सांगण्याचे दान मिळाल्यासारखी बोलू लागली.

“कापणी तुझ्यासाठी फार मोठी आहे. मी तुला तानत आहे/ तुला तान देत आहे.. फक्त माझ्या अत्म्याच्याद्वारे पुढे काय होणार हे तुला समजू शकेल. तू बाजूला पाऊल टाकतो काय? मी तुला तुझ्या समजशक्तीच्या पलीकडच्या कठीण गोष्टी तुला दाखविणार आहे.”

पुढे काय घडले ते सांगण्याअगोदर तुम्हाला आतापर्यंत जे समजले त्यावरून तुम्ही मला सांगू शकाल काय की ह्या परिस्थितीचा अर्थ आम्ही काय लावला असेल? बढती ! मला निवड करण्याचा करण्याचा अधिकार दिला ही गोष्ट मला फार आवडते. देव मला विचारत होता काही अंतर तू माझ्या बरोबर चालणार आहे काय? देव माझ्या साठी जणुकाय STOCK विकत घेत होता. जर मी नाही म्हटले असते तर मला माहित आहे तो दुसऱ्या व्यक्तीकडे गेला असता. परंतु याठिकाणी मला बढती होती , तुम्हाला वाटत नाही काय?

मी म्हटले, “देव, तुला माहित आहे की मी तयार आहे.” काही आठवड्यानंतर Daystar Network ने आम्हाला TV साठी प्रत्येक दिवसाची एक वेळ दिली. ह्या अगोदर आम्हाला आठवड्यातून एकच वेळ दिली जायची. जर हे आम्ही स्वीकारले असते तर आमचे बील प्रत्येक महिना 200,000 डॉलर्स जाणार होते.

अमिच्या भाविश्यवाचक शब्दांनुसार आणि पवित्र आत्म्याच्या आंतरिक अभिषेकामुळे मी होय म्हटले. प्रत्येकाने मला म्हटले की लोकांनी तुझा कार्यक्रम पहिला नाही तर बिल भरण्याच्या बाबतीत तू मागे पडशील. आमच्यासाठी TV कार्यक्रम विकत घेणाऱ्याचा एक इमेल मला आला. त्यात लिहिले होते की आपले बिलाचे पैसे पोहोचण्यास उशीर होत असल्यामुळे त्याचे वकील थोडे नाराज आहेत,

त्यामुळे मी देवाबरोबर झगडा करू लागलो कारण माझ्या कार्यक्रमाचे नावच होते “Fixing the Money Thing” पैसे योग्य वेळी भरता न आल्यामुळे मी थोडासा खचून गेलो होतो व आपले कार्यक्रमात थोडी काटछाट करावी असे मी देन्द्राला सांगितले. तिने मला उतार दिले, “देवाने काय सांगितले? मी तुझे बिल भरेन हेच देवाने सांगितले ना?” 2 दिवस जेव्हा आम्ही बोलायचो तेंव्हा हेच तिचे वाक्य असायचे. आम्ही प्रार्थना केली, आणि त्या वेळी जरी माझ्याजवळ उत्तर नव्हते तरी देवाची शांती मला मिळाली होती. त्या आठवड्यात मला स्वप्न पडले, त्यात मला चेक्स चा ढीगच दिसला. मला फक्त ढीगच दिसला नाही तर त्यावरील रक्कम व कोणी चेक दिला त्यांचे नावही दिसले. आणि मला माहित होते की जेंव्हा मी उठेन तेंव्हा मला

दिसेल की TV बिल्स भरलेले आहेत, आणि मला शांती मिळाली. त्या आठवड्याच्या शेवटी मला दिसले की 500,000 लाखाचे चेक्स मिळाले आणि स्वप्नात दिसल्यानुसार ते कोणी आणि किती रक्कम दिली ते देखील समजले.

लक्षात घ्या कठीण जागा म्हणजे वाईट गोष्ट नाही. ते तुमच्या बढतीचे ठिकाण होय. लोक मला म्हणतात की कठीण ठिकाणी प्रवेश करण्यासाठी ते घाबरतात, कारण ती आपली चूक होईल असे त्यांना वाटते. परंतु लक्षात घ्या पवित्र आत्मा तुम्हाला चूक होण्यासंबंधी देखील सूचना देतो.

मला आठवते की जेंव्हा मी माझी कंपनी गहान ठेवली तेंव्हा आपल्या घरावर पैसे घेऊन माझ्या कंपनी मध्ये तो गुंतवणार होता.. हा विचार मला काही फारसा पटला नाही.त्या ऑफिसच्या पायऱ्या उतरत असतांना माझा एक प्रतिनिधी माझ्या सोबत बोलत होता. आणि तितक्यात पवित्र आत्मा माझ्याबरोबर मी काय करावे याबद्दल बोलू लागला. माझ्या प्रतिनिधीला मी म्हटले, “तू जाऊन करार करू शकतो, आणि गिऱ्हाइकाला कर्ज घेण्याच्या पत्रावरही सही करायला सांग. आणि त्यामध्ये हे लिहायला सांग की गुंतवणूक करणाऱ्या कंपनीचा आम्ही भाग नाही, तर गिऱ्हाईकाच्या विनंतीवरून आम्ही कर्ज घेत आहोत.” आम्ही पुढे हे देखील लिहिले की गुंतवणूक केल्यावर त्याच्या उलाढाली संबंधी किंवा सुरक्षिततेसाठी आम्ही जबाबदार नाही. सहा महिन्यानंतर सर्व उडूनच गेले. गुंतवणूक करणाऱ्या कंपनीने आमच्या गिऱ्हाईकाचे सर्व पैसे गमावले होते, व आता गुंतवणूक करणारी कंपनी व माझी कंपनी या विरुद्ध केस करण्यात आली. परंतु त्यांच्या वकिलाने जेंव्हा माझ्या गिऱ्हाईकाचे सही केलेले पत्र पहिले तेंव्हा त्या केसमधून आम्हाला वगळण्यात आले.

**पवित्र आत्म्यावर तुम्ही विश्वास ठेवू शकता कारण तोच तुमहाला प्रत्येक परिस्थितीत मदत व मार्गदर्शन करतो.**

मी पायऱ्या उतरत असतांनाच पवित्र आत्म्याने मला ते पत्र लिहून घेण्याबद्दल सुचविले होते. पवित्र आत्म्यावर तुम्ही विश्वास ठेवू शकता कारण तोच तुमहाला प्रत्येक परिस्थितीत मदत व मार्गदर्शन करतो. येशुने म्हटले, “भिऊ नकोस.”

ही गोष्ट मी माझ्या दुसऱ्या पुस्तकात लिहिलेली आहे, व या पुस्तकात मला ते लिहावेसे वाटले. एका आठवड्यात आम्ही सर्व कुटुंब तीन दिवसाच्या सुट्टीला जाणार होतो. सर्व कुटुंब

VAN मध्ये बसले, आणि मी इंजिन सुरु करणार इतक्यात पवित्र आत्मा माझ्याशी बोलला की मी माझी कार आहे तेथून काढावी.. माझ्याजवळ दुसरी एक कार होती, ती मी गवतावर ठेवावी असे पवित्र आत्म्याने सुचविले. हे विलक्षण होते. मी विचार केला, “रस्त्यावरून कार न ठेवता गवतावर ठेवावी असे पवित्र आत्म्याने का सांगावे बरे? मला काहीच कल्पना नव्हती. परंतु त्याबद्दलची छाप मात्र जबरदस्त होती. म्हणून मी देन्द्राला सांगितले की मी आपली कार रस्त्यावर न ठेवता गवतावरून ठेवणार आहे,.रविवारी संध्याकाळी घरी येइपर्यंत मी फारसा विचार केला नाही. ज्याठिकाणी माझी कार असायची तेथे एक मोठे झाड होते. आणि ते त्या रस्त्यावर पडले होते. परंतु कार मात्र गवतावर सुरक्षीत उभी होती. जर ती रस्त्यावर उभी असती तर पूर्ण नासधूस झाली असती.

देन्द्रा आणि मी पैशासंबंधीची फारशी कल्पना नसलेले असे वाढलो होतो. परंतु योग्य व्युव्हरचना व गुप्त सुज्ञता यामुळे परिस्थितीपेक्षा मोठे काही करावे हे शिकणार होतो. आणि आता मला आनंदाचे हसू आले कारण आमचा ‘Fixing the Money Thing” हा TV कार्यक्रम जगामध्ये बघितल्या जात होता.

मिताहो, आजच तुमचे भवितव्य आहे.

> *“ते दुर्बलांचे सबळ झाले, ते लढाईत पराक्रमी झाले,त्यांनी परक्यांची सैन्ये पळविली”* (इब्री 11:34b)

कठीण आणि अशक्य वाटणारी स्थळे कठीण व अश्यक्य नसतात जेंव्हा तुम्हाला उत्तर माहित असते तेंव्हा.

## अध्याय 9

# शांत, मंद वाणी

जेंव्हा मी पवित्र आत्म्याच्या वाणीबद्दल शिकवायला सुरुवात केली तेंव्हा अनेकांनी मला म्हटले की त्यांनी देवाची वाणी कधी ऐकली नाही. परंतु मी त्यांना नेहमी सांगतो, “तुम्ही देवाची वाणी ऐकलेली आहे.” तुम्हालाही असेच वाटत असेल चला आपण 1 राज्ये 19:11-12 वाचू या,

> *“त्याने (परमेश्वराने) त्यास म्हटले, ‘तू येथून बाहेर निघून जा, पर्वतावर परमेश्वरासमोर उभा राहा. तेंव्हा पहा परमेश्वर जवळून जात असता त्याजसमोर मोठा सुसाट्याचा वारा सुटून डोंगर विदारित व खडक फोडीत होता; परंतु त्या वाऱ्यात परमेश्वर नव्हता. वारा सुटल्यावर भूमिकंप झाला, पण त्या भूमिकम्पातही परमेश्वर नव्हता. भूमिकम्पानंतर अग्नी प्रगट झाला; पण त्या अग्नीतही परमेश्वर नव्हता. त्या अग्निनंतर शांत, मंद वाणी झाली.’”*
>
> —1 राज्ये 19:11-12

मी वेगवेगळ्या प्रकारे वेगवेगळ्या क्षमतेची पवित्र आत्म्याची वाणी ऐकली. परंतु पवित्र आत्मा सर्वसाधारण रीतीने अशा मंद, शांत आवाजात बोलतो. मी मागे एका पुस्तकात सांगितल्यानुसार देवाची वाणी विचाराच्या स्वरुपात वेगवेगळ्या टणत्कारात ऐकू येते.

एखाद्या गर्दीच्या ठिकाणी तुम्ही तुमच्या लेकराचा आवाज ओळखू शकता, तसे पवित्र आत्मा बोलतो तेंव्हा त्याचाही आवाज ओळखायला तुम्ही शिकता. परंतु या ठिकाणी मी देवाच्या वाणीबद्दल सांगणार आहे की जी सर्वांनी ऐकली आहे परंतु ते त्याच्याबद्दल विचार करत नाहीत.

मी Oral Robert University मध्ये असतांना जुना करार हा मुख्य विषय असतांना ईश्वरविज्ञानाचे अनेक विषय घेतले होते. या अगोदर न ऐकलेल्या अशा पुष्कळ गोष्टी त्यात होत्या.

मी हायस्कूल मधूनच बाहेर पडल्यामुळे अभ्यासाची सवय नव्हती व त्यामुळे मला अभ्यासाचे एक ओझे आलेले होते. विशेषरीतीने शेवटच्या काही आठवड्यात. एका वर्गात मला जुन्या करारातील विषयात एक साधारण पेपर लिहायचा होता. विषय काय होता आठवत नाही. पेपर लिहिण्याची मला भीती वाटली. माझ्या सुरुवातीच्या कॉलेज च्या वर्षात मला माझा पहिला पेपर लिहायचा होता.तो पेपर तपासून मला मिळाला आणि वरच्याच पानावर मोठ्या लाल अक्षरात “F” लिहिलेले होते. व पुढे म्हटले होते :तू हायस्कूल मध्ये तरी जाणे शक्य आहे का? माझी इंग्रजी भाषा व व्याकरण इतके भयानक होते की शिक्षकही हैराण झाले व मला ORU मध्ये पाठविले. पहिले वर्ष पास होण्यासाठी मला इंग्रजी शिकावे लागले.

आता शेवटच्या आठवड्याचा प्रश्न होता. मला दुसरा पेपर लिहायचा होता. मला फारच भीती वाटली. मी पेपर लिहायला बसत होतो पण पेपर कसा लिहायचा हे मला कोणीच सांगितले नाही. मी इकडच्या तिकडच्या गोष्टी पहायचो काही शब्द उचलायचो आणि थोडे इकडे तिकडे करून लिहायचो की जेणेकडून मी दुसऱ्याची कॉपी केली असे कोणाला समजू नये. मी माझ्या मनात अगदी स्वच्छ व स्पष्ट होतो, मी काही चूक करीत होतो असे मला वाटले नाही. कारण माझ्याच शब्दातच इकडे तिकडे वाचून मी लिहित होतो. परंतु महत्वाचे म्हणजे कसे लिहायचे हेच मला माहित नव्हते.

बर, या वेळेला मात्र माझ्याजवळ वेळ नव्हता.माझ्या मित्राचा व माझा वर्ग एकच होता फक्त वेळ मात्र वेगळी होती.वर्गातील प्रत्तेकाला त्याच विषयावर लिहायचे होते, म्हणून माझ्या मित्राला मी विचारले की त्याने पेपर कसा लिहिला ते मला बघायचे आहे.

आता काही कारणांमुळे एकदा मला तो पेपर मिळाला म्हणजे मी त्याच्यासारखा लिहू शकणार नाही हे मला माहित होते म्हणून मी तो कॉपी करण्याचे ठरविले. मला माहित आहे तुम्हाला धक्काच बसला असेल. लक्षात घ्या त्यावेळी मी बाल-ख्रिस्ती होतो. मी त्याचा सर्वच पेपर कॉपी केला नाही पण जवळपास अर्धा पेपर कॉपी केला. त्या आठवड्याच्या शेवटी माझा पेपर मी प्रोफेसरला दिला या आनंदात की एकदाचा पेपर संपला.परंतु नंतर काहीतरी घडले आणि देवाची वाणी ऐकून मला धडा शिकायला मिळाला.

मी त्या रात्री बिछाण्यावर गेलो परंतु झोपू शकलो नाही. मला कळून चुकले की मी जे काही केले ते चुकीचे होते. मी चोरी केली आणि लबाडीही. मी माझ्या मित्राचा सन्मान केला नाही तर त्याचा अनादर केला. रात्री 3 च्या सुमारास मी दुखी कष्टी झालो. मी माझ्या मित्राच्या खोलीजवळ जाऊन त्याला उठविले व मी काय केले ते त्याला सांगितले, व त्याची क्षमा मागितली

त्याने माझ्याकडे झोपाळू डोळ्यांनी पहिले आणी म्हटले, “गेरी, तुझ्या बिछ्याण्यावर जाऊन झोप. आणि स्वतः झोपी गेला.

दुसऱ्या दिवशी मी माझ्या प्रोफेसरकडे जाऊन मी काय केले ते सांगितले. त्यांनी मला माझ्या पेपर साठी F द्यायला हवा होता. परंतु त्यांनी माझ्याकडे स्मित केले व म्हटले की चांगले झाले तू मला हे सांगितले. मी जाऊन झालेली गोष्ट त्यांना सांगितली म्हणून प्रोफेसर म्हणाले ते मला B ग्रेड देतील. मला किती बरे वाटले म्हणून सांगू. मला समजले की माझी चूक सांगणारी ती वाणी किती चांगली होती की तिने मला मोकळे केले व शांती दिली.

मला एक प्रश्न विचारू द्या.” माझा मित्र मी सांगितलेले ऐकल्यावरही अगदी शांत रीतीने का झोपी गेला? मी मोठ्या कष्टात असताही असे का घडले? माझा मित्र तशा त्रासात का नव्हता? मी का झोपू शकलो नाही? मी इतक्या कष्टात का होतो? मी झोपण्याचा प्रयत्न करीत असतांना ती वाणी माझ्यासोबत बोलत होती, मला दोष देत होती,- ती माझी सद्सदविवेक ,बुद्धी होती, ते उपजत योग्य अयोग्य दाखवणारे ज्ञान होते.

सद्सदविवेक बुद्धी म्हणजे एखाद्या मेणबत्ती सारखे आहे की जी अंधार दूर करते. सद्सदविवेक बुद्धी प्रत्येक विचाराचे नोंद आणि तुम्ही केलेल्या कृत्याची नोंद ठेवते. कोर्टात दिलेल्या साक्षीप्रमाणे लपविलेली गोष्ट ती सांगते. ती बोलते व तुम्हाला आठवण करून देते चुकीचे दूर लोटून चांगले ते करावे. ही सद्सदविवेक बुद्धी म्हणजे आमच्या प्रत्येकामध्ये असलेली देवाची वाणी होय ती माच्या कृत्यांबद्दल आम्ही जबाबदार आहोत ते आम्हाला सांगते. कोर्टापुढे जसे आम्ही कबुलीजबाब देतो तसे देवासमोर कबुलीजबाब देण्यासाठी सद्सदविवेक बुद्धी आम्हाला पुढे ढकलते. साक्षीदार जसा एखादा पुरावा देतो तसे आमची सद्सद्विवेक बुद्धी आमच्या बाजूने बोलते किंवा आम्हाला दोष देते.

Medical Xpress ने वरील बाब सिद्ध केली आहे.

"सध्याचा प्रचलित सिद्धांत असे सांगतो की मनुष्याच्या जीवनाची सुरुवात नैतिक दृष्टीने कोऱ्या करकरीत पाटीने सुरु होते. परंतु नवीन सिद्धांत या विरुद्ध सांगतो. त्यानुसार सहा महिन्याचे लेकरूही नैतिक दृष्टीने निवड करते किंवा निर्णय घेते. आपला जन्म होतो तेंव्हाच आपल्या मेंदूमध्ये 'नैतिक सांकेतिक लिपी' असते."

**सदसद्विवेक बुद्धी ही प्रत्येक पुरुष व स्त्री यामधील देवाची वाणी आहे. आपल्याला निर्माण करणाऱ्याचा तो एक ठसा आहे की ज्यामुळे आम्हाला ज्यासाठी निर्माण केले तसे जीवन आम्ही जगावे.**

*"आपण सत्याचे आहोत हे यावरून आपल्याला समजेल.आणि ज्या कशावीषयी आपले मन आपल्याला दोषी ठरविते त्याविषयी आपण स्वतःच्या मनाला त्याजसमोर उमेद देऊ; कारण देव आपल्या मनापेक्षा थोर आहे. आणि त्याला सर्व काही कळते. प्रीयजनहो आपले मन आपल्याला दोषी ठरवीत नसेल तर आपल्याला देवासमोर धैर्य आहे. आणि आपण जे काही मागतो ते त्याजपासून आपल्याला मिळते कारण आपण त्याच्या आज्ञा पाळतो, व त्याच्या दृष्टीने जे आवडते ते करितो."*

—1 योहान 3:19-22

सद्सद्विवेक बुद्धी ही प्रत्येक पुरुष व स्त्री यामधील देवाची वाणी आहे. आपल्याला निर्माण करणाऱ्याचा तो एक ठसा आहे की ज्यामुळे आम्हाला ज्यासाठी निर्माण केले तसे जीवन आम्ही जगावे. सद्सद्विवेक बुद्धीपासून कोणाची सुटका नाही. एखाद्याचा खून करणारी व्यक्ती, किंवा बँक लुटणारी व्यक्ती परत फिरते याबद्दल मला आश्चर्य वाटायचे. परंतु आता मला कळले की सद्सद्विवेक बुधी इतकी वादळ निर्माण करणारी व एखादा मनुष्य दोषी आहे असे दाखविणारी गोष्ट दुसरी नाही. 2 रे करिंथ 1:12 मध्ये पौल सांगतो की सद्सद्विवेक बुधी बोलते व साक्ष देते.

*"आम्हाला अभिमान बाळगण्याचे कारण म्हणजे आमच्या मनाची साक्ष, ही आहे की दैहिक ज्ञानाने नव्हे तर देवाच्या कृपेने देवाने दिलेल्या पवित्रतेने व सात्विकपणाने आम्ही जगात व विशेषकरून तुम्हाबरोबर वागलो."*

—2 करिंथ 1:12

कदाचित तुम्ही म्हणाल, सद्‌सद्विवेक बुद्धीला बोलण्याचा काय अधिकार आहे? अध्यात्मिक कोर्ट मध्ये तिच्या साक्षीला इतके महत्व का आहे? कारण हे की ती देवाची वाणी आहे. रोमकरास पत्रामध्ये पौल हेच सांगतो आहे,

> *"ज्यांना नियम शास्त्र नाही असे विदेशी लोक जेंव्हा नियम शास्त्रात आहे ते स्वभावतः करितात तेंव्हा त्यास नियम शास्त्र नाही तरी ते आपण स्वतःस नियम शास्त्रच आहेत. म्हणजे ते नियमशास्त्रातील आचार आपल्या अंतःकरणात लिहिलेला दाखवितात, त्यांचे मनही त्यास साक्ष देते, आणि त्यांचे एकमेकांविषयीचे विचार दोष लावणारे किंवा दोषमुक्त करणारे असतात."*
>
> —रोम.2:14-15

प्रत्येकाला सद्‌सद्विवेक बुद्धी आहे. कदाचित या विधानाशी तुम्ही सहमत होणार नाही. काही लोक तुम्हाला दिसतील की ज्यांना भावनाच नाही. परंतु मी खात्रीपूर्वक सांगतो त्यांची आयुष्याची सुरुवात तेथे झालेली नाही. जर एखादी व्यक्ती आपल्या सद्‌सद्विवेक बुद्धीचे ऐकतच नाही तर ती शांत आणि शांत होत जाते.

> *".पुढील काळी विश्वासापासून कितीएक लोक भ्रष्ट होतील, लबाड बोलणाऱ्या मनुष्यांच्या ढोंगाने ते फूस लावणाऱ्या आत्म्याच्या व भुतांच्या शिक्षणाच्या नादी लागतील. त्या मनुष्यांचा सद्‌सद्विवेक डागलेला असा होईल."* (1 तीमथी 4:1-2)

पौल हे सांगत आहे की या लोकांचे सद्‌सद्विवेक बुद्धी डागाळलेली आहे, किंवा त्यांची अंत:करणे त्यांनी इतकी कठीण बनविलेली आहेत की आपल्या सद्‌सद्विवेक बुद्धीचे ऐकावे असे त्यांना वाटत नाही. तुमच्या त्वचेबद्दल विचार करा. ती डागाळलेल्या गेली म्हणजेच ती जाळली तर जोपर्यंत नवीन त्वचा येत नाही आणि जुनी पडून जात नाही तो पर्यंत तिला कशाचाच स्पर्श समजत नाही. ही गोष्ट आपल्या सद्‌सद्विवेक बुधीबद्दलही घडते. तुम्ही एखादी गोष्ट करण्यास सद्‌सद्विवेक बुद्धी तुम्हाला भाग पडत नाही, पण ती बोलते. तुम्ही तिचे ऐकू शकता किंवा तिच्याविरुद्ध निर्णय घेऊ शकता. परंतू पौल हे सांगतो की तुम्ही तिला बाजूला सारले तर त्यामुळे तुम्ही मोठ्या संकटात सापडू शकता. पौल म्हणतो तुमचे तारू फुटू शकते.

> *"माझ्या मुला तीमथ्या, तुजविषयी पूर्वीच झालेल्या संदेशानुसार ही आज्ञा मी तुला सांगून ठेवतो की, तू त्यांच्या द्वारेच सुयुद्ध कर. विश्वास व चांगला विवेकभाव धर. कितेकांनी हा झुगारून दिल्यामुळे त्यांचे विस्वसरुपी तारू फुटले."*
>
> —1 तिमथी 1:18-19

आपल्या सद्सद्विवेक बुद्धीचा आवाज जे ऐकत नाही ते आपल्या जीवनाचे सुकाणू हरवून बसले आहेत. त्यांचा कंपास खराब झाल्यामुळे काम करत नाही. कोणत्या रस्त्याने ते जात आहेत हे त्यांना सांगता येत नाही. म्हणून पौल म्हणतो की चांगल्या सद्सद्विवेक बुद्धीला जी स्वच्छ आहे तिला आपण धरून ठेवले पाहिजे, म्हणजे आपणाला योग्य मार्गाने जाता येईल. आपण आपले अंत:कारण कठीण केल्यामुळे चांगले किंवा वाईट हे समजण्याची आपली पात्रता आपण गमावली आहे. पौल म्हणतो, की कायदा किंवा नियम पाळणे व त्याप्रमाणे करणे महत्वाचे आहे.

> *"म्हणून क्रोधामुळे (शिक्षा होईल या भीतीने) केवळ नव्हे तर सद्सद्विवेक बुद्धीमुळेही अधीन राहणे अगत्याचे आहे."* (रोम. 13:5)

जर आम्ही नियमशास्त्राचे उल्लंघन केले तर तुमची सद्सद्विवेक बुद्धी तुम्हाला दोषी ठरवेल. म्हणून नियम पाळण्यासाठी म्हणजे चांगले करण्यासाठी पौल सांगतो म्हणजे तुमची सद्सद्विवेक बुद्धी शांत राहील व ज्यासाठी तिला तयार केले त्यानुसार तुम्हाला सुरक्षित राखण्याचे कार्य ती करेल.

मी आणखी एक मूर्खपणाची गोष्ट केली होती ती सांगितल्यावर तुम्हाला सद्सद्विवेक बुद्धीबद्दल आणखी कळेल. मी पाळकीय सेवा करण्याच्या पूर्वी ही गोष्ट घडली. मला देवाने पाळकपण करण्यासाठी का मोकळे केले नाही हे त्यावरून समजेल. ती पुन्हा ऐका. एक कार होती की जी माझ्या मालकीची होती. ती Peugeot 505 coupe होती की जी मला खूप आवडायची. एके संध्याकाळच्या वेळी एका ट्रक ने माझ्या कारला पाठीमागून ठोस मारली. तिची frame वाकली आणि इतर काही नुकसान झाले. त्या कारचा विमा एजंट माझ्या फार्म च्या घराकडे आला व एक सर्वसाधारण खर्चाचा अंदाज सांगितला.

परंतु हे सर्व होण्याच्या काही आठवडे अगोदर एक गोष्ट घडली होती .माझ्या गाडीचे सायलेन्सर गळून पडले होते, trunk मध्ये असलेली उन्हापासून बचाव करणारी motor बंद पडली होती.जेंव्हा विमा एजंट माझी कार पाहण्यास आला तेंव्हा त्याने सायलेन्सर बाजूला पडलेले पाहून विचारले की (त्याने पाहावे म्हणून मी ते खाली टाकले होते) ते अपघाताचा एक भाग होते काय. मला थोडी भीती वाटली तरीपण मी “होय सर” असे म्हटले. जी उन्हापासून बचाव करणारी motor होती ती देखील अपघाताचा भाग आहे काय असे ही त्याने विचारले. मी पुन्हा “होय” म्हटले.

माझी सद्सद्विवेकबुद्धी मला म्हणत होती “गेरी, हे तू काय करीत आहेस तू लबाड बोलत आहेस.” आता बघा मी स्वतःलाच फसवत होतो. माझ्या या सद्सद्विवेक बुद्धीचे ऐकू नये असे मला वाटले. आज मी विचार करतो तर माझ्या मनात तसा विचार आला होता यावर माझा विश्वास बसत नाही. परंतु त्या वेळी मी मंडळीचा पाळक नव्हतो हे ऐकून तुम्हाला आनंद वाटत असेल ना? देवाला मात्र आनंद वाटत असेल.

शेवटी कार दुरुस्तीसाठी दिली एका आठवड्याच्या आत ती तयार झाली. तिला पाहिल्यावर मला खूप आनंद झाला. ती गाडी चांगली दिसत होती.मी कार चालवीत घरी आलो,आणि या आनंदात होतो की सर्व काही दुरुस्त झालेले आहे. एका आठवड्यानंतर मी ठरविले की घरी जाऊन देन्द्रा आणि लेकरे यांच्याबरोबर दुपारचे जेवण घ्यावे. माझ्या ऑफिस पासून शेतातील घर फक्त दोन मैलावर होते जे मी माझ्या आर्थिक कंपनीसाठी भाड्याने घेतले होते. मी घरी गेलो, कार उभी केली घरात गेलो आणि छान जेवण घेतले.

मी बाहेर जाण्यासाठी घराच्या समोरच्या दारात आलो आणि मी पहिले, कार तिथे नव्हती. कार कोठे गेली?, मी गोंधळून गेलो. आमचे घर टेकडीवर होते. कार उभी करतांना मी ब्रेक्स लावीत असे पण त्यादिवशी मात्र विसरलो, आणि म्हणून कार हळूहळू मागे जाऊन एका झाडाला टक्कर मारून उभी राहिली. मी कार जवळ गेलो आणि मला धक्काच बसला. कारची trunk चेपली होती, कारची frame वाकली होती, सायलेन्सर तुटून पडले होते, उन्हापासून बचाव करणारी motor बंद पडली. जेंव्हा अपघात झाला होता त्यावेळी जी परिस्थितीत ती होती त्याच परिस्थितीत कार उभी होती.

मी उभा राहून मोठ्याने हसू लागलो. देव मला धडा शिकवीत होता. एक गोष्ट देवाने मला शिकविली ती म्हणजे पाळक होण्याच्या अगोदर व लोकांचे पुढारीपण करण्या अगोदर मी ही गोष्ट शिकायला हवी होती.

आत ती कार मी पुन्हा दुरुस्त केली नाही. उलट मी तिला वेगवेगळ्या भागात विकली. दुसऱ्या वेळी मला आठवते की माझी सद्सद्विवेकबुद्धी जोराने ओरडली. ह्या गोष्टीला मी “बायसिकल स्टोरी” म्हणतो.

मला वाटत जे मी सांगत आहे त्यामुळे तुम्हाला मदत होतच असेल. मी असे काही करू शकलो असतो असे तुम्हाला वाटले नसेल ना? पण मला आनंद वाटतो की मी तारल्या गेलो कारण जर तसे झाले नसते तर माझे जीवन खूपच वेगळे झाले असते.

बायसिकॅल स्टोरी दोन वर्षानंतर घडली.

मी माझे नवीन मंडळी सुरु केली होती. शनिवारी मी माझ्या वडिलांच्या घरी गेलो होतो, व आता माझी dodge Caravan गाडी दोन रस्ते असलेल्या माझ्या वडिलाच्या घराजवळ असलेल्या रस्त्यावर आलो.एका टेकडीच्या खाली ज्याच्या दोन्ही बाजूला रस्ते होते अशा ठिकाणी माझ्या वडिलांचे घर होते. एक मुलगा टेकडीवरून निघाला, मी त्याला मागे टाकण्याच्या प्रयत्न केला. परंतु टेकडीवरून उतरतांना त्याचा वेग बराच वाढला होता. आणि तो माझ्याजवळ आला. मला ते माहित नव्हते, मी कार मध्ये बसून मागे सरकून नुकतेच पुढे जाण्यासाठी सुरुवात केली.

आणि एकाएकी मला धडाम असा आवाज ऐकू आला. मी आरशात बघितले, आणि मी एका सायकलस्वाराला पहिले. तो आपले दोन्ही हात वर करून खुणावत होता व जोराने बडबडत होता. मला भीती वाटली त्या मुलाचे हातवारे व बडबड ऐकून मला अपमानास्पद वाटले. मला वाटले, मी मागे सरकतांना पाहून त्याने त्याचा वेग कमी करायला पाहिजे होता. मला समजले की त्याला पुढे जायचेच होते तर तो त्याच्या पूर्ण वेगात माझ्या बाजूने जाऊन तसे करू शकत होता. परंतु त्याने तसे केले नाही, तर कार कडेच यावे हे त्या ठरविले होते

मला वाटले अशा मुलाला कोणीतरी धडा शिकवायलाच पाहिजे. म्हणून मी माझा वेग कमी केला आणि तो जवळ येण्याची वाट पहिली. आणि मग माझ्या van चे (गाडीचे) ब्रेक दाबले, त्यानेही गाडीवर आदळू नये म्हणून आपले ब्रेक्स दाबले ते पाहून मला समाधान वाटले. परंतु

त्यामुळे तो वेडापिसा झाला, व मला शिव्या देऊ लागला की जे शब्द मी या पूर्वी कधीच ऐकले नव्हते. तो ते शब्द पुन्हा पुन्हा ओरडतच होता.

मी रस्त्यावर गेलो आणि अशा कोनात गाडी उभी केली की ज्या दिशेने तो सायकल स्वार येत होता. मी त्याची वाट पाहत आहे हे जेंव्हा त्याच्या लक्षात आले तेंव्हा तो शांत झाला . मला वाटले त्याला समजले की माझी गाडी त्याच्या सायकल पेक्षा मोठी आहे.

मी माझ्या गाडीची खिडकी उघडली . तो जवळ आल्यावर मी जोराने ओरडलो की पुन्हा जर तो मला त्या रस्त्याने दिसला तर मी त्याच्यावरून माझी गाडी नेईल. मी गाडी सुरु केली आणि त्याच्या दिशेने निघालो. पंधरा फुटाचे अंतर असेल. मला वाटले मी त्याला खेटून गेलो. मी त्याला धडा शिकविला असे मी माझ्या कृतीचे समर्थन केले. परंतु हा विचार फार काळ टिकला नाही.

पवित्र आत्मा मला मोठ्या अधिकाराने बोलला, “गेरी, हे तू काय करत आहे?” हे शब्द वाचतांना तुम्हाला त्याची तीव्रता फारशी कळाली नसेल परंतु माझ्या कानावर ते फार जोरात आदळले. एकाएकी मला समजले की मी त्या मुलाचा जीव घेतला असता. मी माझ्या आरशातून मागे पहिले, तो हळूहळू येत होता, डोके खाली लावाविलेले होते, तो जखमी अवस्थेत होता मात्र जिवंत होता. मला खात्री नव्हती. मी टेकडीवरून खाली उतरू लागलो, परंतु माझी सद्सद्विवेक बुद्धी मला स्वस्त बसू देत नव्हती. नवीन पाळक या दृष्टीने काय घडू शकले असते याची मला जाणीव झाली. मी वर्तमान पत्रातील जणू काय बातमी वाचली, “Faith Life Church च्या पाळकाने एका सायकल स्वाराला चिरडले.” पवित्र आत्म्याने मला आठवण करून दिली की या सायकलस्वारा सारख्याच लोकांसाठी ही मंडळी माला सुरुकारण्यास सांगितले होते. म्हणून माझ्या कृत्यामुळे मला स्वतःलाच धक्का बसला. आणि अश्रुपूर्ण नेत्राने मी पश्चातापी झालो.

या अगोदर तुम्ही देवाचे शब्द ऐकलेले आहेत, हे सत्य आहे. ह्याच्याशी तुम्ही माझाबरोबर सहमत व्हा. परंतू तुमची ही सद्सद्विवेक बुद्धी कोमल ठेवा की जेणेकडून ती कठीण होणार नाही व देवाचे शब्द तुम्ही ऐकू शकाल. पवित्र शास्त्र सांगते की इस्राएल लोकांनी त्यांची मने कठोर केली आणि त्यांचा अभिवचनाच्या देशात प्रवेश झाला नाही. नव्या करारात इब्री लोकांचे पत्र स्पष्ट सांगते की त्यांच्या सारखे आम्ही होऊ नये.

*"यावरून पवित्र आत्मा म्हणतो त्याप्रमाणे, 'आज जर तुम्ही त्याची वाणी ऐकल. तर रानातील परीक्षेच्या दिवशी इस्राएल लोकांनी चीड आणिली होती तशी तुम्ही आपली माने कठीण करू नका.'"*

—इब्रीलोकास पत्र 3:7-8अ

ही सूचना इब्री 3 आणि 4 मध्ये अमित कमीत कमी 3 वेळेस दिलेली आहे. अशी सूचना का? कारण तुम्हाला आशीर्वादित करावे आणि येशूने ज्यासाठी खंडणी दिली ते सर्व तुम्हाला मिळावे.

मी लहान मुलगा असतांना एका घोड्याच्या पिल्लाची गोष्ट मला आठवते, त्यावरून कठीण मन काय असते याची माल पुन्हा जाणीव होते. तो एक नम्र पण हुशार प्राणी होता. मी फक्त त्यावर बसू शकत होतो किंवा बसण्याची हिम्मत करू शकत होतो. एक दिवशी माझा एक मित्र माझ्याकडे आला व मला म्हणाला की त्याला घोडे आवडतात व कोणत्याही घोडयाला तो ताब्यात आणू शकतो. टोनी वर म्हणजे त्या घोड्याच्या पिल्लावर बसू देण्यासाठी त्याने मला गळ घातली. मी नाही म्हणत होतो पण शेवटी त्याने मला पटवून दिले की तो त्यावर बसू शकतो. ज्याकी माझ्या मित्राचे नाव होते. म्हणून मी खोगीर खालून तयारी केली. माझा मित्र ज्याकी त्या पिल्लावर बसल्यावर काय झाले हे मी कधीच विसरू शकत नाही. टोनी जोरात धावू लागला, 50 यार्डवरच एक तळे होते. त्यादिशेने टोनी धावत असल्यामुळे ज्याकी जोराने ओरडू लागला व लागामाच्या सह्यांनी त्याला आवरण्याचा प्रयत्न करू लागला. टोनी जोरात धावत धावत जावून त्या तळ्याच्या काठावर एकाएकी थांबला. त्यामुळे ज्याकी टोनीच्या वरून फेकला जावून त्या तळ्यात पडला. हे झाल्यावर टोनी मागे फिरला व जसे काय काहीच झाले नाही अश्याप्रकारे चरू लागला.

**"यावरून पवित्र आत्मा म्हणतो त्याप्रमाणे, 'आज जर तुम्ही त्याची वाणी ऐकल. तर रानातील परीक्षेच्या दिवशी इस्राएल लोकांनी चीड आणिली होती तशी तुम्ही आपली माने कठीण करू नका.'"**

—इब्रीलोकास पत्र 3:7-8अ

झाले काय की ज्याकीने इतक्या जोरात लगाम ओढला की ज्यामुळे टोनीच्या तोंडाला इजा झाली. अगदी निर्दयपणे टोनिकडे न बघता ज्याकीने तसे केले. मला माहित होते की

माझ्याशिवाय टोनी कोणाच्याही फायद्याचा नव्हता. कारण काय? मी अगोदरच सांगितले की तो हुशार किवा चालाक होता.

मी टोनीला त्याचे अन्न देत होतो. आणि त्या जागेपासून दूर नेऊन मोकळ्या हवेत त्याला नेण्याचे काम मीच करत होतो व ते त्याला आवडत होते. परंतु त्यावेळी मला त्याच्याकडे कटाक्षाने लक्ष द्यावे लागत होते. मला माहित आहे की तिरप्या नजरेने मी त्याच्यावर बसलो आहे हे तो पाहत असे. माझे डोके विरुद्ध बाजूस वळण्याची तो वाट पाहत असे, आणि मी तसे केल्याबरोबर तो मागे मान करून माझ्या पायाला चावत असे परंतु त्यामुळे वेदना होत असत म्हणून मी त्याच्याकडे लक्षच ठेवून असे. परंतु तो तसा काही उपयोगी नव्हता.

आम्ही आमची अंत:करणे कठीण केली तर त्याचा देवाला काही उपयोग नाही. एकदा टोनीला आम्ही बाहेर बांधून ठेवले. माझ्या वडिलांनी त्याच्यासाठी पाण्याची बकेट आणून ठेवली व ते मागे फिरून जाऊ लागले, तितक्यात टोनीने त्यांच्या पार्श्वभागावर चावा घेतला. माझ्या वडिलांना फार राग लाल, जवळ पडलेले मीठ त्यांनी जोराने टोनीवर फेकले . परंतु टोनी वाचला. मी टोनीवर विश्वास ठेवत होतो काय? अजिबात नाही.

आह्या प्रकारे लोकांच्या जीवनात घडते. त्यांना असे वाटते की त्यांच्या सद्सद्विवेक बुद्धीचे न ऐकता ते एकदाच देवाची आज्ञा मोडतील, परंतु असे अनेक वेळा घडले तर ते जीवनात कठीण जखमेची खुण तयार करत आहेत हे त्यांना समजत नाही , आणि एके दिवशी ते टोनिसारखे होतात आणि देवाचे आज्ञापालन न केल्यामुळे, किंवा देवाचे न ऐकल्यामुळे त्यांना कोणतेही दुख: होत नाही किंवा केलेल्या कृत्याचा पस्तावा होत नाही. परंतु यावरचा उपाय म्हणजे जेंव्हा तुम्ही तुमच्या सद्सद्विवेक बुद्धी विरुद्ध जाता तेंव्हा ताबडतोब पश्चाताप करणे.

स्तोत्र 51 हे दाविदाचे पश्चाताप स्तोत्र आहे / बेथशेबेबरोबर पाप केल्यावर त्याची जाणीव झाल्यावर त्याने ते लिहिले आहे.

> *“हे देवा तू आपल्या वात्सल्याला अनुसरून माझ्यावर कृपा कर; तू आपल्याला विपुल करुणेला अनुसरून माझे अपराध काढून टाक. मला धुवून माझा दोष पूर्णपणे काढून टाक. माझे पाप दूर करून मला निर्मळ कर. कारण मी आपले अपराध जाणून आहे. माझे पाप माझ्यापुढे नित्य आहे. तुझ्या विरुद्ध तुझ्या विरूद्धच मी पाप केले आहे.*

*तुझ्या दृष्टीने जे वाईट ते मी केले आहे, म्हणून तू बोलशील तेंव्हा न्यायी ठरशील, व निवडा करशील तेंव्हा नि:स्पृह ठरशील. पहा मी जन्माचाच पापी आहे, माझ्या आईने गर्भधारण केले तेंव्हाचाच मी पातकी आहे. पहा अंतर्यामाची सत्यता तुला आवडते. तू माझ्या अंतरामाला ज्ञानाची ओळख करून दे. एजोबाने माझा पापमल काढ. म्हणजे मी निर्मळ होईल, मला धु म्हणजे मी बर्फाहून शुभ्र होईल. हर्षाचे व आनंदाचे शब्द माझ्या कानी पडू दे, म्हणजे तू मोडलेली माझी हाडे उल्लासतील. माझ्या पापापासून तू आपले तोंड फिरीव.; माझे सर्व अपराध काढून टाक. हे देवा माझ्याठाई शुद्ध हृदय उत्पन्न कर; माझ्या ठाई स्थिर असा आत्मा पुन्हा घाल. तू मला आपल्या पुढून घालवून देऊ नकोस, आणि आपला पवित्र आत्मा माझ्यामधून काढून घेऊ नकोस. तू केलेल्या उद्धाराचा आनंद मला पुन्हा होवू दे. आणि उत्सुकतेच्या आत्म्याने मला सावरून धर."*

*—स्तोत्र 51:1-12*

*तुला पशु यज्ञ आवडत नाहीत, नाहीतर तो मी केला असता. होमाबलीही तुला प्रिय नाही. देवाचे यज्ञ म्हणजे भग्न आत्मा; हे देवा, भग्न व अनुतप्त हृदय तू तुच्छ मानणार नाहीस.*

—स्तोत्र 51:16-17

आपल्यामध्ये शुद्ध हृदय उत्पन्न करावे, भग्न आत्मा, अनुतप्त हृदय उत्पन्न करावे म्हणून दावीद ओरडून प्रार्थना करीत आहे. दावीद म्हणतो की त्याला असे हृदय हवे की ज्यामध्ये भावना समजल्या जातील. परंतु एक गोष्ट सत्य आहे ती म्हणजे दाविदाने जे कृत्य केले ते त्याने कधीच केले नसते जर त्याने आपल्या सद्सद्विवेक बुद्धीचे ऐकले असते तर. लक्षात घ्या जर तुम्ही सद्सद्विवेक बुद्धीवरून पलीकडे जाल, तर तुमचे अंतःकरण' (हृदय) तुम्ही कठीण कराल, आणि ही क्रिया पुढे आणि पुढे चालत राहील, आणि शेवटी तुम्ही देवाचा शब्द ऐकूच शकणार नाही.

आमची सद्सद्विवेक बुद्धी अशी आहे की जिच्याद्वारे आम्ही देवाचा शब्द ऐकतो. अर्थात बऱ्याच वेळी पवित्र आत्मा आमच्याबरोबर अगदी सरळ बोलून आम्हाला दिशा व मार्ग दाखवितो.

आणि या अगोदरही सांगितल्यानुसार मी पुन्हा सांगतो की पवित्र आत्मा माझ्याबरोबर मोठ्याने व अधिकार वाणीने बोलून तसेच शांत व लहान आवाजात बोलून मला दुरुस्त करतो, माझ्या मध्ये सुधारणा करतो.

मी पवित्र आत्म्याला स्वप्नाद्वारे व दृष्टांताद्वारे बोलतांना ऐकले आहे. ही गोष्ट मी पुढच्या अध्यायात स्पष्ट करणार आहे. परंतु या अध्यात आम्ही हे शिकलो की आमची सद्सद्विवेक बुद्धी आमचा दोष ऐकण्यासाठी व पश्चाताप करण्यासाठी आम्ही स्वच्छ ठेवली पाहिजे. आमची सद्सद्विवेक बुद्धी आम्ही सौम्य व कोमल ठेवणे आवश्यक आहे की जेणेकडून आम्ही देवाचे ऐकू शकू.

अध्याय 10

# दृष्टांत आणि स्वप्ने

मी बिछान्यावर उठून बसलो आणि देन्द्रा ला म्हटले, “तुझ्या पोटात मुलीचा गर्भ आहे..

आम्हाला पाच लेकरे आहेत. आणि फक्त एकदाच देवाने आम्हला आमच्या पोटातील बाळाचे लिंग सांगितले.तिचे नाव पौलि आमचे चौथे मुल. त्यावेळी पौलि देन्द्राच्या पोटात सहा महिन्याची होती, आणि आमचा कार-अपघात झाला. आम्ही 55 मैल प्रती घन्टा या वेगात दोन लेन असलेल्या रस्त्याने जात होतो , आणि अचानक एक तरुण आमच्या समोर आला. थांबायल्या वेळच मिळाला नाही, आणि आम्ही त्याच्या कार वर जाऊन आदळलो.

कोणीही गंभीर रीतीने जखमी झाले नाही परंतु सर्वजन दवाखान्यात गेलो. देन्द्रा गर्भवती होती व तिच्या सीट- बेल्ट मुळे तिला पोटात दुखापत झाली. तिला पोटातील बाळाबद्दल, पौलि बद्दल काळजी वाटत होती. परंतु देव अगोदरच आमच्याबरोबर बोलला होता, आणि आमच्या मनात शांती होती ; पौलि चांगलीच असेल असे आम्हाला वाटत होतो आणि ते तसेच होते.

आमची मुलगी पौलि जेव्हा आपल्या पहिल्या बाळासाठी गर्भवती होती तेंव्हा देन्द्रा आणि मी आमच्या व्यवसायाच्या निमित्त बाहेरच्या देशात होतो. आणि आमच्या व्यावसायिक ट्रीप च्या मधल्या काळातच तिची प्रसूतीची वेळ आलेली होती. मी प्रार्थनेत काही वेळ घालविला आणि पवित्र आत्म्याने मला सुचविले की तिची प्रसूतीची तारीख चुकीची आहे आणि ती आम्ही परत आल्यानंतर दुसऱ्या दिवशी होती. मी ही गोष्ट देन्द्राला सांगितली आणि आम्ही ट्रीपला निघालो.

जेंव्हा आम्ही घरी परत आलो तेंव्हा त्या देवाने सांगितलेल्या दुसऱ्या दिवशी पौलि प्रसूती गृहात गेली. आणि आमची नवीन नात (आयवोरी) Ivory चा जन्म झाला. आमच्या आत्म्याद्वारे पवित्र आत्म्याचे शब्द आमच्या पर्यंत पोहचतात. परंतु पवित्र आत्मा आमच्याबरोबर आणखी दुसऱ्या मार्गांनी बोलतो याबद्दल आम्हाला माहित असणे आवश्यक आहे.

> *"यानंतर असे होईल की मी आपल्या आत्म्याचा मनुष्यमात्रावर वर्षाव करीन, तेंव्हा तुमचे पुत्र व कन्या संदेश देतील; तुमच्या वृद्धास स्वप्ने पडतील, तुमच्या तरुणांस दृष्टांत होतील. तुमचे दास व दासी यावरही त्यासमयी मी आपल्या आत्म्याचा वर्षाव करीन."*
>
> —योएल 2:28-29

योएल संदेष्टा म्हाणाला की असा दिवस येईल की ज्यावेळी सर्व मानवजातीवर आत्म्याचा वर्षाव होईल. आम्ही त्या काळात राहत आहोत. पन्नासाव्या दिवशी वरच्या मजल्यावर जे वाट पाहत जमले होते त्यांच्यावर पवित्र आत्मा आला. वरच्या मजल्यावर जमलेले सर्वजन अन्य भाषेत बोलू लागले. ते द्रक्षारस पिवून मस्त झाले असे लोकांना वाटले तरी ते म्हाणाले, "हे काय आहे?" तेंव्हा पेत्र लोकांना सांगण्यासाठी उभा राहिला.

> *"तेंव्हा अकरा शिष्यासुद्धा उभा राहून पेत्र त्यास मोठ्याने म्हणाला, आहो यहुदी लोकांनो,व यरुशलेमातील सर्व राहणाऱ्यांनो, हे लक्षात आणा व माझे बोलणे ऐकून घ्या; तुम्हास वाटते तसे ते मस्त झाले नाहीत; कारण हा दिवसाचा पहिला प्रहर आहे; परंतु हा प्रकार योएल संदेष्ट्याच्या द्वारे सांगितलेल्या संदेशाप्रमाणे घडला आहे; तो संदेश असा, 'देव म्हणतो शेवटच्या दिवसात असे होईल की मी आपल्या आत्म्याचा मनुष्यमात्रावर वर्षाव करीन; तेंव्हा तुमचे पुत्र व तुमच्या कन्या संदेश देतील; तुमच्या तरुणास दृष्टांत होतील व तुमच्या वृद्धास स्वप्ने पडतील; आणखी त्या दिवसात मी आपल्या दसांवर व आपल्या दासींवर आपल्या आत्म्याचा वर्षाव करीन; म्हणजे ती संदेश देतील;'"*
>
> *—प्रेषित 2:14-18*

मला हे अजूनही समजत नाही की पवित्र आत्मा त्याच्या सौम्य व शांत भाषेत का बोलतो जेंव्हा इतरवेळी तो स्वप्नात बोलतो. मला वाटत, उत्तराचा एक भाग हा आहे की आम्ही सर्व खूप काम करण्यात गुंग आहोत. आम्ही शांत असल्यावर तो आमची मने त्याच्याकडे आकर्षून घेऊ शकतो, किंवा असेही असेल की आमची परिस्थिती गोंधळाची असेल किंवा एकंदर वातावरणच असे असेल की त्याचा शांत, सौम्य आवाज आम्हाला ऐकू येणे कठीण

होऊन बसते. शेवटी पवित्र आत्म्याला हे हवे असते की आमच्या पर्यंत संदेश पोहोचवा. शेवटी एक चित्रही एक हजार शब्दांचे काम करते. कारण काही असेल, परंतू मी देवाचे आभार मानतो कारण तो आमच्याबरोबर स्वप्ने व दृष्टांत या द्वारे बोलतो. स्वप्ने व दृष्टांत सारखेच आहेत. दोन्ही मध्ये चित्रच दिसते. फरक एवढाच आहे की दृष्टांत आम्ही जागे असतांना पाहतो व स्वप्ने आम्हाला झोपल्यावर दिसतात.

दृष्टांताच्या बाबतीत मी म्हणेन मला फार कमी दृष्टांत झाले की जे मी जागी अवस्थे मध्ये बघितलेले आहेत. ते जणू काय तसे प्रत्यक्ष घडत आहे. मी 19 वर्षाचा असताना देवाने मला संदेश देण्यासाठी पाचारण केले तो दृष्टांत फार अर्थपूर्ण होता. पवित्र आत्म्यामध्ये बाप्तिस्मा होवून एखादा महिनाच झाला असेल. अर्थात हे माझ्यासाठी सर्व नवीन होते कारण माझी मंडळी पवित्र आत्म्याबद्दल फारसे शिक्षण देणारी नव्हती.

तो माझा जन्मदिवस होता. आणि माझ्या मित्रांबरोबर मला संध्याकाळच्या जेवणाचे आमंत्रण होते. मी खाली बसून जेवणासाठी देवाचे आभार मानले, आणि तितक्यात पवित्र आत्मा माझ्यावर अगदी सामर्थ्यानिशी आला. मी या साठी अगदी नवीन होतो, परंतु पवित्र आत्म्याने बाप्तिस्मा होणे म्हणजे काय हे मला माहित होते. त्यावेळी काय करावे हे मला माहित नव्हते म्हणून मी माझ्या मित्रांना सांगितले की थोड्यावेळासाठी बाहेर जात आहे.

मी टेबलवरून उठून बाहेर गेलो आणि देवाची उपस्थिती आणखी प्रखरतेने जाणवली, आणि मला स्पष्ट दिसले. जे मी पहिले ते अगदी समोर घडल्यासारखे मला दिसले. मी एका लाउड-स्पीकर च्या मागे उभा होतो आणि खोलीत जमलेल्या लोकांना मी सांगत होतो. तो खोली 35-40 लोकांनी भरलेली होती आणि ते सर्व घडीच्या खुर्च्यांवर बसलेले होते. बाहेर अंधार होता . एक वाणी आली आणि मी ऐकले, “माझ्या वचनाचा उपदेश करण्यासाठी मी तुला बोलावत आहे.” हे तीन वेळेस घडले आणि अभिषेक वर घेतला गेला. मी आमच्या जेवणाच्या खोलीत परत आलो, व मित्रांनी ,विचारले, “काय झाले”? आणि मी म्हटले, “मला वाटत की मला उपदेश करण्यासाठी पाचारण झाले आहे.”

घरी गेल्यावर ही गोष्ट मी माझ्या वडिलांना सांगितली आणि त्यांनी एव्हढेच म्हटले की उपदेश करणारे जास्त पैसे मिळवत नाहीत. त्या वेळी माझे वडील ख्रिस्ती नव्हते परंतु मला सांगायला आनंद वाटतो की वयाच्या 80 व्या वर्षी त्यांनी ख्रिस्ताचा स्वीकार केला व आता ते स्वर्गात आहेत.

मला झालेल्या दृष्टान्तामध्ये पवित्र आत्मा मात्र मला स्पष्ट बोलला . पहिली गोष्ट म्हणजे मी तरुण होतो. पवित्र आत्म्याला ठावूक होते की माझ्या कुटुंबामध्ये देवाची सेवा केल्यामुळे छळ होणार होता म्हणून मला सहाय्याची गरज होती. आणि माझा तो दृष्टांत तेंव्हापासून आतापर्यंत माझ्याबरोबर बोलतच आहे.

दुसरा एक उघड दृष्टांत म्हणजे आमच्या शेतातील घरामध्ये झालेला. त्या मोडक्या तोडक्या घरामध्ये आम्ही जवळ जवळ 9 वर्षे गरिबीतच राहिलो. परंतु जेंव्हा आम्ही देव राज्याबद्दल शिकू लागलो तेंव्हा आमची भरभराट व्हायला सुरुवात झाली आणि आम्ही कर्जमुक्त झालो.

मी 19 वर्षाचा असतांना उपदेश करण्यासाठी मला बोलावण्यात आले तो दृष्टांत देवाने या काळात पूर्ण केला. आता 21 वर्षे पूर्ण झालीत की देवाने मला उपदेश करण्यासाठी बोलावले आणि आता देवाने मला एक मंडळी सुरु करण्यास सांगितले. ह्या 21 वर्षांपैकी काही वर्षे मी कोलेज मध्ये होतो, आणि अनेक वर्षे मी आर्थिक व्यवहारातील क्षेत्रामध्ये घालविली. आता 40 वर्षाचा असतांना देवाने मला सांगितले की मी एक मंडळी सुरु करावी.

आमची मंडळी आम्ही एका ख्रिस्ती रेडिओ स्टेशन च्या खालच्या भागात सुरु केली. आणि पहिल्याच भक्तीच्या रात्री देवाने 21 वर्षे पूर्व दिलीला दृष्टांतला सुरुवात झाली. त्या पहिल्याच सभेमध्ये मला दिसले की लोक घड्यांच्या खुर्चीवर बसले आहेत; बाहेर अंधार होता, आणि तेथे एक लहानसे व्यासपीठ होते.

मी व देन्द्राने ही लहानशी मंडळी सुरु केली व देव राज्याबद्दल इतके उत्साहित झालो की आम्ही कोठे राहत आहोत हे देखील विसरलो. परंतु आम्हाला हे कळले की आमचे शेतातले घर आम्हाला सोडावे लागेल कारण आमच्या कुटुंबाची संख्याही 5 झाली होती आणि आमच्या जवळ पुरेश्या खोल्या नव्हत्या. परंतु आम्ही आमचा वाढता व्यवसाय आणि मंडळी यामुळे खूपच आनंदी होतो.

एके दिवशी मी आमच्या चर्च मधून घरी आलो, व मुख्य दालनातील कोचवर बसलो. मी बसल्याबरोबर मला दिसले की मी बसलो असलेली खोली दिशेनाशी झाली, त्या खोलीमध्ये म्हणजे मुख्य दालनात कोणतेच फर्निचर नव्हते. मी ज्या दारातून आत आलो त्यातून मला जेवणाची खोली दिसत होती . मला जेवनाची खोली मी बसलेल्या कोचवरून पूर्ण दिसत

होती. आणि विशेष म्हणजे त्या जेवनाच्या खोलीतही कोणतेच फर्निचर नव्हते. हा दृष्टांत फक्त 5 सेकंदच दिसला, आणि मला कळले की आता आम्हाला हे शेतातील घर सोडावे लागणार आहे. दृष्टांत संपल्याबरोबर मी देन्द्राला सांगितले की आपल्याला हे घर सोडावे लागणार आहे.

माझा विश्वास होतो की या दृष्टान्ताद्वारे देवाने मला पुढे काय होणार हे अगदी स्पष्ट कळवले होते. आम्ही व्यस्त होतो पण या दृष्टांतात सांगितलेली गोष्ट लवकर घडणारी होती. आणि ज्याण्याची वेळ आली होती.

ही तातडीची गरज मला नंतर कळाली ते नऊ वर्ष आम्ही त्या शेतातल्या घरामध्ये भाड्याने राहत होतो. त्या ठिकाणी ती जागा विकसित करायची होती पण केव्हा हे कोणालाच माहित नव्हते.

लांब गोष्ट कमी शब्दात सांगतो. देवाने आम्हाला एक सुंदर जागा दाखविली की जेथे आम्ही आमचे नवीन घर बांधत होतो. या घराचे काम हळू हळू होणार होते व त्याला 1 ते 2 वर्षे लागणार होते. घर बांधायला सुरुवात झाल्यावर आम्ही राहत असलेल्या घराच्या जमिनीच्या मालकाचा फोन आला व एक महिन्याच्या आत घर खाली करावे असे सांगितले. आम्ही म्हटले आम्हाला 2-3 महिने वाढवून द्या. त्याने हो म्हटले पण त्यापेक्षा जास्त दिवस मिळणार नव्हते. .

आम्ही अगदी वरच्या गिअर मध्ये आमच्या सर्व बाबी टाकल्या व जमीन मालकाने दिलेल्या काळात घर बांधले. देवाने आम्हाला जर अगोदरच हे सांगितले नसते तर आमचे घर बांधायला जास्त वेळ लागला असता आणि आम्ही पेचात सापडलो असतो.

निळे अस्पष्ट दृश्य (Blue haze) याबद्दल या पुस्तकाच्या सुरुवातीलाच मी सांगितले आणि ते आमचे जीवन बदलून टाकण्याची घटना होती. हा अगदी उघड असा दृष्टांत होता. एका दृष्टीने हा दृष्टांत वेगळा होता कारण माझ्या भविष्याचे चित्र मी डोळ्यासमोर बघितले नव्हते., परंतु त्या निळ्य धूसर वातावरणात पवित्र आत्म्याचा शब्द मला ऐकू येत होते, की जे मला इतर देशांसाठी बोलावत होते.

मला खात्री आहे की आणखी काही स्पष्ट असे दृष्टांत मला मिळाले होते, परंतु स्वप्ने मात्र माझ्यासाठी प्रबलकारी ठरले होते. मी अल्बानिया ला जात होतो, जाण्याच्या एक आठवडा अगोदर मला पुढच्या ट्रीप बद्दलचे स्वप्ना पडले. मी आज जसा प्रवास करतो तसा प्रवास त्यावेळी मी करीत नव्हतो, आणि जो पर्यंत देव माझ्याबरोबर बोलला नाही तोपर्यंत मला अशा प्रवासात रुची नव्हती.

अल्बानियाला जाण्याच्या एक दिवस अगोदर मला हे स्वप्न पडले. स्वप्नात मी डॉक्टरच्या टेबल वर झोपलो होतो . एक नर्सने माझ्याकडे येवून मला सांगितले काही रक्त घेण्याची गरज आहे, आणि असे सांगून माझे रक्त घेऊन गेली व त्यासाठी माझ्या मधल्या बोटातून रक्त घेतले. ते मला चमत्कारिक वाटले. तुम्हाला स्वप्न माहित आहे त्यात काही गोष्टी तुम्हाला कळतात.

आणि माझ्या या स्वप्नात मला देसले की माझ्या प्रत्येक बोटातून रक्त घेण्यात आले. मी बायबल स्कूल मध्ये असतांना आम्हाला शिकविण्यात आले होते की हाताची पाच बोटे मंडळीतील पाच कार्याची पाच पदे दाखवितात. अंगठा म्हंजे प्रेषित, निर्देश-बोट म्हणजे संदेष्टा, मधले बोट म्हणजे सुवार्तिक, अंगठी-बोट म्हणजे पाळक, आणि करंगळी म्हणजे शिक्षक जो पाळकासोबत काम करतो.

रक्त घेणारी परिचारिका (नर्स) काय सांगत होती ते मला समजले होते. माझ्या आयुष्यात सेवेच्या काळात प्रत्येक पद मी भूषविले होते. मी आता पाळक आणि शिक्षक आहे परंतु तरीही मी देव-राज्याच्या व आर्थिक बाबतीत संदेष्ट्यासारखे काम करीत आहे. अल्बानिया मध्ये येशूने तेच मला सांगितले परिचारिकेने माझ्या मधल्या बोटातून रक्त घेतले आणि मला समजले की मला अल्बानियामध्ये सुवार्तिक म्हणून जायचे आहे.

माझ्या प्रेशितीय कामाला मी नुकतीच सुरुवात केली आहे. माझे रक्त घेतल्यानंतर त्या परिचारिकेने लहान लेकरू जसे प्रार्थनेसाठी हात जोडते तसे तिने हात जोडले आणि प्रार्थना हा शब्द पुटपुटली. ज्या ठिकाणी तुम्ही बोलू शकत नाही तेथे जसे काही पुटपुटल्या जाते तसे तिने केले. आणि मला समजले की मला अल्बानियामध्ये सुवार्तिक म्हणून जायचे आहे व त्यासाठी मी प्रार्थना करणे आवश्यक आहे.

मला पुष्कळ स्वप्ने पडली, परंतु ती सर्वच येथे सांगता येणार नाहीत परंतु मला माहित आहे की ती स्वप्ने पवित्र आत्म्याची वाणी आहे. मला अशी लोक भेटली आहेत की ज्यांना रोज स्वप्ने पडतात आणि ती त्यांच्या दृष्टीने अध्यात्मिकच असतात. मला हे सांगू द्या की स्वप्न समजून घेणे हे महत्वाचे आहे. काही लोक असे आहेत की ते सर्वच गोष्टी अध्यात्मिक स्वरुपात घेतात आणि त्याचा त्यांना गर्व वाटतो, परंतु त्या सर्वच गोष्टी देवाकडून नसतात. मला नेहमीच अशी स्वप्ने पडत नाहीत. कोणत्याही एका वर्षाचा विचार केला तर मी म्हणेन मला वर्षाला 4 ते 12 स्वप्ने पडतात, की जी देवापासून आहेत आणि त्याद्वारे देवाला मला

काहीतरी महत्वाचे सांगायचे आहे. अर्थात स्वप्नांचा हा आकडा बदलू शकतो. तुम्हाला किती स्वप्ने पडली यापेक्षा तुम्हाला त्यापासून काय शिकायला मिळाले हे समजणे महत्वाचे आहे.

ज्या स्वप्नाने माझे जीवन बदलून गेले ते म्हणजे ज्या आर्थिक व्यवसायाच्या कंपनीत मी आठ वर्षे काम केले ती देवाने मला सोडायला सांगितली व माझी स्वताःची कंपनी सुरु करून लोकांना कर्जातून मुक्त होण्यास मदत करावी असे स्पष्ट केले. ही गोष्ट माझ्यासाठी फारच महत्वाची होती.

माझी काही स्वप्ने सूचना देणारी देखील होती. एक स्वप्न फारच वेगळे होते पण त्यात मला देवाने सूचना दिली.माझ्या सेवेसाठीचे पैसे कमी झाले होते आणि आमच्यावर आर्थिक बोझा वाढला त्यावेळी हे घडले. माझ्या स्वप्नामध्ये मी माझ्या बिछान्यावर पडलो होतो झोपणारच होतो. झोपण्याच्या खोलीचा दरवाजा उघडा होता. आणि मोठ्या हॉलमध्ये मी स्वप्नात एक आवाज ऐकला आणि म्हणून मी त्या दाराकडे पहिले. एक लहान दुष्ट आत्मा तेथे उभा होता. त्याची उंची तीन ते साडेतीन फुट असावी आणि तो पैशाने भरलेली एक पिशवी ओढत होता. सान्ता क्लोस जशी बाग वापरत होता तशी ती पिशवी होती. ती पिशवी पूर्ण भरलेली होती म्हणून जमिनीवर घासत ओढल्या जात होती.तो बाहेर जात नव्हता तर आमच्या घराच्या तिसऱ्या मजल्यावर जात होता.मी उठलो आणि स्वप्नाबद्दल विचार करू लागलो, आणि माझ्या लक्षात आले की आम्ही जमा केलेले पैसे एक तर चोरीला गेले होते नाहीतर कोठेतरी हरवले होते.

एक महत्वाची गोष्ट महणजे स्वप्नातील त्या पिशवीत किती पैसे आहेत याची मला कल्पना होती. मला आठवते की ते पैसे जवळपास 25000 डॉलर्स होते.

मला असे देखील वाटले की क्या अर्थी तो दुष्ट आत्मा घराच्या बाहेर जात नव्हता तर घरातच वरच्या मजल्यावर ते पैसे नेत होता. म्हणजेच तो व्यक्ती घरातीलच कोणीतरी असावी किंवा संबंधित असावी, आणि माझी खात्री झाली की हे पैसे आमच्या सेवाकार्या संबंधी असावेत. दुसऱ्या दिवशी मी आमच्या एका अनेक वर्ष काम करणाऱ्या वडिलाला बोलावले व सांगितले की आपली सर्व पुस्तके तपासावीत. तेंव्हा असे आढळून आले की काही पैसे विनाकारण खर्च होत होते.व या जास्तीच्या खर्चाकडे दुर्लक्ष झालेले होते. व ती रक्कम दरमहा 25000 डॉलर्स होती. आम्हाला समजले की कोणी पैसे चोरले नव्हते पण दुर्लक्ष झाल्यामुळे

पैसे जास्त खर्च होत होते. आणि खरे म्हणजे ते पैसे आम्हाला त्या दिवसात आर्थिक स्थिती वाईट असल्यामुळे हवे होते.

काही स्वप्ने आम्हाला आमची व्युव्ह रचना तयार करण्यासाठी देव वापरतो. 2018 मध्ये मला एक साधे स्वप्न पडले.त्यामध्ये मी शब्द ऐकले. “summon the ships”( जहाजे गोळा कर). मी ते लिहून घेतले पण त्याचा अर्थ मला समजला नाही. मी देवाला त्याचा अर्थ विचारात होतो. आणि ही गोष्ट देन्द्रा शिवाय मी कोणालाही सांगितली नाही. आमच्या पुरुषांच्या जानेवारीतल्या मिटिंग मध्ये त्या वर्षात काय करायचे ते त्यांच्या समोर मांडले. त्यापैकी एक योजना ही होती की त्या वर्षी पूर्ण देशात “लहान गट “ योजना राबवावी. ही योजना अनेक वर्षापासून माझ्या मनात होती पण आता त्या वर्षी ती राबवावी असे मला वाटले. मिटिंग संपल्यावर एक गृहस्थ माझ्याकडे आला व मला म्हणाला की तो जे काही सांगणार आहे ते मला मुर्खासारखे वाटेल. तो एव्हढेच म्हणाला, “देव म्हणाला तुम्ही ट्रोय शहरातील हेलेन सारखे आहात.” मला त्याचा अर्थ समजला नाही.म्हणून त्याने अर्थ सांगण्यास सुरुवात केली. मी त्याला म्हटले की मला एक इ-मेल पाठव व त्यात स्पष्टीकर कर. त्याने पाठविलेले इ-मेल असे आहे,

**काही स्वप्ने आम्हाला आमची व्युव्ह रचना तयार करण्वासाठी देव वापरतो.**

*स्पार्ता शहराचा राजा मेनेलौसने 1000 जहाजे आपली पत्नी हेलेन हिला ट्रोय येथील लोकांपासून सोडविण्यासाठी पाठविले होते. एक हजार पाठविण्याचा जो एक चेहेरा दिसतो तो “हेलेन” दर्शवितो.*

*जानेवारी 30, 2019 मध्ये पाळकसाहेबानी पुरुषांच्या मिटिंग मध्ये जे सांगितले ते काहीसे “ट्रो’य ची हेलेन (हेलेन ऑफ ट्रोय) सारखे आहे. आमचे पाळक या हेलेन सारखे आहेत. ते 1000 जहाजान्सारखे आहेत. की जी जहाजे हरवलेले, विश्वास गमावलेले, कुटुंब गमावलेले, आणि आर्थिक बाबीत बुडालेल्या लोकांना सोडविण्यासाठी आहेत.*

*त्याच्या सेवेत,*
*अहरोन*

एक दिवासाने त्याने मला आणखी एक इ-मेल पाठविले.

*पाळक साहेब,*

*हेलेन ऑफ ट्रोय ला (एक हजार जहाजांना) मला लष्करी चेहेरा द्यायचा आहे. बहुतेक लोकांसाठी एका राजाने आपल्या पत्नीला ट्रोय मधून सोडविण्यासाठी 1000 जहाजे पाठविल्याची ही गोष्ट आहे. परंतु लष्करात असलेल्या पुरुषासाठी ही एक लष्करी मोहीम आहे ज्याला " operation Helen of Troy" असे म्हणता येईल. प्रत्येक लष्करी मोहिमेसाठी एक नाव देण्यात येते. उदाहरणार्थ ओसामा बिन लादेन साठी जी seal team पाठविण्यात आली होती त्याला " Operation Neptune Spear" हे नाव देण्यात आले होते. माझ्या देखील मिशन कार्याला वेळी अशीत रंगीत नावे देण्यात येत होती. . उदाहरणार्थ, "Operation Mike, ElvisMarshall, and Santa Claus."*

*या सर्व मोहिमांना त्यांची चांगली ओळख पटविण्यासाठी लष्करी नावे देण्यात आलेली आहेत, किंवा हे कार्य काय आहे हे स्पष्ट व्हावे म्हणून आणि हे कार्य कोण करीत आहे ते समजावे म्हणून ही नावे देण्यात आली आहेत.*

*देवाने मला सांगितले की तूम्ही ट्रोय च्या हेलेन सारखा आहे. मी लागुकरण केले की मी गेरी पाळक "Operation Helen of Troy" ही मोहीम राबवणार आहे. मी 1000 जहाजे पाठवणार आहे. त्यामुळे हरवलेले, विश्वास गमावलेले, कुटुंब हरवलेले, आणि आर्थिक बाबतीत सर्व गमावून बसलेले तारले जातील,*

*आणखी पुढे सांगायचे म्हणजे, जेंव्हा मी 1000 जहाजे मोहिमेवर पाठविण्यासंबंधी ऐकले, तेंव्हा माझ्या मनात योद्ध्यान्बद्दलही विचार आला.तसेच मदत करणारे लोक, प्रशिक्षण, त्या संबंधीची माहिती, व्यवस्थापनेची कार्य पद्धती, ह्या सर्व गोष्टी प्रत्येक जहाजावर आवश्यक होत्या, त्याचाही विचार माझ्या मनात आला. मला हेही माहित*

*आहे की अशा प्रकारच्या मोहिमेसाठी सर्वात चांगला तुमच्या शिवाय कोणीही नाही. या मोहिमेसाठी प्रशिक्षण देण्यासाठी कितेक वर्षे तुम्ही घालविले मी आणि माझी पत्नी आमची खात्री आहे की आपल्या गटातील इतर लोकही यात सामील होतील.*

*सेवेत,*

*अहरोन.*

अहरोन हा नेव्ही मध्ये SEAL म्हणून काम करीत होता. 21 वर्षात त्याने 9 मोहिमा केल्या होत्या. वधस्तम्भाच्या सामर्थ्याने त्याच्यात झालेला अमुलाग्र बदल ही एक मोठी गोष्ट होती. देव माझ्याबरोबर काय बोलला हे त्याला माहित नव्हते , परंतु अहरोन चे हे शब्द ऐकल्यावर मला कळले की देवापासून मी जे ऐकले ते बरोबर ऐकले. आमचे ध्येय हे आहे की संपूर्ण देशात 1000 लहान लहान गट तयार करणे की जे देव राज्याची चांगली बातमी सांगतील. जर तुम्हला या मोहिमेत भाग घ्यायचा असेल तर माझ्या WEB Siteवर माझाशी संपर्क करा. (Garykeesee.com)

मला वाटते तुम्हाला माझा मुद्दा कळाला. Dreams.com म्हणजे स्वप्ने ही देव आमच्या बरोबर बोलण्याचे फार मोठे साधन आहे. त्यामेले आम्हाला दिशा, व्युव्हरचना,सूचना, आणि सांत्वन मिळते.

हा अध्याय संपण्यापूर्वी मला तुम्हाला आणखी एक गोष्ट सांगायची आहे ती म्हणजे आम्हाला व्युव्हरचना सांगण्यासाठी तो भविष्यवाणी देखील करतो. भविष्य सांगणे हे देखील एक दान आहे. आहरोन ला हे ज्ञान मिळाले “ज्ञानाचे शब्द” त्याला मिळाले. आणि त्याला काही माहित नसतांना त्याने मला माझ्या नवीन मोहिमेबद्दलचे भविष्य सांगितले. ‘ज्ञानाचे शब्द’ हे पवित्र अत्म्याकडून येतात की जे तुम्हाला अगोदर माहित नसतात. ज्ञानाचे शब्द हे पवित्र आत्म्याच्या नऊ ज्ञानांपैकी एक आहे जे आम्हाला 1 करिंथ 12 मध्ये वाचायला मिळते. आता या आत्मिक दानांबद्दल या पुस्तकात सांगावे हा माझा उद्देश नाही. परंतु त्यापैकी एक म्हणजे “भविष्य”. याबद्दल मला तुम्हला सांगायचे आहे.

पुष्कळ लोक भविष्य सांगण्याच्या या दानाबद्दल चुकीचा ग्रह करून घेतात. काहींना असे वाटते की भविष्य-संदेष्ट म्हणजे तो की जो तुमच्याकडे बोट करून म्हणेल ,"तुला आफ्रिकेला जायचे आहे" किंवा " तुला पाळक होण्यासाठी बोलावोलेले आहे." ही दोन्ही विधाने खऱ्या भाविष्यवादि कसा आहे याचे अगदी बरोबर उदाहरण आहे. परंतु ही दोन्ही विधाने चुकीचे देखील असू शकतात. त्यांच्या कडे तुम्ही कसे पाहता त्यावर ते अवलंबून आहे. ही विधाने जर दिशा दाखविणारी असतील तर ती चुकीची असू शकतील. परंतु ती विधाने संमतीदर्शक असतील तर ती बरोबर असू शकतील. पौल भविष्यवाणी किंवा संदेश कशासाठी आहे याचे स्पष्टीकरण करतो.

**"संदेष्टा हा मनुष्यास उन्नती, बोध व सांत्वन होण्वासारखे बोलतो."**
—1 करिंथ 14:3

*"संदेष्टा हा मनुष्यास उन्नती, बोध व सांत्वन होण्यासारखे बोलतो."* (1 करिंथ 14:3)

संदेश याचा अर्थ तुम्हाला दिशा किंवा अचूक रस्ता दाखविणे असा नाही. संदेशामुळे तुम्हाला निश्चितच एक रस्ता दिसेल असे नाही.

परंतु पौलानुसार संदेश दिशा पक्की करण्यासाठी असतो, दिशा दाखविण्यासाठी नाही. तुमचा पुन्हा जन्म झाल्यावर तुमच्या मध्ये असलेला आत्मा तुम्ही काय करावे हे सांगतो. एखादी स्त्री किंवा पुरुष यांनी तुम्ही ख्रीस्तासाठी काय करावे हे सांगण्याची गरज नाही,परंतु तुम्हाला जे माहित आहे त्याची खात्री देण्यासाठी संदेश आहे.

उदाहरणार्थ मी मागे सांगितलेले उदाहरण घेऊ. संदेश आहे, " तुम्हाला आफ्रिकेला जायचे आहे." हे भाविश्यात्मक किंवा संदेशात्मक शब्द असतील जर ही गोष्ट पवित्र आत्म्याने अगोदरच सांगितली असेल आणि आता ती शब्दाच्याद्वारे खात्री देत आहेत. परंतु जर आफ्रिकेला जाणे तुमच्या मानत नसेलच आणि आता ते तुम्ही प्रथमच ऐकत आहात तर या उदाहरणाला संदेशाचे शब्द किंवा भाविश्यात्मक शब्द असे म्हणता येणार नाही. नवीन करारातील मंडळीत तसे दिसत नाही.

काही लोक माझ्याकडे येतात आणि ,म्हणतात, " देवाने मला सांगितले की माझी भरभराट होणार." बरोबर आहे कोणीतरी तुम्हला सांगावे की तुमची भरभराट होणार, अशी गरज नाही.

पवित्र शास्त्र आम्हाला तसे सांगते. काही लोक दुसऱ्याकडे जातात आणि विचारतात," आमच्यासाठी तुमच्या जवळ काही वचन आहे का? काही भविष्य सूचक शब्द आहेत का? तुम्हाला कोणीतरी संदेषात्मकक किंवा भाविश्यात्मक शब्द द्यावेत याची गरज नाही. तुमच्या मध्ये असणारा पवित्र आत्मा तुमच्या संगती बोलेल आणि होय देव अश्याप्रकारचे संदेशात्मक-भाविश्यात्मक शब्द देईल की जेणेकडून तुम्हाला उतेजन मिळेल. पण पवित्र आत्मातुमच्या जवळील दिशा पाहून त्याला साकार्रात्मक प्रतिसाद देईल पण तुम्हाला स्वतः घेवून जाणार नाही.नाही.

एक नाटकीय उदाहरण म्हणजे जेंव्हा मी देन्द्राबरोबर प्रेम संबंध जुळवत होतो तेंव्हाचे. जॉर्जिया मध्ये तिच्या कुटुंबाकडे जाऊन तिचा हात मागावा या साठी मी जात होतो. तेथे असतांना तिच्या मंडळीमध्ये तिच्या सोबत मी गेलो. या वेळी एका आर्थिक व्यवसायात असण्याऱ्या कंपनी मध्ये मला काम मिळाले होते व त्यात मी संघर्ष करीत होतो.मला 19 वर्षाचा असतांना उपदेश करण्यासाठी पाचारण झाले होते, तरी त्या कंपनीमध्ये काम करण्यासाठी मी गेलो. तरी मी काय करावे यासाठी गोंधळून गेलो होतो.

देन्द्राच्या मंडळीत सकाळची उपासना झाल्यावर जिला मी ओळखत नव्हतो अशे एक स्त्री मला भेटली. परंतु देन्द्राला ती माहित होती. ती माझ्याकडे येऊन म्हणाली, "तुला एक काम पाहिजे नाही का? एक काम आहे त्याला 10 बाजू आहेत." आणि ते सर्व तिने मला समजून सांगितले. "मी त्याठिकाणी चांगले काम करत आहे, तू हे काम घ्यावे असे मला वाटते , देव त्या ठिकाणी आहे." हे ऐकल्यावर मला जाणवले की मी ते काम स्वीकारावे परंतु मी गोंधळून गेलो कारण असा विचार माझ्या मनात का आला असे मला वाटले. तिच्या भाविश्यात्मक/ संदेशात्मक शब्दांनी मला समाधान व उतेजन मिळाले आणि कोणत्या देशेने जावे याची खात्री झाली. परंतु लक्षात घ्या, पवित्र आत्मा तुमाला मार्गदर्शन करतो तो तुमचा सल्लागार आहे.

अध्याय 11

# पवित्र आत्मा मला माझ्या बॉस सारखा वाटतो.

माझी मंडळी लहान असतांना त्यात एक कुटुंब होते. की ज्यांना कामाची आवश्यकता होती. ते कुटुंब अगदी प्रेमळ होते व मदत करण्याची त्यांना आवड होती, परंतु त्यांना पैशाचा प्रश्न होता. त्या कुटुंबातील प्रमुखाचे पुन्हा काम सुटले. मी त्यांना मदत करायचे ठरविले. मी माझे घर बांधत होतो व विजे संबंधित काम मी स्वतः करीत होतो. मला समजले की त्या गृहस्थाला विजेबद्दल थोडेफार ज्ञान आहे. मी त्याला काही तास काम देऊ इच्छित होतो कारण त्याच्या कुटुंबाला खाण्यासाठीह पैसे कमी पडत होते. तो आला आणि आणि वायरिंग चे काम अगदी उत्तम केले.

त्या कामाबद्दल मी फारसा विचार केला नाही पण एक महिन्यानंतर त्या गृहस्थाकडून मला फोन आला. त्याने म्हटले की मंडळीमाधले काही लोक माझ्यासाठी प्रार्थना करण्यासाठी एकत्र येत आहेत. मी विचारले, “कशाबद्दल?” त्याने सांगितले अशा काही गोष्टी आहेत की ज्यामध्ये बदल करण्याची आवशकता आहे. त्याने 10 गोष्टी सांगितल्या. त्यातील पहिली गोष्ट ही होती की माझा घर जास्त मोठे होते आणि त्याने विचारले मंडळी त्यासाठी मला किती पैसे देते. मी ताबडतोब त्याला सांगितले की मंडळी मला घरासाठी एक दमडीही देत नाही. मी हे सांगितल्याबरोबर थोडावेळ शांतता पसरली. त्याने मला पुन्हा विचारले, “मंडळी तुम्हाला काहीच देत नाही का?” मी म्हटले, “अगदी बरोबर ऐकले.” पुन्हा थोडी शांतता पसरली.

तो शेवटी म्हणाला, “मंडळीने तुम्हाला काहीतरी द्यायला पाहिजे.” आणि आमचा संवाद तेथेच थांबला.यानंतर एका आठवड्याच्या आसपास एका कंपनीमध्ये काही कामाच्या जागा निर्माण झाल्या होत्या आणि मला वाटले त्यामध्ये त्याला रुची असेल. त्याने अर्ज केला आणि

त्याला काम लागले. ही अशी वेळ होती की त्याचे कुटुंबाला ते राहत असलेले घर सोडावे लागणार होते. त्या आठवड्यात तो माझ्याकडे आला आणि म्हणाला मी काम सोडले

ते ऐकल्यावर मला धक्काच बसला. मी म्हटले, “काम सोडले? का?” तो म्हणाला त्या आठवड्याच्या शुक्रवारच्या दुपारी त्या कंपनीच्या लोकांनी त्याला जमीन झाडायला सांगितली, आणि त्याने म्हटले की हे त्याच्या कामाच्या करारात नाही , आणि म्हणून त्याने नोकरी सोडली. मी जे ऐकत होतो त्यावर माझा विश्वासच बसत नव्हता.मला समजले की जर या गृहस्थाला आयुष्यात यशस्वी व्हायचे असेल तर त्याला कठीण प्रशिक्षणाची गरज होती.त्या मनुष्याच्या पत्नीची मला काळजी वाटू लागली. त्यानंतर त्या कुटुंबाने मंडळी सोडली, आणि त्यांच्या बाबतीत काय घडले हे मला कळले नाही.

मी अंदाज केला आणि तो बहुतेक बरोबर असेल. मला वाटते, त्या गृहस्थाच्या उद्धट वर्तनामुळे त्याच्या माहिती-पत्रावर नोकरी करण्यासंबंधी फार कमी लिहिलेले असेल आणि तेही प्रत्येक ठिकाणी थोडाच काळ त्याने नोकरी केली असेल. त्याच्याजवळ समृद्धता नव्हती व जे असेल ते फक्त कसेतरी जीवन जगावे. मला चुकीचे समजू नका. लोक बदलतात. आणि मला त्याच्याबद्दल अशा आहे की तो बदलला असेल. परंतु एक गोष्ट मला माहित आहे की त्यावेळी तो चूकीच्या दिशेने चालला होता. देवाची वाणी तो ऐकत नव्हता.

हे तुम्ही त्याला विचारले तर “देवाच्या कोणत्या वाणीबद्दल तुम्ही बोलत आहात?” असे कदाचित तो विचारेल. त्यावेळी त्याला देवाच्या वाणीची कल्पना नव्हती. देवाची प्रशिक्षण देण्याच्या पद्धतीतील पहिली गोष्ट म्हणजे, ‘अधीनता’ शिकणे . मला वाटते या अध्यायाचा मथळा तुम्हाला गोंधळात टाकेल. तुम्ही म्हणाल “माझ्या बॉस ला पवित्र आत्म्याशी काय कर्तव्य आहे?” तुमच्या पवित्र आत्म्याच्या ऐकण्याच्या पात्रतेबद्दल तुमच्या बॉस ला निश्चितच कर्तव्य आहे.हे तुम्हाला या अध्यायात कळेल.

याबद्दलचा अभ्यास कारण्यासाठी आपण मत्तय 8:5-10 याचा अभ्यास करू या.

*“मग येशू कापर्नहुमास आल्यावर कोणीएका जमादाराने त्याजकडे येऊन त्यास अशी विनंती केली की प्रभुजी, माझा चाकर पक्षाघाताने अतिशय पिडीत होऊन घरात पडला आहे. तो त्यास म्हणाला मी येऊन त्याला बरे करीन. तेंव्हा जमादाराने उत्तर*

*दिले की, प्रभुजी, आपण माझ्या छपराखाली यावे अशी माझी योग्यता नाही; पण शब्द मात्र बोला, म्हणजे माझा चाकर बरा होईल. कारण मीही ताबेदार मनुष्य असून माझ्या स्वाधीन शिपाई आहेत; मी एकाला जा म्हटले म्हणजे तो जातो, दुसऱ्याला ये म्हटले म्हणजे तो येतो, आणि आपल्या दासाला अमुक कर म्हटले म्हणजे तो ते करतो. हे ऐकून येशुला आश्चर्य वाटले व आपल्या मागे आलेल्यास तो म्हणाला, मी तुम्हास खचित सांगतो, 'एव्हढा विश्वास मला इस्त्रायेलातही आढळला नाही.'"*

— मत्तय 8:5-10

येशू आपल्या चाकराला बरा करील असे या जमादाराला का वाटले? कारण त्याला माहित होते की अधिकार कार्य करतो. तो म्हणतो, *"कारण मीही ताबेदार मनुष्य असून माझ्या स्वाधीन शिपाई आहेत, मी एकाला जा म्हटले म्हणजे तो जातो, दुसर्याला ये म्हटलेल म्हणजे तो येतो. आणि आपल्या दासाला अमुक कर म्हटले म्हणजे तो ते करितो."* तो जसा कोणाच्या तरी ताब्यात आहे तसे काही लोक त्याच्याही ताब्यात आहेत हे त्याला माहित होते. की त्याचा बॉस' चा शब्द म्हनजे कैसराचा शब्द होता, तसेच त्याचा शब्द त्याच्या चाकारांसाठी कैसाराचा शब्द होता. अशा प्रकारे अधिकार कार्य करितो. म्हणून त्याला हे कळले होते की एखाद्या परिस्थितीवर येशूला अधिकार आहे व तो बोलून आपला अधिकार दाखवू शकतो. ही अगदी साधी गोष्ट आहे आणि या ठिकाणी ते सत्य तुम्ही शिकले पाहिजे.

**ते सत्य महणजे, तूम्हीही तुमच्या अधिकाराने वागले पाहिजेत जसे तुम्ही कोणाच्या तरी अधिकाराखाली आहात, अधीन आहात.**

जर अधिकाऱ्याद्दलचा सर्व सन्मान सैतानाने काढून घेतला आणि सर्वांना विश्वासात घेऊन असे सांगितले की प्रत्येकजण आपल्याला जे पाहिजे ते करू शकतो तर जगात गोंधळ होईल व नाश होईल. अशाच प्रकारचे आव्हान त्याने एदेन बागेत हव्वेला दिले., "देव खरोखर असे म्हटला काय?" लक्षात घ्या पृथ्वीवरील प्रत्येक व्यक्ती कोणाच्यातरी अधिकार खाली किंवा अनेक अधिकारांखाली आहे. तुम्ही कोणाच्या अधिकाराखाली आहात हे तुम्ही ओळखले तर कोणाचे ऐकायचे आणि कोणाचे नाही हे तुम्हाला समजेल. परंतु आताच्या परिस्थितीत प्रत्येकाला अधिकार हवा आहे, कोणाच्या अधिकाराखाली नको असे वाटते. परंतु हे अशक्य आहे.

नुकतेच एका कंत्राटदाराने सांगितले की नोकरवर्गाचे कर व कामदाराची comp-fee न भारता तो त्यांना पैसे कसे देतो. परंतु याचा उलट काय परिणाम होईल हे मला माहित आहे. एके दिवशी नोकर दुखविल्या जाईल व comp-फी साठी अर्ज करेल.आणि त्याला हे कळेल की मालकाने कामगारांचे कोणतेच पैसे किंवा कराचे पैसे भरलेले नाहीत. आणि म्हणून तो मालकावर किंवा कंत्राटदारावर केस करेल व भरपाई मागेल.माझ्या उपासना मंदिराचे काम करतांना मला हा अनुभव अनेक कंत्राटदारांबरोबर आलेला आहे.

मागच्या आठवड्यात मी एका स्त्रीबरोबर बोलत होतो. ती म्हणाली की तिला पाळकाची गरज नाही. तिचा संबंध फक्त पवित्र आत्म्याबरोबर आहे. खरे आहे का? तिने यासाठी सरळ येशूकडे जावे व त्याला विचारावे की ज्याने इफिस 4 मध्ये सांगितल्यानुसार पाळकाची नेमणूक केलेली आहे. जर ती येशूच्या अधीन आहे तर ती येशू जे सांगतो त्याचे अनुकरण करील. खरे म्हणजे ती येशुच्याच अधीन नाही व तिला तिच्या सर्व गोष्टी स्वतःच करायला पाह्जेत.

त्यामुळे ती फसविल्या जाईल व कठीण प्रसंगांना तोंड द्यावे लागेल.

फार काळ झाला नाही, मी एका विक्रेत्या बरोबर बोलत होतो. तो स्वतःची विक्री-कंपनी स्थापित करणार होता, व आपल्यासोबत आपले सर्व गीऱ्हायीके नेणार होता. खरे म्हणजे या लोकांनी असे काही करू नये याचा करार केलेला होता. परंतु या विक्रेतायाबरोबर गेल्यावर आपण जास्त समृद्ध होवू असे त्यांना वाटत होते. परंतु ही चोरी होती.

मला माहित आहे हा अध्याय काही जणांना आवडला नसेल कारण यात मी आत्मिक आणि शांततामय पवित्र आत्म्याबद्दल बोलत आहे. परंतु हा अध्याय तुम्ही योग्य रीतीने घेतला तर हा देवाने पुढे मांडला आहे हे तुमच्या लक्षात येईल.

**तुम्ही कोणाच्या अधिकाराखाली आहात हे तुम्ही ओळखले तर कोणाचे ऐकायचे आणि कोणाचे नाही हे तुम्हाला समजेल.**

एक स्त्री माझ्याकडे एका प्रार्थ मिटींगच्या वेळी अश्रुपूर्ण नेत्रांनी आली, आणि मी तिला प्रार्थनेसाठी का बोलावले नाही म्हणून विचारले. मी तिला कसे बोलू शकत होतो? मला धक्का बसला. ती अनेक पुरुषांच्या बरोबर दिसलेली होती. जर तिने तिच्या वागण्याबद्दल कोणाचे तरी ऐकले असते तर मी एका मिनिटात तिच्या प्रश्नाचे उत्तर देऊ शकलो असतो. ती तिच्या नवऱ्याला मान देत नसे, आणि त्याच्या अध्यात्मिक जीवनाबद्दल इतरांजवळ बोलत

असे. म्हणून मी तिला प्रार्थनेसाठी बोलावले नव्हते. ती रडत आली कारण ती अध्यात्मिक रीतीने चांगली स्त्री नव्हती हे इतरांना कळले होते., तिने तिच्यावरच्या अधिकाऱ्याचा सन्मान केलेला नव्हता. म्हणजे ती घातक स्त्री होती.

आता मला एक प्रश्न विचारू द्या. ज्या ठिकाणी तुम्हाला जायला पहिजे त्या ठिकाणी जाण्याच्या पात्रतेचे तुम्ही आहात काय?

जर मी तुमच्या पालकाला किंवा बॉस ला विचारले की त्यांचे तुमच्याबद्दलचे प्रामाणिक मत काय आहे? तर ते काय म्हणतील? मला माहित आहे की तुम्हाला दुसऱ्याच्या अधिकाराखाली आवडत नाही. येशू ख्रिस्ताने अधिनतेची जी परीक्षा संगीतलेली आहे ती पास करणे महत्वाचे आहे.

> *“जो अगदी अल्प गोष्टीविषयी विश्वासू आहे तो पुष्कळाविषयीही विश्वासू आहे, आणि जो अगदी अल्प गोष्टीविषयी अन्यायी तो पुष्काळाविषयीही अन्यायी आहे. यास्तव तुम्ही अन्यायाच्या धनाविषयी विश्वासू न झाला तर जे खरे धन ते तुम्हाला कोण सोपून देइल? आणि जे दुसऱ्याचे त्याविषयी तुम्ही विश्वासू न झाला तर जे तुमचे स्वतःचे ते तुम्हाला कोण देईल?”*
>
> —लुक 16:10-12

**तुमच्या अधिकाऱ्याबद्दल तुम्ही विश्वासू आहात काय? त्याचा पुरावा म्हणजे तुमची अधीनता.**

पवित्र शास्त्रातील एक गोष्ट आपण पाहू या जी आपल्याला आयुष्यातील यशाबद्दल सांगेल.

> *“तेव्हा पालीष्टी लोक इस्त्राएल लोकांशी लढण्यास जमा झाले; तीस हजार रथ, सहा हजार स्वर, आणि समुद्र किनाऱ्यावरील वाळू इतके विपुल लोक एकवट झाले त्यांनी बेथआवेनाच्या पूर्वेस जाऊन मिखमाश येथे तळ दिला. आपण पेचात सापडले आहोत असे इस्त्राएल लोकांनी पहिले.(खरोखरच त्या लोकास संकट प्राप्त झाले होते,) तेंव्हा ते गुहा झुडपे, खडक, दुर्ग, व विवरे यात लपले. कित्तेक इब्री लोक यार्देन ओलांडून गाद व गीलाद या प्रांतात गेले, पण शौल गील्गालातच राहिला., व सर्व लोक थरथर कापत त्याच्या मागून गेले. शामुवेलाने मुदत ठरविली होती त्याप्रमाणे*

> *सात दिवस तो वाट पाहत राहिला. परंतु शमुवेल गील्गालास आला नाही. म्हणून लोक त्याजपासून निघून पांगू लागले. तेंव्हा होमबली व शान्त्यार्पणे मजकडे आणा असे सांगून शौलाने स्वतःच होम केला.*
>
> —1 शमुवेल 13:5-9

*"शामुवेल शौलास म्हणाला, तू मूर्खपणा केला., तुझा देव परमेश्वर याने तुला केलेली आज्ञा तू मानिली नाहीस, मानिली असती तर परमेश्वराने इस्राएलावर तुझे राज्य निरतरचे स्थापिले असते.पण आता तुझे राज्य कायमचे राहायचे नाही. परमेश्वराने आपल्यासाठी आपल्या मनासारखा मनुष्य धुंडून त्यास आपल्या लोकांचा अधिपती नेमले आहे कारण परमेश्वराने तुला केलेली आज्ञा तू पाळिली नाही.*

—1 शामुवेल 13:13-14

शौल अपात्र ठरला कारण त्याने स्वतःला अधिकाराच्या स्वाधीन केले नाही. येथे आम्हाला पुन्हा पाहायला मिळते की जर तुम्ही तुमच्या अधिकाऱ्याच्या स्वाधीन झाला नाही तर तुम्हालाही अधिकार मिळणार नाही. एक महत्वाचा मुद्दा म्हणजे 'देव आपल्या मनासारखा शोधणार होता.' 'आपल्या मनासारखा" म्हणजे काय?

> *" नंतर त्याने (देवाने) त्याला (शौलाला) दूर करून त्यांचा राजा होण्यासाठी दाविदास उभे केले. आणि त्याजविषयी प्रतिज्ञेने म्हटले की माझ्या मनासारखा इशायाचा पुत्र दाविद मला मिळाला आहे. तो माझ्या सर्व इच्छा सिद्धीस नेईल."*
>
> —प्रेषित 13:22

एखादी व्यक्ती देवाच्या मनासारखी आहे हे तो कसे ठरवितो? एवड ज्याचा द्वेष करतो त्याचा द्वेष करणारा आणि देव ज्यावर प्रेम करतो त्यावर प्रेम करणारा; देवाने जे केले असते ते करणारा म्हणजे देवाच्या मनासारखा. दुसऱ्या भाषेत जर देव पापाचा द्वेष करतो तर हे लोकही पापाचा द्वेष करतात, जर देवाला एखादी गोष्ट करायला पाहिजे तर ती गोष्ट करणारे हेच देवाच्या मनासारखे असणारे लोक आहेत. आपल्या जगात, ज्याला सर्वात जास्त अध्यात्मिक दाने

आहेत ती व्यक्ती म्हणजे देवाच्या मनासारखी होय. आपल्याला वाटते की मृदू भक्ती-संगीत म्हणजे आत्मिक होय. परंतु देव स्पष्ट सांगतो की आज्ञापालन म्हणजे भक्ती होय.

> *शमुवेल शौलास म्हणाला, 'परमेश्वराचा शब्द पालील्याने त्याला जसा संतोष होतो तसा होमांनी व यज्ञांनी होतो काय?पहा, यज्ञापेक्षा आज्ञा पाळणे बरे .एडक्याच्या वपेपेक्षा वचन ऐकणे बरे. अवज्ञा जादुगीरीच्या पातकासमान आहे. आणि हट्ट हा मूर्तीपूजा व कुलदेवतार्चन या सारखा आहे. तू परमेश्वराचा शब्द मोडीला आहे म्हणून त्यानेही तुला राजपदावरून झुगारून दिले आहे.'"*
>
> —1 शमुवेल 15:22-23

आता मला पुन्हा सांगू द्या देवाची वाणी एखाद्या बॉस सारखी आहे. तुमचे नाव कोणालाही माहित नसेल तरी ही तुमचा प्रतिसाद तुमच्या अधिकाऱ्याला कसा आहे हे देव तपासून पाहतो. हे सर्व कसे कार्य करते ही गोष्ट पुष्कळांना समजत नाही. त्यांचा लहानश्या पार्ट-टाइम नोकरी चे महत्व त्यांना कळत नाही. त्यांनी स्वताचा दर्जा ठरविल्रला असतो व त्यानुसार नम्रतेबद्दल/ अधिनतेबद्दल ते स्वतःला शिकवीत असतात, पण ते त्यांना कळत नाही. त्यांच्या आवडीवर व ध्येयावर किती अधीनता घ्यायचे हे ते ठरवीत असतात. नोकरी अर्ध-वेळेची असेल तरी जेंव्हा ते करार करतात तेंव्हा जणू काय ती संस्था त्यांचीच आहे असे ते सांगतात हे त्यांना कोणी शिकाविलेलेच नसते. या दृष्टीने कोणी पाहातच नाही. त्यांच्या समोर मोठे ध्येय असते. ही नोकरी फक्त अर्धवेळेची आहे, काही जास्तीचे पैसे मिळतात , बस, बाकी काही नाही. पण हा विचार चुकीचा आहे.

**आता मला पुन्हा सांगू द्या देवाची वाणी एखाद्या बॉस सारखी आहे.**

'एखादी नोकरी महत्वाची नाही' असे नाही. एखादे कार्य लहान आहे असे नाही. दाविदाजवळ अगदी क्षुलक काम होते आणि ते म्हणजे मेंढरे सांभाळणे. परंतु हे काम त्याच्या दृष्टीने क्षुलक किंवा कमी दर्जाचे नव्हते. त्याच्यावर जे काम सोपविले होते ते त्याने खूप गंभीर रीतीने घेतले होते. इतर कोणालाही माहित नव्हते की तो कोण आहे परंतु देवाला माहित होते ! आणि दविद कोठे असतो हे देवाला चांगले माहित होते.

तुम्ही कोठे आहात हे देवाला माहित आहे, आणि तुमचे अंतःकरण अधिकाऱ्याच्या दृष्टीने कसे आहे ते त्याला माहित आहे. सत्य हे की ज्याला तुम्ही पाहता त्याच्या तुम्ही अधीन नाही तर ज्याला तुम्ही पहिले नाही त्या देवाच्या अधीन तुम्ही राहणार नाही. मी मोठा आहे, सर्व मलाच दोष देतात ही दुसऱ्याचीचूक आहे असे म्हणणारे बरेच लोक मी पाहिलेत. ही माझ्या बॉस ची चूक आहे, सरकारची चूक आहे.असेही ते म्हणतात. ते फक्त हवे तेव्हडेच काम करतात.किंवा कोणी म्हटले म्हणून दबावाखाली काम करतात. त्यांची लार्या प्रणाली म्हणजे स्वतः विचार करण्याऐवजी दुसऱ्याने सांगावे याची ते वाट पाहत असतात. इस्राएल लोकांची हीच परिस्थिती होती. दासपणाचे विचार घेऊनच ते मिसर देशातून बाहेर पडले. त्यामुळे राक्षसारख्या लोकांबरोबर युद्ध करणे त्यांनाकठीण वाटले. वतनाच्या देशात जाण्या अगोदर देवाने त्यांना शिकवावे हे गरजचे होते. देवाने त्यांना शिकविले काय?

> *त्याने तुला लीन केले, तुझी उपासमार होवू दिली. तेंव्हा तुला किंवा तुझ्या पूर्वजास ठावूक नसलेला जो मन्ना त्याच्या योगाने त्याने तुझे पोषण केले; ते यासाठी की मनुष्य केवळ भाकररीने नव्हे तर परमेश्वराच्या मुखातून निघणाऱ्या प्रत्येक वचनणे वाचेल हे तुझ्या प्रत्ययास आणून द्यावे."*
>
> —अनुवाद 8:3

*आणि तुझ्या पूर्वजास माहित नसलेला जो मन्ना त्याच्या योगाने रानात त्याने तुझे पोषण केले; ते यासःती की तुला लीन करावे व कसोटीस लावून आहेरीस तुझे कल्याण करावे.*

—अनुवाद 8:16

देवाने त्यांना लीन/नम्र केले. म्हणजे त्यांना गरजवंत केले; स्वतःवर नाही तर देवावर अवलंबून राहण्यास त्यांनी शिकावे असे त्याने केले. फक्त जेवणासाठीच शोध घ्यावा एवढेच नाही तर त्यांच्या समोर मोठ्या लढाया होत्या. मोठ मोठे योद्धे व तटबंदीची नगरे होती. त्यांच्यासमोर इस्राएल लोक घाबरले असते. परंतु या परिस्थितीपेक्षा, समस्यापेक्षाही ही मोठा देव त्यांच्या बरोबर आहे हे त्यांना माहित असायला पाहिजे होते.

दुसरी गोष्ट म्हणजे त्यांच्यावर कोणत्याही प्रकारची सक्ती न होता त्यांनी स्वताहून योग्य प्रकारची निवड करावी ही देवाची इच्छा होती. मुलांच्या अन्तःकरणाकडे लक्ष न देता भौतिक दृष्टीने त्यांचे सादरीकरण कसे चांगले होईल याकडे पालकवर्गजास्त लक्ष देतो आणि ही मोठी चूक ते करतात. लेकराला त्याची खोली स्वच्छ करण्यास सांगितल्यावर धाडकन दरवाजा बंद करून नम्रतेने नाही तर हट्टी हृदयाने ते काम करून टाकतात. ज्या आई वडिलांना आपल्या लेकारांशी मैत्रीचे संबंध ठेवायचे असतात ते येवून मग म्हणतात की त्याने किती सुंदर काम केले आहे. परंतु; हे चूक आहे कारण लेकरू आंतरिक दृष्टीने नाही तर फक्त बाहेरून तुमच्याशी सहमत झालेले असते. अधीनता, नम्रता ही अन्तःकरणाशी निगडीत आहे. काही दिवसानंतर आई वडील त्यांना सक्तीने तशी निवड करायला लावण्यास तेथे असणार नाहीत. आईवडीलाचे छत्र निघून गेल्यावर ही लेकरे त्यांना पाहिजे तसे वागू लागतात. आता त्यांच्या अंतःकरणात जे आहे ते बाहेर येईल. अशावेळी मग आईवडिलांना आपले मुल अडचणीत असलेले व गोंधळात पडलेले दिसते. कधी कधी ते म्हणतात आमचा जॉनी फार चांगला मुलगा होता परंतु आता कॉलेज मध्ये गेल्यावर किंवा स्वताच्या पायावर उभे राहिल्यावर त्यांचे वागणे वेगळेच झालेले असते व आईवडिलांना धक्का बसतो.

पवित्र शास्त्र सांगते की अखेरीस त्यांचे (इस्राएल लोकांचे) कल्याण व्हावे म्हणून तो त्यांची परीक्षा घेत होता. याच गोष्टीबद्दल आपण बोलत आहोत. लेकाराने आपल्या बरोबर चांगले राहावे म्हणून काही आईवडील जसे वागतात तसा देव वागत नाही. शेवटी लेकराचे कल्याण व्हावे ही देवाची इच्छा आहे. हृदयातील लहान लहान वृत्ती तो सुधारतो की जेणेकडून ते हृदय नेहमी साठी कडक बनणार नाही. म्हणून देव त्यांची परीक्षा घेत होता, घेणार होता. नम्र होण्यासाठी देव त्यांच्या वृत्तीत सुधारणा करत होता.

नम्रतेची परिक्षा प्रत्येकाची होणार होती. आता आम्हाला तर वाळवंट पार करावे लागणार नाही मग देव आमची परीक्षा कशी घेणार? आम्ही त्याची वाणी कशी ऐकणार की जेणेकडून आम्ही नम्रता शिकू? आणि पुढच्या मार्ग क्रमनासाठी, बढतीसाठी तयार राहू? शौला बद्दल देवाने काय म्हटले? “यज्ञा पेक्षा आज्ञा पालन बरे.” मंदिरातील तुमची भक्ती करण्याच्या पद्धतीवर तुमचे पुढची बढती अवलंबून नाही. तुम्हाला अधिकार दिल्यावर देव तुमच्यावर अवलंबून असेल काय? याची सुरुवात कोठे आहे? घर.

*"मुलांनो, आपल्या आईबापांची आज्ञा प्रभूमध्ये मना, कारण हे योग्य आहे. आपला बाप व आई यांचा मान राख. (ही पहिली वचनयुक्त आज्ञा आहे.) ह्यासाठी की तुझे कल्याण व्हावे.व तू पृथ्वीवर दीर्घायु असावे.*

—इफिस 6:1-3

तुमच्या आईवडिलांचे आज्ञापालन केल्याने तुम्हाला दीर्घायुष्य लाभून जीवनात यश मिळेल तर असे का? आज्ञापालन केल्याने देव तुम्हाला काही मार्क्स देतो का? नाही, तसे नाही. परंतु जर तुम्ही तुमच्यावर अधिकार असलेल्या तुमच्या आईवडिलांचा सन्मान कराल तर तुम्ही देवाचा देखील सन्मान कराल. जर तुम्ही तुमच्या आयुष्यात देवाच्या अधिपत्याचा सन्मान कराल व त्याच्या आज्ञा पळाल तर तुमच्या आयुष्यातल्या गोष्टी सुरळीत होतील. तुम्ही लहान असतांना तुमचे आईवडील जसे तूमाची काळजी घेतात तसे देव हा तुमच्या आईवडीलांसारखाच दिसतो., असे मी म्हणतो.

तुम्हाला नम्रता शिकविण्याचा दिसरा मार्ग म्हणजे देव तुमाला मानवी अधिकाराखाली ठेवतो. तुमच्या कामावरच बॉस, तुमचे पाळक, पोलीस अधिकारी, आणि सरकार हे असे अधिकारी आहेत की ज्यांच्या अधिकाराखाली आम्ही असावे असे देव आम्हाला सांगतो.

माझ्या मंडळीत एक कुटुंब मला आठवते की नेहमीच तक्रार करीत असत आणि त्यांच्या समस्येबद्दल बोलत असत. त्यांचे घर त्यांच्या पासून हिरावून घेतले जाणार होते आणि तसे होवू नये म्हणून त्यांना 10,000 डॉलर्स ची व्यवस्था करावी लागणार होती. डझनभर लोकांना त्यांनी आपली व्यथा सांगितली होती.शेवटी एका कुटुंबाने त्यांना 10,000 डॉलर्स देण्याचे ठरविले. परंतु काही महिन्या नंतर ते पुन्हा त्याच अवस्थेत आले आणि आपले घर गमावून बसले. मी त्याच्या बरोबर बोललो व सांगितले की त्या दोघांनीही काम शोधायला पाहिजे आणि एखाद्या रेस्टोरंट मध्ये त्यांना काम मिळू शकते पण त्यांचे म्हणणे असे होते की असले काम त्यांच्यासाठी नाही. मी विचार केला की त्यांची समस्या आर्थिक नाही तर अधिपत्याखाली राहणे. जबाबदारी काय आहे हेच त्यांना माहित नव्हते. आपले प्रश्न किंवा समस्या सोडविण्यासाठी कोणाच्या तरी अधिपात्याखाली राहणे ही त्यांची जबाबदारी होती हे समजून घेण्यासाठी ते अपयशी ठरले.

माझा मित्र रिक रेनर मला सांगतो की एखाद्या व्यक्तीला देखरेख करण्यासाठी कामावर घ्यायचे असेल तो त्यांची कार कशी आहे हे पाहण्याचा तो प्रयत्न करतो, किंवा त्यांच्या घरी अचानक जातो. त्याचे म्हणणे असे आहे की जर ते त्यांच्या वस्तुचीच चांगली काळजी घेवू शकत नसतील तर दुसऱ्याच्या वस्तूंची काळजी कशी घेतील. त्याला माहीत होते की काही महिन्यात त्याचे ऑफिस त्यांच्या कार सारखेच दिसेल.

मी स्वतः माझा अरण्यातील अनुभव (इस्त्राएल लोकांसारखा) घेतला आहे. आणि मला आनंद वाटतो की अधिकाऱ्याकडे निरुत्साही दृष्टीने पाहण्यापासून त्याने मला राखले.त्याने मला नम्र केले माझी परीक्षा पहिली की जेणेकडून मी माझ्या पुढच्या कार्यासाठी तयार होईल.

मला आठवते की आम्ही शेतातील घरात असतांना आमची आर्थिक स्थिती कशी जिकिरीची होती. मी देवाचे आभार मानतो की एका मोठ्या गुंतवणुकी मध्ये मी पडलो नाही, नाहीतर मला माझी कोणतीच बिले भरता आली नसती. कारण ती गुंतवणूक करण्यासाठी दिलेला चेक त्या वेळेत आलाच नव्हता. मी एका नवीन बँक मध्ये खाते उघडले आणि त्या बँकेचा एक चुकीचा चेक माझ्या मुळ बँक बँकेत दिला , मला वाटले दुसऱ्या दिवशी चेक येईल व त्यासाठी नवीन बँकेत पैसे जमा होण्यासाठी त्याचा वापर करता येईल. परंतु दोन आठवडे झाले चेक आलाच नाही. चुकीचा चेक येण्यागोदर मी रोज माझ्या बँकेचा एक चेक लिहित असे . असे दोन आठवडे चालले. आणि माझ्या चूकीच्या चेक ची किमत 2000 डॉलर्सच्या थोडी वर झाली. या काळात रक्कम वाढत होती.

परंतु नंतर सर्व काही बदलले..एके दिवशी बँक म्यानेजरने मला बोलावले व सांगितले की "मिस्टर किसी मला माहित आहे तुम्ही काय करत आहात. मी तुमचे खाते बंद करीत आहे. हे खाते बंद करण्यासाठी तुम्हाला पैसे आणावे लागतील आणि पुन्हा तुम्ही खाते कधीच काढू शकणार नाही. मी पकडल्या गेलो होतो.एक वाईट गोष्ट म्हणजे चेक वर मी पवित्र शाश्त्रातील वाचणे लिहित होतो. आणि बँक म्यानेजर ला मी दाखवीत होतो की देव किती महान आहे. देवाचे आभार मानतो कारण त्याच दिवशी चेक आला आणि तो बँकेत दिल्यावर माझे सर्व कर्जाचे पैसे फिटले जाणार होते. परंतु मला त्यासाठी बँक म्यानेजर समोर जावे लागणार होते, माफी मागावी लागणार होती, आणि तिने देवाला दोष देवू नये असे तिला सांगावे लागणार होते. मी तिला सांगणार होतो की हा माझा मूर्खपणा होता.

माझ्या व्यवसायाचे ते पहिलेच वर्ष होते, आणि विभागीय उप-अध्यक्ष मला शिकवीत होता. तो माझे कागदपत्र तपासात असतांना त्याला दिसून आले की एका ठिकाणी मी सही घ्यायचे विसरलो होतो. तो म्हणाला, “काही हरकत नाही, ते लाईट मध्ये धर व जेथे सही नाही तेथे सही ट्रेस कर. शेवटी त्यांना आपले उत्पादन हवे आहे कारण इतर सर्व ठिकाणी त्यांनी सह्या केलेल्या आहेत. म्हणून त्याप्रमाणे मी केले. एका महिन्यानंतर माझ्या गिऱ्हाईकाच्या वकिलाचा मला फोन आला व सांगितले की तो माझ्यावर 10,000 डॉलर्सचा दावा ठोकीत आहे कारण त्याचे नाव मी बँकेच्या पैसे काढण्याच्या फॉर्मवर लिहिले होते. माझ्या विभागीय उप-अध्यक्षाचा ही त्यात सहभाग होता म्हणून रक्कम 5000 डॉलर्स इतकी कमी झाली. आणि त्याला कामावरून काढून टाकण्यात आले.

परंतु मला आणखी शिकायचे होते. माझ्या एका नवीन प्रतिनिधीला विमा संबंधी परिक्षा द्यायची होती. परंतु अभ्यास कारण्यासाठी पुस्तके हवी होती आणि ते विकत घेण्यासाठी त्याच्याजवळ पैसे नव्हते. मी फोटो-कॉपीज काढून त्याला दिल्या. मला एका वकीलाचा पुन्हा फोन आला की कॉपी-राईट परवानगी न घेतल्यामुळे माझ्यावर खटला करण्यात येत आहे. माझे IRS ऑफिस माझ्या मागे होते. मी उशिरा भरण्यात येणारे कर आणि बिल्स हे बघत होतो. मी गोंधळात भावनामय स्थितीत होतो. या सर्व प्रकरणात देव मला जबाबदार धरत होता, मला शिकवीत होता. देवाला माहित होते की काही दिच्वासांनी मी लाखो डॉलर्स हाताळणार होतो. आणि अशा प्रकारे तो मला जावू देणार नव्हता. त्याबद्दल मी देवाचे आभार मानतो.

मला हे शिकायचं होत की देव पदोन्नती करणारा आहे. परंतु देव तुमची बढती किंवा पदोन्नती तुमच्या कृतीवर किंवा कार्या वर करतो असे नाही. माझी सचोटी किंवा प्रामाणिकपणा द याची देखील परीक्षा घेण्यात येणार होती. म्हणून मी म्हणतो की देव हा आमच्या बॉस सारखा आहे. तुमचा ऑफिस मधला बॉसच्या द्वारे देव तुम्हाला प्रशिक्षित करतो. त्यामुळे तुम्ही पुढच्या कार्यासाठी तयार होता, आणि अधिनतेसाठी नम्रतेसाठी शिक्षण देतो. ही परीक्षा तुम्ही पास कराल का?

*कारण उन्नती ही पुर्वेकडून नव्हे, पश्चिमेकडून नव्हे, व अरण्याकडूनही नव्हे, तर न्याय करणारा देव आहे; तो एकाला खाली घालतो, व दुसऱ्याला वर आणितो.*

*—स्तोत्र 75:6-7*

*कोणतीही शिक्षा तत्काली आनंदाची वाटत नाही, खेदाची वाटते; तरी ज्यास तिचा अभ्यास झाला त्यास ती पुढे धार्मिकता हे शांतिकारक फळ देते.*

*—इब्री 12:11*

*दासांनो, व्यहाररीत्या जे तुमचे धनी त्यांचा हुकुम, तो ख्रिस्ताचा असा समजून, भीत, कापत, सालस मानाने माना; मनुष्यास खुश करणाऱ्या लोकांसारखे तोंडदेखल्या, चाकरीने नका, तर देवाची इच्छा मनापासून पूर्ण करणाऱ्या ख्रिस्ताच्या दासासारखे तो माना; ही चाकरी मनुष्याची नव्हे तर प्रभूची आहे असे मानून सद्भावाने ती करा; कारण तुम्हाला माहित आहे की कोणी जे काही चांगले करितो तेंच त्याला प्रभूपासून मिळेल, मग तो दास असो की स्वतंत्र असो. धन्यांनो, तुम्ही त्यांच्याबरोबर तसेच वागा; धमकावणे सोडा; कारण त्यांचा व तुमचाही धनी स्वर्गात आहे आणि त्याच्याजवळ पक्षपात नाही, हे तुम्हास माहित आहे.*

—इफिस 6:5-9

भीतीयुक्त आदरपूर्वक आज्ञापालन. ही तुमच्या बॉस कडे पाहण्याचं तुमची वृत्ती असावी. बॉस चे आज्ञापालन करणे हे पौलाच्या व्याख्येनुसार देवाच्या इच्छेप्रमाणे करण्यासारखे आहे. आश्चर्य वाटले का? मलाही वाटले होते.

मग देवाची वाणी कशी आहे ? तुमच्या बॉससारखी.

या अभ्यासाचा शेवट करतांना मला वाटते व खात्री आहे की तुम्हाला उत्तेजन मिळाले असेल, व प्रेरणाही मिळाली असेल. आमच्या जीवनात पवित्र आत्मा एक अद्भूत सोबती आहे. त्याने तुम्हाला अभिवचन दिले आहे की तो तुम्हाला कधीही सोडणार नाही, टाकणार नाही. ही मूल्यवान सत्ये तुम्हाला सांगण्याचा सन्मान मला मिळाला याबद्दल मला आनंद वाटतो.

—गैरी कीसी

अध्याय 12

# कशी प्रर्थना करुन पवित्र आत्म्याचा बाप्तिस्मा मिळवावा

आमच्या विश्वासाने देवाने जे आम्हाला सांगितले ते सर्व आम्हाला मिळेल. आणि बाप्तिस्मा मिळण्याची ही देणगी त्यापासून काही वेगळी नाही. पवित्र आत्मा मिळण्यासाठी प्रार्थना करण्याच्या अगोदर तुम्हाला ही खात्री असावी की पवित्र वाचनाचा या पुस्तकात दिलेला अभ्यास तुम्ही केलेला आहे, आणि तुमची खात्री असावी की हे होण्यासाठी देवाची इच्छा आहे आणि तुमच्या प्रश्नांची उत्तरे मिळाली आहेत. जेंव्हा तुमची खात्री होईल की पवित्र आत्म्याचा बाप्तिस्मा तुमच्यासाठी आहे.मग ही प्रार्थना करा,

> **"हे बापा, मी विनंती करितो की मला तुझ्या सामर्थ्यशाली आत्म्याचा बाप्तिस्मा दे. तुझ्या वचनानुसार तो मला आज मिळत आहे, माझ्या आत्म्यात मी तशी प्रार्थना करीत आहे. ही विनंती मी तुझ्या गौरवासाठी येशुच्या नावे करीत आहे.! आमेन.**

तुम्ही कोणत्या अनुभवाची किंवा भावनांची वाट पाहत नाही. कारण तुम्ही देवाच्या वचनावर खंबीर उभे आहात आणि तुमचा विश्वास आहे की तो बाप्तिस्मा तुम्हाला मिळत आहे. तुम्ही विनंती केल्यावर व तो बाप्तिस्मा मिळाल्यावर तुम्ही देवाची स्तुती करण्यास सुरुवात करा. व देवाच्या अभिवचनानुसार त्याने तुम्हाला पवित्र आत्म्याचा अभिषेक केला आहे यासाठी त्याचे आभार माना.

जेंव्हा तुम्ही प्रार्थना करता तेंव्हा तुम्हाला बाप्तिस्मा मिळाला हे समजून घ्या. त्यासाठी पुरावा देण्याची गरज नाही. देवाचे वचन हाच पुरावा आहे.

*"जे काही तुम्ही प्रार्थना करून मागाल ते तुम्हाला मिळालेच आहे असा विश्वास धरा म्हणजे ते तुम्हास प्राप्त होईल.*

—मार्क 11:24ब

हे झाल्यावर देवाची भक्ती करण्यासाठी काही वेळ घालवा. देवाचा आत्मा तुम्हाला मोकळीक देईल व तुमच्या प्रार्थनेच्या भाषेत स्वतःला प्रगट करील. देव तुमचे तोंड उघडणार नाही तुम्हाला ते उघडावे लागेल की जेणेकडून तुम्ही अन्य भाषेत प्रार्थना कराल. या वेळी काही जणांना हलल्या सारखे किंवा तटस्थ, ताठ असल्यासारखे जाणवते

जेंव्हा तुम्ही उपासना करीत राहाल तेंव्हा देवाच्या आत्म्यासमोर नम्र व्हा. तुम्हाला जाणवू लागेल की काहीतरी वेगळे आवाज किंवा शब्द तुमच्या आत्म्या मधून येत आहेत. त्या आवाजा पुढे नम्र व्हा. हे करतांना देवाचा आत्मा तुमच्यासाठी मोकळा केला जाईल व ते प्रमाण वाढत जाईल.

जर त्या क्षणी तुम्ही अन्य भाषेत प्रार्थना करू शकत नसाल तर काही हरकत नाही. ही गोष्ट तुमच्या विश्वासाने मिळाली म्हणून त्याने तुम्हाला अभिषेक केल्यामुळे त्याचे आभार मानत राहा. मला माहित आहे ही काही लोकांना पवित्र आत्म्याचा बाप्तिस्मा मिळाला आणि घरी जात असतांना ते आत्म्यात प्रार्थना करू लागले. किंवा दुसऱ्या दिवशी अंघोळ करतांना प्रार्थना करू लागले. किंवा काही दिवसानंतर त्यांच्या अंगणातील गवत कापतांना आत्म्यात प्रार्थना करायला सुरुवात केली. महत्वाचा मुद्दा म्हणजे तुमचा "विश्वासाने अभिषेक होणे," फक्त भावनांनी नाही. तुमच्या रोजच्या जीवनात आत्म्याने प्रार्थना करण्याची सवय लावा, आणि भरभक्कम प्रर्थानामय जीवन बनवा. देव तुमच्याशी बोलेल आणि तुमच्या सर्व गोष्टींमध्ये तुम्हाला उत्तरे देईल. माझा विश्वास आहे की आत्म्यात प्रार्थना करण्यासाठी तुम्ही वेळ काढाल, आणि देव-राज्य जे तुमच्याजवळ आहे त्याच्या सर्व फायद्यांचा तुम्ही आनंद घ्याल.

# गैरी किसी द्वारा अन्य पुस्तके

पाव र ऑफ़ एलि जेंस (अधीनते सामर्थ)

पावर ऑफ़ रेस्ट (विश्रांतीचे की सामर्थ)

पाव र ऑफ़ स्ट्रेटेजी (कार्यनितीचे सामर्थ्य)

पावर ऑफ़ जेनरॉसिटी

तुमच्या भाषेतील अधिक
मोफत शिक्षण
डाउनलोड करण्यासाठी
**FLNFree.com**
वर जा!

तुमच्या भाषेत अधिक मोफत शिक्षण संसाधने हवी आहेत का?
**FLNFree.com** वर जा

# तुमची वित्तीय क्रांती
## कार्यनितीचे सामर्थ्य

जीवन हे महत्वाच्या निर्णयांनी भरलेले आहे.

*कोणते घर घ्यावे, कोणाशी लग्न करावे किंवा कोणती नोकरी करावी हे तुम्हाला कसे कळेल?*

तुम्हाला यशस्वी व्हायचे असेल तर कार्यनिती किंवा रणनीतीची आवश्यकता आहे. परंतु तुमच्याजवळ उत्तरे नसतांना तुम्ही रणनीती किंवा कार्यनिती कशी तयार कराल.?

**तुमच्यासाठी, तुमच्यापासून देवाचे रहस्य लपविलेले आहे, आणि म्हणून त्यासाठी त्याने तुम्हाला एक गुप्त शस्त्र दिलेले आहे.**

तुमच्या वित्तीय क्रांती या मालिकेतील तिसऱ्या भागात गॅरी किसी त्यांच्या यशाबाबतचा व देवराज्याच्या गंभीर गुपिताचा एक महत्वाचा घटक सांगत आहेत. तो घटक म्हणजे “कार्यनितीचे सामर्थ्य.” कोठे जाळे टाकायचे हे समजले तर कोणीही मासे पकडू शकतो. तुम्हाला आवश्यक असलेले उत्तरे देवाजवळ आहेत पण ती उत्तरे कशी ऐकायची व त्याचे आयुष्यात कसे लागुकरण करायचे हे तुम्हाला समजायला हवे- हीच गोष्ट या पुस्तकात सांगीतलेली आहे.

तर चला,या डोळे उघडणाऱ्या प्रवासात गेरी सोबत जाऊ या, आणि तुमच्या जीवनात ‘कार्यानितीचे सामर्थ्य’ कसे लागू करायचे ते शोधू या.



गॅरी कीसी हे लेखक, वक्ते, व्यावसायिक, आर्थिक तज्ञ आणि पाळक आहेत व लोकांनी जीवनात विजयी व्हावे म्हणून मदत करण्याची त्यांना कळकळ आहे. गेरी आणि त्यांची पत्नी देन्द्रा यांनी अनेक यशस्वी व्यवसाय केलेले आहेत, आणि ते फेथ लाईफ चे संस्थापक आहेत. या संस्थेतर्फे आर्थिक बाबी सोडविणे, जगभरात कॉन्फरन्स भरविणे, आणि व्यावहारिक साधने उपलब्ध करणे या गोष्टी केल्या जातात. कीसी हे कोलंबस, ओहायो, येथे फेथ लाईफ चर्च चे पाळकही आहेत.

GKM GARY KEESEE MINISTRIES
garykeesee.com

तुमच्या भाषेत अधिक मोफत शिक्षण संसाधने हवी आहेत का?
**FLNFree.com** वर जा